# मनोस्वरूप विचार

**(तात्त्विक मनोस्वरूप चर्चा)**

**(Philosophical Discussion about Mind-Existence And Expression)**

**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

**मनोस्वरूप विचार (Manoswarup Vichar)**
**(Philosophy-Psychology)**

**लेखक : प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष- ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रकाशक / मुद्रक**
दिलीप महाजन / गौरी देव / योगिनी आठल्ये
मोरया प्रकाशन
'अनुश्री', ४०/१०, एरंडवणा, पुणे ४११०३८
मो. ९२२३५०१७९७, ८६००१६६२९७
६, 'दिव्यकुंज'. सुदर्शननगर, R10 एम.आय.डी.सी.,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०३
email : info@moryaprakashan.com
web. www.moryaprakashan.com

**प्रथमावृत्ती** : २४ ऑगस्ट २०२१

**© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**

**अक्षरजुळणी** : श्रीपाद कुलकर्णी

मूल्य २००/-

**सद्गुरु चरणी**

# शुभाशिर्वाद

॥ श्रीहरिः ॥

**स्वामी गोविन्ददेव गिरि**
**आचार्य– डी.लिट्. (मानद)**
**कोषाध्यक्ष,**
**श्रीरामजन्मभूमि तीर्थक्षेत्र (न्यास),**
**अयोध्या**

'धर्मश्री', सूर्यमुखी दत्तमंदिर के समीप,
पुणे विद्यापीठ मार्ग, पुणे ४११०१६
दूरभाष : (०२०) २५६५२५८९
फॅक्स : (०२०) २५६७२०६९
swamigovindgirijigmail.com

## मना करा रे प्रसन्न

अगदी किशोरवयापासून मला श्रीमद् भागवताच्या ज्या काही श्लोकांचे विशेष आकर्षण निर्माण झाले त्यातील एक महत्त्वाचा श्लोक म्हणजे –

**दानं स्वधर्मो नियमो यमश्च**
**श्रुतं च कर्माणि च सद्व्रतानि ।**
**सर्वे मनोनिग्रहलक्षणान्ता**
**परो हि योगो मनसः समाधिः ॥**

हा एकादश स्कंधांतर्गत भिक्षुगीतातील श्लोक होय! तसे पाहिले तर हा संपूर्ण अध्यायच मनाचे महत्त्व प्रभावीपणे रेखाटणारा अध्याय आहे. तरीही भावार्थासोबत या श्लोकातील नादमयता मला विशेष भावत गेली.

याच्या भावार्थाची खोली मात्र वाढत्या वयासोबत वाढत राहून शेवटी तिने या निर्णयापर्यंत पोचविले की हाच मला अध्यात्मशास्त्रातील केंद्रीय मुद्दा वाटू लागला व अभ्यासांती नि अनुभवांती तेच सत्य होय असे गमू लागले. चित्तशुद्धीशिवाय वेदांतशास्त्रात पाऊल पुढे पडत नाही, चित्तैकाग्र्य व चित्तनिरोध यांशिवाय योग नाही असे पातंजलशास्त्र म्हणते. गीतेच्या सहाव्या अध्यायात – ध्यानयोगात अर्जुनाला हाच प्रश्न भेडसावत असल्याचे दिसते.

इंद्रियांचे अनुगमन करणारे मन जीवननौकेची वाताहात करते असे

स्थितप्रज्ञविचारात गीता नोंदवते. या व अशा सर्व संस्कृत शास्त्रे व प्राकृत संत वाङ्मय विस्ताराच्या विहंगमावलोकनाने चाणक्याचे सूत्र **'सर्वं हि शास्त्रं इंद्रियजयः।'** सुदृढ ठरते. इंद्रियजयात ही मनोविजय हाच केंद्रीय मुद्दा ठरतो.

या मनाच्या स्वरूपाचे शास्त्रांच्या अवाढव्य पसाऱ्यात वर्णिलेले व सर्व संतांनी केलेले निरूपण अत्यंत प्रयत्नपूर्वक संकलित करून त्याला व्यवस्थित मांडण्याचे किचकट कार्य नगरचे श्रेष्ठ विद्वान प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी केले असून तद्विषयक 'मनोस्वरूप विचार' आणि 'संत-प्रबोधित मनोस्वरूप विचार' अशी दोन गहन पुस्तके मराठी सारस्वताला बहाल केली आहेत. हे महत्कार्य साधण्यासाठी त्यांनी जो अफाट व्यासंग केला आहे तो स्तिमित करणारा होय! या ग्रंथांचे नुसते अवलोकन ही आश्चर्यचकित करणारे आहे. मननपूर्वक वाचन करण्यास तर खूपच धैर्याची आवश्यकता अपेक्षित आहे. या अत्यंत साक्षेपी दोन साहित्यकृतींबद्दल व्यासंगी लेखकाचे हार्दिक अभिनंदन!

'जडाजडं मनो विद्धि' म्हणजे मन जड ही आहे व चैतन्यमय ही आहे. ते जितके द्रष्ट्याकडे वळते तितके चैतन्यमय होत जाते व जितके दृश्याकडे वळते तितके जड होत जाते असा योगवासिष्ठाचा विचार आहे, म्हणून सर्वांनी अधिकाधिक विचार आत्मस्वरूपाचा किंवा ईश्वराचा करणे श्रेयस्कर होय! म्हणूनच भगवान वेदाने प्रार्थना केली - **'तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु।'** माझे मन पवित्र संकल्पांनी भरलेले असो.

या सखोल ग्रंथांच्या चिंतनाने हीच प्रेरणा सर्वांना लाभेल व सर्वांचे कल्याण साधेल असा विश्वास वाटतो. मैत्रावरुणि अगस्त्य, जातकयज्ञ, अमृतगुटिका व ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा या महत्त्वपूर्ण प्रकाशनानंतर ही दोन दमदार पुस्तके लेखकाची सत्कीर्ति वाढवितील यात शंका नाही.

प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या या व्यासंगाचे व मोरया प्रकाशनचे श्री. दिलीपजी महाजन यांचे हार्दिक अभिनंदन!

आषाढ व. ७ — श्री ज्ञानेश्वरपदाश्रित
युगाब्द ५१२३
दि. : ३०/०७/२०२१



## प्रस्तावना

# स्वरूप विचार

डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचे व माझे अनुबंध काही दशकांचे आहेत. अहमदनगर ही त्यांची कर्मभूमी. तेथील पेमराज सारडा महाविद्यालयातून प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले. योगायोगाने मीही नगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून दशकभर काम केले. नगरसारख्या लहान शहरामध्ये एक लाभ होतो तेथे साहित्य आणि कला या क्षेत्रांत वावरणाऱ्या लोकांची संख्या कमी असल्यामुळे व शहराचा आकारही कमी असल्यामुळे, हे लोक एकमेकांना जवळून ओळखतात. कोणाचे काय चालले आहे, याची खबरबात त्यांना असते. एकत्रित येण्याचे प्रसंगही वारंवार येतात.

साहजिकच सहस्रबुद्धे आणि माझा परिचय झाला. मला ते करीत असलेल्या उपक्रमांमध्येही रस वाटू लागला. त्यातील काही गोष्टी अशा होत्या की त्या किंवा तत्सम काही गोष्टी करणे मला स्वतःला आवडले असते, पण माझ्यामागे मीच लावून घेतलेल्या व्यापांमुळे मला ते शक्य झाले नसते. या गोष्टी सहस्रबुद्धे करीत आहेत असे समजल्यावर मला अर्थातच आनंद होत होता. तसे होणे महत्त्वाचे होते. कोण करतो हा मुद्दा गौण. लोकनिष्ठ अध्यात्मवाद, परम सत्तेचे चिंतन असलेली 'अनंत' ही कादंबरी, संत शेखमहंमद यांच्या साहित्याचे संपादन-प्रकाशन, लोकसाहित्याच्या अभ्यासाला देशी पायावर उभे करणे असे काही उपक्रम सहजगत्या नजरेसमोर येतात. आपण स्वतः म्हणजे मी, त्या मी च्या सभोवतालचा लोकसमूह आणि माझ्यासह वर्तमान हा विशाल समूह जिच्यात नांदत आहे ती भौतिक सृष्टी आणि या जडचेतनाच्या आंतरक्रियांच्यामध्ये अनुस्यूत असलेले अनादिअनंत शाश्वत चैतन्यतत्त्व यांच्यात नेमका काय संबंध आहे हा सहस्रबुद्धे सरांचा चिंतनविषय, स्थायीभाव म्हणण्याइतपत त्यांना चिकटून बसला आहे. अनेक जण असे भेटतात की, त्यांना वरीलपैकी एखाद्या गोष्टीत स्वारस्य

असते व उर्वरित घटकांबद्दल औदासिन्य, प्रसंगी तुच्छता असते. हा संपूर्ण अस्तित्वव्यूहाला त्याच्या आंगोपांगासकट, सामोरे जाऊन आत्मज्ञान करणे हे येऱ्यागबाळ्याचे काम नव्हेच. शिवाय याविषयी चिंतन करणे वेगळे आणि या चिंतनात इतरांना सहभागी करून घेणे, त्याला सामूहिक स्वरूप देणे हे वेगळे. सहसा चिंतनशील व्यक्ती सामूहिक उपसर्गापासून दूर राहाणे पसंत करतात. सहस्रबुद्धे हे अपवाद! त्यांचा परिवार पारनेरकर महाराजांचा पूर्णाद्वैत संप्रदाय, अकोल्याच्या अगस्ती ऋषींशी निगडित असलेल्या संस्था, लोणावळ्यातील स्वामी विज्ञानानंदांचे प्रयोगनिष्ठ अभ्यासक, श्रीगोंद्याच्या संत शेखमहंमद बाबांवर प्रेम करणारा वर्ग, अशोकानंद महाराज कर्डिले यांसारखे वारकरी गणगोत अशा विविध आयामांना स्पर्श करीत विस्तारला आहे. शिवाय महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवरील प्रशासकीय व ॲकॅडेमिक वर्तुळे आणखी निराळी. त्यात सहकारी व विद्यार्थी यांचा समावेश होतो. ते त्याला लोकनिष्ठ अध्यात्मवाद म्हणतात. ती केवळ विचारप्रणाली नसून त्यांची स्वतःची जीवनशैली म्हणण्यापेक्षा जीवननिष्ठा आहे.

काही वर्षांपूर्वी सहस्रबुद्धे यांनी 'अनंत' हे आत्म्याचे दीर्घस्वगत वाटावे अशी कादंबरी लिहिली. मुळात चैतन्यस्वरूप असलेले एकमेवाद्वितीय चैतन्यरूप विविधतेने नटून आपण स्वतःच आपल्या समोर येते आणि या सर्व प्रक्रियेचे जणू ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात सिंहावलोकन करते असा शांत आणि अद्‌भुत रसांची निष्पत्ती करणारी त्यांची साहित्यकृती मला सर्वार्थाने भावली. प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ता हेगेल यांचे तत्त्वज्ञानच कोणीतरी भारतीय तत्त्वज्ञानाच्या चौकटीतून सांगत आहे की काय असे वाटून गेले. खरे तर तो त्यांच्या लोकनिष्ठ अध्यात्माचा तात्त्विक आधार होता.

सहस्रबुद्धे यांचा हा चाकोरीबाहेरील प्रयत्न कितीही स्पृहणीय असला आणि त्यांना तो जितका साधणे शक्य होते तितका साधला असता तरी त्याला एक अंगभूत मर्यादा आहे. दुसऱ्याला मध्ये न आणता एकाच्याच संदर्भात व भाषेत नानात्वाचे स्पष्टीकरण कसे आणि किती करणार. ज्ञानेश्वर महाराजांची 'चांगदेव पासष्टी' हे अशा कृतीचे सर्वोत्तम उदाहरण आहे. संवित्ती नावाच्या एकमेव ज्ञानतत्त्वाच्या आधारे ज्ञानदेवांनी या साऱ्या व्यापक दृश्य पसाऱ्याची उपपत्ती लावली आहे. कालक्रमातील रचनाक्रम ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि पासष्टी असा असल्याचे आपण सर्वच जाणतो. खरे तर तो नदी समुद्राला मिळण्यापासून तिच्या उगमापर्यंत असा उलटा प्रवास आहे. समूर्त विशिष्टांकडून अमूर्त तत्त्व अशी

त्याची दिशा आहे. मात्र तात्त्विक क्रमाचा विचार केला तर ते पासष्टी, अमृतानुभव आणि ज्ञानेश्वरी असा असल्याचे लक्षात येते. पासष्टीमधील संवित्ती हे एक तत्त्व अमृतानुभवात शिव आणि शक्ती असे द्विधा होते आणि ज्ञानेश्वरीत प्रत्यक्ष व्यवहाराच्या पातळीवर त्याचे महाभारत झालेले असते. ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात 'शैव म्हणजे शक्ती' हा संदर्भ अमृतानुभवातील (शिवासह) शक्तीच्या, 'ज्ञानी इयेते संवित्ती' हा पासष्टीतील एकतत्त्वाचा आणि 'आम्ही परम भक्ती । आपुली म्हणो ।।' हा ज्ञानेश्वरीतील जगाच्या नानात्वाला एकत्वात गुंफू शकणाऱ्या भक्तीचा आहे.

शिव आणि शक्ती असे म्हणणे हे एक प्रकारे तत्त्वांचे मानवीकरण किंवा दैवतीकरण आहे असे म्हणता येईल. ब्रह्म आणि माया (वेदांत) किंवा प्रकृती आणि पुरुष (सांख्य) यांना एक तसे म्हणता येणार नाही. 'ब्रह्म' हा शब्द पुलिंगी नसून नपुसकलिंगी आहे आणि 'प्रकृती' शब्द स्त्रीलिंगी असला तर त्याच्याशी समानार्थी असलेला व वापरला जाणारा दुसरा शब्द 'प्रधान' स्त्रीलिंगी नाही. शिव आणि शक्ती मात्र सरळ सरळ (पुरुष) दैवत आणि (स्त्री) देवता यांचा वाचक मानता येतो. खरे तर या तिन्ही जोड्यांच्या विवेचकांनी एकमेकांवर प्रभाव टाकत एकमेकांची उसनवारीही केलेली आहे. (जी वैदिक दर्शनांपुरती मर्यादित नसून बौद्धांच्या एका पंथानेही प्रज्ञा आणि उपाय अशी एक द्वंद्वात्मक जोडी कल्पिलेली आहेच.)

एकीकडे शाश्वत असे अद्वैत तत्त्व आणि दुसरीकडे विश्वातील नानाविध जीवांचा चाललेला नाशिवंत व्यवहार यांच्यातील अंतर कसे भरून काढायचे हा खरा प्रश्न उपस्थित होतो. प्रकृती, माया किंवा शक्ती असे दुसरे तत्त्व मानून काही एक व्यवस्था लावता येते. तथापि यांच्यापैकी कोणतेही तत्त्व आणि त्याच्याशी समांतर मानले गेलेले एकमेव तत्त्व यांच्यातही द्वैत ठरते. ते अनुबंध्य होऊ द्यायचे नसेल तर ते मूल तत्त्व आणि विश्व यांच्यामधील दुसरे तत्त्व यांच्यातही कोणते तरी सेतुतत्त्व (Bridging Principle) हवे म्हणजेच मूळ एकमय तत्त्व (ब्रह्म/पुरुष/शिव) आणि नानात्वाने नटलेले विश्व यांच्यातील दरी सांधण्यासाठी दुसऱ्या एका तत्त्वाला गृहित धरायला हवे. (माया/प्रकृती, शक्ती) मात्र पहिल्या आणि आता गृहित धरलेल्या दुसऱ्या तत्त्वामध्ये काहीतरी संबंधसूत्र असण्याची गरज आहे. असे तत्त्व की जे एकीकडे चैतन्यमय एकमेव तत्त्वाशी आणि दुसरीकडे नानात्वाची क्षमता असलेल्या नानात्वास कारणीभूत ठरलेल्या दुसऱ्या तत्त्वाशी निगडित असणार.

हे तत्त्व म्हणजे मन. मन हे एकीकडे जड तत्त्व आहे म्हणून ते प्रकृतीत मोडते, पण दुसरीकडे ते इतके सूक्ष्म व तरल आहे की त्याला त्या एक मूलतत्त्वाचाच भाग मानण्याचा मोह व्हावा. मूलभूत चैतन्यतत्त्वाचे स्वरूप समजून घ्यायचे असेल तर या मध्यवर्ती मनाच्या माध्यमातून, त्याला हाताशी धरून.

अनिल सहस्रबुद्धे यांनी हा मुद्दा अचूक हेरला आणि त्याचे खोलवर चिंतन केले. त्यांच्या या चिंतनाचे फळ म्हणजे दोन भागांमधील प्रस्तुत पुस्तक पहिला भाग 'मनोस्वरूप विचार' आणि दुसरा 'संत प्रबोधित मनोस्वरूप विचार'. पहिल्या भागात सहस्रबुद्धे स्वतःचे चिंतन मांडतात व दुसऱ्यात त्यासाठी संतविचारांचा आधार शोधतात. पहिल्या पुस्तकासंबंधी ते लिहितात, '' 'मनोस्वरूप' हा शब्द आत्मस्वरूप आणि मन यांचा स्वरूपसंबंध सूचित व्हावा यासाठी योजला आहे. परमात्मस्वरूप आणि सृष्टीस्वरूप व ओघाने मानवी आत्मस्वरूप आणि मनोस्वरूप यांचा थेट स्वरूपसंबंध उलगडावा, असा हेतू ग्रंथमांडणी करताना समोर ठेवला आहे. हा स्वरूपसंबंध महर्षी वेदव्यास यांनी 'भागवतपुराण' आणि 'भगवद्‌गीता' यांतून सूचकतेने मांडला आहे. भगवान पतंजलींनी योगविज्ञानात अनुरोधित केला आहे.''

हा झाला प्राचीन इतिहास. त्याचा, गरज असेल व जमेल तेवढा आधार सहस्रबुद्धे घेतातच, पण त्यांची मुख्य मदार आहे ती ज्ञानदेवांवर! ते लिहितात, ''तोच स्वरूपसंबंध सूचित व्हावा, या सुप्त हेतूने, ज्ञानस्वरूप माऊली ज्ञानेश्वरांनी 'स्वसंवेद्य आद्य आत्मरूप' उद्‌घटित केले आहे. त्याचबरोबर मनोस्वरूप आणि वाणीस्वरूप यांच्यातील स्वरूपसंबंधाचे, व्यापक आणि मर्यादादर्शक विवेचन करीत, आत्मस्वरूप आणि मनोस्वरूप यांचा स्वरूपसंबंध स्पष्ट केला आहे.

सहस्रबुद्धे यांच्या विवेचनातील 'स्वरूपसंबंध' हा शब्दप्रयोग अत्यंत महत्त्वाचा आहे. न्यायशास्त्राच्या लक्षणाची (व्याख्येची) चर्चा करताना तटस्थलक्षण आणि स्वरूपलक्षण असे प्रकार मानले आहेत. तटस्टलक्षणेत सांगितला गेलेला लक्षित गुणधर्म हा अपघाती असतो. तो वस्तूत प्रविष्ट होऊन वस्तूचा अंगभूत झालेला नसतो. त्याच्याशिवाय ती वस्तू अस्तित्वात येऊ शकते, राहू शकते. याउलट स्वरूपलक्षणात वस्तूच्या अशा गुणाकडे निर्देश केला जातो की तो वस्तूच्या अंगभूत आहे. तिच्यात प्रविष्ट झालेला आहे.

'स्वरूपसंबंध' शब्दाचा विचारही असाच करायला हवा. हा संबंध वेदांत्यांच्या अभ्यासाने झालेला अभ्यास किंवा भ्रम नाही. तसेच तो अपघाती,

यादृच्छिकही नाही. तो खरोखरचा अंगभूत संबंध आहे.

आपल्या विवेचनात सहस्रबुद्धे यांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच ओवीतील 'स्वसंवेद्या' या शब्दावर भर दिला आहे. किंबहुना ती ओवी त्यांच्या ग्रंथाचे ध्रुवपद आहे असे म्हटले तरी चालण्यासारखे आहे.

मनाचे हे महत्त्व न्यायवैशेयिक दर्शनांनी त्यांच्या प्रमाणमीमांसेत फार चांगले टिपले आहे. प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे इंद्रिय आणि अर्थ (ज्ञेय वस्तू) यांच्यातील सन्निकर्षातून उद्‌भवणारे ज्ञान हे त्यांचे प्रत्यक्ष ज्ञानाचे लक्षण सर्वज्ञात आहे. त्यानुसार प्रत्यक्ष ज्ञान होते तेव्हा ज्ञानेंद्रिय (उदा. डोळा, कान) आणि ज्ञेय वस्तू (रूप, ध्वनी) यात प्रत्यक्ष संबंध येत असतो, पण ही झाली अर्धी गोष्ट. उरलेली अर्धी गोष्ट ही आहे की, मनाचा आत्म्याशी संबंध प्रस्थापित झाला तरच (प्रत्यक्ष) ज्ञान होईल. आपल्या नजरेसमोर घडणारी एखादी घटना कित्येकदा आपल्याला घडलेली कळतच नाही. डोळा आणि घटना यांच्यात संन्निकर्ष झालेला असतोच, पण मन आणि इंद्रिय यांच्यात तसा संबंध न आल्यामुळे ते ज्ञान आत्म्यापर्यंत पोहचलेले नसते.

मन आणि मनाच्या स्वसंवेद्यतेचा संबंध मानवी जीवनाशी कसा लावायचा या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी सहस्रबुद्धेंचे एक दीर्घ अवतरण देणे उचित ठरावे. ''जीवनानुभूतीचे सुखदुःखात्मक संवेदन भोगताना, त्या पलिकडील शाश्वत आनंदाचे संवेदनही, त्याच जीवनानुभूत अनुभवायाचा प्रयत्न करायचा असे संवेदन झाले; की सुखदुःखात्मक जीवनाचा विसर पडून आपण आनंदमग्न होतो. त्या आनंदाभूतीने जगण्याची उमेद वाढावी, जगण्याचे सार्थक झाले असे वाटावे, किंबहुना त्याच आनंदाभुतीसाठी जीवनातील सुखदुःखाच्या लाटांवर स्वार होऊन; मर्त्यतेच्या मार्गावरून, प्रवासत, मृत्यूच्या कुशीत शिरतानाही; जीवनमुक्ततेचे, आनंदाचे संवेदन अमर्त्यपणे भोगावे असा निश्चय झाला.''

हे सामर्थ्य मानवी जन्मातच मिळते. म्हणून ''नरदेहालाच संवेदित होणाऱ्या, समग्र, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाने, स्वकर्मस्वरूप प्रकटविलेले, नरदेह हे सर्वश्रेष्ठ आश्चर्य आहे.''

अशा स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपशक्तीसाठी 'मन' हा शब्दप्रयोग करण्यात आल्याचे सहस्रबुद्धे सांगतात. ते 'आद्य, स्वसंवेद्य, स्फुरणात्मक आत्मस्वरूप' होय.

अशा प्रकारे मनाच्या माध्यमातून स्वसंवेद्य झालेल्या आत्म आत्मरूपाने

मांडलेला ज्ञानविज्ञान आणि कर्माचा प्रपंच म्हणजेच हे विश्व.

सहस्रबुद्धे यांच्या विवेचनाला ज्ञानेश्वरीत आधार मिळतो. ''अर्जुना, मी हे पहिले । मी तोचि मनाने व्याले ।'' किंवा ''वाया मन हे नाव । एरवी कल्पनाचि सावेव । जयाचेची संगे जीव । दशा वस्तु ।।'' जीवाशी लपंडाव खेळत स्वप्रत्यय घ्यायच्या आत्मतत्त्वाचे माध्यमही मनच आणि हा खेळ खेळता-खेळता आत्मतत्त्वापर्यंत पोहचण्यासाठी जीवाला उपलब्ध असलेले माध्यमही मनच. अशी मनाची ही दुहेरी भूमिका आहे. माणसासाठी मन ही एक 'कनेक्टिव्हिटी' आहे. त्याच्यामार्फत तुम्ही सुखदुःखात्मक कर्मप्रभाव विश्वाकडे जाऊ शकता. त्याच्याच मार्फत तुम्ही स्वसंबंध आत्मस्वरूपापर्यंतही पोहचू शकता. आत्मवस्तूला जीवदशेपर्यंत पोहचवणारे मनच आणि जीवाला आत्मवस्तूचा लाभ करून देणारे मनच.

या प्रक्रियेचे वर्णन करताना सहस्रबुद्धे लिहितात, ''लोकसंबंधी, सामाजिक व्यवस्था, राज्यव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, धर्म, नीती, तत्त्वज्ञान यांचा जीवनाशी संबंध, कला, क्रीडा यांचा जीवनाशी संबंध या मनःपूत मांडणीमध्ये स्वाभाविक आत्मरूप मनाचे, आद्य, स्वसंबंध, आत्मरूप संवेदनापासून एवढे विचलन झाले की, मानव देहाहंकारवश तर झालाच, त्याचबरोबर मनाच्या अस्तित्वाविषयीच्या भ्रामक कल्पना मनाच्या ठिकाणी भासमान झाल्या.''

या 'विचलित मनाला संचालित करणे' हेच अध्यात्म असे सहस्रबुद्धे यांच्या विवेचनातून निष्पन्न होते.

वेदांनी परब्रह्माचे वर्णन करताना अनेक गोष्टी सांगत त्यांचा 'नेति, नेति' म्हणत निरासही केला हे सहस्रबुद्धे निदर्शनास आणतात. ज्ञानोबारायांनी त्याच्या स्वसंवेद्यता या वैशिष्ट्याकडे लक्ष वेधले. ''हे तत्त्व सच्चिदानंदस्वरूप असून ते विश्वोत्पत्तीला कारण आहे; त्याकडे महर्षी वेदव्यासांनी लक्ष वेधले होते. व्यासांच्या ज्ञानाविषयी कृतज्ञता व्यक्त करून, माऊली ज्ञानेश्वर निजरूपाच्या स्वसंवेद्यता या स्वभाववैशिष्ट्याकडे लक्ष वेधतात.''

थोडक्यात सांगायचे म्हणजे आत्मवस्तूचे पहिले स्फुरण म्हणजे मन. या स्फुरद्रुपाकडे सकारात्मकतेने पहिल्यांदा पाहिले काश्मीर शैव किंवा प्रत्यक्षिता दर्शनाने. ज्ञानेश्वरांवर परंपरेने या दर्शनाचा प्रभाव होताच. मात्र नंतर त्यांच्या तत्त्वज्ञानाची महाराष्ट्रातील शांकर वेदांती अभ्यासकांनी ओढाताण करून हा मुद्दाच हरवून टाकला. सतराव्या शतकातील विचारवंत शिवकल्याण यांनी

अमृतानुभवावर नित्यानंदी टीका लिहून या मुद्याचे चांगले विवेचन केले होते. पण नंतर तो मागे पडला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात वारकरी संप्रदायातील थोर दार्शनिक दादा महाराज सातारकर यांनी त्याचे पुनरुज्जीवन करायचा प्रयत्न केला. महाराजांच्या मांडणीला त्यांच्या डॉ. भा. पं. बहिरटांसारख्या शिष्यांनी तात्त्विक चौकटीत बसवायचा प्रयत्न केला. सहस्रबुद्धे यांचा हा प्रयत्न त्यांचा पुढील टप्पा होय. शिवकल्याण, दादा महाराज इ.च्या मांडणीत मानवी जीवनाच्या सामूहिक आणि संस्थात्मक अंगाकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. सहस्रबुद्धे ही उणीव भरून काढताना दिसून येतात. ''या मनोस्वरूपाने सामूहिक जीवनात वर्तन करण्यासाठी कुटुंब या संस्थेपासून विश्वात्मकता येथपर्यंत, संस्थांची उतरणच जणू विश्वात्मक मानवी जीवनासाठी मानवाने निर्माण केली'' असे सहस्रबुद्धे लिहितात. तेव्हा त्यांनी एका ओळीत हेगेलचे तत्त्वज्ञान सांगून टाकलेले असते. हेगेलच्या विचारात पौर्वात्य देशांच्या योगदानाला अजिबात स्थान नाही. त्यात परत हिंदुस्थान आणि महाराष्ट्र यांची विचारणाच नको. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी हेगेलच्या वैगुण्याकडे बोट दाखवून न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी विशेषतः जगाच्या वैचारिक आणि मानवी इतिहासात मराठ्यांनी टाकलेल्या योगदानासंबंधीच्या विवेचनाकडे कसे लक्ष वेधले होते ते निदर्शनास आणले होते त्याची येथे आठवण होते. हेगेलने जे काही लिहिले त्याचे वर्णन Spiritual Anthripology असे करता येईल. पाश्चात्य परंपरेत हा तसा नवा प्रकार नव्हता. मध्ययुगातील संत ऑगस्टाइन वगैरे ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी हा प्रयोग पूर्वी केला होता, पण मुख्यत्वे दैवतशास्त्रीय भाषेत हेगेलने तो तात्त्विक परिभाषेत मांडला असे म्हणता येते. आता सहस्रबुद्धे हा विचार भारतीय दर्शनांच्या अनुबंधाने कसा मांडता येईल याचा जणू वस्तुपाठच रचित आहेत. शंकर रामचंद्र राजवाडे यांनी असा काहीसा प्रयत्न आपल्या नासदीय सूक्तावरील भाष्यात केला होता, पण त्यांचा भर कामशास्त्रावर असल्यामुळे त्यातील क्षमता त्यांच्या स्वतःसह कोणाच्याच लक्षात येऊ शकली नाही. सहस्रबुद्धे यांना कामपुरुषार्थाची चर्चा करण्यात काहीच अडचण नाही. तथापि त्यांचा प्रकल्प व्यापक आहे.

सहस्रबुद्धे यांचा खालील परिच्छेद त्यांच्या विवेचनाचे वेगळेपण सिद्ध करण्यास पुरेसा आहे. ते लिहितात, ''मोक्ष हा पुरुषार्थ दोन स्तरांवर सिद्ध करायचा असतो. एक वैयक्तिक स्तरावर, दुसरा सामूहिक स्तरावर. वैयक्तिक मनोस्वरूपसिद्धी म्हणजे विजनवासात जाऊन परब्रह्मस्वरूप होणे. समाधीमग्नतेने देह विसर्जित

करून, वा विदेही होऊन परब्रह्मस्वरूप अनुभवाने अर्थात निजरूप होणे होय. सामूहिक स्तरावर मोक्ष याचा अर्थ प्रेमपूर्वक निष्काम कर्मतत्परता होय. धर्म, अर्थ आणि काम हे तीनही पुरुषार्थ आधी निरुपिल्याप्रमाणे सामूहिक जीवनात सिद्ध करणे म्हणजेच परब्रह्मस्वरूपाने प्रकट होणे होय. हाच नरदेहाचा खरा मोक्ष होय. यालाच लोकनिष्ठ अध्यात्म असे म्हणतात.''

खरे तर हाच महाराष्ट्रातील ज्ञानदेव ते तुकोबा या संतपरंपरेच्या उपदेशाचा गाभा आहे. याची यथार्थ कल्पना असल्यामुळेच सहस्रबुद्धे यांनी 'संत प्रबोधित मनोस्वरूप विचार' हा दुसरा भाग संतांच्या मनोविचारांसाठी राखून ठेवला आहे.

एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष वेधल्याबद्दल डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**– सदानंद मोरे**

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
ज्येष्ठ भाष्यकार, विचारवंत, तत्त्वज्ञ व साहित्यिक

●●●

# अवलोकन व चर्चा

## संतवचनातून मनोस्वरूपाचे उद्‌घाटन!

हरि ॐ

**संतकृपा झाली । इमारत फळा आली ।**
**ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।**
**नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।**
**जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।**
**बहेणी फडकते ध्वजा । निरूपण आले ओजा ।।**

सर्वसामान्य माणसांनाही भक्तीचा अधिकार असलेला भागवत धर्म, महाराष्ट्रामध्ये संतांच्या कृपेमुळे विस्तारला. या कार्यामध्ये संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकारामांपर्यंत अनेक संतांचे योगदान खूपच मोलाचे आहे. अशा संतांचे कार्य अतिशय समर्थपणे वरील अभंगामध्ये, संत तुकारामांच्या श्रेष्ठ शिष्या संत बहिणाबाई यांनी वर्णन केले आहे. दैनंदिन जीवनामध्ये सर्वप्रकारचे कार्य करीत असताना विठू माऊलीच्या भजनात लीन होऊन आपला उद्धार करण्याचा मार्ग या संतांनी दाखविला. 'नरेचि केला हीन किती नर.. येथपासून नर करणी करे तो नर का नारायण बन जाए...' येथपर्यंतचा प्रचंड आवाका असलेल्या या संतसज्जनांच्या मार्गदर्शनाला तोडच नाही. माणसाचे अवघे जीवन धन्य धन्य करण्याचे कार्य संतांनी लीलया केले आहे.

**आयुष्याचे सार्थक करायचे तर हातून होणारे प्रत्येक कार्य शुद्ध असायला हवे. कर्म शुद्ध होण्यासाठी त्याला प्रेरणा देणारे 'मन' शुद्ध असले पाहिजे. या 'मनाला' शुद्ध राखण्याचा मार्ग संतांनी त्यांच्या अभंगातून दाखविला आहेच. याशिवाय जवळजवळ प्रत्येक संताने 'आधी केले, मग सांगितले' असेच जीवन जगून दाखविले आहे.**

या 'मनाच्या' शुद्धीसाठी, मनाच्या उद्धारासाठी मनाची पताका उंच फडकण्यासाठी संतांनी केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचे कार्य प्रा. डॉ.अनिल सहस्रबुद्धे सरांनी केला आहे. त्यांनी यासंदर्भात दोन ग्रंथ लिहिले आहेत. १. मनोस्वरूप विचार (Philosophical Discussion about Mind – Existence And Expression.) २. संत प्रबोधित मनोस्वरूप विचार (Philosophical Discussion about Mind and its Expression by saints) हे दोनही ग्रंथ म्हणजे मनाचा सर्वांगिण विचार मांडणारे अलौकिक लेखनकार्य आहे. तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून सर्वंकष विचार त्यांनी पहिल्या ग्रंथात मांडला आहे. याच मनाचा अतिशय सोप्या पद्धतीने संतांनी केलेला विचार आणि त्याचे आजच्याही काळात असलेले महत्त्व याची मांडणी त्यांनी दुसऱ्या ग्रंथात केली आहे.
या दुसऱ्या ग्रंथाबद्दल काही विचार मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत.

डॉ.सहस्रबुद्धे यांनी 'संत प्रबोधित मनोस्वरूप विचार' या ग्रंथाच्या मनोगतामध्ये या ग्रंथामागची भूमिका विषद केली आहे. माणसाचा, माणूसपणाचा आविष्कार असलेल्या मनाबद्दल वेद, उपनिषद, गीता यांनी केलेली मांडणी वैविध्यपूर्ण आहे. ही मांडणी अनेकवेळा तत्त्वज्ञानाच्या गहन चर्चेमध्ये गुंतून जाते. या मनाचे स्वसंवेद्य स्वरूपाचे तत्त्वज्ञानात्मक चिंतन 'मनोस्वरूपविचार' या ग्रंथात केलेले आढळते. पण ते चिंतन करून झाल्यावर, ऋषिमुनींना जाणवलेले 'मनोस्वरूप' संतांच्या दृष्टीने कसे होते, याबद्दलचे चिंतन ग्रंथरूपाने मांडणे आवश्यक वाटले. या चिंतनाचे मूर्त स्वरूप म्हणजेच 'संत प्रबोधित मनोस्वरूप विचार' हा ग्रंथ होय. **मनोगतामध्ये ते म्हणतात, ''मध्ययुगीन संतांनी मनोस्वरूप सिद्धीसाठी भक्तीसाधनेचा मार्ग प्रबोधित केला.'' संतांच्या कार्याचे महत्त्व प्रतिपादन करण्याचे आपले उद्दिष्ट या एका वाक्यामध्ये मांडले आहे.**

अशा मौलिक ग्रंथरचनेसाठी दीर्घकाळ चिंतनाची आवश्यकता असते. डॉ.सहस्रबुद्धे यांनी गेली अनेक वर्षे तत्त्वचिंतनामध्ये घालविली आहेत. विज्ञानाची पार्श्वभूमी आणि अध्यात्माची ओढ या दोन्हीचा समन्वय त्यांच्या जीवनामध्ये त्यांनी उत्तमरीत्या घातलेला आढळतो. जीवनप्रेरणा अशा उच्च तत्त्वांनी घडल्याने त्यांच्या हातून होणारे लेखनही केवळ तात्त्विक न राहता अनुभूतीपूर्ण झाले आहे.

**कृतज्ञतेचे भाव :–**

आयुष्याच्या वाटचालीमध्ये काही प्रेरणास्थाने निर्माण होण्याचे भाग्य सरांना लाभले. त्यांच्या 'मनोस्वरूप विचार'या तात्त्विक ग्रंथामध्ये 'मन' या

अस्तित्वाचा विचार करून ग्रंथलेखन करण्याची प्रेरणास्थाने त्यांनी उद्‌धृत केली आहेत. डॉ.सहस्रबुद्धे म्हणतात, ''मनशक्तीचा विकास करता येईल, यासाठी अनेक प्रयोग, अनुभवातून सिद्ध केले आहेत. पू. स्वामी विज्ञानानंद यांनी मनशक्ती विकासावर भर दिला आहे. स्वामीजींनी मन आणि आत्मस्वरूप यांच्या परस्पर संबंधाचा विचार करून, मनोविकास परिपूर्णपणे कसा साधता येऊ शकतो, याविषयी आधुनिक विज्ञाननिष्ठेने आणि प्रयोगसिद्धतेने प्रणाली विकसित केली आहे.'' तसेच त्यांचे प्रेरणास्थान पू.डॉ. रामचंद्र पारनेरकर यांचाही आदरपूर्वक उल्लेख केला आहे. 'पूर्णवाद भूमिकेतून, मोठ्या सूचकतेने जीनवनिष्ठ विचार मांडून, कार्यसिद्धांताला जीवनकलेचे स्वरूप देणारे पू.डॉ. रामचंद्र पारनेरकर यांच्या 'जीवनकला मंदिराचा' प्रकल्पही उल्लेखिलेला आहे.' या दोन्ही ज्ञानमार्गी संस्थांची प्रेरणा 'मनोस्वरूप' ग्रंथलेखनामागे असल्याचे त्यांनी अतिशय नम्रतेने आणि कृतज्ञभावाने म्हटले आहे.

**ज्याप्रमाणे ज्ञानेश्वर माऊलींनी व्यासांचा मागोवा घेत 'भाष्यकाराने वाट पुसतु' असे नम्रपणे निवेदन केले, त्याच भावनेने डॉ. सहस्रबुद्धे सरांनी आपल्या ग्रंथरचनेची प्रेरणास्थाने वर्णन करून कृतज्ञतांजली अर्पण केली आहे.**

हल्लीच्या व्यवहारी जगामध्ये 'दुसऱ्याचे तेही माझेच' असे मानण्याची पद्धत सर्रास आढळते. त्याच जगामध्ये सरांसारखे अपवादही आढळतात, की जे ग्रंथलेखन करतानाही आपल्या प्रेरणास्थानांशी कृतज्ञ राहून ते व्यक्तही करतात.

आता आपण मूळ ग्रंथाकडे वळूया. 'संतांचा मनोस्वरूप विचार' ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात डॉ. सहस्रबुद्धे यांनी विविध संतांनी सविस्तरपणे वर्णिलेल्या मनोस्वरूपाबद्दल सविस्तर मांडणी केली आहे.

**मन म्हणजे काय? :–**

'संतांचा मनोस्वरूप विचार' मांडताना डॉ. सहस्रबुद्धे यांनी 'मन म्हणजे काय?' हे स्पष्टपणे मांडले आहे. मध्ययुगीन संतांच्या अभंगाचा धांडोळा या ग्रंथात आहेच. त्याबरोबरीने त्यांनी वेद, उपनिषदे, गीता यांचाही संदर्भ वेळोवेळी घेतला आहे. अगदी चारही वेदांचे महावाक्य, येथपासून गीतेमधील भगवान कृष्णांचे वचन, याद्वारे मनाचे स्वरूप मांडले आहे. **डॉ.सहस्रबुद्धे म्हणतात, ''मनोस्वरूप विचार, सिद्धांत म्हणून मांडताना 'आत्मस्वरूप' हे मनोस्वरूप अविष्कृत होते, असा स्वरूपसंबंध ढोबळमानाने सिद्धांत बीज म्हणून स्वीकारावा लागतो.''** या मनाचे स्वरूप कसे विस्तारले, त्याचे मूळ कोठे आहे हे सांगताना ते

म्हणतात, ''ही जी स्वसंवेद्य स्फुरणात्मकता आहे, यालाच 'मन' असे म्हणता येते. मन हे असे स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेमुळे, आत्मस्वरूपाच्या स्वरूपसंबंधाने, आविष्कृत होते, म्हणूनच ते मनोस्वरूप होते. आत्मस्वरूप हेच त्याचे मूळ असते.'' **मन आणि आत्मा हे वेगवेगळे तत्त्व नसून ते एकच तत्त्व आहे, असे स्पष्टपणे डॉ. सहस्रबुद्धे मांडतात.**

या ठिकाणी 'मनशक्ती प्रयोगकेंद्राचे' प्रथम चिंतक स्वामी विज्ञानानंद यांच्या 'विज्ञान परिभाषेत गीता' या ग्रंथातील प्रबंध तीन 'मन म्हणजे काय' याचा संदर्भ देणे उचित वाटते. **स्वामीजी म्हणतात, ''मनुष्याला काय हवे आहे याचे उत्तर सोपे आहे, सुख हवे आहे. पण सुख कशाला होते? शरीराला की मनाला, आत्म्याला की आणखी कशाला?'' हा मूलभूत प्रश्न निर्माण करून त्याचे उत्तरही ते पुढीलप्रमाणे देतात. या कोंडीतून विज्ञानाने आता वाट काढली आहे. मानवी घडणीत निसर्गाने जड वस्तूचा वापर केला आहे, हे ढोबळमानाने सत्य आहे. त्यापलीकडे उदा. मानव ज्या जडाशी (शरीराशी) बद्ध आहे, त्यापलीकडे काही वस्तू जागती आहे असे विज्ञानाने आता म्हटले आहे. जडात तथाकथित अचलता, मनात चलप्रेरणा आणि त्यापलीकडे आत्मा मानला तर त्याला पूर्ण अचलता, अशी ही त्रिस्थळी आहे.** येथे स्वामीजींनी जड सृष्टी आणि त्यापलीकडे मन/आत्मा ही प्रेरक शक्ती अशी स्पष्ट मांडणी केली आहे. वेदांताचे अद्वैततत्त्व विचारात घेऊन ते पुढे असेही म्हणतात की, 'कोणी सांगावे, यापैकी एक किंवा दोनच वस्तू सत्य असतील.' पण विज्ञानाच्या चालू मर्यादेत तूर्त हा अखेरचा शब्द ठरला आहे.'**स्वामीजींनी मन आणि आत्मा याचे एकरूपत्व मांडताना म्हटले आहे की 'विकारसहीत अस्तित्व म्हणजे मन आणि विकाररहित अस्तित्व म्हणजे आत्मा. या अधिक स्पष्टपणाने म्हणायचे तर शुद्ध स्वरूपात असतो तो आत्मा, आणि अशुद्ध स्वरूपात असते ते मन.**' नाण्याच्या दोन बाजू असतात, पण नाणे मात्र एकच असते, तसे मन आणि आत्मा दोन स्वरूपे नसून फक्त विकाररहित आणि विकारसहित एवढीच त्याची विभागणी आहे.

थोडे सविस्तरपणे हे मांडण्याचे कारण म्हणजे संतांच्या अनुभवसिद्ध मांडणीला विज्ञानाच्या परिभाषेत मांडणाऱ्या स्वामीजींनी मन, आत्मा याचे केलेले वर्णन महत्त्वाचे आहे. 'प्रकाशवेगाच्या पलीकडे जाते ते मन आणि म्हणून ते अजड' अशी मनाची 'अजड' स्वरूप व्याख्या स्वामीजींनी विज्ञानाचे विविध संदर्भ देत केली आहे. डॉ. सहस्रबुद्धे यांनी जीवसृष्टी आणि मन याची मांडणी केली

आहे, ती मला तरी वरील स्वामीजींच्या तत्त्वमांडणीला पूरक वाटली. डॉ. सहस्रबुद्धे त्यांच्या शब्दात सांगतात की, ''सृष्टीस्वरूप हे आत्मांश किंवा आत्मांशपुंज स्वरूपात जाताना सगुण, साकार, सविकार असा अष्टधाप्रावृतिक रूप + आत्मांश किंवा आत्मांशपुंजरूप = सृष्टीतील रूप, हे सूत्र ध्यानात ठेवावे लागते.'' जडसृष्टी आणि चेतनसृष्टी या व्यवहारी जगातील अनुभवाला येणाऱ्या तत्त्वांबद्दल ही मांडणी खूप महत्त्वाची आहे.

**अध्यात्म आणि विज्ञानाचा मेळ :-**

स्वामी विज्ञानानंद यांनी 'मना'चे स्वरूप वर्णन करताना विज्ञानाप्रमाणेच संतांच्या अभंगांचाही आधार 'संतसंगती' या ग्रंथात केला आहे.

संत तुकाराम महाराजांच्या 'मन करा रे प्रसन्न' या अभंगाचे विवरण करताना ते म्हणतात, 'मनाची समाधानी स्थिती हाच मोक्ष असतो. मोक्ष म्हणजे मुक्ती. मला सुख मिळेल का? ते टिकेल का या भयापासून मुक्ती हवी.' 'नको नको मना गुंतु मायाजाळी' या अभंगात विकारांच्या मायाजाळापासून मुक्ती सुचविली आहे. संत एकनाथ महाराज 'मनोभाव जाणोनि माझा । सगुणरूप धरिले वोजा ।' या अभंगात वरवरच्या पूजेच्या उपचारांपेक्षा शुद्ध आणि मोकळ्या मनाचे महत्त्व सांगत आहेत. तर 'माझे मन अतिचंचल, त्यासी बांधा तुम्ही सबल' या अभंगात मनाचे अधिष्ठानच सुखदु:खाला कारण असते, असे सांगितले आहे. 'अंतर मम विकसित करो, अंतर तर हे निर्मल करो, उज्वल करो, सुंदर करो हे' या बंगाली भजनाचा दाखला देत स्वामीजी म्हणतात, 'मन विकसित करण्याची ही भावना सहज आणि सुंदर आहे.' ज्ञानेश्वर माऊलींच्या 'मन मारूनिया मुक्त पै केले । मीपण माझे नेले हिरोनिया' या अभंगाचा संदर्भ देऊन 'मनाचे सामर्थ्य ब्रह्म होण्याएवढे मोठे आहे' असे
वर्णन केले आहे.

थर्मोडायनॅमिक्सच्या नियमांचा संदर्भ देऊन स्वामीजी म्हणतात 'विषमता ही मूलत: मनाची आहे. जडातील समता या शब्दसंहितेला अर्थही नाही. मनाची समता करणे हीच धर्मसंगति' असे ठामपणे मांडताना ते विज्ञान आणि अध्यात्म या दोघांचाही आदर करतात.

**मना, तुज सगुण म्हणू की निर्गुण रे ।**
**तुज सगुण म्हणो की निर्गुण रे ।**
**सगुण निर्गुण एकु गोविंद रे ।**

**अनुमाने ना अनुमाने ना ।**
**श्रुती नेति नेति म्हणती गोविंदु रे ।**

ज्ञानेश्वर माऊलींचा हा अभंग म्हणजे द्वैत-अद्वैत याबद्दलचे अप्रतिम आणि अतिशय सोपे वर्णन आहे. 'मनाचे' स्वरूप मांडतांना डॉ.सहस्रबुद्धे यांची भावना यापेक्षा वेगळी वाटत नाही. या अद्वैतरूपाचे वर्णन करताना ते म्हणतात, ''मनोस्वरूप मात्र गुणात्मक शक्तीमत्तेने अनुभूत करून घ्यावे लागते. वरवर पाहता जड, अचर, अचेतन असे वाटणारे हे स्वरूपही, त्याच निर्गुणाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक प्रक्रियेतून त्याच्या सर्व गुणात्मकतेसह प्रकटलेले असते. पंचमहाभूते, हे त्या अस्तित्वाचे चलाचलरूप होय.'' अधिक स्पष्टपणाने म्हणायचे झाले तर, निर्गुणाचे अस्तित्व हेच मानवाचे मनोस्वरूप आहे, असे त्यांनी ठामपणाने प्रतिपादन केले आहे.

**ॐ कार स्वरूपा, मनोस्वरूपा! :-**

श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या 'ॐ नमोजी आद्या' या सृष्टीरचनेच्या आद्यरूपाचे वर्णन डॉ. सहस्रबुद्धे यांना मानवी अनुभूतीचे उच्च स्वरूप वाटते. 'एकाक्षर ब्रह्म ॐ कार हेच मानवी मनोस्वरूप, आत्मस्वरूप आहे' याची जाणीव म्हणजेच 'ज्ञानबीजाचा ज्ञानात्मक विस्तार' असे सरांना जाणवते. विश्वाचे चिरंतन अस्तित्व वाणीस्वरूपाने उच्चारणे म्हणजेच ॐ काराचा उच्चार आहे. याच ॐ कारस्वरूपाची अनुभूती 'मनोस्वरूपाने' घेता आली तर जीवनातील अत्युच्च आनंद प्राप्त होऊ शकेल अशी त्यांना खात्री आहे.

**ग्रंथरचनेचे उद्दिष्ट :-**

या ग्रंथरचनेमागे केवळ साहित्यकृतीची निर्मिती असा उद्देश अजिबात जाणवत नाही. ऋषिमुनींपासून साधूसंतांपर्यंत अनेकांनी मानवी देहात मनाचे अस्तित्व हे 'चिदानंद' प्राप्तीचे माध्यम मानलेले आढळते. दैनंदिन जीवनात माणूस षड्विकाराच्या माध्यमातून आणि जडदेहाच्या मदतीने बद्ध होतो. म्हणजेच 'स्व' चे अनंत अस्तित्व विसरतो. **त्या अनंत आत्मस्वरूपाचे अस्तित्व अनुभवून हा भवसागर पार हे करणे हेच जीवनाचे अंतिम उद्दिष्ट तत्त्वचिंतक मानतात. मात्र यासाठी संसाराची कर्तव्ये दूर सारणे हे अभिप्रेत नसावे, तर 'प्रपंच करावा नेटका, तव पाहे परमार्थी' म्हणजेच सर्व कर्तव्यकर्म करीत संसार करण्याचा उपदेश संत करीत असतात.** जीवनातील दोष विवेकपूर्ण ज्ञानाने कमी होऊ शकतात, हे या ग्रंथामध्ये डॉ.सहस्रबुद्धे यांनी संतांची, विविध रचना उद्धृत करून मांडले आहे.

'मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण' या संत तुकोबारायांच्या अभंगाचा दाखला देऊन त्यांनी असार संसाराचे रूपांतर पुरुषार्थपूर्ण जीवनात करण्याचे मर्म सांगितले आहे.

**संतांचे जीवन हेच आपले आदर्श :–**

मध्ययुगीन संतांनी त्यांचे त्यांचे प्रपंच आणि कर्तव्यकर्म करीतच साधनेचे सोपान साध्य केले आहेत. संत नामदेव, संत जनाबाई, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत एकनाथ इत्यादी संतांनी आपापल्या संसारात राहून परमार्थ साध्य केला आहे. संत ज्ञानेश्वरादि भावंडांनी पारंपारिक संसारात न पडताही, तत्कालीन समाजाला भक्तिपरायण मार्गातून जीवनमुक्तीचा मार्ग दाखविला. अशा अनेक संतांनी जीवन सफल करणारे अभंग रचून आपल्यावर महान उपकार केले आहेत.अशा संतांच्या वचनांचे डॉ.सहस्रबुद्धे यांनी, त्यांच्या समर्थ लेखणीद्वारे उत्तम दाखले देत देत ही ग्रंथरचना साकारली आहे. उदाहरणार्थ काही दाखले पाहू –

'संत ज्ञानेश्वर माऊलींचे 'ॐ नमो जी आद्या', या वेदांचे प्रतिपादन करणाऱ्या आद्यरचनेने या ग्रंथरचनेची सुरुवात झाली आहे. 'विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले' या अभंगाचा दाखला देऊन मनोस्वरूपाचा आत्मस्वरूपाशी संवाद घडविला. कर्म ज्ञानवान करण्यासाठी मनाने निजस्वरूप होण्याचा निश्चय आणि प्रयत्न हे माऊलींच्या अभंगांचे 'मर्म' उलगडून दाखविले.

संत मुक्ताबाईचा अधिकार फार मोठा. त्यांची अभंगरचना 'मने मन चोरी, मनोमन धरी । कुंडली आधारी सहस्रावरी ।।' या अभंगाचा दाखला देऊन 'मनाने विवेकाच्या आधारे वासनाविरोध करून ध्यान मार्गाने हरिहर स्वरूपाचा अनुभव घेण्याचे' सुचविले आहे.

संत नामदेवांचे कार्य अलौकिकच. त्यांनी श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीचे अभंगाद्वारे केलेले वर्णन, आपल्याला साक्षात त्या प्रसंगापाशी नेते, एक उच्च अनुभूती प्राप्त होते. या नामदेव महाराजांनी केलेले मनाचे वर्णन म्हणजे डॉ. सहस्रबुद्धे यांना 'मनोस्वरूपाला भक्तियोगमार्गे' नेणारे मार्गदर्शन य वाटते. संत नामदेवांचा अभंग 'मन धावे सैरावैरा । मन मारूनि केले एकमोरा ।। मन केले तैसे होय । मन धांवडिले तेथे जाय,' यामधील भौतिकाच्या मागे धावणाऱ्या मनाला एकचित्ततेने आवरण्याचा मार्ग दिसतो. या मनाला 'क्षण एक मना बैसोनि एकांति । विचारी विश्रांती कोठे आहे' हा शांतीचा संदेश सरांना भावतो. संत जनाबाईंच्या अभंगातील 'मना लागो हाचि छंदा । रामकृष्ण हरि

गोविंद' हे भक्तिमार्गाचे सार त्यांना गवसते.

संत कबीरांसारख्या महान भक्ताचा अभंग मनाचा निरोध करण्यास सुचवितो तो अभंग अप्रतिम वर्णिला आहे. त्याच संत कबीरांनी 'शून्यमों बस्त बस्त आगे शून्य देखे देखे न्यारे ।' या अभंगाद्वारे मांडलेला, 'आत्मांश हाच सत्य, परिपूर्ण, सच्चिदानंदस्वरूप आहे' हा दृष्टांत ते आपल्यापर्यंत पोचवितात. संत नरसी मेहता, संत मीराबाई यांच्या हिंदी भजनांचा समावेश 'मनोस्वरूपाचे अगाध रूप' दाखविण्यासाठी सरांनी केला यात आश्चर्य नाही.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समकालीन असणाऱ्या अनेक संतांचे दाखले दिल्यानंतर डॉ. सहस्रबुद्धे, मध्ययुगीन संत एकनाथ, संत तुकाराम महाराज आणि श्री रामदास स्वामी आणि त्यांच्या समकालीन संतांचे अभंगरूपी संदर्भ देतात. भौतिक जगात रमलेल्या मनाला संतांच्या सहवासामुळे मनाच्या शुद्ध स्वरूपाचे आकलन करण्याचा मार्ग या संतांनी दाखविला आहे. संत एकनाथांचा 'मनाचेनि मने जहालो शरणागता । कृपावंत संत मायबाप' हा अभंग तसेच 'मनासी निर्धार केलासे देखा । सतसंग सुखा आतुडलो ।।' अशा अनेक अभंगानी मनोस्वरूपाला संताच्या सहवासासह भक्तिरसाचा आस्वाद कसा प्राप्त होतो याचे वर्णन त्यांनी केले आहे. मनाला संकल्पपूर्वक मनोस्वरूपापर्यंत नेण्याचे कार्य संत एकनाथ महाराज पार पाडतात.

संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांनी तर मनोस्वरूपाचा, पर्यायाने मन:शक्तीचा विकास करण्याचा सहज मार्ग दाखविला, जो आजही महत्त्वाचा वाटतो, त्याचा मागोवा सरांनी घेतला आहे. 'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण । मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।' हा अभंग तणावरहित मनासाठी समाधानाचा सोपान दर्शवितो. सध्याच्या अतिशय धावपळीच्या काळाचे यथार्थ वर्णन संत तुकारामांनी 'रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन' या अभंगाद्वारे केले आहे. जीवनातील संघर्ष संपविण्यासाठी नामभक्तीचा मार्ग विकार, वासना यांना दूर सारून, मनाचे सच्चिदानंदस्वरूप आकलन करणारा हा मार्ग डॉ. सहस्रबुद्धे यांना अतिशय भावलेला आहे. हे आपल्यालाही जाणवते.

या ग्रंथाचा समारोप डॉ. सहस्रबुद्धे यांनी समर्थ रामदास स्वामींच्या मनोबोधाने केला आहे. अतिशय सोपी भाषा असलेले, आचरण करण्यास प्रवृत्त करणारे 'मनाचे श्लोक' ही अतिशय श्रेष्ठ रचना त्यांना जीवनादर्श वाटते.

'मना, सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरि पाविजो तो स्वभावे ।।' या

श्लोकातील मनाचे मूळ स्वरूप सज्जन म्हणजेच परमात्मस्वरूप आहे असे सर म्हणतात. मात्र भक्तिमार्गातील कर्मकांड टाळण्याचा समर्थांचा उपदेश त्यांना खूप भावतो. 'गळा बांधिला पाषाण । आत्मलिंग कोण जाण ।' हा अभंग अथवा 'केली क्रिया ते कळेना । मन विवेके वळेना' हा कोरडा भाव स्पष्ट करणारे वर्णन त्यांनी आवर्जून उल्लेखिले आहे.

समर्थांनी विवेकपंचक अभंगाद्वारे मानवी मनोस्वरूपाचा 'विवेकशक्ती' जागविणारा उपदेश केला आहे.त्यांनी याचा दाखला देऊन 'वासनाविकार कमी करून, सुख, आनंद, समाधान' प्राप्तीचा मार्ग दाखविला आहे.

**'मनोस्वरूप विचार – तात्त्विक चर्चा' – वैचारिक ग्रंथ :–**

संतांचे एकूणच अलौकिक कार्य डॉ. सहस्रबुद्धे यांनी ग्रंथस्वरूपात वाचकांसमोर सादर केले आहे. त्याचबरोबरीने या मनोस्वरूपाचा तत्त्वज्ञानात्मक अभ्यास त्यांनी वरील ग्रंथाद्वारे स्वतंत्रपणे केला आहे. मनाच्या अस्तित्वाचा आणि सामर्थ्याचा विचार अनादिकाळापासून झाला आहे. मानवाचे आत्मरूप मनाच्या रूपाने, नरदेहाच्या माध्यमातून, पंचमहाभूतांच्या सान्निध्यात कसे प्रकटले याचे तत्त्वरूप वेदांमधून वर्णिलेले आहे. उपनिषदातील परंपरेप्रमाणे गुरू–शिष्य संवादाचा आश्रय घेऊन डॉ. सहस्रबुद्धे सरांनी मन:शक्तीचा विकास करण्याची गुरूकिल्ली वाचकांच्या हातात सोपविली आहे.

मन, मनाची शक्ती यांचा विचार तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, वर्तनशास्त्र आणि विज्ञान याद्वारे कसा केला आहे याचा परामर्श या ग्रंथात घेतला आहे. **माणूस जन्माला आला की त्याला देहाची, वासनेची, विकारांची बंधने निर्माण होतात. या संघर्षामधून 'मनाला' सर्वात्मक सच्चिदानंद स्वरूपा, आत्मस्वरूपापर्यंत पुन्हा घेऊन जाण्याचा मार्ग तत्त्वज्ञानाच्या अंगाने या ग्रंथात वर्णिला आहे.**

मानवी जीवनामध्ये मन:शक्तीचा विचार केंद्रस्थानी असतो. बुद्धी, पंचज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये याद्वारे जीवनातील मनाचे प्रकटीकरण कसे होते याचा मागोवा या ग्रंथामध्ये घेतलेला आढळतो. स्मृति, कल्पनाशक्ती/निर्णयशक्ती, ही मनाचीच विविध स्वरूपे आहेत. मनाचा निग्रह करणे, निश्चय करणे, विवेक आणि शहाणपणाची जोड देणे याद्वारे मनाला योग्य वळण लावता येते, मन:शक्तीचा विकास घडविता येतो असे व्यवहारी स्वरूप येथे मांडले आहे.

सदरचा ग्रंथ अभ्यासपूर्ण आहे. एकूणच मनोस्वरूपाचा विचार डॉ. सहस्रबुद्धे यांनी तत्त्वज्ञान आणि संत साहित्य या दोन्ही घटकांद्वारे फारच समर्थपणे

मांडला आहे, असे जाणवते.

**समारोप :–**

चंचल मनोस्वरूपाला त्याच्याच आद्यरूपाचे आत्मरूपाचे ज्ञान झाले पाहिजे. त्यामुळे संसारात राहूनही परमार्थ साधता येतो. मनाचा निरोध करणे, मनाची शुद्धी करणे, मनाला प्रसन्न करून घेणे यासाठी मध्ययुगीन संतांनी केलेले महान कार्य डॉ. सहस्रबुद्धे यांनी 'संत प्रबोधित मनोस्वरूप विचार' या ग्रंथाद्वारे वाचकांपर्यंत पोचविले आहे.

**'मनाचे आत्मरूप हेच त्याचे आद्य आणि अंतिम स्वरूप आहे' असे वर्णन करणारा हा ग्रंथ वाचकांना सुंदर अनुभूती देईल याची खात्री आहे. कर्ममार्ग न सोडता त्याला ज्ञानवान करणे असा संतांचा सहजमार्ग या ग्रंथाद्वारे डॉ.सहस्रबुद्धे यांनी वर्णिला आहे. या कार्यासाठी त्यांचे मनापासून अभिनंदन.**

वेद, उपनिषदकर्ते ऋषी असोत की मध्ययुगीन संत असोत या सगळ्यांनीच मानवाच्या मुक्तीचा केलेला विचार हा या ग्रंथांचा मुख्य आशय आपणही 'मनावर' घ्यावा आणि मनाच्या आत्मरूपाची ओळख करून घ्यावी, यासाठी सदिच्छा !

**– प्रमोदभाई शिंदे**
कार्यकारी विश्वस्त,
मनशक्ती प्रयोगकेंद्र, लोणावळा

●●●

# अवलोकन व चर्चा

## ‘मनोस्वरूप विचार’ या ग्रंथाच्या निमित्ताने

मानवी मन म्हणजे माणसाचा आविष्कार. माणसाचे मन, त्याचे विचार, त्याच्या भावना, हेच त्याचे वर्तन ठरवित असते. म्हणून असे म्हणता येईल की, ‘जसे मन, तसे वर्तन’. मनुष्याच्या; पर्यायाने संपूर्ण मानवजातीच्या उत्क्रांतीमध्ये मनाची भूमिका ही प्रामुख्याने राहिली आहे आणि म्हणून मन कसे आहे?, त्याचे गुणधर्म काय आहेत?, त्याचं स्वरूप काय आहे? याचा शोध हजारो वर्षांपासून म्हणजे अगदी वेदकाळापासून झालेला आपल्याला आढळतो.

प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या ‘‘मनोस्वरूप विचार’’ या ग्रंथात मनाचे अस्तित्व व त्याचे प्रकटीकरण याचा विचार तात्त्विक, आध्यात्मिक स्वरूपात अतिशय सुरेख पद्धतीने मांडला गेला आहे.

आधुनिक विज्ञानाची सुरुवात एका तऱ्हेने सोळाव्या, सतराव्या शतकात गॅलिलियो, न्यूटनपासून झाली असे समजण्यास हरकत नसावी. तेथपासून ते विसाव्या शतकात क्वाँटम मेकॅनिक्सचा उदय होईपर्यंत आधुनिक विज्ञानात मनाबद्दलचा विचार केलेला आढळत नाही. आजही मन म्हणजे काय? त्याची वैज्ञानिक व्याख्या काय? त्याचे शरीरात स्थान कुठे असते? ते शरीरात राहते किंवा शरीराच्या बाहेरही जाऊ शकते का? इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे विज्ञानात नाहीत. पण तीच उत्तरे आज २१ व्या शतकातही अध्यात्मामध्ये सापडतात. इतकेच नव्हे तर मनाची विविध रूपे उदा. मन, आत्मा, परमात्मा, भावना, स्फूर्ती इत्यादी बारकाव्यांचा शोध हा अध्यात्मात घेतलेला आढळतो. मनाच्या स्वरूपाची ही मांडणी त्या त्या वेळच्या वेगवेगळ्या संतांनी त्यांच्या अभंगात, लेखनात केली आहे. ही मांडणी अखिल भारतवर्षातल्या सर्व प्रदेशातल्या संतांनी, साधूंनी केली आहे.

प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या ''संतप्रबोधित मनोस्वरूप विचार'' या दुसऱ्या ग्रंथात अतिशय सुंदर रितीने केली आहे. त्यामध्ये सद्गुरू ज्ञानेश्वर माऊली, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कबीर, संत नरसिंह मेहता, संत मीराबाई, येथपासून ते संत चोखामेळा, संत बंका, संत शेख महम्मद, संत एकनाथ, संत तुकाराम, ते अगदी संत समर्थ रामदासस्वामी, या सर्वांनी केलेला मनस्वरूपाचा आविष्कार या ग्रंथात दिला आहे.
''अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग ।।'' – संत सोयराबाई
''मनाचे मनपण सांडितां रोखडें । अंतरींचें जोडे परब्रह्म ।।'' संत नामदेव
''मने मन चोरी मनोमय दरी । कुंडली आधारी सहस्त्रदरी ।।'' संत मुक्ताबाई
''मना सज्जना भक्तीपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे ।।'' संत समर्थ रामदासस्वामी अशा अनेक संतांची मानवी मनाला दिलेली शिकवण सूत्ररूपाने या ग्रंथात दिलेली आहे.

''मनोस्वरूप'' ग्रंथलेखनाची प्रेरणा या 'क्षेत्र आणि संस्थांच्या चिंतनातून मिळाली आहे' असा उल्लेख प्रा. डॉ. सहस्रबुद्धे त्यांच्या मनोगतात करतात. त्यांच्या या ग्रंथलेखनाच्या प्रेरणेमागे स्वामी विज्ञानानंद आणि त्यांची मनशक्ती संस्था या नक्कीच आहेत असे त्यांनी नमूद केले आहे. स्वामी विज्ञानानंद यांच्या या संन्यासोत्तर नावाचा खुलासा करताना म्हणत असत, 'विज्ञानात आनंद घेणारे म्हणून विज्ञानानंद'. त्यामुळे पूज्य स्वामीजींनी प्रत्येक गोष्टीला शक्य तेवढी विज्ञानाची जोड दिली. त्यांनी मनशक्ती केंद्राची स्थापना केली व मनाचा अभ्यास वैज्ञानिक तऱ्हेने करण्यावर भर दिला. वैज्ञानिक दृष्टिकोनात सर्वप्रथम जी गोष्ट येते ती म्हणजे त्या वस्तूची व्याख्या करणं आणि मनाबद्दलचा विचार करताना त्यांच्या असे लक्षात आले की, आधुनिक विज्ञानाकडे मनाला मानणारी अशी मनाची व्याख्याच नाहीये! म्हणून त्यांनी प्रथम जे काम केले ते म्हणजे वैज्ञानिकांना मान्य असू शकणारी, वैज्ञानिक भाषेत मांडली जाणारी अशी मनाची व्याख्या केली. ही व्याख्या स्वामीजींनी केवळ जडवादी दृष्टिकोन बाळगणाऱ्या त्यावेळच्या (१९६०) रशियन शास्त्रज्ञांसमोर ठेवली. कारण जडवादी वैज्ञानिक मनाचे अस्तित्वच नाकारतात. ह्या जगात जड (matter)आणि फक्त जडच आहे अशी त्यांची धारणा. त्यावेळी झालेल्या पत्रव्यवहारात स्वामीजींच्या या व्याख्येबद्दल त्यांना त्रुटी दाखवता आली नाही. ती व्याख्या अशी, ''प्रकाशवेगापलिकडे जे जाऊ शकते त्याला मन असे म्हणतात.'' सदर व्याख्येचा आधार स्वामीजींनी इयान पावलॉव्ह आणि अल्बर्ट

आईनस्टाईन यांच्या संशोधनाचा घेतला होता. आईनस्टाईनच्या सुप्रसिद्ध $E=mc^2$ या सूत्रानुसार कुठलीही जडवस्तू (matter) प्रकाशाचा वेग ओलांडू शकत नाही. (प्रकाशाचा वेग दर सेकंदाला ३ लाख कि.मी. आहे) हा वेग कुठल्याही जडवस्तूला गाठता येत नाही, कारण तो गाठला की त्या वस्तूचे वस्तूपणच नाहीसे होऊन जाते व ती वस्तू शक्तीस्वरूप (energy) होऊन जाते. पण मानवी मन मात्र प्रकाशाचा हा वेग कैकपटीने ओलांडू शकते. सूर्याकडून निघालेला किरण पृथ्वीवर पोहोचायला प्रकाशाच्या वेगानेसुद्धा सुमारे ८ मिनिटे लागतात, पण मन मात्र क्षणार्धात काल संध्याकाळी बघितलेला सूर्यास्त लगेच आठवू शकते, डोळ्यासमोर आणू शकते. आधुनिक विज्ञानाच्या भाषेत चपखल बसू शकेल अशी ही मनाची व्याख्या स्वामीजींनी १९५८ साली त्यांच्या प्रबंधात मांडली.

केवळ जडवादी विचार करणारे वैज्ञानिक किंवा जे दिसतं तेवढंच सत्य आहे, असे मानणारे अभ्यासक आजही मनाचे अस्तित्व मानायला तयार नाहीत. कारण ते दिसत नाही, दाखवता येत नाही. आधुनिक वैद्यकशास्त्र आता या निष्कर्षाप्रत आले आहे की, व्यक्तीला होणाऱ्या आजारांपैकी ९०%हून अधिक आजार हे मनोकायिक (psychosomatic) आहेत. म्हणजेच ९०%हून अधिक रोगांची कारणं ही त्या व्यक्तीच्या मनामध्ये दडलेली असतात. असे असून सुद्धा आधुनिक वैद्यकशास्त्रात ना मनाची व्याख्या सापडते, ना त्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे औषध दिले जाते. पण आता हळूहळू का होईना, रोगांचा संबंध मनाशी जोडला जाऊ लागला आहे, हे ही नसे थोडके! पूर्ण जडवादी दृष्टिकोनात तर मनाचे अस्तित्वच नाकारले आहे. त्यांनी मनाची व्याख्या अशी केली – Mind is the highest product of matter – काही शास्त्रज्ञ तर मेंदूलाच मन समजतात. पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांचा जर का आपण विचार केला तर मनाबद्दलचा विचार अगदी सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटलपासून आढळतो. १७ व्या शतकात रेने देस्कार्ट या फ्रेंच तत्त्वज्ञाने मनाबद्दलचा एक वेगळा विचार मांडला. त्याने मनाचा संबंध जाणिवेशी जोडला. मन म्हणजे आंतरीक जाणिव व बाह्य जाणिव असणारी गोष्ट आहे. मेंदू हा त्यापासून वेगळा असून तो बुद्धीमत्तेचा पाया आहे. थोडक्यात मन आणि मेंदू ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत असे त्याने मांडले. देस्कार्टची ही तात्विक मनाबद्दलची बैठक ''द्वैतवाद'' म्हणून नावाजली गेली.

देस्कार्टने जोडलेला मनाचा जाणिवेशी संबंध हा अतिशय महत्त्वाचा आहे. जाणिव म्हणजे कॉन्शसनेस (consciousness). जाणिव या शब्दाचा अर्थ

पूज्य स्वामी विज्ञानानंदांनी अतिशय वेगळ्या प्रकारचा केला आहे. जाणीव या शब्दाची फोड जाण+इव अशी केली आहे. जाण = ज्ञान, आणि इव = फक्त. म्हणजे जाणिव याचा अर्थ फक्त 'ज्ञान' असलेली मनाची अवस्था आणि यालाच भारतीय तत्त्वज्ञांनी आत्मस्वरूप म्हटलेले आहे.

आत्मस्वरूप ही एक मनाची उच्चतम अवस्था आहे. तत्त्वज्ञानामध्ये मनाला इंद्राची उपमा दिलेली आहे. मनामध्ये विकार असतात, वासना असतात, भावना असतात. जेव्हा मनामधून या सर्व गोष्टी निघून जाऊन मन नितळ व पारदर्शी होते त्या अवस्थेला आत्मस्वरूप म्हटले आहे. थोडक्यात मनाचीच विकार रहितअवस्था म्हणजेच आत्मा. प्रत्येकाच्याच मनामधले विकार जाऊन आत्मस्वरूपी स्थितीमध्ये सर्वांचाच आत्मा एक असतो असे म्हणता येईल.

आज जगभरामध्ये जाणिवेबद्दल म्हणजेच कॉन्शसनेसबद्दल (consciousness) संशोधन चालू आहे. या संशोधनाची व्याप्ती आता फक्त 'तत्त्वज्ञान'या विषयापुरती सीमित न राहता ती मेंदूशास्त्र, मानसशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, संगणकशास्त्र, अशा अनेक शाखांशी जोडली गेली आहे. त्यामुळे मानवी मन म्हणजे काय हे समजून घेण्याची आवश्यकता आज सर्व विषयातील संशोधकांना भासू लागली आहे.

Cognition याचा अर्थ जाणीव किंवा स्वत:ला जाणून घेण्याची प्रक्रिया. ह्याच प्रक्रियेला भारतीय तत्त्वज्ञांनी विशेषत: ज्ञानेश्वर माऊलीने ''स्वसंवेद्या'' असे संबाधले आहे.

पाश्चात्य संशोधकांचा विचार केला तर १९६०च्या सुमाराला ग्रेगरी बॅट्सन (Gregory Bateson) या संशोधकाने मनाचे मानसिक प्रक्रिया असे नामकरण केले व त्यानंतर १९७० च्या सुमाराला मातुराना (Maturana) आणि फ्रांसिस्को वरेला (Francisco Varela) यांनी मनाबद्दलची पूर्व संकल्पना विकसित केली व त्याला ''जाणिवेची सॅन्टिॲगो थिअरी'' (Santiago theory) असे नाव दिले. मनाच्या सॅन्टिॲगो थिअरीप्रमाणे जाणिवेच्या प्रक्रियेमध्ये 'आकलन' (perception), भावना (emotion), आणि वर्तन (behaviour), यांचा समावेश असतो आणि ही जाणिवेची प्रक्रिया कार्यान्वित होण्यासाठी मेंदू किंवा मज्जासंस्थेची आवश्यकता असतेच असे नाही. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, ""In this new view cognition involves the entire process of life - including perception, emotion and behaviour - and does not even necessarily

require a brain & nervous systeam" Ref.page 30, _'The hidden connections" by Fritjof Capra.

याचा अर्थ consciousness किंवा जाणिवेला, किंवा स्वसंवेद्यतेला म्हणजेच स्वत:च स्वत:ला जाणून घेण्याच्या प्रक्रियेला मेंदूची आवश्यकता लागत नाही. पण ती जाणीव शरीरामध्ये कार्यान्वित होण्यासाठी मेंदूची आवश्यकता लागते.

कार्टेशियन पद्धतीप्रमाणे (Cartesion characterization) म्हणजे मन, शरीर द्वैतवाद ह्या संकल्पनेप्रमाणे मनाला ''विचार करणारी वस्तू'' असे संबाधले जाते. अलिकडल्या संशोधनात सँटिॲगो (Santiago) या शास्त्रज्ञाने वेगळीच कल्पना मांडली. त्यांनी असे म्हटले की मन म्हणजे विचार करणारी वस्तू नसून ती जाणिवेची प्रक्रिया आहे. मेंदू मधून ही प्रक्रिया साकारली जाते. मन आणि मेंदू यांचा संबंध, प्रक्रिया आणि ती साकारणारी रचना म्हणजेच मेंदू असा आहे.

मन किंवा जाणिवांचे देहाव्यतिरिक्त अस्तित्व असते. असा विचार रेने डेस्कार्ट, इमॅन्युअल कांट व कार्ल जुंग इत्यादी पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनी केलेला आढळतो. त्यांच्या म्हणण्यानुसार माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याला वंशपरंपरेने काही गोष्टी मिळतात. त्याचप्रमाणे जाणिवांचा किंवा मनाचा काही भाग हाही त्याला मिळतो. त्यालाच कार्ल जुंगने archetype असे संबोधले आहे. विशेष म्हणजे अशाच प्रकारचा दृष्टिकोन आणि निष्कर्ष अलिकडल्या न्यूरोसायंटिस्ट व न्यूरोसर्जन्सनी काढलाय. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मानवी मनाची किंवा जाणिवांची व्याप्ती मेंदूच्याही पलिकडली आहे. म्हणजेच जडाच्याही पलिकडली आहे.

मन म्हणजे काय? याचा शोध घेताना वैज्ञानिकांना न्यूटोनियन मेकॅनिक्सची मर्यादा (न्यूटनच्या गतिविषयक नियमांची मर्यादा) लक्षात आली. त्यानंतर २० व्या शतकात विकसित झालेले क्वाँटम मेकॅनिक्स (जडाच्या सूक्ष्म भागात म्हणजे अणुच्याही मध्ये असणारे इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, न्यूट्रॉन इत्यादी यांचा नियम शोधणारे शास्त्र) विकसित झाले. या सूक्ष्म शास्त्रामार्फत मनाचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. कारण सूक्ष्म पातळीवरचे, अणुरेणू पातळीवरचे नियम हे आपल्या कल्पनेपेक्षाही वेगळे आहेत. युजिन वेगनर, फ्रिमन डायसन, डेव्हीड चाल्मर, रॉजर पेनरोज, अशा अनेक शास्त्रज्ञांची नावे या संशोधनाशी जोडली आहेत. अणुभोवती फिरणारा इलेक्ट्रॉन हा जसा स्वैर, स्वच्छंदी फिरत असतो, त्या इलेक्ट्रॉनला सुद्धा मन असावे

अशी एक शक्यता वैज्ञानिक ताडून पहात आहेत. तंत्र व शास्त्र अजूनही प्रगत होत जातील पण आज तरी मन म्हणजे काय? हा वैज्ञानिकांच्या लेखी ''बिग क्वेश्चन'' म्हणूनच याची नोंद आहे. हापूसच्या आंब्याची मी चाखलेली चव (qualia) मेंदूत कुठे निर्माण होते? कशी निर्माण होते? हे आज तरी गूढ आहे.

या सर्व पार्श्वभूमीचा आपण अभ्यास केला तर असे लक्षात येते की भारतीय तत्त्वज्ञानात याचा सखोल अभ्यास व मांडणी केली आहे. प्राध्यापक, डॉक्टर अनिल सहस्रबुद्धे सरांनी ''मनोस्वरूप विचार'' या ग्रंथात मनाचे विविध पैलू आपल्याला उलगडून दाखवले आहेत. मनाच्या गुणधर्माबरोबरच मनाला शक्ती देणाऱ्या मंत्र आणि तंत्र आणि साधना याही समजून सांगितल्या आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये ३३ कोटी देवतांचा उल्लेख आहे. अशा दैवतांचा मनशक्तीशी कसा संबंध आहे?, गुरुशिष्य परंपरा, कर्मगति, अशांसारख्या अनेक अध्यात्मिक गोष्टींची उकल व संबंध सोप्या तऱ्हेने दाखवून दिलेले आहेत.

विश्वातली आदिशक्ती म्हणजे शिव, व त्याचे प्रतिकरूप म्हणजे ॐ. कैलास माथ्यावर राहणाऱ्या शिवशक्तीचे ॐ स्वरूपातील दर्शनाचा अविस्मरणीय योग श्री. सहस्रबुद्धे सरांना आला, हे त्यांच्या मनातील श्रद्धेचेच लक्षण आहे. मनाला आत्मस्वरूपाकडे नेणारी, स्वसंवेद्य बनविणाऱ्या त्यांच्या या कलाकृतीस माझ्या हार्दिक शुभेच्छा !!!

**– ग. श्री. केळकर**

वैज्ञानिक संशोधन प्रमुख व विश्वस्त

मनशक्ती प्रयोग केंद्र लोणावळा

●●●

# स्वसंवेद्यता

'मनोस्वरूप विचार' हा ग्रंथ विचक्षण वाचक, जाणकार, चिंतक आणि अभ्यासकांना सादर करताना, आनंद वाटतो. मन म्हणजे नेमके काय? हा प्रश्न, मानवी मनाला, अनंतपणे, मनाने विचारलेला प्रश्न आहे. अवघे तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि वर्तनशास्त्र असा प्रवास, या प्रश्नाचा खल करण्यासाठी घडला आहे. 'मन', या अस्तित्वाचा विचार, स्वरूपसंबंध विचारात घेऊन; या ग्रंथात करण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला आहे. स्वरूपसंबंध म्हणजे एक आणि त्यापासून निर्माण झालेले दुसरे किंवा पुढचे स्वभावगुणवैशिष्ट्यांसह तंतोतंत त्याचसारखेच नव्हे; तर स्वभावतः तेच असणे होय. एक आणि एक हे एकच असणे होय. अंश किंवा अंशपुंज रूपातही स्वभावगुणवैशिष्ट्यांसह, ते एकच असणे होय. जलाचा अणुरेणुपेक्षाही सूक्ष्म अंशबिंदू जलत्वच प्रकट करतो, तसे हे एकच असणे असते.

'मन', या अस्तित्वाविषयी, अनेक प्रकाराने मांडणी झाली आहे. 'मन' या अस्तित्वाच्या, अनेक शक्तींचा, पृथक पृथक प्रकारे, स्वरूप आणि प्रक्रियाविषयक विचार झाला आहे. मानसशास्त्र ही स्वतंत्र ज्ञानशाखा, तत्त्वज्ञान या ज्ञानशाखेच्या बरोबरीने विकसित झाली आहे. शिक्षण प्रक्रियेत मानसशास्त्राचा विशेष अभ्यास करण्याकडे कल आहे. मनःशक्तींचा विकास कसा करता येईल; यासाठी अनेक प्रयोग, अनुभवातून सिद्ध केले आहेत. पू. स्वामी विज्ञानानंद यांनी मनःशक्ती विकासावर भर दिला आहे. शारीर आणि मानसिक विकासाला अनुकूल आणि उपयुक्त प्रयोगांची मांडणी केली आहे. मन आणि आत्मस्वरूप यांच्या परस्पर संबंधाचा विचार करून; मनोविकास परिपूर्णपणे कसा साधता येऊ शकतो; याविषयी आधुनिक विज्ञाननिष्ठेने आणि प्रयोगसिद्धतेने प्रणाली विकसित केली आहे. असाच मनोस्वरूप आणि आत्मस्वरूप यांच्या स्वरूपसंबंधाचा विचार, 'पूर्णवाद' भूमिकेतून पू.डॉ. रामचंद्र पारनेरकर यांच्या प्रबंधात आणि प्रबंधाच्या

अनुबंधाने त्यांनी मांडलेल्या विविध ग्रंथात प्रथम मांडलेला आहे. तो या लेखनाला प्रेरक ठरला आहे. जीवननिष्ठ विचार मांडून; कर्मसिद्धांताला जीवनकलेचे स्वरूप देत; अखिल मानवी जीवन, मानवी बद्धतेसह, परिपूर्ण सच्चिदानंदस्वरूप, असे ठायीच कसे अनुभवता येईल; याचे, साक्षात अनेक वस्तुपाठ 'जीवनकला मंदिर' प्रकल्पातून तसेच जीवनाच्या सर्व क्षेत्रातील प्रत्यक्ष वर्तन प्रयोगातून पूर्णवादवर्धिष्णू डॉ. विष्णुदास पारनेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उभे केले आहेत. वरील दोन्ही, अभूतपूर्व ज्ञानमार्गी संस्था, भारतीय परंपरांतील योगविज्ञान, भक्तिमार्ग, कर्मविज्ञान, या संबंधात भौतिकविज्ञाननिष्ठेने, श्रद्धा जागवित, मानवी जीवन कल्याणाचा मार्ग प्रशस्त करीत आहेत. या दोन्ही संस्था, तत्त्वज्ञ आणि प्रणाली यात ह्या स्वरूपसंबंधाचा स्वतंत्रपणे विचार झालाही असेल. तो ग्रंथनिविष्टही असेल. ते सर्वच लेखन किंवा ग्रंथ माझ्या अवलोकनात किंवा व्यासंगात येणे शक्य झालेही नसेल. ती माझी मर्यादा आहे असे मला वाटते. खरेतर, या दोन्ही प्रेरक संस्था किंवा तत्त्वज्ञच काय; अशा अनेक संस्था, प्रणाली, तत्त्वज्ञ, ऋषी, मुनी, तपस्वी, विचारवंत यांनी हा स्वरूपसंबंध लक्षात घेऊन 'मनोस्वरूप विचार' मानवाच्या येथवरच्या प्रवासात मांडलाही असेल. त्याचा विचार करता मी काही नवे संशोधन किंवा नवे तत्त्वज्ञान मांडतो आहे असा माझा दावाही नाही आणि अभिनिवेशही नाही. 'मनोस्वरूप' ग्रंथलेखनाची प्रेरणा या क्षेत्र आणि संस्थांच्या चिंतनातून मिळाली आहे, हे प्रांजळपणे मांडलेच पाहिजे.

'मनोस्वरूप' असा शब्द आत्मस्वरूप आणि मन यांचा स्वरूपसंबंध स्पष्टपणे सूचित व्हावा यासाठी योजला आहे. परमात्मस्वरूप आणि सृष्टीस्वरूप व ओघाने मानवी आत्मस्वरूप आणि मनोस्वरूप, यांचा थेट स्वरूपसंबंध उलगडावा; असा हेतू, ग्रंथमांडणी करतांना समोर ठेवला आहे. हा स्वरूपसंबंध महर्षी वेदोव्यास यांनी 'भागवतपुराण' आणि 'भगवद्‌गीता' यांतून सूचकतेने मांडला आहे. भगवान पतंजलींनी योगविज्ञानात अनुरोधित केला आहे तोच स्वरूपसंबंध सूचित व्हावा, या सूप्त हेतूने, ज्ञानस्वरूप माऊली ज्ञानेश्वरांनी 'स्वसंवेद्य आद्य आत्मरूप' उद्‌घटित केले आहे. त्याचबरोबर मनोस्वरूप आणि वाणीस्वरूप यांतील स्वरूपसंबंधाचे, व्यापक आणि मर्यादादर्शक विवेचन करीत; आत्मस्वरूप आणि मनोस्वरूप यांचा स्वरूपसंबंध स्पष्ट केला आहे. संत तुकोबाराय आणि संत स्वामी रामदास यांनी मनोस्वरूपसिद्धीचा विचार मांडून; या स्वरूपसंबंधाकडे लक्ष वेधले आहे. 'मनोस्वरूप' या ग्रंथाच्या निमित्ताने 'मन'विषयक चिंतनाच्या सर्व परंपरांविषयी चिंतन करण्याचा

प्रयत्न करीत; व्यवहार आणि तत्त्वज्ञान यांचा परस्परसंबंध विचारात घेत; 'मनोस्वरूप' याविषयीचे चिंतन करण्याचा प्रयत्न आहे.

उपनिषदांनी 'अहं ब्रह्मा अस्मि', 'सोऽहम', 'तत्त्वमसि' अशी महावाक्ये प्रसृत केली आहेत. त्याचबरोबर ''ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।'' या शांतिमंत्राने या स्वरूपसंबंधाकडे लक्ष वेधले आहे. पूर्वसूरींच्या चिंतनाचा, चिंतनपूर्वक अभ्यास करीत 'मनोस्वरूप' उलगडण्याचा येथे प्रांजळ आणि यथाशक्ती प्रयत्न आहे. हे नवे सिद्धान्तमंडन आहे, असा दावा नाही. त्याचबरोबर हे विवेचन परिपूर्ण आहे, असाही दावा नाही. संशोधन ही प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया स्वसंवेद्य स्फुरक सच्चिदानंदस्वरूप, अशी प्रक्रिया आहे, अशी धारणा आहे. या ग्रंथाच्या निमित्ताने, सुहृद जाणकार यांशी संवाद होऊन; चिंतन अधिक प्रकाशमान व्हावे; अशी माफक विनम्र अपेक्षा आहे.

●●●

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मानस | ३ |
| २. | मनोमयता | ९ |
| ३. | सद्गुरू निरुपित मनोस्वरूप विचार | १५ |
| ४. | मन मंडल स्वरूप | ३८ |
| ५. | दैवत-मन-स्वरूपसंबंध | ४५ |
| ६. | मुक्तबद्ध स्वरूपसंबंध | ५६ |
| ७. | आद्य स्वसंवेद्य आत्मरूप - मन | ६५ |
| ८. | कर्मस्वरूपता | ७१ |
| ९. | परब्रह्माचे परिपूर्ण प्राकट्य | ८५ |
| १०. | मनोस्वरूपाचा शक्तीस्वरूप संबंध | ९९ |
| ११. | परमात्मा-जीवात्मा स्वरूपसंबंध | ११८ |
| १२. | जीवात्मा-स्थितीगती- स्वरूपसंबंध | १२७ |
| १३. | मन-वाक्ब्रह्म | १४३ |

# १. मानस

'मानस' पाहिले. संचित फळले. अत्यानंद झाला. धावलो. गोठवत्या पाण्यात झेपावतांना, निमिषार्ध जाणवलेला, गात्र गोठवणारा, गारवा नाहीसा झाल्याचे कळलेच नाही. माणसाच्या कुशीत मनस्वीपणे मत्स्य झालो. मानससरोवरात, हिमवान कैलासापलिकडे, प्रवासणाऱ्या सूर्यनारायणांना अर्घ्य देण्यासाठी आपण उभे आहोत; ही भावना, युगांच्या असलेपणाने, तनमनाला मोहरून टाकीत होती. हंसांचे थवे या प्रसंगाला साक्ष होते. त्रिवार अर्घ्य समर्पित करून; मानसातून विश्वाच्या स्थाणूला आणि तेजाला, मनोभावे वंदन करतांना, मनात अहंकाराचे स्फुरण झाले. प्रत्यक्ष श्रीकृष्ण, परब्रह्म, कैवल्य, अनंत, सार्वकालिक, सर्वव्यापक आत्मरूप महाशून्य, सत्-चिद्-आनंदस्वरूप, असे स्वसंवेदित होणारे त्रिदेव, ब्रह्मा, विष्णू आणि महेशदेखील ज्या मानसात नित्य स्नान करतात; ब्रह्ममानसपुत्र ज्यांतून प्रकटले, सद्गुरू भगवान महर्षी अगस्त्य ज्यांतून प्रकटले, त्याच मानसात, मी स्नान करून पावन होत होतो. मानसातील तीर्थ आणि तळाची वालुका पुन्हा पुन्हा हातात घेऊन; विसर्जित करतांना बालक्रीडेचा केवलानंद घेत, कितीतरी वेळ, मी मानसाचा अनुभव घेत होतो. हा क्षीरसागर, हा मौत्तिकमळा, हे हंसांचे परमधाम! त्यात मी, माझे तन मन, माझे असलेपण अनुभवत होतो. तीर्थवालुकेसाठी सरसावलेल्या ओंजळीत, शिवसाळुंकीसारखा एक अश्म दिसला. कैलासपतींचे आत्मलिंग, हातात आल्याची श्रद्धा जागवली. मनोभावे जपत, मी मानसातून, माणसांत आलो. ते आत्मलिंग जपून ठेवले. 'डारचेन' गावातल्या मुक्कामात रात्रभर त्या दिव्यानुभूतीत गढून होतो.

'अष्टपाद' दर्शन घेतले. कैलास, वृषभ आणि साक्षात विनायकांचे दर्शन घेतांनाच कैलास यात्रा सफल झालेसे वाटले.

यमद्वारातून, कैलासपती, शिवशंकरांच्या कैलास प्रदक्षिणेला सुरूवात होतांना;

यमद्वार ओलांडून पुढे जातो आहोत; ह्या भावनेने अमर्त्यतेच्या वाटेवर, परिक्रमा घडल्याचा अनुभव येत होता. कैलास, गौरीकुंड, यांच्या पायथ्याशी असलेल्या, 'डेरापुग' या छोट्याशा गावी होतो. डेरा म्हणजे मुक्काम आणि पुग म्हणजे पोहोचणे. 'डेरापुग'ला, यात्रेकरूंच्या जथ्थ्यात, मी आणि उषा मुक्कामाच्या ठिकाणी, कैलासनगरीच्या द्वाराशी पोहोचलो होतो. बर्फगार गोठवून टाकणारी थंडी, तेव्हढाच हिमवर्षाव करणारा पाऊस, त्यात हिममय झालेले आम्ही, बऱ्याक म्हणता येईल, अशा निवासस्थानी पोचलो. वरखाली अंगावर आणि भोवती सारेच बर्फगार ओले. त्या बऱ्याकीत निवाऱ्याला गेल्यावर, गारठलेल्या जीवाला बाहेर मावळतीची मजा लुटण्याचेही भान नव्हते. पण मला रावणाची लघुशंका लागावी तसे झाले होते. कसाबसा बाहेर आलो. त्याही अवस्थेत जागा शोधली. लघुशंकेचा आवेग नाहीसा होतांनाच, मेघाच्छादित मावळतीचे रंग दिसू लागले. कैलास पर्वताला पाठमोरा मी, वळून सामोरा झालो आणि...

भली महाकाय शामपांढूर अभ्रे सरकत होती. अवघे अवकाश व्यापून तोलून; हिमवान कैलास, अनंताचा आधारस्तंभ; समाधीमग्न योग्यासारखा दृश्यमान होत होता. अवघा धवल. क्षणात महायोग्याच्या भालपटलावर, आकृती प्रकट झाली. अनंत अवकाशातून प्रक्षेपित आकृती स्पष्ट स्पष्ट झाली. दृष्टी खिळली, आनंदविभोर झाली. मुखातून हाक स्फुरली ''ॐकार'', ''अरे या या लवकर या, कैलासावर ॐकार दिसतोय!'' मी आनंदाने आरोळी ठोकली. बराकी मधून, माझी आरोळी ऐकून, दोन स्त्रिया तीनचार पुरुष धावत आले. स्त्रियांपैकी एक सौ. उषा होती. पुरुषांपैकी दोघे आमच्या चमूला साथ करणारे शेरपा होते. ''साबजी यही दर्शन हैं ।, आपकी यात्रा सफल हुयी'' आम्ही सात जण, अनिमिश नेत्रांनी ॐकाराचे दर्शन घेत होतो. हृदयाकाशात साठवीत होतो. भावसमाधीत अचानक ॐकार स्वरूपातून ध्यानमग्न, प्रसन्न मुखमुद्रा प्रकटली. दर्शन घडले. मी पुन्हा अतीव आनंदाने हाक दिली. ''अरे, पाहा पाहा! मला ध्यानस्त योग्याचा चेहरा दिसतोय! आपल्याला ही?'' ''हो हो! '' सगळे ओरडले. ''साबजी येही शिव है!'' आनंद मावत नव्हता. मावळतीकडून प्रकाश धूसर होत होता. डोळ्यांना धारा लागल्या होत्या. दृष्टी त्या ॐकारस्वरूप मुद्रेवरून हालत नव्हती. पुन्हा महाकाय कृष्णधवल अभ्रे सरकत आली. त्यांनी अवघे दर्शन आक्रमित केले. आमची दृष्टी मात्र खिळलेलीच होती. हलण्याचे नाव नव्हते. अभ्रे आली तशीच पुढे सरकली पुन्हा दर्शन! पुन्हा अभ्रे येतील याचे भान आले. हा क्षण सर्वांना दृश्य

व्हावा म्हणून, ओरडलो ''उषाऽ, फोटो घ्या'' सुदैवाने उषाच्या हातात बरोबर आणलेला कॅमेरा होता. पण व्यर्थ. निरूपयोगी. अतुल काकाणी सरसावले, सुदैवाने त्यांचा कॅमेरा काम करीत होता. त्यांनी मनमुराद फोटो काढले. आम्ही आनंदात न्हात होतो. पुन्हा पुन्हा दर्शन घेत होतो. कैलास आम्हाला, 'ॐकार' स्वरूप सद्‌गुरु शिवांचे दर्शन घडवीत होता. पुन्हा अभ्रे आली. मावळती गडद होऊ लागली. अभ्रांनी अवघ्या कैलासालाच कवेत घेतले. डोळ्यासमोरून दृष्यआनंद हालत नव्हता. मनात जन्माचे सार्थक, कृतकृत्यता दाटत होती. आमच्या चमूत जवळपास ऐंशी लोक होते. साऱ्यांचाच बर्फ झालेला. त्या बर्फपणातून, आम्ही सातहीजण, डोके वर काढून; दर्शन मिळविल्याच्या अहंकाराने बऱ्याकीत शिरलो. बर्फमयतेत उबेचे वस्त्र लपेटले गेले. कैलास पाहिला, ''ॐ''कार पाहिला, ''शिव'' पाहिला. अक्षरशः याचि देही याचि डोळा, परमानंदसुखसोहळा अनुभवला! रात्र या आनंदमग्नेतत सरली. मला आणि उषाला राहवत नव्हते. फटफटले, आम्ही गोठलेपण झटकले. बऱ्याकीतून बाहेर आलो. कैलास अभ्रांत गुडुप होते. अधीर, आशाळभूतपणे पाहात राहिलो, वेड्यासारखे! होय वेडंच ते. आम्ही आमच्यातून निसटलो होतो. कैलासाला कवटाळण्याचा हा प्रयत्न! दोनक्षणच, पण अभ्र विरळ झाले. आणखी थोडे सरकले आणि आम्ही पुन्हा ॐकार स्वरूप शिवांच्या दर्शनाने पावन झालो. पण दोनच क्षण, अभ्रांनी पुन्हा आम्हाला पारखे केले. अभ्रं अधिक गडद झाली. डोळ्यातून धारा थांबत नव्हत्या. त्यांना कवेत घेऊन; आम्हाला झोडपणाऱ्या प्रलयंकर धारा बरसू लागल्या. आम्ही त्याही अवस्थेत पुन्हा पुन्हा कैलासाकडे पाहात बऱ्याकीत घुसत होतो....

मन ॐकार स्वरूप झाले होते. मनोमनी पुन्हा पुन्हा ॐकार प्रकट होत होता.. माऊलींचे शब्द भावाकाशातून स्फुरण पावले

''**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।।**'' ज्ञा. अ. १ ओ. १।।

कैलास मानस प्रदक्षिणा पूर्ण करून परतलो. अलौकिकातून लौकिकात आलो. येणे भागच होते. अलौकिकाला मनात साठवून लौकिकात वावरावेच लागते. अलौकिकाच्या अनुभूतीचा एक परिणाम सतत अनुभवतो आहोत. लौकिकातील अगदी छोट्याछोट्या कर्मपरतेत, अलौकिकाचा धांडोळा करावासा वाटतो. अलौकिकाचे प्रतिरूपच आपण लौकिकात, व्यवहारात अनुभवतो आहोत;

अनुभव क्षणोक्षणी घेण्याचा जणू ध्यास लागला. जणू लौकिकाला अलौकिकाचे परिमाण लाभले; कर्ममय व्यवहारातही नित्यमुक्ततेचा अनुभव घेण्याची चटकच लागली!

जीवनानुभूतीचे सुखदुःखात्मक संवेदन भोगतांना, त्या पलिकडील शाश्वत आनंदाचे संवेदनही, त्याच जीवनानुभूतीत अनुभवण्याचा प्रयत्न करायचा. असे संवेदन झाले; की सुखदुःखात्मक जीवनाचा विसर पडून आपण आनंदमग्न होतो. त्या आनंदानुभूतीने जगण्याची उमेद वाढावी, जगण्याचे सार्थक झाले, असे वाटावे, किंबहुना त्याच आनंदानुभूतीसाठी जीवनातील सुखदुःखांच्या लाटावर स्वार होऊन; मर्त्यतेच्या मार्गावरून, प्रवासात, मृत्यूच्या कुशीत शिरतांना ही; जीवनमुक्ततेचे, आनंदाचे संवेदन, अमर्त्यपणे भोगावे असा निश्चय झाला. हे सामर्थ्य या मानवी जीवनात आहे! हे जगण्याचे सामर्थ्य; हेच मानवी देहाचे परमभाग्य होय. मानवी देह किंवा नरदेह आपण प्रत्यक्ष अनुभवतो आहोत, हीच त्या अलौकिक महासामर्थ्याची, मूल कारणाची नरदेहातील साक्ष होय. नरदेहालाच संवेदित होणाऱ्या, समग्र परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाने, स्वकर्मस्वरूप प्रकटविलेले, नरदेह हे सर्वश्रेष्ठ आश्चर्य आहे! नरदेहाला, समग्र, परिपूर्ण स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाचे संवेदन घडते; हे नरदेहाचे, त्या समग्र परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाचे, प्रतिरूप, स्वरूप सामर्थ्य होय! याच नरदेहाच्या सामर्थ्याने, ते समग्र, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूप, स्वस्वरूपाचे संवेदन भोगत आहे; हेही या नरदेहाच्या, स्वरूप सामर्थ्याला आकलित होत आहे. हे समग्र परिपूर्ण स्वसंवेद्य स्फुरणात्मक असे स्वरूपसामर्थ्य, नेमके कोणत्या संवेदनशक्तीने जाणवते; हा पहिला प्रश्न स्वसंवेद्यतेला पडला. त्या प्रश्नाचे उत्तर त्या स्वसंवेद्य स्फुरणाच्या योगाने नरदेहाच्या संवेदनविश्वात प्रकटले. त्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूप शक्तीला 'मन' असे नाव दिले. या नावामुळेच तर नरदेह माणूस म्हणून मिरवला गेला. मनःशक्तीने माणसाला; समग्र, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूप, सामर्थ्यवान असल्याचे संवेदन, संवेदित केले. याच संवेदनेने माणूस कर्मवान झाला. माणसाचे कर्मवान अस्तित्व; हे त्या मनःशक्तीचे दृश्यरूप आहे. हे दृश्यरूप म्हणजेच, समग्र, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाचे लौकिक स्वरूप होय. अलौकिकाचेच हे परिपूर्ण दृश्य रूप! अलौकिक आणि लौकिक ही अशी एकाच समग्र, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाची, नरदेहाला अर्थात माणसाला जाणवलेली द्विविध रूपे होत.

माणसाचे जगणे, या द्विविध रूपांतील, कोणत्या रूपात सुरू आहे; याचे उत्तर माणसाने, नेहमीच, 'लौकिकात!', असे दिले आहे. अलौकिकाची संवेदना मात्र माणसाच्या ठिकाणी नेहमीच आहे. माणसाला जाणवणारे जिवंतपण हे या संवेदनेची साक्ष आहे; असे वरवर पाहाता वाटले तरी; समग्र परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाची द्विविधरूपात्मकता, ही अपरिहार्य आणि स्वाभाविकपणे माणसाला जाणवते. जगण्यातील ही द्विविधता माणसाला मनोस्वरूपाच्या ठिकाणी संवेदित होते; हेही तेवढेच स्वाभाविक आणि वास्तव आहे. माणसाने, लौकिकाची अर्थात भौतिकाची मांडणी आणि अलौकिकाच्या अनुभूतींची मांडणी, ही देखील 'स्व' अर्थात माणूससापेक्षतेने केली. भौतिक साधनांची निर्मिती व त्यांचा स्वजीवनासाठी विनियोग आणि स्वतःसह अखिल अस्तित्वाची तात्त्विक मांडणी व त्याचा स्वजीवनसापेक्ष विनियोग, असे माणसाने केलेल्या या मांडणीचे स्वरूप आहे. अशी मांडणी करण्याचा, माणसाचा हा खटाटोप अनंतपणे सुरूच आहे. अखिल विश्वाच्या पसाऱ्यात माणूस प्रकटला; त्या क्षणापासून त्याचा हा मांडणी करून जगण्याचा खटाटोप सुरूच आहे. असे करीत असतांना हे आपण का करतो आहोत; हे लौकिक आणि अलौकिक असे अस्तित्व का, केव्हां, कोणत्या कारणास्तव निर्माण झाले आहे; हे सर्व कोणाच्या; की आपल्याच प्रभुसत्तेने, अनंतपणे अस्तित्वात आहे; या व अशा, या विषयीच्या, असंख्य प्रश्नांचे जंजाळ, त्याच्या जिज्ञासेला अर्थात त्याच्या मनाला सतत आव्हान देत आहे. माणसाला पडलेले हे प्रश्न, माणसाने केलेली व करीत असलेली मांडणी आणि माणसाच्या ठिकाणी उद्‌भवणाऱ्या अहंकार यांचे प्राकट्य आणि क्रियान्वितता, या गोष्टींचे प्रेरक कोण? याचेही उत्तर मनोस्वरूप अर्थात मन हेच आहे. हे मन केवळ माणसाच्या ठिकाणीच आहे; की विश्वातील अखिल अस्तित्वाला आहे; असा प्रश्न जेव्हां माणसाला पडला; तेव्हां त्याची ब्रह्मजिज्ञासा शिगेला पोचली. ही ब्रह्मविषयक जिज्ञासा माणसाप्रमाणेच ब्रह्माच्या ठिकाणीही उत्पन्न झाली असावी, याची स्वसंवेद्यता ही माणसाला स्फुरली. माणसाच्या मनाने त्याचाही वेध घेतला आणि तत्त्वज्ञान प्रकटले. लौकिक आणि अलौकिक, अशा सर्वच मांडणीचे श्रेय माणसाने माणसालाच दिले आहे. विश्वातील, अवघ्या विश्वअस्तित्वासह प्रत्येक गोष्ट आपल्या ज्ञान विज्ञान कक्षेत आणून; आपल्याला हवी त्या प्रकारे त्याची मांडणी करता येईल; असा विश्वास माणसाला वाटतो आहे. हे माणसाच्या मनोस्वरूपाचे सामर्थ्य आहे.

हे 'मना'चे अस्तित्व आणि सामर्थ्य, माणसाने ओळखले; हे देखील माणसाच्या मनाचेच सामर्थ्य होय. 'मन' अस्तित्वाचा आणि त्याच्या सामर्थ्याचा विचार; अर्थात मनानेच माणूस अनादीकाळापासून करीत आहे. 'मन' हे माणसाला लाभलेले एक तरल अदृश्य तरी जाणवणारे इंद्रिय आहे; असे मानून; मनाचे 'जड' स्वरूपात आकलन करण्याचा प्रयत्न, प्राचीनतम परंपरांनी केला आहे. 'मन' अजड आहे; अशी अनुभूती काही परंपरांनी प्रस्थापित केली आहे. 'मन' नावाची काही गोष्ट– जड अथवा अजड, अशी काही नसतेच इतके नगण्य ठरविणारे मनोविषयक प्रतिपादन काही तथाकथित विद्वानांनी केले आहे. या सर्व परंपरा न नाकारता, मानसशास्त्राची मांडणी, विश्वातील अनेक महामानवांनी केली आहे. 'एकं सत् विप्रा बहुधा वदंती' या उक्तीच्या आश्रयाने या संकल्पनांना गृहित धरून; 'मन' या गोष्टीचे अस्तित्व आणि सामर्थ्य यांचा, मनःशक्तींनेच मनोस्वरूपाच्या ठिकाणी पुनर्विचार करून; थोडा अधिक प्रकाश 'मन' या गोष्टीवर टाकता येणे शक्य आहे. आजवर मनाविषयीचा विचार मनःशक्तीनेच केला आहे; हे कोणी नाकारण्याचा प्रश्न येऊ नये; असे मनाला वाटते हे मात्र खरे! म्हणून मानसात हंस होऊन मनोस्वरूपाच्या, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाचा, अनुभव अलौकिक अशा नरजन्मात घेत कर्मयोगी असावे; हे नक्कीच, माणसाला वरदान आहे.

मनःशक्तीचा असा अभ्यास करतांना गूढता, अद्भुतता, वासना, वृत्ती, प्रवृत्ती. जन्ममरण प्रक्रियेवरील समग्र सनातन अस्तित्वाचा परिणाम नैतिक विश्वबद्धता, मानवीजीवात्म बद्धता, प्राणीजीवात्म बद्धता, पृथ्वीसह ब्रह्मांडस्वरूप बद्धता या सर्व संबंधाने, जीवन संघर्षचा, श्रेय आणि अश्रेयतेचा विचार करता येतो. मनःशक्तीच्या विकासाचा अभ्यास मनोस्वरूपाच्या सर्वात्मसिद्धी ध्येयाने करता येतो. अंशात्मस्वरूप आणि परमात्मस्वरूप यांच्या स्वरूपसिद्धीचा अनुभव ठायीच मनोस्वरूपाने कसा साधता येतो हेही पाहता येते. मानवी जीवनाचे सार्थ परिपूर्ण स्वरूप या अभ्यासाने अनुभवता येते.

●●●

# २. मनोमयता

आद्य, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप-स्वरूप मनाला, स्वाभाविक स्वसंवेद्य स्फुरणाने, अनेकत्वातील एकात्मतेची जाणीव आहे. सद्-चिद्-आनंद स्वरूप आत्मरूपाला स्वतःतंर्गत, अनेकत्व संवेदित होत आहे. एकल, एकटे अस्तित्व, सद्-चिद्-आनंद स्वरूप, आत्मरूप, अनंत स्वरूप, सार्वकालिक, सर्वव्यापक असलेल्या परब्रह्माला परमात्मा, केवल, महाशून्य, श्रीकृष्ण, अशी नावे, विविध भाषांमधील पर्यायांसह, मानवी मनाने दिली आहेत; त्या एकल परब्रह्माच्या ठिकाणी, त्या अंतर्गत, एकलपणाच्यासह, अर्थात परब्रह्माच्या समग्र गुणात्मकतेसह, हे स्वसंवेद्य स्फुरणात्मक अनेकत्व स्वभावतः जाणवत आहे. परब्रह्म एकल, केवल, समग्र, परिपूर्ण, अनंत स्वरूपात आहे. ते स्वतःचे एकल, केवलपण अबाधित असल्याच्या स्वसंवेद्यतेसह; हे अनेकत्व, बहुत्व, तेवढ्याच गुणात्मकतेसह; परिपूर्ण, स्वसंवेद्य, तरी पृथक स्फुरणासह; स्वाभाविक परब्रह्मस्वरूप, अर्थात सद्-चिद्-आनंद-स्वरूप, आत्मरूपाच्या स्वसंवेद्यतेचे; म्हणजे परब्रह्म्याच्या एकलत्वाचे अनुभवन स्वीकारत आहे. स्वरूपतेने भोगण्याच्या, आतुर, उत्सुक, अनिवार्य ओढीने; पृथकत्वातील स्वसंवेद्यतेस; स्फुरणमग्न, अर्थात कर्मशील अपरिहार्यतेने, स्वसंवेद्यतेसह, ते अस्तित्वात आहे. परब्रह्माची ही स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रिया, आत्मस्वरूप अर्थात मनोमयी आहे.

परब्रह्म्यातील हे अनेकत्व, परब्रह्म्याच्या गुणात्मकतेसह, स्फुरित, सूक्ष्मातिसूक्ष्म आत्मांश किंवा आत्मांशपुंज स्वरूपात, मानवाच्या स्वसंवेद्य, आत्मरूपात्मक, मनाला जाणवते आहे. मानवाने या अनेकत्वाला, आकाशगंगा, तेजोमेघ, तारे, नक्षत्रे, ग्रहमालिका, ग्रह, ब्रह्मांड, सृष्टी, जड, चेतन, भूतमात्र, प्राणीमात्र अशी मनःपूत नावे दिली आहेत; सूक्ष्मातिसूक्ष्म अशांनाही अशी नावे दिली आहेत. यांतील प्रत्येक आत्मांशपुंज अस्तित्वाच्या गुणधर्मांनाही नावे दिली

आहेत. पृथ्वीवरील मानवाने, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप मनाने, अशी नामकरणे करीत; परब्रह्म्याच्या स्वाभाविक गुणात्मकेविषयीच्या अनुभूती, विज्ञान स्वरूपात मांडल्या आहेत. या सर्व प्रक्रियेत मानवी मनाला प्रत्येक अस्तित्वाच्या स्थितीगती आणि परमगतीच्या आत्यंतिक ओढीसंबंधीचे, संवेदन घडत आहे. अंशात्मक व अंशपुंजात्मक, अशा सूक्ष्मातिसूक्ष्म आणि अतिमहाकाय अस्तित्वांची, मानवी मनाने आपल्या स्वाभाविक, स्वसंवेद्य आत्मरूपात्मकतेने, ज्ञान विज्ञानात्मक, मांडणी करण्याच्या परंपरा निर्माण केल्या आहेत. एवढेच नव्हे तर परब्रह्म्याच्या स्वाभाविक, स्वसंवेद्य स्फुरण स्वभावाने, पृथ्वीवरील भूतमात्र आणि प्राणिमात्र अशा जडचेतन पुंज अस्तित्वांची; संयुग, संधी, संघटन, विघटन, परिवर्तन आदि स्फुरणाच्या स्वाभाविकतेनुसार, मांडणी आणि व्यवस्था करण्याचा प्रयत्न, मानवी मनाने सातत्याने केला आहे. मानवी मनाला देखील, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप, सद्-चिद्-आनंद-अनंत, अविनाशी, अशा एकल परब्रह्म स्वरूपाची स्वाभाविक ओढ आहे. मानवी मनाने, आपल्यातील, परब्रह्मस्वरूपातंर्गत, परब्रह्मस्वरूप, अंशात्मक अवस्थेचे, पृथकपणातील, आत्मरूपाचे स्वसंवेद्य स्फुरणात्मक आद्य सच्चिदानंदस्वरूप संवेदन, पूर्णपणे जागृत करून; अंशपुंजात्मक अस्तित्वात, एकल, सर्वात्मक, श्रीकृष्णत्व, अविनाशित्व, स्वसंवेद्यतेने भोगण्याची धडपड केली आहे. त्यासाठी मानवी मनाने स्वतःत, अर्थात पूर्णांशात्मकतेत परिपूर्ण परब्रह्म संवेदित करण्याचे विज्ञानही मांडले आहे.

स्वसंवेद्य आत्मरूपस्वरूपातील, स्वाभाविक स्फुरण प्रक्रिया, जशी एकल अशा अवघ्या सद्‌चिदानंद स्वरूपात सुरू आहे; तशी ती, परब्रह्मांतर्गत, स्फुरित अशा अगणित सूक्ष्मातिसूक्ष्म अंशांत, अंशपुंजात, देखील परिपूर्णपणाने स्वाभाविकपणे सुरू आहे. प्रत्येक अंश अंशपुंज हा एकल परब्रह्माची परिपूर्ण गुणात्मक आत्मस्वरूप स्वसंवेद्य स्फुरणात्मकता अनुभवत असतांनाच; पृथक परिपूर्ण अस्तित्व, परब्रह्मस्वरूप गुणात्मक स्वसंवेद्य स्फुरणात्मकताही अनुभवत असतो. अंशपुंजाचे एक उदाहरण म्हणजे; पृथ्वीचे अस्तित्व मानले; तर त्यातही अगणित अंशपुंज जडचेतन स्वरूपात, पंचभूतात्मक स्वरूपात, पृथक, तरी परिपूर्ण संवेदन अनुभवत आहेत. प्रत्येक अंश, व अंशपुंजाचे अंतर्गतही; सूक्ष्मातिसूक्ष्म अंशपुंज स्फुरत असतात. एकूण परब्रह्म्यांच्या स्वसंवेद्य, आत्मस्वरूप स्फुरणातून, प्रक्रियात्मकतेने, सतत, अंश, व अंशपुंज स्फुरतांना; संघटन, विघटन, पुनर्संघटन, परिवर्तन, संयुग, समुदायक असे अंशपुंज निर्माण होतच आहेत. हीच प्रक्रिया स्फुरित अंश व अंशपुंजांत सतत

सुरू आहेच. म्हणजे अवघेपणाच्या गुणात्मकतेसह, पृथकपणाच्या प्रक्रियेतून प्राप्त अस्तित्व, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने अनुभवतांना; स्फुरण प्रक्रियेत, अंश व अंशपुजात्मक अस्तित्व अनुभूती, संवेदित होतांना; प्रक्रियाग्रस्ततेत, संघर्ष अटळ असतो. हा संघर्ष अनुभवत असतांना, मुळात स्वभावतः, सद्चिदानंद स्वरूप आत्मस्वरूपाच्या, अनंत अविनाशित्वाची, संवेदना बोथट होत असते. ही स्फुरण प्रक्रियाप्राप्त संघर्ष अवस्था असते. हा संघर्ष सर्व स्तरांवर असतो. अंशपुंजांचे पृथक अस्तित्व, स्वसंवेदित आत्मरूप मनाला, अनुभूत होत असतांना; प्रक्रियांतर्गत प्राप्त कर्म म्हणून हा संघर्ष अनिवार्य असा असतो. अंश, अंशपुंज यांचे स्वाभाविक स्वरूप, हे सच्चिदानंदस्वरूप, अर्थात आत्मरूप, अनंत, केवळ असे अवघ्या अस्तित्व स्वसंवेद्यतेचे असल्याने; संघर्षातून पुनर्अवघेपणाची स्वसंवेद्यता तीव्र होते. या स्वसंवेद्यतेला, माणसाने जीवनमुक्तता असे नाव दिले आहे. अंश किंवा अंशपुंज अवस्थेला जीवन असे नाव दिले आहे. स्फुरणप्रक्रियेतील प्रक्रियेला, जन्ममरणप्रक्रियेचे नाव दिले आहे. स्फुरण प्रक्रियेतील संघर्ष हा सर्व स्तरांवर अंश व अंशपुंज यांच्या संदर्भात परस्परावलंबी असतो; कारण मुळात सर्व अंश व अंशपुंज हे सद्-चिद्+आनंद, आत्मरूप, अनंत, अविनाशी अशा एकल, परिपूर्ण, सार्वकालिक, सर्वव्यापक परब्रह्मांतर्गतच आहेत. त्याच गुणात्मकतेने ते पृथकत्व स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप मनाने अनुभवत आहेत.

पृथ्वीवरील समग्र सृष्टीच्या, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप मनोवस्थेचे, मानवी मनाला, स्वसंवेद्य स्वरूपात असे, पृथक तरी सर्वात्मक व सर्वात्मक तरी पृथक, तरीही एकल परिपूर्ण, स्वसंवेद्य आत्मरूपाचे अनुभवन घडले आहे.

सार्वकालिक, सर्वव्यापक, श्रीकृष्ण, सद्-चिद्-आनंद स्वरूप, आत्मरूप, परब्रह्म, परमात्मा अशा निर्गुण, निराकार, निर्विकार, स्वसंवेद्य स्फुरणात्मक अनंत, महाशून्य, कैवल्यस्वरूप अशा, आद्य अस्तित्वांतर्गत, स्फुरण प्रक्रियेतील, समस्त अंश आणि अंशपुंज अस्तित्वांचे देखील, स्वसंवेद्य स्फुरण स्वभावतः सुरू आहे. असे असले तरी; अंश आणि अंशपुंजांचे अस्तित्व, मानवी मनाला आणि ज्ञानेंद्रियांना, अर्थात अंश व अंशपुंजांच्या आत्मरूपाला, स्वसंवेद्यतेने सगुण, साकार, सविकार स्वरूपात, दृश्यमान झाले आहे. या संवेद्यतेची, मानवी मनाने मांडणी करून; अंश आणि अंशपुंजाला जगत, लोक, अशी नावे दिली. त्यांचे, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, नित्य, अशा कर्मपरता, प्रचलन, परिवर्तन, संघटन, विघटन, संयुग, समुदायन, व स्वभाव यांचे वर्णन, विज्ञान स्वरूपात करण्याचा प्रयत्न केला.

या अंश आणि अंशपुंजांचे अर्थात आकाशगंगा, तेजोमेघ, ब्रह्मांड, सूर्यमाला, तारे, ग्रह, नक्षत्रे यांच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक नित्य स्फुरणाचे, अनादी, अनंत, गति, उत्पत्ती, स्थिती, लय, परिभ्रमणविषयक निरीक्षणे, पृथ्वीवरील मानवाने केली आहेत. त्याने पृथ्वी या अंशपुंजाअंतर्गत, स्वसंवेद्य, आद्य आत्मरूप अशा अस्तित्वाच्या, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मस्वरूप मनशक्तीने कल्प मांडले. ते कल्प परब्रह्माच्या अंतर्गत, पृथ्वी हा अंशपुंज, स्वसंवेद्यतेने आत्मस्वरूप स्फुरत आहे; या स्वसंवेद्य अनुभूतीने पारखले आहेत. याच स्वसंवेद्य आद्य आत्मरूपाचा, मनोस्वरूप अनुभव, पृथ्वीवरील मानवाने घेऊन; सर्व अंश आणि अंशपुंजांना गवसणी घालत; निर्गुण, निराकार, सर्वात्मक, निर्विकार; सर्वलिप्त तरी अलिप्त; अशा; सद्-चिद्-आनंद स्वरूप; केवळ, अनंत, महाशून्य अशा परमात्म्याचा अनुभव, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूपाच्या स्वरूपात, मानवी देहाच्या ठिकाणी घेतला आहे.

मानवाच्या आत्मरूप मनाने, नरदेह स्वरूप अर्थात पंचमहाभूते आणि त्रिगुणयुक्त संघटन स्वरूप; ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांच्या साधनाने; अस्तित्वाची संगती लावली आहे. परब्रह्म-ब्रह्मांडे-ब्रह्मांडांतर्गत अस्तित्वे, यांचा पृथक आणि एकात्म स्वरूपसंबंध स्पष्ट केला आहे. माऊली ज्ञानोबारायांनी हा संबंध त्यांच्या सर्वच ग्रंथात प्रकट केला आहे. ज्ञानेश्वरीच्या १४व्या अध्यायात ते म्हणतात, त्याप्रमाणे याला भारतीय परंपरेत द्वैत आणि अद्वैत यांचा स्वरूप संबंध, असे नाव आहे. याच संबंधावर आधारित, सर्व प्रकारच्या विज्ञानाची मांडणी केली आहे. अवघ्या अस्तित्वाची अनंतकाल, अनंतस्वरूप, कर्मप्रक्रियात्मक अवस्थेची मांडणी, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप अशा मनःस्वरूपाने केली. पृथक अवस्थेत सगुण, साकार, सविकार अंश आणि अंशपुंजांच्या, उत्पत्ती, स्थिती आणि लय अर्थात जन्ममरण-चक्रनेमीक्रमाची, संगती लावून; या चक्रनेमीक्रमातही, सद्-चिद्-आनंद-स्वरूप, आत्मरूप, अनंत, कैवल्य, परब्रह्म, परमात्मा, श्रीकृष्ण अस्तित्वाचे अनुभवन, जीवात्म्याच्या ठिकाणी स्वसंवेद्यतेने घडते हे सिद्ध केले आहे. मानवी मनाचे हे आत्मरूपस्वरूपातील स्वसंवेद्य सामर्थ्य, नित्य, स्वाभाविक स्फुरणात्मक प्रक्रियेतील, संघर्षात्मक, परिवर्तनात्मक विचलन, संघटन, विघटन, पुनःप्रकटन, स्वरूपात गतिमान, प्रवाही, अविनाशी जीवन अनिवार्यपणे जगत असतांनाही स्वाभाविकपणे मनाने जाणले आहे. या प्रक्रियेत आत्मस्वरूप मनःशक्तीचे विचलन-

''**तूं जयांप्रति लपसि । तया जग हें दाविसी ।
प्रकटु तैं करिसी । आघवेंचि तूं ।।**'' ज्ञा. अ. १४ ओ. ४।। असे...

स्वाभाविक असते; याची संवेद्यता, मानवी मनाला आहे. हे विचलन, निग्रहपूर्वक बाजूला करून; परमात्म स्वरूपाशी, जीवात्म्याचा, मुळातच असलेला स्वरूप संबंध, स्वभावतः प्रकट करण्याचे सामर्थ्य, ही मानवी आत्मरूप स्वसंवेद्य स्वरूप मनाच्या ठिकाणी आहे. मानवी मनाने मानवी देहाला हा स्वरूपसंबंध अनुभवण्याच्या उद्देशाने अभ्यासाचेही शास्त्र मांडून वळण लावले आहे. या पृथ्वीवरील मानवाने अंशपुंज स्वरूपातील आपल्या पृथक अस्तित्वाला, पृथक अस्तित्व, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने अनुभवत, त्याच स्वसंवेद्यतेने सर्वात्मक, अस्तित्व अनुभवण्याचे सामर्थ्य प्रकटविले आहे. मनोविज्ञान, तत्त्वज्ञान, योगविज्ञान, कृषीविज्ञान, संगीत, शरीरविज्ञान, आयुर्वेद अशी अनेक शास्त्रे मांडली आहेत.

अखिल अनंत काल आणि अवकाश स्वरूपात्मक, सद्-चिद्-आनंद स्वरूपात, आद्य आत्मरूपाच्या ठिकाणी, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेतून प्रकटलेल्या; पृथक, सगुण साकार, सविकार तरी मूळ स्वाभाविक स्वसंवेद्य आत्मरूपात्मक असलेल्या अंश आणि अंशपुंजांच्या प्रचलनाची सूत्रे मानवी मनाने स्वसंवेद्यतेने, विज्ञान स्वरूपात मांडली. त्यात आकर्षण, भ्रमण, जनन, मरण, जीवन अशा अनेकानेक सूत्रांचा समावेश आहे.

पृथ्वीच्या बाबतीत विचार केला तरी मानवी मनाच्या या स्वसंवेद्य आत्मस्वरूप शक्तीचे, अमर्याद शक्तीरूप सहज लक्षात येते. मानवी देहाच्या सहाय्याने आत्मस्वरूप मनाने केलेल्या कार्य प्रक्रियेचे वर्णन, श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील पंधराव्या अध्यायात, 'पुरुषोत्तम योग' यात स्पष्ट केले आहे–

''**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।
अधिष्ठाय मनाश्चायं विषयानृपसेवते ।।**''

भ.गी. अ. १५ श्लो. क्र. ९ ।।

वस्तुतः पृथ्वीवरील संपूर्ण अस्तित्वाविषयी या अध्यायात स्पष्टीकरण केले आहे.

पृथ्वीवरील आत्मस्वरूप मानवी मनाने, पृथ्वी या अंशपुंजाच्या स्थितीगतीचे, जीवनाचे, स्पष्टीकरण आणि व्यवस्थापन करून; मानव्यशास्त्रे आणि भौत्तिक शास्त्रांची मांडणी केली आहे. मानवी मनाच्या या कर्मप्रक्रियेला; सद्-चिद्-आनंद स्वरूप केवळ परमात्मस्वरूप आणि जीवात्मस्वरूप यांच्या स्वरूपसंबंधाचा

स्वाभाविक आधार, स्वसंवेद्यतेने दिलेला आहे. सगुण, साकार, सविकार जीवात्मस्वरूप हे परिपूर्ण परमात्मस्वरूप आहे. असा स्वरूप-संबंध संवेदित झाल्यामुळे मानवीमनाने; लोकसंकल्पनेसह संस्कृती, वर्तनप्रणाली, जीवनपद्धती मानव आणि मानव यांचा संबंध, मानव आणि सृष्टी संबंध निर्धारित करण्याची प्रक्रिया अवलंबिली आहे. मांडणी, व्यवस्थापन, कला, शास्त्रे, यांचे मानव लोक व समग्र केवल यांशी सापेक्ष मंडण करण्याची प्रक्रिया, सुरू ठेवली आहे.

लोकसंबंधी, सामाजिक व्यवस्था, राजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, धर्म, नीती, तत्त्वज्ञान यांचा जीवनाशी संबंध, कला, क्रीडा यांचा जीवनाशी संबंध या मनःपूत मांडणीमध्ये स्वाभाविक आत्मरूपस्वरूप मनाचे, आद्य, स्वसंवेद्य आत्मरूप, संवेदनेपासून एवढे विचलन झाले; की मानव देहाहंकारवश तर झालाच, त्याचबरोबर मनाच्या अस्तित्वाविषयीच्या भ्रामक कल्पना मनाच्या ठिकाणी भासमान झाल्या. असे होऊनही; मुळात सद्-चिद्-आनंद स्वरूप, आत्मरूप, कैवल्य, अनंत, परमात्मा, श्रीकृष्ण हे अस्तित्व; त्याच्या ठायी स्वभावतः असलेल्या, आद्य स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूपात्मकतेने; सर्व अंश आणि अंशपुंजांत त्याच स्वाभाविक नित्य अपरिहार्यतेसह नटले आहे; या गोष्टीची जाणीव मानवी मनाला होतेच होते; हेही जीवात्म्याच्या ठायी असलेल्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मस्वरूप, मनाला संवेदित झाले आहे. अध्यात्म या शास्त्राची मांडणी, मानवी मनाने केली आहे. मानवी मनाच्या, परमात्म्याशी असलेल्या स्वरूपसंबंधामुळे परमात्म्याची, परमात्म्यांतर्गत क्रीडा स्वाभाविकपणे अबाधितपणे, मानवी मनाला संवेदित होत राहते. हेच मानवी मनाचे परमसामर्थ्य होय. विचलित मनाला संचालित करण्याचा प्रयत्न मनाने केला; तर हे सामर्थ्य प्रत्यही प्रकटेल!

●●●

# ३. सद्‌गुरु निरुपित मनोस्वरूप विचार

स्फटिकविमल मानस सरोवरात, परमपवित्र कैलासाचे प्रतिबिंब, सूर्यतेजस्वीपणाने झळाळत होते. शिष्य अनिमिषनेत्रांनी प्रतिबिंबात बिंबमग्न झाले होते. पद्मासनात ज्ञानमुद्रेने विराजित शिष्य, तनमनाने मानस होऊन; समाधिस्त झाले होते. स्वसंवेद्यतेने ते स्वतः, मानस आणि मानसातील प्रतिबिंब, एकस्वरूप झाले होते. स्वसंवेद्यतेला, मग्नअवस्थेत, ज्ञानवेधक प्रश्न स्फुरत होते. प्रश्नांच्या प्रातीभवलयात, शिष्य आत्मसंवादात्मकतेने प्रकट होत; कैवल्याचे सत्‌च्चिदानंद स्वरूप, अनुभवण्याचा अभ्यास करीत होते. सद्‌गुरू समीप येऊन, स्नेहाळ नजरेने, सत्‌शिष्याची ज्ञानवेधक मुद्रा पाहात; ज्ञानाचा ज्ञानाशी संवाद अनुभवत होते. जवळपास घटिकाभर हा ज्ञानसंवाद उभयतांच्या देहाठायी अनुभूत होत होता. सद्‌गुरूंना पान्हावलेपणाने, शिष्याची ही ज्ञानवेधक मुद्रा अधिक भावार्त करीत होती. संकल्पपूर्वक सद्‌गुरूंनी शिष्याच्या प्रातिभआभेत, वात्सल्याने प्रवेश करीत, आवाहन केले, ''भोऽ वत्स!'' शिष्याच्या आत्मरूपाने आवाहन स्वीकारले. शिष्य मग्नतेतून, मनःस्थितीत आले. नेत्र प्रकाशले. सद्‌गुरू दर्शनाने उन्मेषपूर्वक भानावर येऊन; सद्‌गुरूचरणी लीन होत उद्‌गारले,

''प्रणाम गुरुदेव, आपण केव्हां आलात कळलेच नाही! क्षमस्व. परंतु गुरुदेव..''

सद्‌गुरू : वत्स, ही ज्ञानवेधक ध्यानमग्नताच, मला, तुझ्याकडून अपेक्षित आहे. या अभ्यासाने तू सत्वर सद्‌गुरूपदी पोहोचशील.

शिष्य : गुरुदेव, आपण धन्य आहात. गुरुदेव,...

सद्‌गुरू : असा सन्मुख बैस, ज्ञानमुद्रा स्वीकार.

सद्‌गुरू सुखासनात्मक पद्मासनस्थ होऊन, विराजमान झाले. शिष्य सन्मुख ज्ञानमुद्रेसह पद्मासन स्वीकारून बसला. सद्‌गुरू काही बोलणार त्या पूर्वीच,

त्याच्या मुद्रेवरील प्रश्न स्पष्ट होत गेले. सद्‌गुरूंनी त्याची मुद्रा न्याहाळली. आणि बोलू लागले.

सद्‌गुरू : वत्स, प्रथम निःसंकोच हो. मनात उमटलेल्या प्रश्नांवरच आपण बोलणार आहोत. दर्शनांचा तुझा अभ्यास कालच पूर्ण झाला आहे.

शिष्य : गुरुदेव, हा कैलास, हे मानस, हे शिव, ही शक्ती, हे चैतन्य, हा आत्मा; अशा असंख्य गोष्टींची चर्चा आपण केली आहे. मला प्रश्न असा पडतो ही सर्व नामावली, कोणी आणि का निर्माण केली?

गुरुदेव : वत्सा, सृष्टीनिर्माता तर ब्रह्मदेव आहे. त्यांचीच ही सर्व निर्मिती आहे.

शिष्य : म्हणजे ही नावे त्यांनी दिली?

गुरुदेव : वत्सा, आपण संवाद करीत आहोत; होय ना? हा संवाद वाणीशक्तीच्या योगाने करीत आहोत. ही वाणी ब्रह्मदेवाची निर्मिती आहे. जीवमात्रांनाच नव्हे तर चर, अचर अशा सर्व वस्तुमात्राला, चेतन, अचेतन अशा सर्व भूतमात्रांना, ब्रह्मदेवांनी वाणीशक्ती प्रदान केली; म्हणूनच वाणी हे ब्रह्मस्वरूप आहे. वाणी चार प्रकारांनी प्रकटतात. वैखरी, मध्यमा, पश्चंती आणि परा असे हे चार प्रकार होत. वैखरीमुळे आपण बोलतो, शब्द वापरतो. मध्यमा शक्तीने आपण शब्द किंवा बोल यांना संवादमाध्यम म्हणून वापरतो. या मध्यमेमुळे वाणीरूपांना सर्वमानवव्यापकता येते. हीच वाणी आपण ज्ञानग्रहणासाठी, ज्ञानमंडनासाठी वापरतो. द्रष्ट्या ऋषीपरंपरेने याच वाणीशक्तीने ज्ञानभांडार निर्माण केले. ते ज्ञान मंत्रस्वरूप घडवून मध्यमा आणि वैखरी रूपांत सर्वगत केले. याच वाणीशक्तीने सृष्टापलिकडील, दृष्टापलिकडील, अज्ञात म्हणता येईल अशा स्थितीगती ज्ञानकक्षेत आणण्याचा प्रयत्न केला. या वाणीशक्तीला पश्चंती म्हणतात. त्या पलिकडील ज्ञान प्रकटीकरण करणाऱ्या वाणीला परावाणी, अर्थात वाणीपलिकडील वाणी, असे म्हटले गेले. परावाणी स्फूट होत नाही ती संवेदित होते. मात्र हे संवेदित होणे वाणीरूपांनीच घडते. ही चार रूपे वरवर पाहाता, चार पायऱ्या वाटल्या; तरी स्वरूपतः ती एकात्म वाणीशक्तीच असते. या वाणी चतुर्विध आहेत. हीच गोष्ट ब्रह्मदेवांच्या चतुर्मुख स्वरूपात प्रतिमा म्हणून स्वीकारली आहे. या वाणीलाच, शब्द, किंवा भाष् असे म्हणतात. वाणी म्हणजेच भाषा होय. या भाषेला शब्द, रूप, रस, गंध, स्वर, नाद, लय आदि गुण असतात. माणसाला या सर्व गुणांसह वाणीशक्ती उपजतच प्रदान केली आहे. या वाणीचे परंपरागत आद्य बीज म्हणजे ॐकार स्वरूप होय.

शिवस्थानातून ते ध्वनित होते. या ॐकार स्वरूप एकाक्षराला एकाक्षरब्रह्म असे मानतात. मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य, स्फुरक अशा स्वभावामुळे हे वाणी अर्जन माणसाने केले आहे.

शिष्य : परंतु, गुरुदेव, हे मानणे तरी कोणी आणि का निर्माण केले? की तेही ब्रह्म्यानेच निर्माण केले?

सद्‌गुरु : वत्सा, षट्‌शास्त्रे, उपनिषदे, वेद, अरण्यके, ब्राह्मणे आणि संहिता आदि वाङ्‌मयात या प्रश्नाचे उत्तर आपापल्या परीने शोधण्याचा प्रयत्न केला आहे. कारण शोधणारी, पाहाणारी, मांडणारी मंडळी ही सर्व, तुझ्या-माझ्यासारखी माणसेच होती. उपजतच, समूहाने जगणारी ही माणसे, व्यक्तीव्यक्तीला, आलेल्या अनुभवांचे आकलन एकात्मभावाने करून; समूहमनाची अर्थात आत्मांशपुंजाची अनुभूती म्हणून; आकलने सूत्ररूपाने मांडण्याचा प्रयास करीत; ज्ञान आत्मसात करीत आली आहेत. समूहातील त्याच्यांतर्गत धुरिणत्वाने पुढे आलेल्या माणसाच्या मुखाने ज्ञान किंवा तत्त्व, सूत्ररूपाने मांडीत. आज आपण या सर्व धुरिणांना श्रेष्ठ माणूस म्हणून ऋषी, मुनी, योगी, सिद्ध, साधू, शास्त्री, राजा, बाबा अशा नावांनी ओळखतो.

शिष्य : क्षमा करा गुरुदेव, पण आपल्या म्हणण्याचा अर्थ आजवरचे मानवअर्जित ज्ञानसंचित ही मानवी मनाची निर्मिती आहे. असेच ना?

सद्‌गुरु : (शून्यात, शून्य दृष्टीने पाहात उद्‌गारले) वत्सा, ही सारी ज्ञानसृष्टी, मानवी मनाची मांडणी आहे. 'अहं ब्रह्मः अस्मि', 'सोऽहम्' तत्त्वमसी, ही सर्व महावाक्ये, ही मानवी मनाचा अनुभूतीसंचित प्राप्त असा आत्मोद्‌गार आहेत. माणसाच्या सनातन अस्तित्वाचे अवघे संवेदनपूर्ण ज्ञानस्वरूप मानवीमनाचे अर्जन आहे.

शिष्य : गुरुदेव, मानवी मनाचे हे ज्ञानार्जन केवळ मानव कल्पित आहे का? की सत्य? मानवी मनाद्वारे हे प्रकटले आहे?

सद्‌गुरू : भो वत्स, हा प्रश्न आत्मरूपाला विचार! क्षणभर ध्यानमग्न हो. ज्ञानसाधनेची पूर्णशक्ती पणाला लावून प्रश्न विचार आणि तूच तुझ्या प्रश्नाचे उत्तर दे.

शिष्य : जशी आज्ञा गुरुदेव.

क्षणातच सद्‌गुरू आणि शिष्य ध्यानमग्न झाले. काही घटिका या समाधीमग्न अवस्थेत गेल्या. गुरुदेव, अशा आवाहनात्मक संबोधनाने, सद्‌गुरूंची समाधीमग्नता

विसर्जित झाली. सद्‌गुरूंची आणि शिष्याची मुद्रा सूर्यतेजस्वीपणाने प्रकाशमान झाली.

सद्‌गुरू : वत्सा, तुझ्या प्रश्नाचे तुला उत्तर मिळाले आहे. ते तूच तुझ्या मुखाने उद्‌घटित करावेस.

शिष्य : जशी आज्ञा गुरुदेव. गुरुदेव आत्मरूप आणि मन ही दोन अस्तित्वेच नाहीत. आत्मस्वरूपच मनोस्वरूपाने प्रकटले आहे. म्हणजे. ही अवघी ज्ञानमयता ही आत्मस्वरूपाचीच लीला आहे. याचा अर्थ मनोस्वरूपानेच हे सर्वविश्व सगुण, साकार, सविकार अष्टधाप्रकृतियुक्त, उदय, आलय, प्रलय, प्रक्रियेत, आपले, पृथक तरी अविनाशी, अस्तित्व अनुभवत आहे, असेच ना? आपण तर ब्रह्मदेवाने हे सारे निर्माण केले; असे म्हणतो आहोत असे म्हणायचे तर ब्रह्मदेव व मनोस्वरूप आणि आत्मस्वरूप यात भेद कोणता?

सद्‌गुरू : वत्सा, खरोखरीच अभेदत्वानेच हे अस्तित्व अनुभवते. किंबहुना मानवाने असे अभेदत्व अनुभवून; प्राप्त व्यवहार करावा हे अपेक्षित आहे. यासाठीच सच्चिदानंद स्वरूप परमात्म्याचा चराचराशी असलेला स्वरूपसंबंध लक्षात घेतला पाहिजे.

**''ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।''**

या शांतीमंत्राने हा स्वरूपसिद्धांत आपण नेहमीच समजावून घेत आलो आहोत. सुवर्ण हे मूलद्रव्य पाहा. या विशिष्ट मूलद्रव्याचे, भौतिक, सगुण, साकार, सविकार, अस्तित्व सुवर्णत्व या गुणाने सिद्ध होते. ते सुवर्णत्व भौतिक सगुण आकार स्वरूपात आपण पाहू लागलो; की त्या द्रव्यातूनच असंख्य प्रकारचे अलंकार आपण घडवतो. त्या अलंकारांना विविध नावे देतो. परंतु अशी नाव देतांनाही 'सोन्याचे' असे मूलद्रव्यनिर्देशक विशेषण आपण लावतो. द्रव्याचा प्रत्येक अणु, रेणु, एवढा अंशही पूर्ण गुणधर्माने सुवर्णत्वासह प्रकटतो. हे सर्व अलंकार, अगदी अंश अंश, आपण वितळून विलयित केले; तरी त्या गोळ्याला आपण सोनेच म्हणतो. सुवर्णत्व अविनाशी, स्थिर असले तरी ते जेव्हां अंशात्मक असा अणु, रेणुचा पृथक भाग म्हणून प्रकटते, तेव्हांही तेथे सत्य परिपूर्ण सुवर्णत्व असतेच म्हणूनच तो रेणू सुवर्ण असतो. सुवर्ण रेणू स्वरूपातही परिपूर्ण गुणात्मकतेने प्रकटते. तेच त्या मूलद्रव्याच्या सुवर्णत्व, या निर्गुण निराकार अविनाशित्वाने

उपस्थित असते. म्हणूनच सुवर्णत्वाचा प्रत्येक भौतिक अंश किंवा अंशपुंज सुवर्णच असतो म्हणूनच तो मूल्यात्मकतेने प्रकाशित होतो.

शिष्य : गुरुदेव, परंतु प्रत्येक अंश हा अंश आकारात पृथक आणि मर्यादांनी बद्ध असतो ना?

सद्गुरू : होय ही सगुणत्वाची, साकारतेची बद्धता पृथक अस्तित्व मिरवते; तरी उदयापूर्वी आणि विलयानंतरची मूल्यात्मक गुणवत्ता, उदय, आलय आणि विलय या प्रक्रियेत अबाधितपणे असतेच ना? त्यामुळेच तर पुन्हा नव्याने उदय, आलय आणि विलय प्रक्रिया अनुभवता येते. त्या मूल्यात्मक गुणवत्तेत, कोणताही बदल होत नाही. तसेच परमात्मतत्त्व हे सर्व अस्तित्वांच्या ठायी असते. ती सर्वअस्तित्वे त्या परमात्म तत्त्वाच्या अस्तित्वातूनच उदय, आलय, विलय, प्रक्रिया अनंतपणे अनुभवतांनाही; त्यांच्या ठायीच्या, मूल्यात्मक गुणवत्तेसह, परमात्मतत्त्व अबाधितच असते.

शिष्य : गुरुदेव, अशा स्वरूप संबंधानेच जर वस्तुमात्र, जीवमात्र उदय आलय, विलय प्रक्रियेत, आत्मस्वरूपच मनोस्वरूपाने अनुभवीत आहे तर; मनुष्यमात्राला हा संसारप्रपंच अवघा दुःखकारक, तापदायक का अनुभवास येत आहे?

सद्गुरू : वत्सा, मनुष्यमात्रासह प्रत्येक पृथक अस्तित्व हे आत्मांश किंवा आत्मांशपुंजात्मकतेने आपले पृथकत्व, उदय, आलय, विलय प्रक्रियेत आहे; यातच त्याच्या बद्धतेचा आणि आत्मस्वरूपाचा म्हणजे मुक्ततेचा विचार दडला आहे. बद्धतेचा अर्थात पृथकपणाचा अहंकार बळावला की मनोस्वरूप त्या बद्धतेने बाधित होऊन वावरू लागते. उदय, आलय, विलय प्रक्रियेतील अस्तित्वाची तात्कालिकता, क्षणभंगुरता, मर्त्यता यांचा विसर पडून; ठायीच्या अविनाशी शाश्वत, मुक्त, सार्वकालिक आणि सर्वव्यापक अशा सच्चिदानंद स्वरूपापासून मनोस्वरूप वंचित होऊ लागते. अशा बद्ध बाधित मनोस्वरूपाला मनरूप असे नाव आहे. हे मन स्वरूप विसरून, सगुण, साकार, सविकार मर्त्य, अस्तित्वालाच भ्रामकतेने शाश्वत मानू लागते. जे शाश्वत नाही; त्याला शाश्वत मानून अहंकारपूर्वक व्यवहार घडू लागला की उदय, आलय, विलयाच्या प्रक्रियेचा विसर पडून, अहंकारवश लिप्तता येते. प्राप्त कर्म, व्यवहार हा लिप्ततेने सापेक्षतेने घडू लागला; की अन्य पृथक अस्तित्वांशी संघर्ष आलाच. त्यामुळे अपेक्षाभंग आलाच. याचे रूप हे दुःख किंवा ताप असते. मात्र ताप किंवा दुःखही, उदय, आलय, विलय

या प्रक्रियेतच उद्‌भवलेले असते. तेही क्षणभंगुर असते. याचा विसर पडल्याने किंवा अहंकारवश अंधत्व आल्याने, दुःख भोगणे येतेच. यामुळेच मनुष्यमात्राला दुःख, त्रिताप यांचा अनुभव येतो. हे दुःख आणि त्रिताप नाहीसे करण्यासाठीच तर पृथकत्व दशेत, आत्मस्वरूप असे मनोस्वरूप प्रकटविण्याचा अभ्यास करावयाचा. बद्धतेने येऊ पाहणारी लिप्तता विवेकाने दूर करून; सच्चिदानंदस्वरूप अशा मनोस्वरूपाने प्राप्तकर्म ही उदय, आलय, विलय यातील क्रीडा आहे. हे लक्षात घेऊन ही क्रीडा करणारे असे, आपण एक आविष्कारस्वरूप आहोत हे समजून, कर्म करण्याचा अभ्यास करीत; मनोस्वरूप, बद्ध आणि बाधिततेही; शुद्ध अलिप्तपणे आविष्कृत करण्याचा अभ्यास करावयाचा. असे केले की दुःख, भोग, ताप यांचे आपसुकच निवारण होते. दर्शने, वेद, योगमार्ग यांचे मंडन यासाठीच केले आहे.

शिष्य : क्षमा करा गुरुदेव, प्रत्येक पृथक अस्तित्व, हे गुणात्मकतेने सत्य, परिपूर्ण, असे परमात्मस्वरूप आहे; असे आपण म्हणतो आहोत. स्वरूप हे तंतोतंत तत्स्वरूपच असते. ते परमात्मस्वरूप तर नित्य मुक्त, निर्गुण, निराकार, निर्विकार आहे. असे असतांना प्रत्येक पृथक अस्तित्व, सत्य परिपूर्ण कसे असेल? ते तर बद्ध असते आणि बाधितही होते. शिवाय मनुष्यमात्र किंवा भूतमात्र मनोस्वरूप असे आविष्कृत होते. ह्या मनोस्वरूपाचा परमात्मस्वरूपाशी स्वरूपसंबंध कसा जोडता येईल?

सद्‌गुरू : माझे महद्‌भाग्य, मला तुझ्यासारखा प्राश्निक मिळाला, तू मनोस्वरूपसिद्धीच्या पदी पोचला आहेस. हे वत्सा, प्रश्नांच्या चिंतनाने, उकलनाने स्वरूप शुद्ध, सत्य आणि परिपूर्ण स्वरूपात आकलित होते. ज्ञानसंचिताला जेव्हां प्रश्न पडतात, तेव्हांच ज्ञान पुन्हा पुन्हा परिपूर्णतेने प्रकाशमान होते. आणि तत्त्व दर्शन घडते. हे वत्सा, ऐक,-

परमात्मा हे समस्त अस्तित्वाचे मूलकारण आहे; असे आपण सर्वच म्हणतो. त्याचे स्वरूप कसे आहे? हे आकलित झाले की प्रश्न संपतात. केवळ ज्ञान प्रकाशते. ऐक-

परमात्मा असे ज्या अस्तित्वाला नाव आहे; त्याचे स्वरूप विविध नावांनी ओळखले जाते. हे मूलकारण, सर्वसत्ताकारण, मूलतत्त्व कसे आहे; याची संवेदना माणसाला, आत्मस्वरूपाच्या आकलनाने आणि अनादि अनंत प्रवासातील अनुभवसंचिताच्या योगे झाली. ते असणे- निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, महाशून्य, श्रीकृष्ण, केवल, सच्चिदानंदरूप, अनंत, आद्य /अविनाशी/

स्वसंवेद्य स्फुरक, एकल, नित्य, परब्रह्म, परमात्मा म्हणून आकलित झाले आहे. हे त्या तत्त्वाचे निजरूप, म्हणजे स्वरूप आहे. त्याच्या अस्तित्वा अलिकडे पलिकडे काहीही नाही. म्हणजेच जे काही आहे ते तेच सर्वकाही आहे. त्यामुळेच ते निरूपमेय आहे. ते तेच आणि त्याच्यासारखेच आणि केवळ तेच आहे. म्हणूनच त्याचे वर्णन वेदांनीही 'नेति' या शब्दाने त्रिवार केले. या निजरूपाची किंवा स्वरूपाची नेमकी वैशिष्ट्ये वरील सर्व वर्णनात्मक नामात एकवटली आहेत. परंतु त्याच्या एका महत्त्वाच्या नित्य, स्थायी अशा वैशिष्ट्याकडे ठळकपणे कोणी लक्ष वेधले नाही. प्रत्यक्ष परमात्मावतार किंवा ज्ञान असे ज्यांचे वर्णन करतात, त्या संत ज्ञानोबारायांनी, त्या वैशिष्ट्याकडे मुद्दाम लक्ष वेधले. ते वैशिष्ट्य म्हणजे 'स्वसंवेद्यता'; हे होय. ते तत्त्व सच्चिदानंदरूप असून ते विश्वोत्पत्तीला कारण आहे; याकडे महर्षी वेदोव्यासांनी लक्ष वेधले होते. व्यासांच्या ज्ञानाविषयी कृतज्ञता व्यक्त करून; माऊली ज्ञानेश्वर निजरूपाच्या, स्वसंवेद्यता या स्वभाव वैशिष्ट्याकडे लक्ष वेधतात. हे वत्सा, निर्गुण, निराकार, निर्विकार, महाशून्य, अनंत, श्रीकृष्ण, कैवल्य, एकल, सार्वकालिक, सर्वव्यापक, अविनाशी अशा निजरूपाचा स्वभाव, स्वसंवेद्य असल्याने, सच्चिदानंद स्फुरकता त्याचे ठायी आहे. म्हणूनच ते विश्वोत्पत्तीचे कारण आहे. म्हणजेच स्वसंवेद्य सच्चिदानंदस्वरूप स्फुरकता, हा त्या अविनाशी निर्गुणाचा स्वभाव आहे. त्यामुळेच निजरूप किंवा परमात्मा या मूळ कारणापासून सगुण, साकार, सविकार आणि अविनाशीपणाने नित्य मर्त्य अशी सृष्टीरूपता, अगणित रूपांतून, स्वरूपतः प्रकट झाली आहे हे लक्षात घे. निर्गुणाचे सगुणरूपांत नटणे, म्हणजे रूपांतर घडणे होय. हे रूपांतर परमात्म्याच्या आत्मांश किंवा आत्मांशपुंज अवस्थांच्या योगाने घडते. हे निर्विकार निर्गुणाला शक्य होते; ते त्याच्या ठायीच्या, या स्वसंवेद्य सच्चिदानंद स्फुरकतेमुळे होय. ही त्याच्या ठायीची स्वसंवेद्य सच्चिदानंद रूप स्फुरकता म्हणजे त्या निजरूपाचे 'मन' होय. याचा स्पष्ट अर्थ असा की; निजरूप 'मन' स्वरूपाने आविष्कृत झाले. याला ब्रह्ममानस असेही नाव देता येईल. या स्वसंवेद्य सच्चिदानंदस्वरूप स्फुरक अशा मनोस्वरूपाने परमात्मा ठायीच सगुण साकार सृष्टी लीला करीत आहे. अशी लीला करणे हे परमात्म्याचे प्राप्त कर्म आहे. ते प्राप्तकर्म अपरिहार्यपणे त्याच्या गुणवैशिष्ट्यासह कर्मतत्परतेने घडत आहे. या मनोस्वरूपाने परमात्मा एकल असूनही ठायीच अनेकत्व अनुभवतो. हे अनेकत्व संवेदित होते; याचेही कारण, त्या अनेकातील प्रत्येक आविष्कार, हा सच्चिदानंदस्वरूप स्वसंवेद्य स्फुरकच

असतो. प्रत्येक अस्तित्व निर्माण होते, मिरवते आणि नाहीसे होते; ते त्याच्याच ठायी होय. याचा अर्थ तेच सत्य, चिद्रूप, आनंदमय अस्तित्व या सर्व गुणांसह, प्रत्येक पृथक अस्तित्वात असते. म्हणूनच तो परमात्म तत्त्वाचा आत्मांश किंवा आत्मांशपुंजात्मक, असा आविष्कार असतो. त्या प्रत्येक अस्तित्वाला तीच स्वसंवेद्यता, तेच सत्य अस्तित्व, तेच चैतन्यमय अस्तित्व व तीच ज्ञानपूर्ण किंवा आनंदमय अवस्था असते. ही संवेद्यता, हे सत्य, ही चिद्रूपता, ही आनंदमयता, म्हणजेच जीवमात्राच्या ठिकाणीचा जीव किंवा आत्मा होय. म्हणूनच त्याला जीवात्मा असे म्हणतात. या जीवात्म्याचा जो जिवंतपण प्रदर्शित करणारा आविष्कार घडतो; तो त्याच्या ठायीच्या स्वसंवेद्य, सच्चिदानंदरूप स्फुरणात्मकतेने, म्हणजेच मनाने होय. म्हणूनच वत्सा, तू म्हणालास तर आत्मस्वरूप आणि मनोस्वरूप दोन नाहीतच. मनसः जातः मानसः । असे त्यामुळेच म्हटले जाते.

शिष्य : गुरुदेव, क्षमा असावी, पण ते मनोस्वरूप बाधित होते तरी कसे? बद्ध असते म्हणून? पण ही बद्धता तर, उदय, आलय आणि विलय प्रक्रियेपुरतीच आहे ना?

सद्‌गुरू : अगदी बरोबर बोललास. त्या बद्धतेचीच चर्चा करणेही तेवढेच आवश्यक आहे.

वत्सा, निजरूप, परमात्मा, मूलकारण, महाशून्य, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, अविनाशी, केवल, एकल, श्रीकृष्ण परब्रह्माविषयी आपण बोलत आहोत. ते तत्त्व निर्विकार असूनही स्वसंवेद्य, सच्चिदानंद स्वरूप आहे. ते तत्त्व नित्यमुक्त आहे, असे आपण म्हणतो आहोत; ते तर्कशुद्ध आहे का; असा विचार केला; तर निर्गुण, निर्विकार, निराकार असूनही ठायीच स्वभावतः स्वसंवेद्य, सत्य, चिद्, आनंद अशी लीला स्फुरणारे आहे. म्हणजे ठायीच विकारवशता आहे. काहीसा वदतो व्याघात घडविणारा तर्क वाटला; तरी हेच त्या स्वरूपाचे वास्तव आहे. स्वसंवेद्य सच्चिदानंद स्फुरकतेच्या स्वरूपाने, निजरूपाचे मनोस्वरूप प्रकट आहे. सर्वव्यापकता, सार्वकालिकता, महाशून्यता, अविनाशितता, अविचलता अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकारता, तरी स्वसंवेद्यता, सच्चिदानंदरूप स्फुरकता, या अवघ्या गुणांनी ते परमात्म तत्त्व बद्ध नित्य आहे. या त्या स्वरूपाच्या नित्य बद्ध स्वसंवेद्य, सच्चिदानंद स्फुरकतेला, परिपूर्ण मुक्तता आहे, स्वतंत्रता आहे; असे आपण म्हणतो; ते तर्कशुद्ध कसे म्हणता येईल? स्वभाव आणि स्वरूप, हे ठायीच नित्यबद्ध आणि नित्यमुक्त, मनोस्वरूप असते.

हेच या तर्कातून निष्पन्न होते. म्हणजे स्वरूपसंबंध लक्षात घेतांना, बद्धता, स्वभाव आणि मनोस्वरूप, अशी त्रिविधता ठायीच उदयित होते, पृथकत्वाने आलयित दिसते. आणि ती निजरूपाचे ठायी विलयित होते. हे उदय, आलय, विलय असे प्रक्रिया चक्र त्या एकलाच्या, स्वसंवेद्य सच्चिदानंदरूप स्फुरक, म्हणजे मनोस्वरूपाने बहुरूपांत, आविष्कृत होताना आणि सनातनपणे नवे नवे बहुरूप आविष्कार होतांना; प्रत्येक निजात्मांश आणि आत्मांशपुंजाच्या ठायी, बद्धता, स्वरूपता, आणि स्वभावता, संक्रमित करते. म्हणूनच प्रत्येक आत्मांश किंवा आत्मांशपुंजही, नित्यबद्धता आणि नित्यमुक्तता अनुभवत, उदय, आलय आणि विलय अशा प्रक्रियाचे परमात्मस्वरूपाठायीच नांदतो. या बद्धता, स्वभावता आणि स्वरूपता, यामुळेच, ऋषींना ''ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णातपूर्ण मुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।'' असा शांतीमंत्र, स्वसंवेद्य स्फुरणात्मक अशा स्वाभाविकतेने स्फुरला.

शिष्य : गुरुदेव, आपण म्हणता त्याप्रमाणे, मूलकारण परमात्मस्वरूप, यांपासून सूक्ष्मातिसूक्ष्म अणुरेणुपेक्षाही सूक्ष्मअस्तित्वे देखील; त्या मूलकारणाच्या बद्धतेअंतर्गत, उदय, आलय, विलय प्रक्रियेतील आपल्या पृथक अशा अस्तित्वासह, बद्धता, परिपूर्ण स्वाभाविकता आणि मनोस्वरूपता यांसह, अविनाशित्वाने, संचार करतात. स्वतःच्या उदय, आलय, विलय प्रक्रियेतील, अशाश्वत पृथगात्मता, शाश्वततेत मिरवत; पुन्हा पुन्हा सच्चिदानंद स्वरूपता अनुभवत, संचारतात असेच ना? यालाच त्या निजरूप मूलकारणाची लीला असे म्हणतो आहोत. होय ना. मग गुरुदेव, मनुष्यमात्राला आणि जीवमात्राला दुःखानुभूती, अशांतता येण्याचे कारणच नाही. तरी देखील सृष्टीप्रपंच म्हणजे भवसागर आहे. तो केवळ दुःखकारक आहे. अशी अनुभूती सर्वांना का येते? सद्गुरू संवाददेखील, संसारप्रपंच दुःखकारक आहे; असे ठामपणे प्रतिपादित करीत; प्रपंच असार आहे; तो टाकून द्या आणि परमात्म्याला शरण जा असाच प्रबोध सतत करतात ना?

सद्गुरू : वत्सा, तुझे निरीक्षण, मनुष्यमात्राचे आणि जीवमात्रांचे अस्तित्व रूप उलगडून, समजून घेण्यास प्रवृत्त करणारे आहे. ते नीट समजावून घेतल्याशिवाय तत्त्व प्रचिती अशक्य आहे. संसारप्रपंच करणारांना, लिप्ततेमुळे तत्त्वप्रचिती येणे कठीण असते. त्याकरिता संसार असार आहे. त्याचा त्याग करा. असे बजावून; परमात्मस्वरूपाचे स्मरण करण्याचा संदेश सद्गुरू देतात. हा संदेश म्हणजे भक्तियोगाचा अभ्यास करण्याचा संदेश असतो. भक्तीच्या अभ्यासाने हळूहळू, दैनंदिन येणाऱ्या,

अशाश्वताच्या अनुभवातून परमात्मस्वरूप उकलू लागते. अर्थात ज्ञान प्रकाशमान होऊन, वैराग्याचा उदय होतो. ठायीचे आत्मस्वरूप मनोस्वरूप होते. ठायीच सच्चिदानंद अनुभूती येऊ लागते.

शिष्य : परंतु गुरुदेव, प्रत्येक पृथक रूप, निजरूपाचे आत्मांशस्वरूप व आत्मांशपुंजस्वरूप स्वसंवेद्य, सच्चिदानंद स्फुरक असे असतांना; हा योगमार्गाचा खटाटोप मानवाने का केला? जे नित्य आहे ते विचलित कसे होणार? तरी जीवमात्र विचलित होतात. त्याची संगती तरी कशी लागणार? जीवमात्र ही पृथक मर्त्यरूपे मूळातच दुःखी आणि त्रितापयुक्तपणे उदय, आलय, विलय या प्रक्रियेत निष्पन्न होतात का? गुरुदेव अद्यापही माझा संभ्रम दूर होत नाही.

सद्‌गुरू : वत्सा, विविधलोकी निर्माण झालेली जीवसृष्टी ही अष्टधा प्राकृतिक संघटनेने अस्तित्वात आहे. आपणा सर्व मानवमात्रांना, प्रत्यक्ष अनुभूत होणारी उद्‌भिज, स्वेदज, अंडज आणि जारज अशी चतुर्विध जीवसृष्टी सत्य, चिद्, आनंदस्वरूप, म्हणजे परमात्मस्वरूपच आहे. हे सत्य तू समजून घे. तथापि ही जीवरूपे सृष्टीतील पंचमहाभूते आणि त्रिगुण यांच्या संघटनेने निर्माण होतात, मिरवतात आणि त्याच सृष्टीत ती विलयित होतात. असे पाहा, पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश, ही पंचमहाअस्तित्वे, ही देखील परमात्म्याच्या स्वसंवेद्य सच्चिदानंदरूप, स्फुरणाचाच आविष्कार आहे. मूलकारणाचा प्रथम आविष्कार, असेही या आविष्काराला, सृष्टीरचना समजून घेण्यासाठी मानता येईल. अन्यथा, कारण व आविष्कार, चक्रनेमिक्रमात प्रथम आणि क्रमाने असे काही नसते. या पंचमहाभूतांच्या पृथकत्वाचे चिंतन केले; तर ही पंचमहारूपे, आपले बद्धत्व, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने कसे मिरवतात; हे लक्षात येईल. पृथ्वी आपले पार्थिवपण अर्थात जडत्व मिरविते, आप आपले जलत्व, प्रवाहित्व आणि स्वसंवेद्य स्फुरकत्व मिरविते, तेज आपली ऊर्जा आणि चैतन्यत्व मिरविते. वायू आपले गतिशीलत्व, चंचलत्व आणि प्राणतत्त्व मिरविते तर आकाश आपले सर्वव्यापकत्व आणि शून्यत्व मिरविते. या पंचतत्त्वांच्या स्वभावगुणांतून संघटन स्वरूपात, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, तीन गुण, सत्व, रज, व तम निर्माण होतात. सत्वगुण अलिप्तता, ज्ञानमयता, सत्य, चैतन्यमयता आदि अविनाशी, सार्वकालिक, सर्वव्यापक वैशिष्ट्याने स्थित असतो. रजोगुण पार्थिवता, चैतन्यमयता, चंचलप्राणतत्त्वता, आनंदमग्नता, भोगकारिकता स्वामित्व आदि वैशिष्ट्यांनी स्थित असतो. तमोगुण अज्ञानवशमग्नता, भोगकारिकता, स्वार्थपरता आदि गुणांनी युक्त, वस्तुतः मूळ

परमात्मतत्त्वाच्या, स्वसंवेदित स्फुरकतेतून, पृथकरूपांच्या स्वरूपात, पंचमहाभूते आविष्कृत होतांना; विघटन, संघटन, संक्रमणाचा तो परिणाम असतो. चतुर्विध जीवसृष्टी, ही मूळातील स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वभावामुळे, पंचमहाभूतातील, गुणवैशिष्ट्यांसह, संघटित होतांना; लक्षावधी विविध रूपे निर्माण होतात. असे होतांना, त्रिगुणात्मकता देखील संक्रमित होते. म्हणून, जीवसृष्टीतील प्रत्येक अस्तित्व हे, अष्टधा प्राकृतिक जाणवते. हे अस्तित्व, शारीर आणि आत्मरूप या दोहोंच्या संयुगात्मकतेने प्रतीत होते. शारीर अवस्थेला आपण पृथ्वी आणि आप महातत्त्वांचा आविष्कार आहे असे अनुभवतो तर आत्मन् हा आविष्कार तेज, वायू आणि आकाश या महाभूतांचा असतो. प्रत्यक्षात तेज, वायू, आकाश यांच्या आश्रयाने पृथ्वी आणि आप शारीर म्हणून मिरविते. या द्विविध संघटनांचे संयुग, जीवात्मा म्हणून मिरविते. असे घडतांना, उदय, आलय व विलय प्रक्रिया, जीवदशेच्या स्वरूपात देखील सुरू असते. अनादि अनंतपणे हे चक्र सुरू असतांना, जीवसृष्टीतील रूपे आत्मांशपुंज स्वरूपात, म्हणजे प्रजातींच्या स्वरूपात, पुन्हापुन्हा निर्माण होतात. यालाच जननप्रक्रिया असे नाव आहे. या जननप्रक्रियेची मर्त्यता आणि नित्यता ही त्याच मूळकारणाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेची, म्हणजे आत्मरूपाच्या मनोस्वरूपाची स्वाभाविक प्रक्रिया असते. म्हणूनच बीजवृक्ष प्रक्रिया आपण अनुभवतो. त्याच-त्याच प्रजाती, जननप्रक्रियेत वारंवारिता राखतात. मात्र आत्मांश या प्रक्रियेत संघटित होतांना; उदयापूर्वी आणि विलयानंतर, संक्रमण अवस्थेत, त्या मनोस्वरूपाच्या बद्धबाधिततेच्या परिणामांनी आणि संक्रमणाच्या गतीनुसार, नव्या रूपात आविष्कृत होऊ शकतात. यामुळेच आत्मांश हा चौऱ्यांशी लक्ष योनीतून भटकतो, असे आपण अनुभवसंचिताच्या आधारे मांडतो. प्रत्येक पृथक आविष्कार, संक्रमण, संघटन, विघटन, पुनर्संक्रमण, संघटन; अशा उदय, आलय, व विलय या प्रक्रियेत, आरंभबिंदूपासून गतिमान असतो. त्याचे प्रत्येक पृथक, प्राकट्य, निजस्वरूपाच्या, मूळ स्वभाव, स्वसंवेद्य, सच्चिदानंद स्फुरक, मनोस्वरूपाने, आविष्कारित होत असते. तसेच त्या प्राकट्यात संक्रमित, समाविष्ट, संघटित घटक, त्यांच्या पृथक वैशिष्ट्यासह पृथक प्राकट्यात, कार्यान्वित होतात. त्या घटकांची स्वभाववैशिष्ट्ये, पृथक अस्तित्वाच्या मनोस्वरूपाला, पृथक प्राकट्याच्या बद्धतेत, स्वतःकडे खेचत प्रकट होण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे प्रत्येक पृथक प्राकट्याची शारीर प्रकृती आणि संबंधित मनप्रवृत्ती भिन्न असते. वत्सा, मानवाने, आयुर्वेद या उपवेदाच्या स्वरूपात मानव आणि अन्य जीवसृष्टी

यांच्या प्रकृतीवैशिष्ट्यांचा, अनादि काळापासून सूक्ष्म अभ्यास केला आहे. मानवाच्या बाबतीत, निजरूपाचा आत्मांश+आविष्कृत पंचमहाभूते यांची भिन्न भिन्न प्रकृती यांचे संयुग प्रकटले आहे. अन्य जीवमात्रांमध्ये पंचमहाभूतांची कमीअधिक अंशात्मकता संघटित झाली आहे. मानवात मात्र पंचमहाभूतांची सर्व वैशिष्ट्ये परिपूर्णपणे प्रकट आहेत. त्यामुळे, नरदेहाच्या स्वरूपातील माणसाचे प्राकट्य, हे अन्य जीवसृष्टीतील सर्व प्राकट्यांपेक्षा भिन्न, परिपूर्ण आहे; असे मानवाच्या अनुभूतीसंचिताचे निष्कर्षण आहे. त्यामुळे मानवी जीवात्मा परब्रह्मस्वरूपाचा परिपूर्ण अनुभव, व्यष्टी अर्थात आत्मांश आणि समष्टी अर्थात अखिल मानवी समूह; या स्वरूपात अनुभवू शकतो. तसेच संक्रमण आणि संघटन प्रक्रियेत, गुणात्मक, कमीजास्तपणा घडला; की मानवी समूहातच, देव, ऋषी, मुनी, राक्षस, दानव, यक्ष, किन्नर, गंधर्व, विद्याधर, पिशाच्च आदि प्रकारचे मानव व्यक्ती किंवा समूहस्वरूपात, संक्रमण संघटनांच्या परंपराप्रक्रियेतून, वंशात्मक स्वरूपात, प्रकट होतात. गुणसमुच्चयपुंजाचा, हा परिणाम असतो. असे असूनही मानवी अस्तित्वाला, अभ्यासपूर्वक, हवे ते वळण लावण्याची क्षमता मिळाली आहे. मानवाला निर्णय आणि विवेक या, मानवाठायीच्या, स्वसंवेद्य स्फुरक, अशा मनोस्वरूपाच्या शक्तींमुळे ही क्षमता मिळाली आहे. असे वळण, व्यक्तीसाठी वा समूहासाठीही मानव स्थापित करू शकतो. त्यासाठी वाणी, कला आणि विद्या यांचा प्रपंच मानवाने अनादिपणाने केला आहे.

जीवसृष्टीमधील, अन्य जीव जातींपेक्षा, माणसाचे वेगळेपण जाणवते. समूहजीवनातील, व्यक्ती आणि समूह यांतील परस्परसंबंधासंबंधी, कर्म आणि वर्तन या दृष्टीने, माणसाने सामूहिक जीवनसारणी स्वरूपात, नैतिकविश्वाची निर्मिती केली आहे. नैतिकविश्व सनातनपणे, परिवर्तन प्रक्रियात्मकतेने गतिमान असते. मानवाच्या दृष्टीने याला विकास म्हटले जाते. असा विकास करण्याचा प्रयत्न ही मानव जीवन प्रक्रिया आहे. या नैतिक विश्वाचे, जगभरात चार विभाग स्थूलमानाने आढळतात- (१) धर्म-तत्त्वज्ञान-दैवतकल्पना, आरोग्य, भौतिक व रसायनशास्त्रे, त्रिकालसापेक्ष प्रजनन प्रथा, ज्योतिर्विज्ञान, आणि या सर्व गोष्टींसाठी, नियमित असे उपासना, वर्तन, परस्परव्यवहार यांच्या कला, परंपरा, सणोत्सव परंपरा, संस्था, प्रथा, संकेत, श्रद्धा, विश्वास इ. गोष्टींचा विभाग. (२) कुटुंबसंस्था, समाजसंस्था, राजसंस्था, संरक्षण (धनुर्वेद), आपत्ती निवारण, कलापरंपरा धर्मरक्षण, समूहांचे परस्पर संबंध, इ. संबंधातील नीतीनियम, न्याय इ. गोष्टींचा विभाग. (३)

अन्नशोधन, कृषीपरंपरा, घरेदारे, कपडेलत्ते, वाहनव्यवस्था, विनिमय व्यवस्था, व्यापारउदीम, स्थावरजंगमादी मालकीहक्क, विविध कौशल्यपरंपरा, कलापरंपरा, साधननिर्मिती, स्थावर जंगमाचे व्यवस्थापन इ. गोष्टींच्या संस्था, समूह, जाती, परंपरा, प्रथा, नीतीवर्तनपरंपरा इ. गोष्टींचा विभाग. (४) सेवा, स्वच्छता, सहाय्य, मदत, व्यवहारविनिमय साधनरूपता, श्रमविनिमय, उदय, आलय, विलय या प्रक्रियेतील सर्व प्रकारचे सहाय्य इ. गोष्टींचा विभाग.

असे चार विभाग दिसत असले तरी ते स्वतंत्र पूर्णतः पृथक नसतात. हे विभाग समूहधारणेसाठी एकात्मतेने कार्यान्वित असतात. मानवी समूहातील कोणतीही व्यक्ती किंवा समूह यातील कोणत्याही विभागात आवड, संधी आणि शारीरिक व मानसिक शक्ती, यानुसार कर्मतत्पर होऊ शकते. यांतही वंशपरंपरा निर्माण होण्याची शक्यता असते; हे आजवरच्या अनुभवसंचितातून स्पष्ट झाले आहे.

अशा नैतिकविश्वात, व्यक्ती व समूह, अर्थात आत्मांश व आत्मांशपुंज आपले पृथकपण मिरविण्यासाठी, मनोस्वरूप, अहंकारवश करून, कर्म करू लागतात. यातून जीवनार्थ संघर्ष सुरू होतो. नरजन्माच्या वाट्याला आलेला हा संघर्ष, उग्ररूप धारण करतो. या संघर्षामुळे नैतिकविश्वातील जीवन दुःखकारक, क्लेशदायक, अतृप्त असल्याचा अनुभव येऊ लागतो.

अष्टधाप्राकृतिक नरदेहाच्या ठिकाणी निर्माण होणारे विकार, वासना, विकृती, वृत्ती, प्रवृत्ती, अहंकार, क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोह, काम आदि प्रकारच्या देहभावना, ठायीच्या आत्मांशस्वरूप मनोस्वरूपाला, बद्ध आणि बाधित करण्याचा प्रयत्न करतात. हे तर सर्व जीवमात्रांच्या ठिकाणी त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक पातळीवर घडते. या सर्वांच्या मुळाशी मूलभूत असे जीव विकार-आहार, निद्रा, भय आणि मैथून, हे असतातच. मानवी जीवनात, मानवानेच अनुभवसंचिताधारे व्यवस्थापित केलेल्या नैतिकविश्वाची भर पडते. ही नैतिकविश्वाची बद्धता आत्मांशस्वरूप मनोस्वरूपाला बद्ध व बाधित करतांना उपरोक्त अष्टधाप्राकृतिक देहभावाच्या वैशिष्ट्यांनाही, बद्ध व हवे तसे वळण लावण्याचा प्रयत्न करते. मानवी अस्तित्व त्रिविध प्रकारची बद्धता अनुभवते- (१) परमात्म्याच्या सृष्ट होण्याच्या प्रक्रियेतील उदय, आलय, विलय प्रक्रिया, (२) जीवदशेची बद्धता, (३) नैतिकविश्वाची बद्धता- अशा त्रिविधबद्धतेने, मनोस्वरूप बद्ध आणि बाधित होत, अहंकारवशतेने वावरतांना, आत्मस्वरूप अशा मनोस्वरूपाचा नरदेहास विसर पडतो. बद्धतेचे अशाश्वत दुःख भोगतो आहोत असा अनुभव येतो. त्यामुळेच

संसारप्रपंच असार असण्याचा थेट प्रबोध, सद्‌गुरू करतात. प्रबोध करतांना शुद्ध अशा मनोस्वरूपाने प्राप्त कर्म करण्यासाठी नरजन्मात प्रवृत्त व्हावे; हेच मुख्य आणि अंतिम ध्येय असते.

शिष्य : गुरुदेव, नैतिकविश्वात यशश्री, शौर्य, वंशवर्धन यांना विशेष महत्त्व दिले जाते. यासाठीच भारतीय परंपरेत, पुरुषार्थाची मांडणी केली आहे; असेच ना?

सद्‌गुरू : वत्सा, तुझे म्हणणे पुष्कळअंशी सत्य आहे. परंतु तेवढ्याच मर्यादेत, पुरुषार्थ कल्पना समजावून घेणे योग्य होणार नाही.

शिष्य : म्हणजे? गुरुदेव, पुरुषार्थाचे आणखी व्यापक स्वरूप कोणते?

सद्‌गुरू : जिज्ञासा ही ज्ञानार्जनाला, अतिशय आवश्यक अशी मनोवृत्ती आहे. योगसाधनेने परिपूर्ण सिद्धअवस्थेपर्यंत पोहोचतांना देखील याच मनोवृत्तीच्या आश्रयाने ज्ञान प्रक्रिया घडते. तुझ्यासारखा प्राश्निक, ज्ञानपिपासू अर्थात, जिज्ञासू मला भेटला, हे अहोभाग्य! त्या योगानेच मी सार्वकालिक सर्वव्यापक सच्चिदानंदस्वरूप, अशा ज्ञानसागरात, विहार करण्याचा आनंद उपभोगतो आहे. ज्ञानी होणे यापेक्षा ज्ञानोत्तर, ज्ञानप्रकाश सर्वत्र उजळणे, हेच तर ज्ञानाचे श्रेय. हेच निजरूपाचे कार्य आहे. संत तुकोबाराय, ''याच कारणासी आलो,'' असे आवर्जून सांगतात. असो. हे बघ तू पुरुषार्थाची व्यापक भूमिका जाणून घेण्यास उत्सुक आहेस ना; ऐक तर मग. हे बघ पुरुषार्थ याचा सरळ अर्थ पुरुष+अर्थ, अर्थात पुरुष असण्याचे श्रेय किंवा यशस्विता होय. यांतील पुरुष शब्दाचा अर्थ, स्त्री, पुरुष या लिंगवाचक अर्थाशी संबंधित नाही हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. तसेच पारंपरिक धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या शब्दांचे अर्थ-धर्म म्हणजे प्रचलित धर्माचे पालन असा सामान्यतः घेतला जातो; तो तसा नाही. धर्म म्हणजे निजरूपाचा अर्थात परमात्म्याचा नित्य स्वभाव होय. त्या स्वभावाचे अगोदरच वर्णन केले आहे. हा स्वभाव, स्वसंवेद्य, सच्चिदानंदरूप स्फुरक असा आहे. परमात्मस्वरूप नरदेहाच्या ठायी, आत्मांशस्वरूपाने तर नरसमूहाच्या ठायी म्हणजे मानवी समुदायाच्या ठायी आत्मांशपुंज स्वरूपाने ते आहे. या अंशात्मक प्रकटीकरणात देखील, परमात्म्याचा स्वभाव तोच असणार, हे उघड आहे. म्हणून सच्चिदानंदस्वरूप स्फुरणात्मकतेने, ठायीची स्वसंवेद्यता अनुभवत, सर्वांठायी सच्चिदानंद अनुभूती घडविण्यासाठीचा, कर्मव्यवहार देहदशेने करणे, म्हणजे धर्म पुरुषार्थ होय. अर्थ म्हणजे, सृष्टीस्वरूपातील पृथक अस्तित्वासह सृष्टीशी अर्थात चराचराशी व्यवहार

करण्याचे साधन होय. म्हणजेच मानवी व्यवहाराला, सर्वात्मक धारणा करण्याचे सामर्थ्य देणे होय. सामान्यतः अर्थ म्हणजे पैसा असा अर्थ आपण घेतो. सर्व जीवनसाधने विनिमयांसाठी अर्थभावना वापरली जाऊ लागली की पृथक अस्तित्व मिरविण्याला, परमात्मस्वरूपाचे परिमाण प्राप्त होते. त्या परिमाणासह साधनांचे अर्जन आणि विनिमयन, म्हणजे अर्थ हा पुरुषार्थ होय.

काम म्हणजे, जनन प्रक्रियेसाठीची मूलभूत प्रेरणा होय. परमात्म्याच्या स्वसंवेद्य, सत्‌चिदानंद स्फुरण स्वभावाचे, अर्थात मनोस्वरूपाची नवनिर्माण करण्याची प्रेरणा. प्रजनन प्रक्रिया ही सृष्टीच्या उदय, आलय, विलय प्रक्रियेची मूलभूत प्रेरणा होय. संपूर्ण नैतिकविश्वाच्या सर्वसुलभ, सर्वसमावेशक, सर्वआनंदप्रद, सर्वसुखदायक अशा, निर्माणाची प्रेरणा होय. ही प्रेरणा अन्य भूतमात्रांपेक्षा मानव जीवाच्या वाट्याला अधिक आली आहे. सच्चिदानंदस्वरूपाचा, मनोस्वरूप आविष्कार कामप्रेरणेने होतो. कामप्रेरणेचे दुसरे नाव प्रेम असे आहे. आत्मस्वरूप आविष्कृत करण्याची ही प्रेरणा होय. प्रजननप्रक्रियेतील नर आणि मादी यांची संभोग क्रीडा हे याचे मुख्य दृश्य रूप होय. ही क्रीडा आत्मस्वरूप अशा मनोस्वरूपाने म्हणजे प्रेमाच्या अद्वैत श्रेणीने घडणे अभिप्रेत आहे. अनादि अनंतपणे ही क्रीडा सुरू आहे. ही क्रीडा अशा प्रेमभराने करणे म्हणजे आत्मस्वरूपाचे आत्मस्वरूपाने ऋण फेडणे होय. स्वसंवेद्य सच्चिदानंदस्वरूप स्फुरक या परमात्म्याच्या स्वभावाचा, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक सर्वव्यापक अविनाशी, अनंत, श्रीकृष्ण परब्रह्माचा, तो सगुण, साकार, सविकार, सच्चिदानंदस्वरूप आविष्कार असतो. एवढ्या आत्मस्वरूप मनोस्वरूपाने, तो नर आणि मादी यांच्याकडून घडणे म्हणजे काम हा पुरुषार्थ सिद्ध करणे होय. परंतु एवढीच या पुरुषार्थाची मर्यादा नव्हे. सार्वकालिक, सर्वव्यापक, अविनाशी असा सच्चिदानंदस्वरूप आविष्कार मानवी समूहात सहज घडावा, यासाठी, मानवाच्या मनोस्वरूपाने नैतिकविश्वात नातेसंबंध निर्माण केले आहेत. हे सर्व नातेसंबंध प्रेमपूर्वक सांभाळण्याची क्रीडात्मक भूमिका म्हणजे काम पुरुषार्थ होय. कुटुंब, समाज, ग्राम, परिसर, प्रदेश, राष्ट्र आणि विश्व या सर्व स्तरांवर नातेसंबंधांची वीण मानवी विश्वात कर्माधिष्ठित कर्तव्यतत्परतेसह निर्माण केली आहे. आत्मस्वरूप मनोस्वरूपाने ही प्राप्त अवस्था, सापेक्ष कर्मतत्परता सांभाळणे, म्हणजे काम पुरुषार्थ सिद्ध करणे होय.

मोक्ष हा पुरुषार्थ दोन स्तरावर सिद्ध करावयाचा असतो. एक वैयक्तिक स्तरावर, दुसरा सामूहिक स्तरावर. वैयक्तिक मनोस्वरूप सिद्धी म्हणत विजनवासात

जाऊन, परब्रह्मस्वरूप होणे. समाधीमग्नतेने देह विसर्जित करून, वा विदेही होऊन परब्रह्मस्वरूप अनुभवणे अर्थात निजरूप होणे होय. सामूहिक स्तरावर मोक्ष याचा अर्थ प्रेमपूर्वक निष्काम कर्मतत्परता होय. धर्म, अर्थ आणि काम हे तीनही पुरुषार्थ आधी निरुपिल्याप्रमाणे सामूहिक जीवनात सिद्ध करणे म्हणजे परब्रह्मस्वरूपाने प्रकट होणे होय. हाच नरदेहाच्यासाठी खरा मोक्ष होय. यालाच लोकनिष्ठ अध्यात्म असे म्हणतात. हेच सदेह वैकुंठगमन होय.

अशाप्रकारे आत्मस्वरूप असे मनोस्वरूप, देहाहंकारपणे नैतिकविश्वाचे ठायी बद्ध व बाधित न होऊ देता, कर्मतत्पर होणे, म्हणजे पुरुषार्थ संपादन.

शिष्य : गुरुदेव, पौरुष आणि पुरुषार्थ यात कोणता भेद आहे?

सद्‌गुरू : पौरुष म्हणजे शारीर आणि आत्मिक तेजस्विता होय. या तेजस्वितेसह वर्तन करणे म्हणजे पुरुषार्थ होय. पौरुष म्हणजे शक्तिमत्ता आणि पुरुषार्थ म्हणजे त्या शक्तिमत्तेचा मनोस्वरूपसिद्धीने उपयोग करणे होय.

शिष्य : गुरुदेव, नैतिकविश्वातील सत्ताप्रभुता मनोस्वरूपसिद्धीने कशी वापरता येणार? तेथे तर संघर्ष अटळ नव्हे का? असे असेल तर; गुरुदेव हा संघर्ष अभिनिवेशपूर्वकच होणार नव्हे का? म्हणजे मनोस्वरूप बद्ध, बाधित होणे अटळच नव्हे का? क्षमा करा गुरुदेव, मानवी जीवनाचा प्रवास तर अशा संघर्षात्मकतेने घडला आहे, हे वास्तव नव्हे का? मग, अशा जीवन प्रवासात आपण म्हणता असे पुरुषार्थपूर्ण जीवन कसे अनुभवता येईल? मानवी जीवनात मनोविकार, वासनालोलुपता, स्वार्थांधता, द्वेष, मत्सर, सूड अशाच गोष्टींचा प्रवास अनादिपणे सुरू आहे. हाच असतो का जीवनार्थ कलह? गुरुदेव या प्रश्नांनी मी अशांत होतो. जीवनाची या प्रवासामधील, यथार्थता कोणती?

सद्‌गुरू : वत्सा, नरदेह त्रिविध प्रकारे बद्ध आहे हे आपण पाहिले. असे असूनही त्याच्या ठायी गात्र आणि आत्मरूप यांच्या संयुगाचे ठिकाणी, स्वसंवेद्य, सच्चिदानंद स्फुरक असे ब्रह्मस्वरूप अर्थात मनोस्वरूप असतेच. या मनोस्वरूपाने सामूहिक जीवनात वर्तन करण्यासाठी कुटुंब या संस्थेपासून विश्वात्मकता येथपर्यंत, संस्थांची उतरणच जणू विश्वात्मक मानवी जीवनासाठी, मानवाने निर्माण केली. त्या प्रत्येक संस्थेच्या ठायी, आत्मांशपुंज स्वरूपात व व्यक्ती म्हणून आत्मांश स्वरूपात; प्रत्येक मानवी अस्तित्व, समूहपणे व पृथकपणे मिरविण्याचा, स्वाभाविक असा प्रयत्न, ठायीच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने करते. त्यामुळे प्रत्येक संस्थेचा अभिनिवेश, संस्थेचे संरक्षण, भरणपोषण, स्थलकालपरिस्थिती सापेक्ष परिवर्तनात्मक अवस्थांतरण;

ही नैतिकविश्वाच्या स्वरूप प्रकटीकरणासाठी आवश्यक व कर्तव्यपूर्तीसाठीची नैतिक जबाबदारी प्रत्येक मानवी अस्तित्वावर येऊन पडणे, स्वाभाविक आहे. त्यामुळे प्रत्येक संस्थात्मक अवस्थेतील सत्ताप्रभुत्वभावना मनोस्वरूपाचे ठायी संवेदित होणे व स्फुरणे स्वाभाविकच असते. असे करतांना देहभावाच्या ठिकाणी अगोदर सांगितल्याप्रमाणे वृत्ती, प्रवृत्ती, वासना, अहंकार, पौरुष, प्रेम, आसक्ती, आदि सारे काही प्रकटणेही स्वाभाविकच होय. परंतु येथेच मनोस्वरूप, आत्मस्वरूपपणे आविष्कारित होण्यात बाधा निर्माण होते. मनोस्वरूप बाधित होऊन; अहंकार, अज्ञान, वासनाधीन होऊन अशाश्वत अस्तित्वाला शाश्वत मानून कर्म करू लागते. असे कर्मच त्याला पुरुषार्थ वाटू लागते. अशी लिप्त, अहंकारी अपेक्षापूर्ती कधीच होणे शक्य नसते. जीवनसंघर्ष दुःखकारक होतो. जीवनसंघर्ष ही तर स्वसंवेद्य स्फुरक स्वाभाविक गोष्ट आहे. बद्धता आली की निर्विकारासाठी अर्थात मुक्तीसाठी संघर्ष आलाच. मनोस्वरूपाच्या बाधिततेने प्रकट होऊ लागले की, जीवनातील संघर्ष, कर्मपरता आणि परस्पर आनंद किंवा प्रेमकारक वर्तनात्मकता ही क्रीडनात्मक असत नाही. ती षड्रिपूंच्या आधीन होऊन कार्य करू लागते. अवघे जीवन प्रलंयकारी संघर्षाच्या रूपाने अनुभूत होऊ लागते. असे घडले की कुटुंबापासून ते विश्वापर्यंत सर्व स्तरावर अहंकारी, शोषणात्मक युद्धे सुरू होतात. यातूनच, तू म्हणतोस तशा, बाधित मनोस्वरूपात अज्ञानवश, अहंकारी विकृती निर्माण होतात. त्याच नैतिक, शाश्वत आणि यशदायी वाटू लागतात. त्यातून मानवी जीवन उदय आणि आलयाच्या ठिकाणीच प्रलयंकारी, नर्ककारक, असंतुष्टता, अतृप्तता, खंती अनुभवू लागते. वत्सा, हा खरा संघर्ष नसतो. संघर्ष ही क्रीडा किंवा लीला आहे. परमात्म्याच्या, स्वसंवेद्य सच्चिदानंदस्वरूप स्फुरक अशा सृष्टीस्वरूप होण्यापासूनच, ही क्रीडा सुरू आहे. खेळ खेळतांना गड्यांनी, आपणच ठरविलेले खेळाचे नियम निर्णयपूर्वक, निश्चयाने आणि विवेकाने पाळले तरच, खेळ खेळ म्हणून आनंदानुभूती देतो. खेळात बद्धता आहे तशीच मनोस्वरूप सिद्धी आहे. क्रीडा आणि कला या, अशा मनोस्वरूपाच्या सिद्धीचा सहज मार्ग म्हणूनच, मानवाने अर्जित केल्या आहेत. हे लक्षात घेऊन; अपरिहार्यपणे आलेली बद्धता निर्लेप कर्मतत्परतेने वर्तन करीत, आविष्कृत करणे; हे मनोस्वरूपाचे कार्य होय. अशाप्रकारे वर्तन घडू लागले तर व्यष्टीपासून समष्टीपर्यंत बद्धतेत मनोस्वरूपाने प्रेमपूर्वक, मुक्त, असा क्रीडनाचा अनुभव आपण करू शकतो.

शिष्य : गुरुदेव, याचा अर्थ, बद्धतेच्या मर्यादा पाळूनच, मनोस्वरूपाने

याचिदेही आत्मस्वरूप, अर्थात परमात्मस्वरूपाचा अनुभव ठायीच घेता येतो. असेच ना?

सद्‌गुरू : होय, बद्धतेच्या मर्यादा, सर्वांनाच, सर्व स्तरांवर, पाळाव्या लागतात. हीच तर निर्गुणाची सगुण लीला होय. मात्र सतत विवेक जागृत ठेवून; बद्धअस्तित्वाचे वास्तव भान ठेवून, बद्धतेलाच शाश्वत सत्य न मानता, अशाश्वत तरी सत्य अशा बद्धतेचे प्राप्त कर्म, निखळ मनोस्वरूपाने करण्याचा, सतत अभ्यास करावा लागतो. म्हणजेच मनोस्वरूप, शुद्ध आणि सिद्ध ठेवण्याचा सतत अभ्यास करावाच लागतो. मनोस्वरूपसिद्धी घडली की; ठायीच चराचराचा सगुण स्वरूपाचा आणि सच्चिदानंदस्वरूप निर्गुण स्वरूपाचा अनुभव येऊ लागतो. हेच सदैव लक्षात ठेवून; अभ्यास करणे आवश्यक आहे.

शिष्य : म्हणजे, गुरुदेव, प्रत्येक जीव या तऱ्हेने वागू लागला तर प्रत्येकच परमात्मस्वरूप ठायी अनुभवू लागेल, होय ना?

सद्‌गुरू : होय अगदी खरे आहे.

शिष्य : परंतु, गुरुदेव अशा स्थितीला जाणारा, आपल्यासारखा अपवादात्मक असा आढळतो. मग अन्य अगणितांना हा अनुभव कसा मिळावा?

सद्‌गुरू : अगदी योग्य आणि अचूक प्रश्न विचारलास. हे बघ, अशा अपवादात्मक विभूतिमत्त्वाला, देव मानून त्याच्या ज्ञानसिद्ध अवस्थेकडे, पूज्य भावाने, अशक्यतेच्या कोटीत ढकलून, आपण स्वतः अंधपणे ज्ञानापासून दूर आणि देहभावाच्या अहंकारवशतेत जगण्यात धन्यता मानत. तू म्हणतोस ते अगणित जगतात. या सर्वांचा विवेक जागृत करून; त्यांना मनोस्वरूपसिद्धीसाठी प्रवृत्त करण्यासाठीच; ऋषी, मुनी, तपस्वी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञचिंतक, योगी अनुभवी, धुरीण, जाणते, सतत प्रयत्नशील असतात. किंबहुना नैतिकविश्वाची निर्मिती, त्यासाठीच लोकधुरिणांनी केली आहे. धुरिणांचे अनुकरण अन्य अगणितांनी करावे हीच अपेक्षा असते. ज्ञानदान व ज्ञानार्जनाच्या सर्व परंपरा, तत्त्वज्ञानाच्या विविध परी, यांसाठीच निर्माण झाल्या आहेत.

प्रत्येक नरदेह, शुद्ध मनोस्वरूपसिद्धीपर्यंत पोहोचून आत्मसाक्षात्कारी व्हावा, असाच प्रयत्न असतो. म्हणून अखिल मानव जातीमधील प्रत्येकाने मनोस्वरूपसिद्धीने प्राप्त स्वीकृत कर्मतत्पर व्हावे. ठायीच सच्चिदानंदस्वरूप आत्मस्वरूप, मनोस्वरूपाने अनुभवावे, असा प्रयास असतो. मानव जातीतील, प्रत्येक मानवाने, मनोस्वरूपसिद्धीचे ध्येय समोर ठेवून; अभ्यासाला आरंभ करावा, असा प्रबोध, धुरीण आणि गुरुवर्ग

करीत असतात. ज्याची जेवढी अभ्यास साधना, तेवढी मनोस्वरूपसिद्धी किंवा मनःशक्तीचा विकास अधिक व तेवढे त्या व्यक्तीचे वर्तन ज्ञानवान होते. असे हे सूत्र आहे.

शिष्य : म्हणजे गुरुदेव, मन, मन, असे आपण ज्या गोष्टीला म्हणतो आहोत, ते आत्मस्वरूप, ठायीच देहभावाने झाकले जाते. ते मनःशक्ती विकासाने सर्वथा प्रकट करण्याचा प्रयत्न करावयाचा असेच ना?

सद्‌गुरू : वत्सा आत्मस्वरूप हेच मनोस्वरूपपणे प्रकटते हे लक्षात ठेवून प्रवास करायचा; हाच बद्धतेच्या मर्यादा पाळून ज्ञानात्मक होण्यासाठीचा अभ्यास; हाच जीवनार्थ संघर्ष होय. असा संघर्ष अगोदर सांगितल्याप्रमाणे जेवढा पुरुषार्थपूर्ण होईल, तेवढी जीवनकला सच्चिदानंदस्वरूप होईल. कारण तोच तर आत्मस्वरूपाचा, अर्थातच मनोस्वरूपाचा स्वभाव आहे. निर्गुण नित्य सत्य आहे. तसेच निर्गुणाचे सगुण होणेही नित्य सत्य आहे. सगुणाचे निर्गुणत्व ठायीच नित्य अनुभूत होणे, हेही सत्य आहे. यासाठीच मनोस्वरूपतेचे ज्ञान आणि मनोस्वरूपसिद्धी आवश्यक होय. तत्त्वज्ञान, मनोविज्ञान अर्थात वर्तनशास्त्र यांचे मंडन तत्त्ववेत्त्यांनी यासाठीच केले आहे.

शिष्य : म्हणजे, गुरुदेव, यशस्वी, आनंदमय. जीवनाची गुरुकिल्ली म्हणजे मनःशक्तीचा परिपूर्ण विकास, होय ना? मनःशक्तीचा परिपूर्ण विकास म्हणजेच मनोस्वरूपता अर्थात आत्मसाक्षात्कार होय ना? मनोस्वरूपसिद्धीने, जीवनात प्राप्त स्वीकृत कर्मपरतेने प्रवासणे, म्हणजेच जीवनक्रीडा, जीवनकला किंवा ठायीच सच्चिदानंदस्वरूपता अनुभवणे होय ना?

सद्‌गुरू : वा वा! वत्सा तुला मनोस्वरूपसिद्धीचे परिपूर्ण आकलन झाले आहे. आता मी माझ्या तपःश्चर्येला मोकळा झालो.

मानस सरोवरात काहीवेळ उठलेले तरंग, हंसथव्यांचा झेपावेगवावर, सारे काही शांत झाले. गगन मानसात वितळून गेले. कैलास बिंब, स्वतःचे प्रतिबिंब पाहून, स्वतःला सच्चिदानंदस्वरूप अनुभवू लागले!

●●●

## मनोस्वरूप विचार
**(वर्णनात्मक तक्ता १)**

निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, अनंत, महाशून्य, श्रीकृष्ण, केवल, अविनाशी, निजरूप, परब्रह्म, परमात्मा, आत्मस्वरूप, स्वसंवेद्य सच्चिदानंदस्फुरक आद्य, एकल असे परमात्मस्वरूप-अस्तित्व स्वसंवेद्यता सच्चिदानंदरूप स्फुरकता हा-स्वभाव निजस्वरूप स्वसंवेद्य स्फुरकता ही मनोस्वरूपता - या सर्व स्वभाववैशिष्ट्यांसह अस्तित्व हीच परमात्म्याची बद्धता

↳

सच्चिदानंदपूर्ण मनोस्वरूपतेने सृष्टीआविष्कार-अविनाशी, परिवर्तनशील अशा उदय, आलय, विलय प्रक्रियेसह सृष्टीआविष्कार स्वरूपाची वैविध्यपूर्ण अगणितता हा परमात्म्याचा अंशात्मक, अंशपुजात्मक आत्मस्वरूप आविष्कार म्हणजेच सृष्टीतील भूतमात्र रूपे, त्यातून उदय, आलय, विलय प्रक्रियेत अविनाशी, परिवर्तनशील, नित्यनूतन

↳

सत्‌च्चिदानंदपूर्ण, जड, चेतन, अशी आत्मस्वरूप अर्थात मनोस्वरूप सृष्टी - उदय, आलय, विलय प्रक्रियेत असे अविनाशी परिवर्तनशील नित्यनूतन

मनोस्वरूप अर्थात आत्मस्वरूप, सत्‌च्चिदानंदपूर्ण, जीव किंवा प्राणी सृष्टी - चतुर्विध - उद्‌भिज, स्वेदज, अंडज, जारज, यांचा उदय, आलय, विलय प्रक्रियेत अविनाशी परिवर्तनशील नित्यनूतन

↳

सच्चिदानंदपूर्ण मनोस्वरूप अर्थात आत्मस्वरूप जीवसृष्टीतील, जारजजीवांतर्गत, मानवप्राणी - उदय, आलय, विलय प्रक्रियेत अविनाशी परिवर्तनशील नित्यनूतन

आद्य आत्मस्वरूप अशा मनोस्वरूपापासून, मानवी मनोस्वरूपापर्यंतचे सर्व अस्तित्व हे स्वरूपसंबंधाने अस्तित्वात येत असल्यामुळे, प्रत्येक अस्तित्व स्वबद्धतेसह सत्य, परिपूर्ण तरी अविनाशीपणे परिवर्तनशीलतेने पृथक असूनही परमात्मस्वरूपच असते. ते मनोस्वरूपाने आविष्कृत होते.

↳

अवघी सृष्टी प्रक्रिया, आविष्काररूपांच्या परस्परावलंबी संघटन, विघटन, संकर, संयुग, संक्रमण, अशा प्रक्रियांमुळे, अविनाशी परिवर्तनशील अस्तित्व भिन्न पृथक एकल आणि सामूहिक अशी नवी रूपे अनंतपणे अनुभवत असते. या सर्व उदय, आलय, विलय प्रकियांतर्गत व्यवस्थापन, परिवर्तन, अवस्थांतरण इ. मनोस्वरूपाने घडते.

↳

मानवी मनोस्वरूपाने वाणीला मनोस्वरूप रूप देत ही अवघी प्रक्रिया ग्रंथनिविष्ट, अनुभूतीनिविष्ट, कर्मनिविष्ट स्वरूपात, नैतिकविश्व निर्माण करून मांडली. या नैतिकविश्वाला समूहमनोस्वरूपता प्राप्त झाली. ही प्रक्रिया अखंड, अविनाशी, परिवर्तनशील, स्वसंवेद्य स्फुरकतेने सनातनपणे नित्यनूतनत्व आणि नित्य वर्तमानत्व अनुभूत करते.

## आत्मस्वरूप – मनोस्वरूप
# स्वरूपसंबंध
**(वर्णनात्मक तक्ता २)**

| | |
|---|---|
| स्वरूपसंबंध – → | **आद्य परमात्मस्वरूप** – स्वसंवेद्य स्फुरक – सच्चिदानंद स्वरूप निर्गुण, निराकार, निर्विकार, सर्वव्यापक सार्वकालिक, अविनाशी |
| स्वरूपसंबंध → | **स्वसंवेद्य स्फुरक – सच्चिदानंदस्वरूप – मनोस्वरूप आत्मस्वरूप = मनोस्वरूप** |
| स्वरूपसंबंध → | महतत्त्व – महाशक्ती – अगणित ब्रह्मांडे – अंतरिक्ष – **मनोस्वरूप** तेजोगोल, तारे, नक्षत्रे असंख्य इ. |
| स्वरूपसंबंध → | प्रत्येक ब्रह्मांडात – शिव–शक्ती, विष्णू–लक्ष्मी, ब्रह्ममाया, पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश युक्त सूर्यमालांसारखी स्वतंत्र अस्तित्वे – ग्रह, उपग्रह इ. सह अंतरिक्ष सत् चिद् आनंद स्वरूप **मनोस्वरूप** |
| स्वरूपसंबंध → | सूर्यमाला – ग्रहमाला पृथ्वी इ. वरील सर्व गुणात्मकतेने पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश + शिवशिवा, विष्णुलक्ष्मी, ब्रह्ममाया त्रिगुण अशी विविध प्रकारे, विविध आविष्कारासह सृष्टी ग्रहमालेतील प्रत्येक घटकावर – अष्टधाप्राकृतिक – **मनोस्वरूप** |
| स्वरूपसंबंध → | पृथ्वीवरील सृष्टी – सत्–चिद्–आनंद स्वरूप– अष्टधाप्राकृतिक – जडचेतन स्वरूप. सुप्तचेतन = जड व प्रकट चेतन जीव **मनोस्वरूप** |

| | |
|---|---|
| स्वरूपसंबंध → | अष्टधाप्राकृतिक - सच्चिदानंदस्वरूप - आत्मस्वरूप<br>उद्भिज, स्वेदज, अंडज, जारज - **मनोस्वरूप** |
| स्वरूपसंबंध → | अखिल मानव (जारज) (योनिसंभव) व<br>(अष्टधाप्राकृतिक - आत्मस्वरूप - संघटन संयुग<br>अयोनीसंभव)<br>: देव, दानव, राक्षस, यक्ष, किंपुरुष, विद्याधर, गंधर्व<br>इ. द्विविध नर-नारी रूप - **मनोस्वरूप**<br>व्यष्टी आणि समष्टी स्वरूप - **मनोस्वरूप** |
| स्वरूपसंबंध → | उपरोक्त शृंखलेत सर्वव्यापक सार्वकालिक आत्मांश<br>किंवा आत्मांशपुंज असे **मनोस्वरूप** |
| स्वरूपसंबंध → | अखिल मानव निर्मित, आकारित वाणीस्वरूप आणि<br>नैतिकविश्वस्वरूप - **मनोस्वरूप** |

# ४. मन मंडल स्वरूप

तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, वर्तनाचे शास्त्र या क्रमाने, मानवी मनाचा विचार, शास्त्रीय दृष्टीने करण्याचा प्रयत्न झाला आहे. मन आणि मनाची शक्ती, यांचा विचार स्वतंत्रपणे केला जाणे; ही गोष्ट ज्ञान आणि विज्ञान या दोन्ही आकलनाच्या दृष्टीने, महत्वाची आहे. मन हे जड आहे, असे मानणाऱ्यांची परंपरा मोठी आहे. त्याचप्रमाणे मनाला अजड मानणाऱ्यांची परंपराही निर्माण झालेली आणि स्थिरावलेली पाहावयास मिळते. आद्य स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मस्वरूप असे मनस्वरूप आहे; असा कल्प, स्वीकारून, आपण चर्चा करीत आहोत. सद्-चिद्-आनंद स्वरूप आत्मरूप, हे निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, केवल, अनंत, असे स्वसंवेद्य स्फुरणात्मकस्वरूप आहे. ही स्वसंवेद्य स्फुरणात्मकता मान्य केल्याशिवाय, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, अनंत, आत्मरूप, असे कैवल्याचे, परमात्म्याचे, परब्रह्माचे, स्वरूप तरी कसे ज्ञात झाले असते? आत्मरूपाची स्वसंवेद्य स्फुरणात्मकता, हीच आत्मस्वरूपाची मनोस्वरूपता होय. या स्वसंवेद्यतेला नित्य स्फुरण आहे. कारण स्वसंवेद्यता हीच स्फुरण प्रक्रिया आहे. या स्फुरण प्रक्रियेअंतर्गत, निर्गुण, निराकार, निर्विकार, एकल, अनंत, सार्वकालिक, सर्वव्यापक, अशा परमात्म्याच्या ठिकाणी, असलेल्या अस्तित्वात, असंख्य, अगणित, पृथक अशी, सूक्ष्मातिसूक्ष्मापासून महाकायातिमहाकाय पर्यंत, अंश, अंशपुंज स्वरूपाची अस्तित्वे निर्माण झाली आहेत. परमात्म्या अंतर्गतच असूनही, पृथक अस्तित्वाची, आत्मरूप स्वसंवेद्यता, त्या त्या रूप स्वरूपात, बद्धपणे संवेदित होत आहे. पृथ्वी आणि पृथ्वीवरील जीवसृष्टीतील मानव, हे ही आत्मरूपाच्या स्वसंवेद्यतेतून स्फुरित, अंश आणि अंशपुंजच होत. ही अस्तित्वेदेखील पृथक सगुण, साकार, सविकार बद्ध अशी; तरी स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूपात्मक अस्तित्वे होत. आत्मरूप स्वसंवेद्य स्फुरणात्मक अशा मनोस्वरूपाचे कार्य, कसे

आणि का प्रकटते? हा प्रश्न मानसशास्त्राचा चर्चेचा विषय होय. वर उल्लेखिल्याप्रमाणे, मन हे इंद्रिय आहे; असे कल्पून, त्याची जडता स्वीकारली आहे. त्या कल्पाच्या अनुषंगाने कार्यविषयक विचार केला आहे. हा विचार, आत्मरूपाशी, मनाचा स्वरूपसंबंध, विचारात घेऊन करणे, आवश्यक आहे. त्याच दृष्टीने माऊली ज्ञानेश्वरांनी –

''**ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।**
**जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।।**'' ज्ञा. अ. १ ओ. १।।

असा स्वसंवेद्य आत्मरूपाचा, आद्य ॐकार आकार, स्फुरविणाऱ्या आद्य अस्तित्वाचा, अर्थातच, आत्मरूप आणि मन, अर्थात आद्य स्फुरक असा स्वरूप संबंध स्पष्ट करून; स्वसंवेद्य आत्मस्वरूप, म्हणजेच मनःस्वरूप होय; असे सूचित केले आहे. हाच आत्मरूप आणि मन यांचा स्वरूपसंबंध; बद्ध अशा सगुण, साकार, सविकार, अवस्थेतील स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूपाचे, जीवात्म स्वरूप सिद्ध करतो. या आत्मस्वरूप, मनस्वरूपाचे कार्य निवेदित करतांना; या कार्यप्रक्रियेची सुरुवात; मोठ्या खुबीने, ज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायातील, तिसऱ्या श्लोकावर, भाष्य करतांना, रूपकात्मकतेने माऊलींनी वर्णन केली आहे–

''**महदब्रह्मउदरीं । प्राकृतीं आठै विकारीं ।**
**गर्भाची करी । पेलोवेली ।।**'' ज्ञा. अ. १४. ओ. ९० ।।
''**उभयसंगु पहिलें । बुद्धितत्त्व प्रसवले ।**
**बुद्धितत्त्व भारैलें । होय मन ।।१।।**'' ज्ञा. अ. १४. ओ. ९१ ।।

रूपकातून, माऊली ज्ञानेश्वर, मानव नावाचा, पृथक अंशपुंज स्फुरण घडतांना अर्थात अष्ठधाप्रकृतीने, विकारित देह निर्माण होतांना, अंशात्मक स्वरूप आणि अष्टविकारी यांचा संयोग झाला. तेव्हां आत्मस्वरूपातून बुद्धीतत्त्व प्रसवले. हे बुद्धीतत्त्व आत्मस्वरूपाने भारले आणि 'मन' झाले म्हणजेच मनोस्वरूप प्रकटले. या प्रक्रियेत, आत्मस्वरूप आणि मनोस्वरूपाचा स्वरूपसंबंध तर स्पष्ट केला आहे. त्याचबरोबर अष्ठधाप्राकृतिक देहाच्या ठिकाणी, मनस्वरूपाचे, कार्य करण्याचे साधन म्हणून, 'बुद्धीतत्त्व' असा उल्लेख आला आहे. हे बुद्धीतत्त्व, श्रवण, द्रष्टेपण, श्वसन व घ्राण, रसत्व आणि स्वरत्व, स्पर्शत्व, या तत्त्वांप्रमाणेच प्रकटले; हे उघड आहे. अर्थात श्रवण–कान, द्रष्टेपण–डोळे, श्वसन व घ्राण– नाक, रसत्व स्वरत्व– जीभ आणि स्पर्शत्व–त्वचा, या पंचज्ञानेंद्रियांप्रमाणेच बुद्धितत्त्व– मस्तक महामंडळ

असा मेंदू असे सहावे इंद्रिय प्रकटले. चर्चा करतांना पंचज्ञानेंद्रियाची चर्चा होते. तशी मनाची होत नाही, हे विचारत घेतले तर; मेंदूची चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. अशी मेंदूची स्वतंत्र चर्चा मानसशास्त्र करते. स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप, स्वसंवेद्य स्फुरणात्मक जीवात्मा स्वरूपाने प्रकटते तेव्हां, मन हे आत्मस्वरूप अवस्थेतच प्रकटते. त्यामुळे जीवाच्या संदर्भात, विचारात, चर्चा करतांना, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप- स्वसंवेद्य स्फुरणात्मक जीवात्मा- स्वसंवेद्य स्फुरणात्मक मनोस्वरूप असा स्वरूपसंबंध विचारात घ्यावा लागेल. स्वसंवेद्य जीवात्मा, हा स्वसंवेद्य परमात्मरूपांतर्गत; बद्ध स्वरूपातील, पृथक स्वसंवेद्य जीवात्मस्वरूप; सगुण, साकार, सविकार असे पृथक रूप होय. स्वसंवेद्य स्फुरणात्मक परमात्मस्वरूपाच्या, बहुस्वरूप, संवेद्येतील एक अंशपुंज होय. हे विचारात घेऊन; आत्मरूप- मन- बुद्धितत्त्व अर्थात मेंदू, यांचा स्वरूपसंबंध विचारात घ्यावा लागेल. स्वसंवेद्य परमात्म स्वरूपाच्या; पृथ्वी या बद्ध अंशपुंजातील, आत्मस्वरूप प्रकटीकरणाच्या आद्य आरंभ साकार रूपाचे, ॐचे वर्णन, माऊलींनी रूपकात्मकतेने केले आहे. ते गणेश वंदनेच्या स्वरूपात आहे. त्यातील 'मकार महामंडळ मस्तकाकारे' असा स्पष्ट उल्लेख माऊलींनी केला आहे. तो उल्लेख पाहाता, 'मंडलाकारमस्तक' हा उल्लेख मेंदूचा आहे हे स्पष्ट आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेवर, भावार्थ- दीपिका रूपाने, भाष्य करतांना, 'पुरुषोत्तम योग' या पंधराव्या अध्यायात, परंपरेने, मनासाठी आलेल्या 'इंद्रिय' ह्या शब्दावर, भाष्य करतांना, मोठ्या सूचकतेने, आत्मस्वरूप- मनोस्वरूप- बुद्धितत्त्व रूप यांचा स्वरूपसंबंध स्पष्ट झाला आहे.

बुद्धितत्त्वाचे संचालन व व्यवस्थापन, स्वसंवेद्यतेने होते. या प्रक्रियेचे कारण, वरील स्वरूपसंबंध हे होय. बुद्धितत्त्वाचे संचालन व व्यवस्थापन म्हणजेच, आत्मस्वरूप, स्वसंवेद्यतेच्या अर्थात मनोस्वरूप, स्वसंवेद्यतेचे नियोजन, ज्या ऐंद्रिय व्यवस्थेने होते; ते इंद्रिय म्हणजेच, 'मस्तक', अर्थात 'महामंडळ' अर्थात मस्तकातील मेंदू या इंद्रियाचे अस्तित्व होय. मनोस्वरूपाची स्वसंवेद्य स्फुरणात्मकता म्हणजेच मनःशक्ती होय. या मनःशक्तीचे संयोजन व व्यवस्थापन, मनाच्या ठिकाणी अर्थात मेंदूच्या यंत्रणेने होते. याकरिता, मानसशास्त्रात, मेंदूचे कार्य, याऐवजी मनाचे कार्य असे म्हटले जाते. याचे दुसरे कारण म्हणजे आत्मस्वरूप आणि मनस्वरूप यांचा स्वरूपसंबंध होय. मनस्वरूपाचे, अर्थात स्वसंवेदनेचे, अर्थात मनःशक्तीचे, कार्य मन-मेंदू स्वरूपसंबंधातून कसे घडते; याचेही वर्णन, योगशास्त्रात, मानसशास्त्रात व शरीरविज्ञानात केलेले असते. या आत्मचलनाचा, अधिकाधिक

अभ्यास नित्य सुरूच आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील 'पुरुषोत्तम योग' या १५ व्या अध्यायात केलेल्या चिकित्सेवर माऊली ज्ञानेश्वरांनी भाष्य केले आहे. भगवद्‌गीतेतील श्लोक असे-

"**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनः षष्ठानान्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ।।७।।** गीता अ. १५ श्लो ७ ।।
**शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ।।८।।** गी. अ. १५ श्लो. ८ ।।
**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।**
**अधिष्ठाय मनाश्चायं विषयानुपसेवते ।।९।।** गी. अ. १५ श्लो. ९ ।।
**सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।**
**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ।।१५।।**" वा. अ. १५ श्लो. १५ ।।

जीवलोकात, अंश, अंशपुंज याप्रकारे मीच असतो. हे जीवांचे अस्तित्व हे माझ्या स्वसंवेद्य स्फुरणानुसार, सनातन आणि पृथक, बद्ध असे अस्तित्व आहे. हाच माझा अंश अर्थात परमात्मा अंशात्मकतेने स्वाभाविकपणे जीवात्मस्वरूप व क्रमाने, मनोस्वरूप असून, देहरूपी क्षेत्रात, सहा इंद्रियांना कार्यान्वित करतो. जीवात्मा शरीर सोडून जातो म्हणजे दुसऱ्या जन्मात किंवा अवस्थेत प्रकट होतो, तेव्हा आत्मस्वरूप अशा मनस्वरूपाने सहाही इंद्रियातील कार्यान्वित केलेली, तत्त्वे, संपादित अनुभूतींसह, अर्थात वासनांसह तो प्रकट होतो. केवळ पंचभूतात्मक कलेवर सांडते. हा जीवात्मा मनोस्वरूपाने ऐकण्याचे साधन कान, पाहण्याचे साधन डोळे, स्पर्शाचे साधन त्वचा, रसाचे साधन जीव्हां, गंध साधन नाक आणि या सर्वांशी, संबंध जोडणारे, मनोस्वरूप मस्तक, अर्थात मेंदू, यांच्या आश्रयाने शब्दादि सर्व विषयांचा उपभोग घेतो. मी सर्व जीवात्म्यांच्या बुद्धीमध्ये, उत्तमप्रकारे, आत्मस्वरूपाने, अर्थात मनोस्वरूपाने मंडलस्वरूप प्रकटल्याने, स्मृती, ज्ञान, विस्मृती आदि बद्धजीवात्म्याचे धर्म, आत्मस्वरूप मनोस्वरूपाला अर्थात मस्तक, मंडल स्वरूप बुद्धितत्त्वाचा स्वभाव होतात. सर्व वेदांना, अर्थात परमात्म्याच्या अंतर्गत, स्वसंवेद्या व नित्य स्फुरणाचे, सर्व अनुभव, मानण्यास, जीवात्मस्वरूपात, घेण्यास मीच योग्य असतो. वेदार्थवेत्ताही मीच असतो आणि अंशपुंजस्वरूप बद्ध अशा, जीवात्म्याच्या ठिकाणी मनस्वरूपाच्या योगाने, सर्वनियामक, सर्वज्ञ असा, परमात्मा

मीच असतो. अशाप्रकारचा, स्पष्ट, अस्तित्वभाव निर्देश, या श्लोकांमधून केला आहे.

या सर्व विवेचनाचा मतितार्थ म्हणजे जीवात्मा या बद्ध अवस्थेतील, स्वसंवेद्य आणि नित्य स्फुरण यामुळे जाणवणारे; परमात्मअंश अस्तित्वाचे; सर्वात्मक परमात्मतत्त्व, जाणून घेऊन; जीवात्म स्वरूपातील, पृथ्वीवरील, अस्तित्वाच्या, परमात्मतत्त्वाच्या सर्वात्मकतेचा, वेध घेऊन; तत्स्वरूप मनोस्वरूपाने, समग्र जीवनशैलीची, मांडणी करता येणे, शक्य आहे. कोणत्याही बद्ध अवस्थेच्या नित्यतेसाठी आणि परमात्मस्वरूप अनुभूतीसाठी, ते आवश्यक आहे. परमात्मतत्त्वाचे स्वरूप सद्-चिद्-आनंद स्वरूप आहे. तेच स्वरूप त्या अंतर्गत स्फुरलेल्या जीवात्म्याला स्वाभाविकपणे भोगता यावे. परमात्म्याच्या स्वसंवेद्य आणि नित्य स्फुरण प्रक्रियेतील, प्रत्येक, पृथक, बद्ध; जरी स्वसंवेद्य, नित्य, स्फुरण प्रक्रियात्मक अवस्थेचा, पृथ्वीवरील जीवात्म्याला ठायीच आणि पृथ्वीवरील सर्व अंश आणि अंशपुंज अस्तित्वांचा; अर्थात पंचमहाभूतात्मक सृष्टीचा, परमात्म्याच्या स्वसंवेद्य आणि नित्य स्फुरणात्मक प्रक्रियेचा; अनुभव घेता येतो. हा अनुभव घेण्यासाठी, पात्र होतांना; जीवात्म स्वरूपातील, आत्मरूप, मनोस्वरूपाने ज्ञात करणे, शक्य आहे. आजवरच्या ज्ञानयोग आणि विज्ञानयोगातील प्रयत्नशील मानवाने यात उत्तुंग झेप घेतली आहे. पूर्णपरमात्मस्वरूप होणे म्हणजे पूर्ण बद्धता, सांडणे होय. परंतु सद्-चिद्-आनंदस्वरूप, अनंत, परब्रह्म, परमात्मा, अशा स्वरूपाच्या अंतर्गतच, आत्मांश किंवा आत्मांशपुंज स्वरूपातील, समस्त बद्ध अस्तित्वे, स्वसंवेद्य, नित्य स्फुरण प्रक्रियेमुळे; या ना त्या स्वरूपात, बद्ध अवस्थेतच, त्या एकल, सर्वात्मक, अनंत, सद्-चिद्-आनंद स्वरूपाची, निर्गुण, निराकार निर्विकार तरी स्वसंवेद्य, नित्य स्फुरण, अस्तित्वाची अनुभूती; सगुण, साकार, सविकार तरी स्वसंवेद्य, नित्य स्फुरणात्मकतेने, अपरिहार्यतेने भोगत असतात. याच बद्धअवस्थेमुळे केवळ परमात्मस्वरूप अवस्थेपासून जीवात्मा विचलित होऊन; जीवबद्धतेतच गुरफटतो. परिपूर्ण अशा स्वतः ठायी असलेल्या, आत्मअंश किंवा आत्मअंशपुंजात्मक अस्तित्वाचे, त्याला विस्मरण होते. अज्ञानवश, अशा अवस्थेत, त्रिताप भोगण्यातील दुःखानुभूती, संघर्ष, यातून प्रकटणाऱ्या; बद्ध जीवदशेतील ऐंद्रिय अशा, प्राकृतिक वासनांचा, विकृत परिणाम तो भोगू लागतो. ही अवस्था मानवी जीवात्म्याने नेहमीच नाकारली आहे. ती नाकारून जीवनशैली आनंदमय करण्यासाठीच तर ज्ञानयोग आणि विज्ञानयोगाची मांडणी, आत्मपुंजात्मक सामूहिक स्वरूपातील

मानवी जीवात्म्यांनी केली आहे.

पृथ्वीवरील मानवी जीवनशैली; विश्वरहस्य जाणून घेऊन; जडचेतन सृष्टीचा विनियोग, मानवकेंद्रिततेने, तसेच समस्त सृष्टीच्या दृष्टीने, अधिक कल्याणकारक, करावयाचा आहे; हे मानवाचे ध्येय, मानवाने, नित्यपणाने स्वीकारले आहे. ह्या ध्येयाची परिपूर्ती करावी, यासाठी, अंशपुंजात्मक मानवी समुदाय, स्पर्धेने प्रयत्नशील आहेत. प्रसंगी सर्वकल्याणात्मकतेचे उद्दिष्ट, विस्मरणात जाऊन, त्या त्या अंशपुंजात्मक मानवी समूहांची, बद्धतेतील स्वार्थपरता शिगेला जाऊन न्याय-अन्याय, सुष्ट-दुष्ट स्वरूपातील संघर्षही पेटतात. या तात्कालिक गोष्टी बाजूला सारून; सर्वकल्याणात्मकतेचे, उद्दिष्ट साधण्यासाठी, ज्ञानयोग आणि विज्ञानयोगाचे, परिपूर्ण ज्ञानात्मक, प्रयत्न करण्याचा प्रयत्न, माणसाने व्यक्तिगत, सामूहिक आणि सर्वात्मक स्वरूपात करणे आवश्यक असते.

जीवात्मा, बद्धअवस्थेतील तरी स्वसंवेद्य व नित्य स्फुरणात्मक स्वरूपात, मनोस्वरूपाने संवेदन, माहिती, ज्ञान स्वीकारून कर्मशील आहे. असे कर्म करतांना, परमात्मतत्त्वाचे परिपूर्णत्व, जीवात्मरूपात आणि मनस्वरूपातही, स्वाभाविकपणे अस्तित्वात आहे. तो त्याच पूर्णत्वाचा, अंश किंवा अंशपुंज आहे. या पूर्णत्वाचे जागरण आवश्यक असते. परिपूर्ण जागरणापर्यंत जाण्यासाठी, जीवात्म्याजवळ, जड देह हे जड साधन आहे. साधन सुविहित, निकोप, निर्दोष चलन घडवित असेल; तर साधनातून जे तत्त्व प्रकट होणार असते, ते परिपूर्णपणे प्रकटते. हे वास्तव लक्षात घ्यावे लागते. याकरिता ज्ञानेंद्रियांची शुद्धता व विकसितता अभ्यासपूर्वक आवश्यक असते. पंचज्ञानेंद्रियांचा, मनोस्वरूपातून थेट आत्मस्वरूपाशी, मनःशक्तीसह, नित्य, आनंदमय, संबंध जोडणारे, जड इंद्रिय साधन म्हणजे मस्तक अर्थात महामंडळ अर्थात मेंदू होय. अशा सहाही इंद्रियांची निकोपता, परिपूर्णविकसितता करणे आवश्यक असते. जीवात्म्याच्या ठायी, असलेल्या ऐंद्रियभावासह, स्वसंवेदित असलेल्या आत्मरूपाच्या स्वसंवेद्य व नित्य स्फुरणात्मकतेला ऐंद्रिय स्वरूपातील जीवाने, आत्मस्वरूप मनोभावाने, वळण लावण्याचा अभ्यास करणे शक्य असते. योगविज्ञानाने हे शास्त्रीय स्वरूपात सिद्ध केले आहे. तसेच विज्ञानाने माणसाच्या स्वसंवेद्य जीवात्मस्वरूप नित्यस्फुरण स्वरूपाचे मनोस्वरूप उपयोजून- जडचेतनाची मांडणी, मानवअर्जित कल्पाने, करून; विनियोगित करण्याच्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. या दोन्ही मार्गांनी ध्येयाप्रत जातांना, जीवात्मस्वरूपातील परमात्म्याची परिपूर्ण स्वसंवेद्य, नित्यस्फुरित,

स्वाभाविकता, लक्षात घेऊन; मनोस्वरूपाची व ऐंद्रियभावाची, परिपूर्णता गाठली पाहिजे. यासाठी पंचज्ञानेंद्रियांसह, प्रामुख्याने आत्मरूप-मन यांशी स्वरूपसंबंध असलेल्या मस्तक-महामंडळ अर्थात मेंदूचा; बद्धतेतील पृथक, स्वसंवेद्य, नित्यस्फुरण सहाय्याने, अभ्यास करीत विकास साधला पाहिजे.

●●●

# ५. दैवत-मन-स्वरूपसंबंध

पृथ्वीवरील मानव या जीवात्म मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, नैतिकविश्वनिर्मिती केली आहे. नैतिकविश्वामधील, अतिमहत्त्वाचा भाग म्हणजे, दैवतकथा निर्मिती होय. 'दिव्यत्वाची जेथ प्रतिती, तेथे कर माझे जुळती' या काव्यपंक्तीमध्ये दैवत निर्मितीची प्रक्रिया वर्णन केली आहे. जागतिक पातळीवरील, सर्व मानवी समूहांनी, आपल्या जीवनप्रणालींमध्ये, दैवते, दैवत उपासना, दैवत साधना, दैवतकथा, यांना महत्त्वाचे स्थान दिलेले आढळते. मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणाची ही प्रक्रिया, मानवाला प्राप्त असलेल्या 'वाणी' आणि वाणीच्या मौखिक आणि लिखित अशा भाषारूपांच्या आश्रयाने घडते आहे. मानवी जीवात्मा आणि सच्चिदानंदस्वरूप, निर्गुण, निराकार, निर्विकार, केवल, अनंत, महाशून्यस्वरूप, सार्वकालिक, सर्वव्यापक, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, असे परमात्मा, परब्रह्म, श्रीकृष्ण, आत्मस्वरूपा, मनोस्वरूपा, अस्तित्व, अंतरिक्ष, अंतरिक्षातील तेजोतत्त्वे अर्थात तेजोमेघ, अगणित ब्रह्मांडे, सूर्यमाला, पृथ्वीचे ब्रह्मांडस्वरूप, पृथ्वी कक्षेतील; वायु, तेज, आप, आकाश ही अस्तित्वे, पृथ्वीचे अस्तित्व, पृथ्वीशी बद्ध असलेली, जड-चेतन अस्तित्वे; या व अशा सर्व गोष्टीतील दिव्यानुभूतींचे स्वरूपसंबंध, दैवतकथांतून प्रकट होतात. या सर्व अस्तित्वांची, बद्ध, सगुण, साकार, सविकार, शक्तिमत्ता, त्यांचे परमात्मस्वरूप, आत्मस्वरूप स्वसंवेद्य स्फुरक अस्तित्व आणि अन्य अस्तित्वांशी असलेला संबंध; यांशी, मानवसापेक्ष स्वरूपसंबंध दैवत कथांतून प्रकट होतात. या सर्व अस्तित्वांशी, मानवी जीवात्म्याचा आत्मिक, जैविक आणि भौतिक संबंध आहे. या संबंधांचा उपयोग, मानवी जीवनासाठी, अपरिहार्य आहे. या सर्वअस्तित्वांची, परमात्मतत्त्वांतर्गत बद्ध, परिवर्तनशील, सगुण, साकार, सविकार, अशा स्वरूपातही, स्वसंवेद्य स्फुरक शक्तिमत्ता, मानवी मनोस्वरूपाने, वैज्ञानिक स्वरूपात, उपयोजित केली आहे. असे उपयोजन करतांना, या अस्तित्वांतील,

तात्कालिकता, परस्परपूरकता, नियमितता, परमात्मस्वरूपांतर्गततेतील बद्धता, यांचा विचार करून; त्यांच्या शक्तिमत्तेचा, साधनस्वरूप उपयोग, नैतिकविश्वाच्या, मांडणी प्रक्रियेत केला आहे. सर्व अस्तित्वांतील गतिमानता, स्वसंवेद्यता, परिवर्तनशीलता, नित्यता, चैतन्यमयता, स्थितीरूपता, या व अशा गुणात्मकतेचा उपयोग मनोस्वरूपाने, स्वसंवेद्यस्फुरक शक्तींच्या सहाय्याने, विज्ञान, तंत्रज्ञान, सर्वप्रकारे मानवसापेक्ष व्यवस्थापन, मानवी जीवात्मस्वरूपाच्या जीवनप्रणाली यांच्या निर्मितीसाठी केला आहे. सर्वात्मकता, मानवी जीवनाची प्रणालीतील समाधानकारक पूर्तता, या दृष्टीने या सर्व अस्तित्वांच्या, गुणात्मकतेचा, स्वाभाविकतेचा, विचार करून; त्यांचे नैतिकविश्वात, कृतज्ञता, पूज्यभाव, कार्यान्वितताभाव, या संबंधाने, मंडन केले आहे. नैतिकविश्वातील धर्म, नीति, तत्त्वज्ञान, साधना, व्रते, अनुष्ठाने, संस्कार, कला, यांचा संबध, या दिव्यशक्तींशी भावात्मकतेने जोडलेला आहे. तर या दिव्यशक्तींचा उपयोग, वैज्ञानिक आणि तांत्रिकदृष्ट्या, मानवी जीवनप्रणालींच्या व्यावहारिक वर्तन, साधनपरंपरा, यांच्याशी जोडलेला दिसतो. अध्यात्माचा असा समग्र विनियोग मानवी जीवात्म्याच्या मनोस्वरूपनिर्मित नैतिकविश्वातील जीवनसंघर्षासाठी, सामर्थ्यसंपन्न कर्मवान होण्यासाठी उपयोग केला जातो.

मानवी जीवात्म्यांशी, सापेक्ष संबंधानुसार, दैवतशास्त्राची निर्मिती, मानवी मनोस्वरूपाने, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेआधारे केली. मानवी जीवात्म्यास, बद्ध, सगुण, साकार, सविकार अशा अस्तित्वाची, जाणीव संवेदित होत असल्याने; मानवी नैतिकविश्व निर्मितीप्रक्रियेत, मानवी मनोस्वरूपाने, सर्व दिव्य आणि सामान्य शक्तीरूपांना किंवा अस्तित्वांना, स्वसापेक्ष असे, मानवी स्वरूप दिले. त्यामुळे दैवतकथांमधील सर्व अस्तित्वे, मानवसदृश्य स्वरूपातच, प्रतिकरूपाने माणसाने, मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्यतेने सिद्ध केली. जगातील सर्व मानवी समूहांनी; परमात्म्याची निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक आणि सर्वव्यापक अशी, समग्रउत्पत्ती, स्थिती, लय स्वरूपातील प्रचलन, यांचे मूल कारण म्हणून, अनुभवन केलेले आहे. जीवात्म्यातील स्वरूपसंबंधाचे आकलन करण्यासाठी, स्मरण करण्यासाठी आणि जीवनसंघर्षाला आत्मबल प्राप्तीसाठी; या ना त्या प्रकारे, सगुण साकार, सविकार असे बद्धस्वरूप देऊन; मानवी नैतिकविश्वात, त्या मूलतत्त्वांचे, मानवी जीवात्म सापेक्ष, मंडन करून; परमात्मा आणि अंशात्मक स्वरूपातील जीवात्मा, यांचा भज्य व भजक संबंध प्रस्थापित केला आहे. हीच गोष्ट, मानवी मनोस्वरूपाने, सर्वच दिव्य शक्तिमत्तांच्या व भौतिक शक्तिमत्तांच्या संदर्भात केली आहे. जीवनसंघर्ष

अपरिहार्य, अनिवार्य असल्याने, त्याशी जीवात्मसामर्थ्याने सामोरे जातांना; परमात्मस्वरूपातून, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपात, त्या अंतर्गत बद्धपणे प्रकटलेल्या, सर्व अस्तित्वांच्या शक्तिमत्तांचा, उपयोजन प्रयोग करून; परिपूर्ण आत्मरूपाचे प्राकट्य, मनोस्वरूपाच्या ठिकाणी प्राप्त व्हावे; अशा उद्देशाने, मानवी जीवात्म्याने जीवात्म्याचे ठिकाणी असलेल्या, अंशात्मक अस्तित्वाने, आपल्यातील सर्वात्मक परिपूर्णत्व, संपन्न करण्यासाठी; साधना परंपरा सुरू केल्या. या साधनांच्या मार्गाने, जीव आणि आत्म, या दोन्ही स्वरूपातील संघर्षाला सामोरे जाण्यासाठी, वाणीचे उपयोजन करून; शक्तिमत्ता, जीवात्म्याच्या ठिकाणी, वश करण्याचा दीर्घोद्योग मांडला. वास्तविक, जीवात्मा हा ही आत्मस्वरूप परिपूर्ण, सत्य अस्तित्व असल्याने; स्वसंवेद्यतेने हे सर्वात्मक आत्मस्वरूप, परिपूर्ण सत्य अस्तित्व त्या त्या, दिव्य, पृथक, बद्धअस्तित्वाच्या ठिकाणी, प्रकटविण्याचा, हा मार्ग, मानवी मनोस्वरूपाने प्रस्थापित केला आहे. हे लक्षात घेतले तर; मानवी जीवनप्रणालीतील ही प्रक्रिया वैज्ञानिक सत्याच्या कसोटीवर, भौतिक स्वरूपात, जीवात्म्यांनाही अनुभवता येते.

मानवी मनोस्वरूपाला सर्वात्म स्वसंवेद्यतेमुळे, पृथ्वी, अंतरिक्ष आणि अनंत अवकाश, यांत व्याप्त, शक्तिमत्तांचे, बद्ध, पृथक, परस्परावलंबी गतिमान, चैतन्यमयी, परिवर्तनशील, अस्तित्व संवेदित झाले. जीवात्मा आणि ब्रह्मांडाच्या कक्षेतील अस्तित्वे यांचा स्वरूपसंबंध आकलित झाला. परिपूर्ण सर्वात्मक आत्मस्वरूप, मनोस्वरूपाने, मानवी, बद्ध, सगुण, साकार, सविकार, जन्म मरण, पुनर्जन्म, यांमध्ये, पृथकत्व मिरवतांना, संघर्षमय जीवनप्रणालीसाठी; या शक्तिमत्तांचे उपयोजन, स्वरूपसंबंधांमुळे घडत असते; त्याचे रूपांतर, स्वेच्छा उपयोजन प्रक्रियेसाठी, करावयाचे, स्वसंवेद्य स्फुरण, अर्थात कल्प स्वीकारले. या मानवी जीवात्म्याच्या, आत्मस्वरूप मनोस्वरूपाने जीवात्म्याच्या, अंशांत्मक, आणि अंशपुंजात्मक पृथक अस्तित्वांच्या, नित्य आणि नैमित्तिक, नैसर्गिक आणि नैतिकविश्वातील, तात्कालिक, नित्य आणि केवळ अशा, 'सच्चिदानंदस्वरूप' अनुभूतींच्या, भोगात्मक प्रक्रियेअंतर्गत, स्वभावतः सर्व शक्तिमत्तांना, त्यांच्या ठायीच्या, परमात्मांशस्वरूप दिव्यत्वानुसार, देवत्वाचा कल्प मांडून; मानवी जीवनशैलीत प्रयोगसिद्ध स्थान देण्याची परंपरा राखली आहे. दैवतनिर्मिती ही अशी मानवी प्रवृत्ती आहे.

भारतीय परंपरेतील, वेद वाङ्मयात, अशा शक्तिमत्तांना आवाहन करून; उपयोजित करण्यासाठी; यज्ञकर्मात्मक, प्रयोगसिद्धता केलेली दिसते. आधुनिक काळातील, वैज्ञानिक प्रयोगसिद्धीसारखीच ही प्रयोगसिद्धता असते. या योगाने

मानवी मनोस्वरूपाने परमात्मस्वरूपाच्या, अंशात्मक तरी परिपूर्ण, पृथक बद्ध, परिवर्तनशील, स्वसंवेद्य, स्फुरणात्मक, सगुण, साकार, सविकार अशा, परमात्मस्वरूपांतर्गत अस्तित्वांना; मानवी जीवात्म्यांच्या आत्मस्वरूप, मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक, पृथक, बद्ध, सगुण, साकार, सविकार, जीवनप्रणालीत विज्ञान स्वरूपात उपयोजित केले आहे. सूर्य, इंद्र, पर्जन्य, वायू, रुद्र, ब्रह्म, पुरुषस्वरूप परमात्मा, यांसह, सर्व शक्तिमत्तांना, यज्ञस्थळी बोलावून, अग्नीमुखाने, त्या शक्तिमत्तांना प्रकट करण्यासाठी, उद्भिजादी बद्ध तरी, तत्सम शक्तीमता प्रकटविण्यास उपयुक्त, जीवात्म्यांच्या, पार्थिवांच्या, आहुतीभागांचा उपयोग करून; पूर्ण शक्तिमत्तेसह, तरी उपयोजन आवश्यक स्वरूपात, प्रकटवून उपयोजिले आहे. या शक्तिमत्तेचा स्वनिर्मित, अर्जित अशा नैतिक विश्वातील, बद्धअवस्थेतही, 'सत्‌च्चिदानंदस्वरूप' अनुभूती ध्येयाने, संघर्षात्मक जीवनप्रणालीसाठी उपयोजित केले. या सर्व वैज्ञानिक प्रयोगात्म प्रणालींसाठी परमात्मतत्त्वाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक, नित्य, तत्त्वांच्या, स्वरूपाला प्रकट करण्यासाठी; प्राण अर्थात वायुतत्त्वाचा आणि ठायीच्या आत्मरूपाचा उपयोग, वाणींच्या द्वारे करता येतो ह्याचे आकलन, हे मानवी मनोस्वरूपाचे, परमात्मस्वरूप सामर्थ्य होय. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरीच्या प्राकट्यासाठी, शारीर ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये, यांचा साधनस्वरूप वापर करता येतो; याची स्वसंवेद्यता, हे मानवाच्या मनोस्वरूपाचे, बद्धावस्थेतील जीवात्म स्वरूपातील, सामर्थ्य होय. म्हणूनच वाणीबीजला मानवी मनोस्वरूपाने स्वसंवेद्य आत्मरूप, अर्थात परमात्मस्वरूप मानले आहे. निर्गुण, निराकार, निर्विकार स्वसंवेद्य स्फुरणात्मक सच्चिदानंदस्वरूप, केवल, अनंत, श्रीकृष्णस्वरूप, सार्वकालिक, सर्वव्यापक, परमात्मा, परब्रह्मस्वरूपाला, आकलून, साकार, सगुण, सविकार, बद्ध, तरी स्वसंवेद्य स्फुरणात्मकपणाने, प्रकट करून; मानवी नैतिविश्वातील, व्यष्टी आणि समष्टीच्या, आनंदलक्ष्यी, जीवनप्रणालीसाठी, उपयोजित करण्याचे सामर्थ्य, वाणीशक्तीत, अर्थात मानवी जीवात्म्याच्या ठिकाणी वास्तव सत्य स्वरूपात आहे. हे वाणीचे सर्वात्मक सामर्थ्य होय. माऊली ज्ञानेश्वरांनी–

**''ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।''** ज्ञा. अ. १ ओ. १ ।।

या वाणी स्वरूपातून, वाणीची आद्य स्वसंवेद्य आत्मरूपात्मकता वर्णन केली आहे.

सर्व शक्तिमत्तांना, वाणीच्या मानवी मनोस्वरूप स्वरांत, बद्ध करून, पुनः आत्मरूप प्राकट्यपणाने, प्रकट करता येते व वाणीच्या आवाहन, निवेदन, सूचन, आज्ञांकन, स्वरूपांनी कार्यान्वित करता येते; हे प्रयोगसिद्ध केले आहे. हीच, मानवी जीवात्म्याच्या ठिकाणी, स्वयंप्रेरित परिपूर्णता होय. वाणीला परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी अशा स्वरूपात, प्रकट करण्यासाठी, पंचप्राण आणि स्वरयंत्रे व रसना यांचा ऐंद्रिय वापर जसा होत राहिला; तसाच मानवी मनोस्वरूपाने, छंदात्मक उपयोजनासाठी, अक्षर अशा, शब्दसामर्थ्याला, आकार देणारी, चिन्हव्यवस्था निर्माण केली. ही मानवी जीवात्म्याच्या अंशपुंजात्मक समूह मनोस्वरूपाची निर्मिती, परमात्मस्वरूपाचे प्रकट स्वरूप झाली आहे.

मानवी मनोस्वरूपाने, स्वसंवेद्य स्फुरणात्म शक्तिमत्तांच्या स्थितीगती यांच्या आकलनाने, न्यास, ताल, सूर, लय, यांची मांडणी प्रक्रियात्मकतेने केली आहे. संगीत साधना, ही वाणी सामर्थ्याचे सर्वात्मक स्वरूप होय. मंत्रोच्चार, मंत्रगायन यांचे छंदशास्त्र, गुरुशिष्य परंपरेने विकसित केले आहे. काल आणि शक्तिमत्तांचे विभ्रम, यांचा समन्वय लावून; संगीतातून त्या त्या शक्तिमत्तांचे, सामर्थ्य प्रकट करण्यासाठी, नर्तन, वादन, गायन, यांचा स्वसंवेद्य स्फुरक, तरी भावात्मक विनियोग साधला आहे.

वाणीच्या स्फूटशक्तीची व्यवस्था करून; स्फूटव्यवस्थेला चिन्हव्यवस्था आणि नामव्यवस्था, संयोगीत केली आहे. यातून, मंत्रांचे मंडन, द्विविध प्रकारे, करता आले आहे. संगीतबद्ध आणि शब्द किंवा भाषाबद्ध असे हे प्रकार होत. भाषाबद्धतेत शक्तिमत्तेच्या नामोच्चाराला अधिक महत्त्व असते. नाम ही शक्तिमत्तेची समग्र प्रतिमा असते.

बीजमंत्रांमध्ये बीजात्मक नामोच्चार महत्त्वाचा ठरतो. भारतीय परंपरेमध्ये, ॐकार हे, सर्व वाणीचे आद्य बीज मानले गेले असल्याने; त्या बीज मंत्राला, 'ॐ'ला, परमात्मस्वरूप प्राकट्याचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. प्रत्येक मंत्राच्या प्रारंभी, ॐकार उच्चार हा, परमात्मशक्ती आणि त्या अंतर्गत स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेतून प्रकटलेली, प्रत्येक बद्ध सगुण, साकार, सविकार शक्ती, यांचा स्वरूपसंबंध संवेदित होत; मानवी जीवात्म्याच्या, अंशपुंजात्मक सामूहिक मनोस्वरूपाशी, जोडला जातो, असे वाणीविज्ञानाने सिद्ध केले आहे.

मंत्रांचे भिन्नभिन्न प्रकार जगभरात प्रचलित झालेले दिसतात, आवाहनमंत्र किंवा निमंत्रणमंत्र तसेच प्रसन्न करण्यासाठी सूक्त किंवा यशगायन मंत्र, आकलित

करण्यासाठी, अर्थात स्वेच्छेप्रमाणे वापर करण्यासाठी, अर्थात स्वसत्ताग्रस्त करण्यासाठी, वशीकरण मंत्र. प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी सूचना, प्रेरणा किंवा आज्ञा देण्यासाठीचा मंत्र, कार्यसिद्धी, संकट निवारण, समाधानविवरण, सुखसमृद्धीप्राप्त करण्यासाठीचे मंत्र अर्थात शांतीमंत्र. तत्त्वप्राकट्यनिर्देशात्मक मंत्र हेही शांतीमंत्र स्वरूपात असतात. मंत्रांना प्रार्थना, अर्चना, प्रसाद याचना, यशगान असे स्वरूप देण्यासाठी; आरत्या आदि प्रकारच्या, शाब्दरचना आल्या आहेत. यज्ञकार्यसिद्धीसाठी किंवा विधी सिद्धीसाठी, यज्ञमंडन, आवाहन, या स्वरूपाचेही, मंत्र असतात. मंत्र ही वाणीसिद्ध केलेली रचना असते. त्यातून या सिद्धीमुळे नियमित स्वरूपात शक्तिमत्ता प्रकटते. त्यांचे उपयोजन करता येते. याकरिता मंत्रसाधना करण्यासाठी, गुरु-शिष्यपरंपरा महत्त्वाची असते. वाणीशास्त्रांनुसार मंत्राची संथा देणे घडते. संथा देणे म्हणजे, वाणी शास्त्रानुसार, प्रयोगसिद्धीचे प्रत्यक्ष अनुसरण करावयास शिकविणे होय. यालाच विद्यादान असे भारतीय परंपरेने म्हटले आहे. आधुनिक वैज्ञानिक मांडणीमध्ये, ज्ञान प्रकटीकरणासाठी सूत्रे किंवा नियम मांडले जातात. त्या त्या सूत्रानुसार, प्रयोग केला; तर ते ज्ञान प्रकट होते. हीच पद्धती, यज्ञसंस्था आणि गुरु-शिष्य परंपरेत, अतिशय सूक्ष्मातिसूक्ष्म तपशिलासह, सिद्ध केली आहे. आधुनिक विज्ञान आणि भारतीय परंपरेत, मूलभूत भेद हा आहे की; भारतीय परंपरेत, प्रयोगकर्ता जीवात्मा, ठायीच्या स्वसंवेद्य आत्मरूप प्राकट्यासह, प्रयोगास सिद्ध होऊन; वाणी आणि अन्य साधनात्मक पदार्थ, यांच्यातील स्वरूपसंबंध जागृत करून; प्रयोग करतो. त्यामुळे प्रतिकांच्या सहायानेही; सत्-चिद् स्वरूपाची, जागृती होऊन, प्रयोगसिद्धी घडते. त्यामुळे यज्ञ किंवा विधीस्वरूपातील प्रयोग, मंत्रसामर्थ्य आणि अपेक्षित, नियोजित स्वरूपसंबंधात्म पदार्थ यांच्या सहाय्याने, ही सिद्धी होते. विज्ञानात, प्रयोग, केवळ सामग्रीच्या पातळीवर व सामग्रीतील गुणवत्तेच्या, संघटन, विघटन, विच्चलन, परिवर्तन, संयुग, अशा सिद्धीने सिद्ध होतात. भारतीय परंपरेत प्रत्येक प्रयोगात, आत्मभावासह, पदार्थसिद्धी असते.

देवतांच्या अनेक श्रेणी करता येतील. भारतीय सनातन परंपरेने, तेहतीस कोटी देव श्रेणी मानल्या आहेत. यात १२ आदित्य + ११ रुद्र + ८ वसू इंद्र आणि मरुत असे ३३ कोटी, अर्थात श्रेणीतील देव मानण्यात आले आहेत. यांच्या पलिकडे, ब्रह्मा, विष्णू, महेश अर्थात शिव, असे त्रिदेव; आदिमाया, आदिलक्ष्मी, आदिशक्ती अशा त्रिशक्तींची कल्पना, क्रमाने युगल व पृथक स्वरूपात केली आहे. या पलिकडे, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक,

अनंत, केवल, महाशून्यस्वरूप, सच्चिदानंदस्वरूप, श्रीकृष्ण, परब्रह्म, परमात्मा, अशी स्वरूपनामे असलेले, स्वसंवेद्य स्फुरक, आद्यतत्त्व मानले आहे. या अस्तित्वांतर्गत, अन्य सर्व देवकल्पना पृथक, बद्ध, सगुण, साकार, सविकार, तरी स्वसंवेद्य आत्मस्वरूप देवता येतात. या सर्व देवतांची गणना करतांना, भारतीय परंपरेने, अंतरिक्ष देवता-तारे, नक्षत्रे, चंद्र इ., सृष्टीदैवता म्हणून, पंचमहाभूतात्मक देवता यांत- पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, या बरोबरच वनस्पतीदेवता, पर्वत देवता, जलदेवता, सागर, नद्या, प्राणीदेवता, मनुजदेवता; दानव व दैत्य देवता, राक्षस देवता, या स्वरूपातील देवता आणि यक्ष, किंपुरुष किंवा किन्नर, विद्याधर, गंधर्व आदि प्रकारच्या मानव सदृश्यदेवता मानल्या आहेत. तसेच पूर्वज देवता माता, पिता, पती, पत्नी इ. सह अधरआत्मदेवता- यांत- भूत, हडळ, खवीस, सैतान, ब्रह्मराक्षस या प्रकारचे मानवी, मरणोत्तर अस्तित्वांचा विचार, दैवत म्हणून केला आहे. धुरिण देवतांमध्ये- राजा, ऋषी, मुनी, तपस्वी, सिद्ध, साधू, संत, तत्त्वज्ञ, चिंतक, कलावंत, शास्त्रज्ञ, अशा मानवी अस्तित्वांना धुरिण देवता मानले आहे. एवढेच नव्हे तर वारांगनांनादेखील दैवतात मान्य केले आहे. याचा अर्थ असा की भारतीय परंपरेने 'जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत' असे सूत्र स्वीकारले आहे. परमात्मस्वरूपाच्या, सर्वात्मक, स्वसंवेद्य स्फुरक, अविनाशी, परिवर्तनशील, अंशात्मक आणि अंशपुंजात्मक स्वरूपाचा, विचार केला आहे. याशिवाय स्थलकालपरिस्थिती सापेक्ष, लोकदेवतांची संख्या अगणित आहे. या व अशा सर्व देवतांचा संचार नैतिकविश्वातील, आनंदलक्षी, पृथकत्वलक्षी, जीवनप्रणालीतील संघर्षात्मक जीवनात, मनोस्वरूपाच्या सामर्थ्यसंपन्न प्राकट्यासाठी केला जातो.

जागतिक पातळीवरील परंपरांचा विचार करता, निरीश्वरवादी, अज्ञेयवादी, एकेश्वरवादी आदि असंख्य परंपरा, प्रचलित आहेत. अशा वैविध्यपूर्ण कल्पना, एकत्रितपणे विचारात घेतल्या तरी, दृश्य सृष्टीचे, कोणतेतरी, सत्य, वास्तव, तरी गूढ असे, कारण अस्तित्वात आहे व तीच प्रभूसत्ता आहे; ते तत्त्व कार्यान्वित आहे; ते नित्य, अविनाशी आहे; या कल्पनांवर निरपवादपणे, सर्व विचारवंतांचे एकमत आहे. मानवी जीवात्म्यांची, सर्वात्मकता, सहानुभूतीच्या योगाने जाणवते; हेही सर्वमान्य आहे. मानवी जीवात्म्याची, तात्कालिकता व मर्त्यता, सर्वांना अपरिहार्यपणे जाणवते; तरी मानवी जीवात्म्याची, सार्वकालिक, सर्वव्यापक, अविनाशी अशी, महत्ता सर्वमान्य आहे. मानवी मनोस्वरूप, या सृष्टीच्या मूळ

कारणापर्यंत, ज्ञानात्मकतेने आणि पदार्थविज्ञानत्मकतेनेही पोहोचू शकेल; यावरदेखील, जागतिक पातळीवर समविचार आढळतात. मानवी जीवात्म्यांचे अंशपुंजात्मक समूहजीवन, नित्य आहे. मर्त्यता अंशात्मक जीवात्म्याला आहे, याची जाणीवही आहे. मानवी जीवनप्रणालींचा विचार, आत्माअंशपुंजात्मक समूहजीवनाच्या संदर्भात, सनातनपणे मांडता आला आहे. नैतिकविश्वाची निर्मिती, त्या आधारावर झाली आहे. प्रश्न राहतो, ते, दैवत मानणे, त्याची उपासना करणे, दैवतशक्तींचा, जीवनसंघर्षातील, संघर्षशक्ती वाढविण्यासाठी उपयोग करून; नैतिकविश्वातील, जीवनसाफल्याच्या आनंदापर्यंत पोचणे; या संदर्भातील विविध विचारांचा. प्राचीन म्हणविणाऱ्या संस्कृतींमध्ये, भारतीय परंपरांचे मोठ्या प्रमाणावर साम्य असल्याचे लक्षात येते. गत काही हजार वर्षांमध्ये आलेल्या, नव्या सांस्कृतिक, धार्मिक प्रणालींचा व त्यांशी संबंध असलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आदि संदर्भातील, प्रणालींचा विचार करता; मान्य दैवी किंवा गूढशक्ती किंवा तत्त्वे, यांच्या आवाहन, प्रार्थना, इ. गोष्टींसाठी, स्थाने, प्रतिके, मानवी पवित्र अस्तित्वे; यांचा उपयोग, या सर्व गोष्टींसाठी, करण्यात आला आहे. सत्यनिष्ठेतून, मनोस्वरूपाने, मानवी जीवनप्रणालीत, कल्पिलेली प्रतिके या ना त्या स्वरूपात पूज्य भावाने, उपासली जातात. त्यांच्या निर्मिती व उपासनापद्धतीही निर्माण होतात, असे दिसते. याची अनुभूती सर्वांना आहे. यात काहीही आक्षेपार्ह, गैर नाही. दैवतनिर्मिती ही मानवी प्रवृत्ती आहे; असे आपण म्हटले आहे; ते याच दृष्टीने होय. सत्य, महत्त्वांविषयी, श्रद्धा किंवा विश्वास भाव आणि त्यांचा पूज्य भावाने, मानवी मनोस्वरूपाच्या ठिकाणी जागर; ही बद्ध मानवी जीवात्म्याची, एवढेच नव्हे सर्व जीवात्म्यांची, आत्मस्वरूप संबंधानुभूती आहे, हे अनेकदा प्राणी, वनस्पती इ. वर झालेल्या प्रयोगांतून सिद्ध आहे.

दैवतांची, निर्मिती आणि दैवतांचा मानवी जीवात्म्यांशी, जोडलेला स्वरूपसंबंध; हा 'लोक' या बद्ध, पृथक अस्तित्वसिद्धीसह, परमात्म्याच्या स्वसंवेद्य स्फुरक, तरी निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक आणि सर्वव्यापक, अस्तित्व बद्धतेतील, अनिवार्य, प्रक्रियात्मक अवस्थेची, स्वरूप अनुभूती आहे; हे समजून घेतले पाहिजे. 'लोक' या संकल्पनेत व्यक्ती अथवा एक जीवात्मादेखील अविनाशी, परमात्मतत्त्वांश स्वरूपातील, जडचेतन घटकांसह, तात्कालिक, अस्तित्व असते. त्याची अशी 'लोक' अवस्था मर्त्य असली; तरी जडचेतनघटक आणि परमात्मतत्त्वांश, या संदर्भात, अविनाशी असते. 'लोक' ही संकल्पना, नित्य,

परिवर्तनशील, अविनाशी असे अस्तित्व स्पष्ट करते, 'लोक' सर्वकाल, सर्वव्यापी आणि नित्य असतो. 'लोक' हे अस्तित्व, निर्गुण, निराकार, निर्विकार, अशा परमात्मतत्त्वाशी स्वरूपबद्ध, दृश्य, अस्तित्व असते. मानवी जीवात्म्याच्या ठिकाणी 'लोक' हे अस्तित्व तत्त्वतः मनोस्वरूपाने, व्यक्ती, समूह आणि सर्वात्मक, अशा त्रिविधतेने, अनुभवता येते. हा संबंध विचारात घेतला तर; 'लोक' या मानवी जीवात्म्यांच्या, अंशपुंजात्मक समूह सापेक्ष, अस्तित्वात 'दैवत' प्रवृत्ती घट्टपणे असल्याची, जाणीव सहज होऊ शकते. दैवतकथाशास्त्रात, भारतीय परंपरेने सर्व अस्तित्वांना 'लोक' संबोधले आहे. इंद्रलोक, चंद्रलोक, सूर्यलोक, पृथ्वीलोक, ब्रह्मलोक, शिवलोक, विष्णूलोक, मनुष्यलोक, राक्षसलोक, देवलोक, स्वर्गलोक, मृत्यूलोक, पाताळलोक; इ. स्वरूपात शब्दयोजना करून; मांडलेल्या कल्पना, ह्या परमात्मतत्त्व, त्या अंतर्गत, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, प्रक्रियात्मकतेने प्रकट होऊन, बद्धअस्तित्वात, दृश्य होणारी, असंख्य, आत्मांश आणि आत्मांशपुंजात्मक अनंत ब्रह्मांडे, त्या अंतर्गत तत्सम अस्तित्वे, त्या अस्तित्वांतर्गत अस्तित्वे, यांची प्रक्रियात्मक अस्तित्वांची आणि त्यांच्या थेट स्वरूपसंबंधांची जाणीव करून देते.

मानवी जीवात्म स्वरूपातील आत्मांश असा एक जीव आणि आत्मांशपुंजात्मक असा त्या जीवांचा समूह यांत, सत्य, सर्वात्मक, परिपूर्ण अशा स्वरूप शक्तिमत्तेची जाणीव या 'लोक'च्या स्वरूप संबंधामुळे घडते. पृथ्वीवरील अस्तित्वातील, असे मानवी जीवस्वरूप-भोगतांना, पृथक, तात्कालिक, अस्तित्वातही, स्वभावतः ही लोकसंबंध जाणीव, नैतिकविश्वात प्रकटते. या कारणाने मानवी जीवात्म्यांचे व्यक्तिगत आणि सामूहिक जीवन; अबाधित, प्रभुसत्तेसह, सुप्रतिष्ठित आणि स्वरूपानंदलक्ष्यी असे व्यतीत करून; मर्त्य प्रणालीतही, अमर्त्यतेची अनुभूती, मनोस्वरूपाने, भोगण्यासाठीची, 'जीवनार्थ धडपड', अर्थात संघर्ष, अंतरबाह्य स्वरूपात करणे, क्रमप्राप्त होते. हा संघर्ष हीच मर्त्यजीवनातील आनंदलीला असते. ही लीला, स्वकेंद्रित, समूहकेंद्रित आणि विश्वकेंद्रित अशी, आत्मानुभावाने भोगायची असते. या संघर्षलीलेत अंशात्मक, पूर्णत्वाला सर्वात्मक पूर्णत्वाची शक्तिमत्ता, दैवतांच्या मनोस्वरूप संबंधातून प्राप्त होते. मर्त्य जगत अमर्त्यतेने भोगता येते. मानवी मनोस्वरूपाने, नैतिकविश्वांतर्गत, अशी दैवतसिद्धी, आत्मिक आणि भौतिक स्वरूपात, अनुभवण्याची ज्ञान विज्ञानस्वरूप मांडणी केली. ही मांडणी म्हणजेच दैवतस्वरूपसंबंधाचा अभ्यास होय.

मानवी जीवात्म्यांच्या संघर्षलीलेच्या दोन बाजू संवेदित होतात. संघर्षासाठी

शक्तीसंवर्धन आणि संघर्ष करतांना, विजय संपादण्यात, बाधा आणणाऱ्या गोष्टींचे, निर्दालन करणे. या दोन्ही गोष्टींसाठी, मानवी जीवात्मे दैवतांचे स्मरण, आवाहन आदि सर्वप्रकारे उपयोजन करण्याचा प्रयत्न करतात. याच कारणाने दैवतांची स्वरूपवर्णने आढळतात. एक सौम्य प्रसन्न तर दुसरे उग्र, भयानक आणि विक्राळ! त्याचबरोबर स्थलकालपरिस्थितीनुसार, ग्रामदैवते, लोकदैवते, पूर्वजदैवते, तसेच दैत्य, भूत आदि प्रकारची दैवते, ही निर्माण करण्याची प्रवृत्ती असते. या व पारंपरिक दैवते यांचा; प्रत्यक्ष संघर्षप्रयोगासाठी, तंत्र विद्यांची निर्मिती, मनोस्वरूपांनी केली आहे. तंत्रदेवतांच्या स्वरूपात, दैवतांचे, आवाहनादी करण्याची विधीविधानेदेखील, मानवी मनोस्वरूपाने, तयार केली आहेत. तंत्रशास्त्र, ही दैवतकथाशास्त्राची, एक विकसित शाखा आहे. या शास्त्रात दैवत उपयोजनासाठी मंत्र, तंत्र आणि यंत्रांचीही निर्मिती केलेली असते. शक्तीदेवता, भैरवदेवता, दैत्य देवता, भूत देवता, या प्रामुख्याने या गटात येतात. भारतीय परंपरेत मंगल, संकटमोचक, अशा श्रीगणेश, श्री हनुमान यांसारख्या देवतांचा तंत्र विद्येत समावेश केलेला असतो.

दैवतकथाशास्त्राच्या दृष्टीने 'यातुशक्ती' अर्थात दैवतांची कार्यान्वयी शक्ती, सृष्टीत भावात्मकतेने वावरत असते असे मानले आहे. या शक्तींचा तंत्रशास्त्रात, दैवत संचार प्रणालींमध्ये विशेष विचार केला जातो.

दैवतकथाशास्त्रांच्या परंपरेत, यातुविद्या, काळीविद्या, मायाविद्या, पिशाच्यविद्या अशा विद्या, उपासनापद्धती बरोबरच, सनातनपणे प्रचलित आहेत.

संघर्षप्रक्रिया व जीवनप्रणाली यांत दैवतांच्या श्रेणींविषयी, लोकसारणीत विभागणी केलेली आढळते. महान देवता- आणि क्षुद्र देवता यांतील स्थलकालपरिस्थितीप्रमाणे, देवतांची, महान देवता किंवा शुद्र देवता म्हणून, संभावना होते.

हा सगळा तपशील, मानवी मनोस्वरूपाने, नैतिकविश्वात दैवतांना दिलेल्या स्थानांच्या दृष्टीने, महत्त्वाचा नसला तरी; प्रणालीतील ह्या गोष्टी, तपशीलाने, व्यक्ती आणि समूह पातळीवर अनुसरल्या जातात. या परंपरेत, पापपुण्याच्या कल्पना जोडलेल्या दिसतात. विधीनिषेधांची आचारसंहिता, जत्रायात्रा, व्रतवैकल्ये यांच्या परंपरा, यांतून मानवी मनोस्वरूपांनी, लोकसारणीमध्ये, श्रद्धा-अंधश्रद्धा यांचे द्वंद्व उभे केलेले आहे. मानवी मनोस्वरूपाच्या अस्तित्वाशी, या द्वंद्वाचा संबंध नसतो. अंशात्मक जीवात्म्याची श्रद्धा म्हणजे, आत्मरूपाची स्वसंवेद्यता होय. ही

स्वसंवेद्यता, जीवात्म्याच्या स्थलकालपरिस्थिती, संस्कार परंपरा यांशी निगडित असते. कोणतेही मनोस्वरूप, हे आत्मस्वरूपच असते. ते जीवात्मा स्वरूपात, नैतिक विश्व व जीव, या दृष्टीने, बद्ध असते. त्याच्या या बद्ध जीवनातील, आत्मभान जपत, नैतिकविश्वात व आत्मस्वरूपात, आनंदलक्ष्यी स्वरूपात, सफल होण्यासाठी, जीवात्म्याचा संघर्ष सुरू असतो. या संघर्षातील, दैवतस्वरूप संबंधाने, सर्वात्मक आणि सच्चिदानंद स्वरूपाशी, स्वरूपसंबंध घडविण्याची, मानवी मनोस्वरूपाची धडपड असते. हेच मानवी मनोस्वरूपाचे परमात्मस्वरूप, परिपूर्णात्मक सामर्थ्य होय!

●●●

# ६. मुक्तबद्ध स्वरूपसंबंध

सागराचे जगडव्याळ अथांगपण, वादळवारे, वावटळी, लहरी; यांचा मुक्त अवकाशसंचार, सूर्याचं अवकाशभर प्रकाशणं नि अंधारात गडप होणं, अगणित तारे नक्षत्र ग्रह यांचं, अंधारातून स्वतःचं गतिमान अस्तित्व, नित्यसिद्ध करणारं चकाकणं, पृथ्वीचं, पर्वत शिखरांवर, माळपठारांवर, दऱ्याखोऱ्यांत आणि सर्वांगव्यापी; या सर्वांना पेलत; उद्‌भिज, स्वेदज, अंडज, जारज या जीवसृष्टीला, माऊलीच्या ममतेनं सांभाळणं, सारं काही, अवकाशाच्या उदरात, क्षितिजापासून, क्षितिजापर्यंत, आकाशापासून आकाशापर्यंत, साऱ्यांना नित्य सांभाळणं. स्वसंवेद्य स्फुरणप्रक्रियेसह, परिवर्तनाची क्रीडा करीत; नित्य प्रकटणं, नित्य फुलणं, नित्य लयाला जाणं; तरीही अविनाशीपण भोगणं; सद्-चिद्-आनंदस्वरूप अस्तित्वासह; या अनुभूतींचं दर्शन मानवी मनाला नित्य घडत आहे. मानवी मनाला येणाऱ्या या नित्य अनुभूतींचं, स्वसंवेद्य स्फुरणासह मनोमयतेनं, स्वसापेक्षपणे, पुनर्मांडणी करून; त्यावर प्रभुसत्ता प्रकटविण्याचं सामर्थ्य, मानवी अस्तित्वाला असणं; हे मानवी अस्तित्वाचं केवढं ऐश्वर्य! या अस्तित्वाच्या कार्यकारणाचा विचार करण्याची क्षमता असणं; अस्तित्वातील स्वतःच्या अस्तित्वाचं स्थान निश्चित करण्याची उमेद असणं; त्या अस्तित्वाला कवेत घेण्याचा कल्प स्फुरणं; हे मानवी मनाचं, त्याच्या अस्तित्वाचं केवढं सामर्थ्य! हे ऐश्वर्य आणि सामर्थ्य भोगतांनाही माणसाला बद्धतेचा अनुभव येतो. ही बद्धता, माणसाला त्याच्या अस्तित्वात दडलेल्या, नित्य मुक्ततेची ओढ लावते. ही मुक्ततेची ओढ, माणसाच्या अस्तित्वात, बद्धतेच्या जाणिवांमधून आणि मुक्ततेतील निखळपणाविषयीच्या जाणिवेने, नित्य संघर्ष निर्माण करते. संघर्ष हाच बद्ध अस्तित्वाचा स्वभाव आहे; असे जाणवू लागते. ही बद्धता जन्ममृत्यूच्या कालावधीपुरती आहे; याचे भान माणसाला येते; तेव्हा तेव्हां, तो

क्षणभुंरतेच्या जाणिवेने दुःखी होतो; तरी जीवनमुक्ततेच्या जाणिवेने सुखावतो. प्राप्तबद्धतेतील अपरिहार्य कर्मपरतेला, बद्धावस्थेमध्ये, प्रभुसत्ता भोगण्याचे वळण लावायचे; की मानवी मनाला जाणवणाऱ्या चिरंतन मुक्त, सद्-चिद्-आनंद स्वरूपाचे, वळण लावायचे; याचा निर्णय करण्याचे सामर्थ्य मानवी मनाला आहे; हे ही मानवाला जाणवते. निर्णय घेण्याच्या या सामर्थ्यामुळेही बद्धअस्तित्व संघर्षमय होते.

बद्ध अवस्थेत ही, नित्य स्वाभाविक, सद्-चिद्-आनंदस्वरूप, आत्मरूप अस्तित्वाचा, निर्गुण निराकार, निर्विकार, अनंत परमात्म स्वरूपाशी स्वरूपसंबंध, अनुभूत करण्यासाठी, प्रयत्नांची पराकाष्ठा; ज्ञानविज्ञानात्मक अनेक मार्ग, पद्धती, शैली, शोधून; तात्त्विक स्वरूपात, हा स्वरूपसंबंध, स्पष्ट करण्याचा सतत दीर्घोद्योग या मनःशक्तीने केला आहे. हा दीर्घोद्योग म्हणजेही, सततचा; शारीरिक, मानसिक आणि बद्धअस्तित्वांतर्गत, परस्पर स्वरूपातील संघर्ष आहे. बद्ध अस्तित्वाचा अर्थ संघर्ष, असा कल्प स्थिरावतांनाच, हा संघर्षदेखील कैवल्याची, आत्मरूपाची क्रीडा आहे, असा साक्षात्कार माणसाला झाला आहे.

श्रीकृष्णभगवंत, परमात्मा, परब्रह्म, सत्-चिद्-आनंदस्वरूप, अशी नावे, ज्या अस्तित्वाला आहेत; 'विश्वोत्पत्यादिहेतवे' विश्वोत्पत्ती ह्या हेतूला कारण झालेले असे ते, अस्तित्व, केवल, एकल असे आहे. असा कल्प मानवाने सनातनपणे मांडला आहे. त्याच्या असलेपणाचे वर्णन; निर्गुण, निराकार, निर्विकार, अनंतकाल आणि अनंत अवकाश व्याप्त, महाशून्य असे माणसाने केलेले पाहावयास मिळते. जगातील सर्व परंपरांनी, सर्व भाषांनी, अशा अस्तित्वाचे, थोड्याफार फरकाने वर्णन केले आहे. हे आद्य अस्तित्व स्वसंवेद्य आहे, नित्य स्फुरणारे आहे; असे माऊली ज्ञानेश्वरांनी वैशिष्ट्यपूर्णतेने सांगितले आहे. निर्गुण, निराकार, निर्विकार असले तरी; स्वसंवेद्यता अर्थात नित्य स्फुरणता, हा त्या सत्-चिद्-आनंद अशा आत्मरूपाचा स्वभाव आहे. ह्या वैशिष्ट्याकडे सर्व विश्वाचे लक्ष वेधले आहे. जे निर्गुण आहे, निराकार आहे, निर्विकार आहे, अनंत आहे; तेच स्वसंवेद्य स्फुरक आहे; हा निखालस अंतरविरोध आहे. परंतु हा विरोध हेच तर या अस्तित्वाचे, सद्-चिद्-आनंद स्वरूप आहे. सत्य हे चिद् स्वरूप स्वसंवेद्यतेने स्फुरण पावते आणि आनंदमयता ठायीच अनुभवते. सत्य नेमके आहे तरी काय? सत्य म्हणजे असलेपण होय. हे असलेपण सत्व, रज, तम असे गुणात्मक नाही किंवा गुणात्मक एकारलेपणाही त्यात नाही. या तीनही गुणांना सामावून अलिप्तपण

राखणारे ते आहे. तरी ते चिद्स्वरूप अर्थात चैतन्यत्व आहे. या चैतन्यतत्त्वाला परमात्मा, अनंत, आत्मरूप, अशी असंख्य नावे वरीलप्रमाणे दिली आहेत. चिद्स्वरूपाचा स्वभावच स्वसंवेद्यतेसह स्फुरण्याचा आहे. सत्य हे स्वतःच्या अस्तित्वाच्या आरंभबिंदूपासून नित्य आहे. पण आरंभबिंदूही कसा? कारण ते अनंत आहे. निराकार आहे. म्हणूनच; सत्य हे स्वभावतः चिद्रूप आहे. हे स्वसंवेद्य स्फुरणात्मक असे आत्मरूपाचे ठायीच परमानंदमय स्वरूप आहे. यातील सत्-चिद्-आनंद स्वरूपाची अवस्था निरपेक्ष आहे. म्हणूनच ते निर्विकार आहे. ते निर्विकार आहे, म्हणूनच ते अनंतकालस्वरूप व अनंतअवकाशस्वरूप अर्थात सर्वव्यापक आहे.

असे हे परमात्म श्रीकृष्णस्वरूप एकल, एकटे होते आणि त्याला अहंकार झाला, कंटाळा आल्याने, त्याने आपल्या स्वरूपाचा, 'बहुस्याम' होण्याचा संकल्प केला आणि स्वसंवेद्य स्फुरण स्वरूप, आत्मरूप मनोस्वरूप, अर्थात महतत्त्वस्वरूप होऊन; आपले बहुत्व अनुभवू लागले, असा कल्प माणसाने आत्मरूपाच्या विश्वोत्पत्तिकार्य, विषयक मांडला आहे. हा कल्प थोडा बाजूला ठेवून विचार करूया. स्वसंवेद्यता हा आत्मरूपाचा स्वभाव आहे मानले; तर नित्य होणारे स्फुरण हे, स्वसंवेद्यतेने होते; ते कसे? निर्विकारतेतून तर तर्कदृष्ट्या अशक्य वाटते. म्हणजेच स्वसंवेद्य आत्मस्फुरण संपदा त्या चिद्रूपाची, अर्थात आत्मरूपाची स्वाभाविक दृश्य अशी अवस्था किंवा अनुभवन घडविणारी अवस्था आहे. यालाच मनोस्वरूपता असे म्हणावे लागेल. याच स्वरूपतेमुळे चिद्रूप आनंदस्वरूप असे अनुभूत होते. जेथे सद्-चिद्-आनंद स्वरूप असे आत्मरूप आहे, तेथे मनोस्वरूप आहेच. या मनोस्वरूपालाच महतत्त्व, अहंकार अशी नावे, संगती लावणारांनी दिली आहेत. म्हणजे सद्-चिद्-आनंदस्वरूप, हे आत्मस्वरूप, मनोस्वरूप आहे हे स्पष्ट आहे. हेच त्याचे नित्य, अविनाशी, शाश्वत अर्थात अनंत असे अस्तित्व आहे.

अनंतता, निर्गुणता, निर्विकारता, निराकारता, स्वसंवेद्य स्फुरणात्मकता, नित्यता, अविनाशितता हीच या सद्-चिद्-आनंदस्वरूप श्रीकृष्ण परमात्म्याची बद्धता आहे.

या परमात्म्याचे सर्वकालिक सर्वव्यापकत्व, आहे तरी कसे? या संबंधात विविध कल्प मांडता येतील. परमात्म्याचे, हे अवघे एकलपण, म्हणजे परमात्मस्वरूप अगणित सूक्ष्मातिसूक्ष्म अंशांचा सर्वकाल सर्वव्यापक असा पुंज हे होय. यातील

प्रत्येक अंश, हा परमात्म स्वरूपाचाच परिपूर्ण गुणात्मक अंश आहे. तपासण्यासाठी सूक्ष्मातिसूक्ष्म एक अंश घेतला; तरी तो परमात्म्याच्या सर्वगुणधर्मांनी युक्तच आहे. हे अवघे अस्तित्व जड आहे की अजड आहे? ते चेतन आहे की अचेतन आहे? जर, विश्वोत्पत्तीचे कारण, हे अवघे अस्तित्व आहे, असे ठामपणे वाटते आहे; तर हे वाटणे; ज्या पृथ्वीवरील जडाजडचेतनाच्या अनुभवाने वाटते आहे; त्याप्रमाणे तर, हे अवघे अस्तित्वही, जडाजडचेतनाचेच अर्थात या उभय गुणांनी युक्त आहे, असेच ठरते. त्या अवघेपणाच्या अतिव्याप्ततेमुळे, ते सकृतदर्शनी, अनंतकाल आणि अनंत अवकाश असल्याचे भासमान होत असले तरी; विश्वातील आकाशगंगापासून पृथ्वीवरील सूक्ष्मातिसूक्ष्म धुलिकण किंवा एखादा अदृश्य वाटणारा जीवाणू या पर्यंतची अस्तित्वे; ही जडपदार्थ आणि चेतनतत्त्व यांनी भारलेली आहेत. हे मानवी मनाने विज्ञान आणि योग विज्ञानाच्या अभ्यासातून सिद्ध केले. 'पिंडी ते ब्रह्मांडी' किंवा 'ब्रह्मांडी ते पिंडी' हा सिद्धांत नाथसंप्रदायासारख्या योगमार्गाने जाणाऱ्यांच्या, सिद्धांताप्रमाणे सिद्ध होतो. याचा मतितार्थ असा की त्या श्रीकृष्णपरमात्म्याच्या, सार्वकालिक सर्वव्यापक, सद्-चिद्-आनंदस्वरूप, निर्गुण, निराकार, निर्विकार अस्तित्वाचा, सूक्ष्मातिसूक्ष्म अंशदेखील, त्याच्या सर्व गुणांनी युक्त, अर्थात स्वरूपसंबंधानेच सिद्ध आहे. ज्या अर्थी हे परमात्मस्वरूप किंवा ज्याला आत्मरूप असे आपण म्हणतो आहोत; ते स्वरूप स्वसंवेद्य स्फुरक असेल, अवघे एकलपण सांडून बहु होत असेल; तर तेच गुणधर्म प्रत्येक अंश अस्तित्वात किंवा अंशपुंज अस्तित्वात असणार हे उघड आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत हे स्वरूपसंबंध ज्ञान बहुतेक सर्वच योग विवेचनाच्या निमित्ताने स्पष्ट केलेले दिसते. हा उल्लेखही येथे पुरेसा आहे.

केवल एकल एकट्या परमात्मस्वरूप, सद्-चिद्-आनंदस्वरूपाला 'बहुस्याम प्रजायेय' ही भावना झाली असेल; तर ती का? त्याचे उत्तर सहज आणि उघड आहे. ते म्हणजे, स्वसंवेद्य स्फुरण हा त्याचा स्वभाव आहे. स्वभाव नित्य असतो. या नित्य स्वसंवेद्य स्फुरणाने, अर्थात आत्मस्वरूपाच्या मनोस्वरूपाला, ज्या अगणित अंश किंवा अंशपुंजाचे स्फुरण होते आहे; ते ते अंश किंवा अंशपुंजांचे प्राकट्य होते तरी कोठे? त्या सर्वकालसर्वव्यापक श्रीकृष्णांच्या या सर्वव्यापक अवस्थेच्या बाहेर? पण सर्वव्यापक सर्वकाल अशा व्यापकतेच्या बाहेर जाणे किंवा असणे शक्यच नाही. म्हणजेच, श्रीकृष्णपरमात्म्याच्या ठिकाणीच, हे स्वसंवेद्य स्फुरण घडते आहे. सर्वकालसर्वव्यापक, निर्गुण, निराकार, निर्विकार, सच्चिदानंदस्वरूप,

स्वसंवेद्य स्फुरक असे आत्मरूप हीच त्या आद्य अस्तित्वाची बद्धता आहे. त्या बद्धतेतच, ते आत्मरूप अंशात्मक, अंशपुंजात्मक अशा पृथक बद्धतेने, त्याच्या सर्व गुणधर्मासह, स्वसंवेद्य स्फुरकतेने प्रकटत आहे ती अस्तित्वे त्याच्या बद्धतेनेच नित्य आहेत. याचा अर्थ सार्वकालिक सर्वव्यापक परमात्मा, जरी त्याच्या सार्वकालिक सर्वव्यापक अविनाशी रूपाने अस्तित्वात आहे तरी त्यामुळे, त्याच्याच ठायी, स्वसंवेद्य स्फुरणाने सतत प्रकट होत जाणारे, अंश व अंशपुंज, हे त्याचेच गुणधर्म घेऊन; प्राकट्याच्या बद्धतेत, उत्पत्ती, स्थिती व लय, अशी स्फुरणप्रक्रिया, स्वसंवेद्यतेने, त्याच्याच ठायी भोगत आहे. या अंश व अंशपुंजात्मक अस्तित्वांना, मानवी मनाने, त्या परमात्म्याच्या परिपूर्ण गुणधर्मासह, बद्धपणे, प्राकट्य भोगतांना, स्वसंवेद्य स्फुरणाने, अंश व अंशपुंजात्मक आकारांची व्यवस्था, स्वसापेक्षतेने अनुभवतांना अनंत, अवकाश, अनंतकाल, आकाशगंगा, तेजोमेघ, सूर्यमाला, ग्रह, तारे, नक्षत्रे, ब्रह्मांड, पृथ्वी, पृथ्वीवरील विवक्षित वस्तु, मात्र, यांना नावे ठेवून, त्यांच्यात आत्मरूपाचे, सर्व गुणधर्म असल्याचे अनुभवन, मानवी मनाच्या योगाने, भोगले; एवढेच नव्हे तर, ते प्रत्येक अस्तित्व पृथक बद्ध असले तरी, ते त्या सर्वव्यापकत्वाची आणि पृथकत्वाची बद्धता, स्वसंवेद्यस्फुरणासह भोगत, अविनाशिपणाने, 'पुनरपिजननम् पुनरपिमरणम्' ही तात्कालिक बद्धावस्था, 'सद्-चिद्-आनंदस्वरूप' अनुभवत आहे.

आत्मरूपाच्या या स्वसंवेद्यस्फुरण स्वभावाने निर्माण घडते. ते निर्माण त्याच्या अंतर्गत असलेल्या, त्याच्या सर्वगुणांनी युक्त अशा अगणित अंशांच्याच परिपूर्ण गुणात्मकतेसह गतिमानता संघटन, विघटन, संयुग परिवर्तन, विलय, नवसंघटन स्वरूपातील असते. जसे सुवर्णत्व हा गुण सोने या मूलद्रव्याच्या प्रत्येक कणात परिपूर्ण स्वरूपात असूनही त्या कणांच्या संघटन, विघटन आदि क्रियांच्या मुळे भिन्नभिन्न, असे कणांचे पुंज, किंवा अंशपुंज सगुण, साकार, सविकार स्वरूपात बद्धपणे प्रकटतात; तसे आत्मरूपाच्या सार्वकालिक सर्वव्यापक अशा अस्तित्वाच्या ठिकाणी असे स्वसंवेद्य स्फुरण घडल्याने अंशात्मक किंवा अंशपुंजात्मक रूपे निर्माण होतात. ते प्रत्येक रूप त्या त्या साकार, सगुण, सविकार या लक्षणांसह स्वतंत्र भासमान होते. त्यात पूर्णात्मकतेने आत्मरूप प्रकटलेलेच असते. ते त्या रूपात्मकतेत बद्ध असूनही, परिपूर्णात्मकतेचा, स्वसंवेद्य स्फुरणात्मक अनुभव घेत असते. याच स्फुरणात्मकतेने त्याचे रूप, निर्माण, स्थिती, विलय, परिवर्तन अनुभवणारे, गतिमान असे, सगुण, साकार, सविकार असले तरी त्या सर्वव्यापक आत्मरूपाचे

निर्गुण, निराकार, निर्विकार, स्वसंवेद्य स्फुरण अनुभवत असते. या अगणित रूपांचे ही घटनात्मक अर्थात सगुण, साकार, सविकारात्मकपणाने, घडणे मोडणे अनुभवणे, हे सर्वकाही; परमात्मस्वरूपाच्या अंतर्गत घडणारी घटना, त्या आत्मरूपाचेच परिपूर्ण समावेशन असूनही, सार्वकालिक, सर्वव्यापक अशा आत्मरूपाच्या अवस्थेत कोणताही स्वरूपात्मक बदल होत नाही. म्हणूनच ते निर्गुण, निराकार, निर्विकार अवस्था भोगत असतांनाही; त्याच्यातील स्वसंवेद्यस्फुरणात्मकतेमुळे, तरी अलिप्तपणे, आनंद अनुभवत असते. कर्म घडत असते. तरी अलिप्ततेने कर्म हे क्रीडास्वरूप अनुभवले जाते. ही क्रीडा सर्वव्यापक अस्तित्वात, त्याच्याच स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेमुळे सुरू असते. तरी, स्फुरणात्मक घटना घडत असतांना, परिवर्तन, गतिमानता यामुळे, संघटन, विघटन होत असतांना, अंशात्मक, अंशपुंजात्मक, पृथक अस्तित्वांच्या, परस्पर प्रचंड स्वरूपात संघर्ष सुरू असतो. याचा अनुभव मानवाने अंतरिक्षातील, ग्रहमालेतील आणि पृथ्वीअंतर्गत, गती, आकर्षण, परिवर्तनप्रक्रिया यांच्या अनुभवातून अभ्यासला आहे. उदा. सूर्यमालेतील बद्धतेतील विस्मयकारक अशी भ्रमणातील घटनात्मक अनुभव, ग्रहयुती, ग्रहणे भूकंप, स्फोट इ. स्वरूपातील घटना, हा असा, स्वाभाविक प्रक्रियेतील संघर्षच असतो. एकूण विचार करता, स्वसंवेद्य स्फुरणातून स्फुरित अस्तित्वांना, गुणात्मकतेने या संघर्षाला अपरिहार्यतेने सामोरे जावेच लागते.

अंशात्मक परिपूर्ण स्वसंवेद्यस्फुरक अस्तित्वे आणि अंशपुंजात्मक स्वसंवेद्य स्फुरक अस्तित्वे; निर्गुण, निराकार, निर्विकार सर्वकाल सर्वव्यापी केवल अशा परमात्म्याच्या बद्धस्वरूपाच्या ठिकाणी सगुण, साकार, सविकार, तात्कालिक स्वरूपातील, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरक, अस्तित्वे भोगतांना, त्या अस्तित्वांच्या परिपूर्ण स्वसंवेद्य स्फुरकत्वामुळेच; बद्धरूपाशी अहंकारवश होतात. या रूपांना कैवल्यतत्त्वाचे सर्व गुणधर्म प्राप्त असल्याने, स्वअंतर्गत आणि अन्य सर्व पुंजांच्या सापेक्षतेने गती, आकर्षण, संघटन, विघटन, विचलन, पुनर्संघटन प्रक्रिये आधीन, असतानाही, ते बद्धात्मक स्वरूपाची, आसक्तीवश स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रिया घडविण्याच्या प्रयत्नांची स्वाभाविक कर्मप्रणाली स्वीकारतात. हे पृथ्वी या पुंजात्मक, पृथक, बद्ध, अवस्थेच्या अनुभवाधारे, मानवी मनसामर्थ्याने जाणले आहे. ज्योतिर्विज्ञान अशा अनुभवातूनच प्रगत झाले आहे. माणसाने अशा, बद्ध अंशपुंजात्मक अवस्थांच्या, परिपूर्ण स्वसंवेद्यस्फुरण प्रक्रियेचे आणि पृथकत्वाचे निरीक्षण केले आहे. गुरुत्वाकर्षण कक्षा, भ्रमण यांविषयी वस्तुनिष्ठ निरीक्षणे

नोंदवून सिद्धांतन केले आहे. पृथ्वीच्या कक्षेतील जडचेतन भूतमात्रांचे विज्ञानात्मक आकलन माणसाने केले आहे.

अशा आकलनातून पृथक परिपूर्ण बद्ध तरी स्वसंवेद्यस्फुरण रूपांचे, व्यापक बद्धतेतील, स्वबद्धतेच्या अहंकारवश अस्तित्वाच्या, स्वसंवेद्यस्फुरणात्मक प्रक्रियेतील, संघर्षाचे चित्र– 'जीवो जीवस्य जीवनम्', परस्परसंहारक जीवन संघर्ष, चेतन, अचेतन अवस्थांची परस्पर अवलंबिता, चेतन–चेतन अस्तित्वांचा, परस्परावलंबी संघर्ष; यांविषयीच्या अनादि अनुभूतींच्या आधारे, वर्णन केले आहे. एवढेच नव्हे, तर मानवी, आत्मस्वरूप मनोस्वरूपाच्या, स्वसंवेद्य स्फुरण शक्तीसामर्थ्याने, स्वकेंद्रित स्वरूपाचे व्यवस्थापन केले आहे. हे सर्व करत असतांना, बद्धावस्थेतील सर्व अस्तित्वे, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक सर्वव्यापक अविनाशी अशी, केवल, अनंत, महाशून्यस्वरूप, परमात्म तत्त्वाच्या, सर्वव्यापक अविनाशी अशा स्वसंवेद्यस्फुरणशीलतेअंतर्गत तत्त्वतः अविनाशी, तरी बद्धतः विनाशी, तात्कालिक स्वसंवेद्यस्फुरण स्वरूप, आत्मरूपात्मक, मनोस्वरूपी, सद्–चिद्–आनंदस्वरूप भोगत आहेत. हा केवळ आभास, भ्रामकता किंवा मायारूपता नाही; तर परमात्म्याच्या पूर्णसत्यत्वाएवढेच, हे पृथक, बद्ध, तात्कालिक अस्तित्वदेखील, पूर्ण सत्य आहे! परमात्म्याची सर्व प्रकारची गुणात्मकता त्या अस्तित्वात तत्त्वतः आणि वास्तव स्वरूपात, अनुभवता येते. हे मानवी मनाला, त्याच्या आत्मस्वरूप, मनोस्वरूपाच्या योगाने, परमात्म्याच्या अस्तित्वाशी, पृथक अशा सूक्ष्मातिसूक्ष्म अस्तित्वाचा, स्वरूपसंबंध लक्षात घेऊन; प्राप्त बद्धअवस्थेत, आत्मस्वरूप मनोस्वरूपाला, अगदी वास्तव किंवा भौतिक स्वरूपात; स्वसंवेद्यस्फुरण शक्तीच्या योगाने, अर्थात मनशक्तीच्या योगाने, सर्वव्यापक परमात्मस्वरूप अनुभवता येते. हे, माणसाच्या दृष्टीने, वैज्ञानिक सत्य स्वरूपात सिद्ध करता आले आहे. ज्ञानयोगविज्ञान आणि विज्ञानयोग, हे दोन्ही मार्ग, मानवी मनानेच, आपल्या स्वसंवेद्यस्फुरण शक्तीने प्रस्थापित केले आहेत. मानवी मनोस्वरूपाच्या, आपल्या वैशिष्ट्यपूर्ण पृथक अस्तित्वाने, स्वसापेक्ष असे ज्ञानविश्व आणि नैतिकविश्व यांची मांडणी माणसाने केली आहे. या विश्वाची बद्धता, मानवी मनाने स्वीकारली आहे. यामुळे मानवी बद्धजीवनाचे स्वरूप, या समस्त मुक्तबद्धस्वरूपावस्थेमध्ये, आणखी वेगळेपणाने, विचारात घ्यावे लागते. असे असले, तरी त्याच्या या वेगळेपणाचे अस्तित्व, सार्वकालिक सर्वव्यापी परमात्मस्वरूपाच्या अंतर्गतच विचारात घ्यावे लागते. हेही अपरिहार्य आहे.

सद्-चिद्-आनंदस्वरूपाच्या ठिकाणी आत्मरूप अशा मनोस्वरूपाचे स्वसंवेद्यस्फुरण; निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक सर्वव्यापक अशा बद्धावस्थेत, अविनाशीपणाने, नित्य प्रक्रियात्मक आहे. यात परमात्म्यांतर्गत स्फुरणप्रक्रियेतून, अगणित सगुण, साकार, सविकार अशा, अगणित जडचेतनरूपांचे, निर्माण, अस्तित्व आणि विलय अशा अपरिहार्य प्रक्रियेने, अस्तित्व, अस्तित्वात येतच राहाते. यातील कोणते रूप केव्हां निर्माण झाले यांचा क्रम ठरवितांना संभ्रम निर्माण होतो. उदा. कोणती आकाशगंगा केव्हां, कोणत्या क्रमांकावर निर्माण झाली? याविषयी हा संभ्रम असतो. अशी रूपे क्रमाने निर्माण होत गेली; की एकाचवेळी अनेक रूपे निर्माण झाली किंवा होत आहेत? अगणित रूपे एकाच वेळी निर्माण होऊन; ती एकाचवेळी लयाला जातात आणि एकाच वेळी पुन्हा निर्माण होतात? पुनर्निमाणातील त्यांची स्वरूपभिन्नता ठरविता येते की नाही? का? अशा अनेक गोष्टींविषयी, मानवी मनोस्वरूप आपल्या ठायीची स्वसंवेदनात्मक स्फुरण आत्मस्वरूप शक्ती, ज्ञान आणि विज्ञान योगाच्या मार्गाने पूर्णांवंशाने प्रकट करण्याचा प्रयत्न करून; उत्तरे शोधत आहे. यात पृथ्वीवरील मानव नावाच्या अंशपुंजात्मक जातीपुंजाचा नेमका उत्पत्तीक्रम आणि काळ कोणता? याविषयी संभ्रम आहे. असे असले तरी त्या परमात्म स्वरूपाचा जीवात्मस्वरूप संबंध, मानवी मनोस्वरूपाला संवेदित झाला आहे. या स्वरूपाची परिपूर्ण सत्य अवस्था मानवाला जाणवली आहे.

परमात्म्याच्या स्वसंवेद्यस्फुरण प्रक्रियेतील, पृथ्वी या अवघ्या सगुण, साकार, सविकार, रूपातील, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेअंतर्गत; अष्टधा प्रकृती या अवस्थेचा स्वरूप संबंध, त्या अंतर्गत प्रकटलेली जड चेतन सृष्टी, त्यातील जीवात्मस्वरूप सृष्टी, या सर्व स्वरूपातील बद्धावस्थेतील, अष्टधाप्रकृती स्वरूप, स्वसंवेद्यस्फुरण प्रक्रियेची, एकात्म स्वरूप जाणीव, माणसाला होत आहे. या अवघ्या स्वरूपातील, जीवात्मा स्वरूपातील, बद्ध अशा सगुण, साकार, सविकार, रूपात, उद्‌भीज, स्वेदज, अंडज, जारज स्वरूपवैविध्याचे चेतनरूपात्मक एकात्मस्वरूप आणि जडस्वरूपातील भिन्नभिन्न प्रकृतीस्वरूप मानवाला जाणवते आहे. या सर्व जीवात्मस्वरूप, रूपांतील मानवी रूपाची स्वरूपता आणि स्वसंवेद्यस्फुरक तरी अष्टधाप्रकृतीबद्ध अवस्था, मानवाने मनोस्वरूपाने जाणली आहे. हे मानवाच्या आत्मस्वरूप मनोस्वरूप विकसनाचे सामर्थ्य आहे. असे सामर्थ्य अन्य जीवात्म्यांच्या ठिकाणी आहे किंवा कसे? सूर्यमालेतील अन्य ग्रहांवर आहे किंवा कसे? अन्य

समान मालिकांत आहे किंवा कसे? अन्य आकाश गंगात आहे किंवा कसे? पृथ्वीवरील अनुभूतींच्या आधारे, आत्मस्वरूपाचे आकलन पाहता, सर्वत्र या नात्या स्वरूपातील, समत्व अनुभवता येईल, याचा ठामसंकल्पात्मक अनुभव माणूस घेत आहे.

●●●

# ७. आद्य स्वसंवेद्य आत्मरूप-मन

दिसणाऱ्या सर्व पसाऱ्याची उत्पत्ती केंव्हा, कोणापासून, कशी आणि का झाली? असे प्रश्न माणसाच्या मनाला पडले. हे प्रश्न माणसाच्या मनाला केव्हां आणि का पडले? ते प्रश्न माणसालाच पडले, की सर्व जीवांना पडले? याचे उत्तर, निश्चितपणे, माणसालाच पडले; हे स्पष्ट आहे. माणसाने जी ज्ञानविज्ञानाची ग्रंथरूप मांडणी केली; ती ग्रंथसंपदा माणसाच्या या; 'प्रश्न पडणे' संवेदनेची साक्ष देते. हे, असे प्रश्न अन्य जीवांना पडल्याचा कोणताही आधार माणसाच्या हाती नाही. म्हणजे अन्य जीवांपेक्षा अधिक सक्षम, असे मानवी मनात काही तरी आहे. हेच माणसाचे, अन्य जीवांपेक्षा वेगळेपण होय. याचा अर्थ या प्रश्नांची जाणीवच अन्य जीवांच्या ठिकाणी नाही; हे म्हणणे मात्र, अहंकाराचे, उद्धटपणाचे आणि अज्ञानदर्शक होईल. अन्य जीवांचे जगणे अनुभवू लागले की; या जीवमात्रांनादेखील मन आहे तसेच या सर्व प्रश्नांची जाणीव किंवा संवेदना आहे, हे सहज लक्षात येईल. हे सर्व प्रश्न मानवी मनात प्रकटले. त्याची उत्तरे शोधण्याचा अथक प्रयत्न, माणूस सतत करतोच आहे. तेही त्याच्या जवळ असलेल्या 'मन' नावाच्या अस्तित्वाने. असे मन सर्व जीवमात्रांजवळ आहे; असे माणसाच्या मनाने प्रयोगांती सिद्ध केले आहे; तरी माणसाचे मन हे सर्वथा सामर्थ्यसंपन्न आहे असे माणसाच्या मनाला जाणवले आहे. परमेश्वराची प्रतिकृती, असा मानवी मनाने, माणसाचा गौरव केला; तो याच जाणिवेने. 'अगर नर करणी करे, तो नर का नारायण बन जाय!' असे म्हटले गेले ते माणसाच्या मनाला स्वसामर्थ्याविषयीच्या दृढ विश्वासामुळे. याचा अर्थ मानवी मनाचे परिपूर्ण स्वरूपज्ञान माणसाला, माणसाच्या मनाने घडविले आहे. असे होऊनही माणसाच्या मनाच्या परम सामर्थ्याविषयी चर्चा सुरूच आहे. 'माणसाच्या मनाचा थांग लागत नाही' असे विधान; वेदांनी 'नेति नेति नेति इति ब्रह्म' म्हणावे; तसे सतत म्हटले जाते. याच जिज्ञासेने मानवी मनाचा पुनर्शोध

घेण्याचा प्रयत्न करतांना; माऊली ज्ञानेश्वरांच्या, ज्ञानेश्वरीतील प्रथम ओवीचा आठव झाला.

**''ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।।''** ज्ञा. अ. १ ओ. १ ।।

माऊली ज्ञानेश्वरांच्या ठिकाणी 'आद्य स्वसंवेद्य आत्मरूप' हा स्वरूप साक्षात्कार मानवी 'मन' या विषयीच झाला आहे. असे मनाला संवेदित झाले.

भारतीय दैवतकथाशास्त्रातील विश्वोत्पत्ती सिद्धान्तानुसार; विश्वोत्पत्तीचे कारण परब्रह्म, केवल, अनंत अशा श्रीकृष्णांना अर्थात श्रीकृष्णस्वरूपाला म्हणजे सद्‌चिदानंदस्वरूपाला मानले आहे. म्हणूनच तापत्रय भोगणाऱ्या विश्वाच्या, समग्र कल्याणासाठी त्या श्रीकृष्णस्वरूपाला मनाने शरण जाण्याचा खटाटोप केला आहे. श्रीकृष्णाला वंदन करतांना स्पष्टपणे स्वरूप सिद्धान्त मांडला आहे-

**''सच्चिदानंदरूपाय विश्वोत्पत्यादिहेतवे**
**तापत्रय विमोक्षाय श्रीकृष्णाय वयंनुमः ।।''**

भारतीय परंपरेने, अनंत, केवल, अविनाशी, सर्वात्मक, महाशून्यस्वरूप अशा अवस्थेचे निर्गुण, निराकार, निर्विकार असे; परब्रह्म अस्तित्वाचे आकलन केलेले आहे. त्या परब्रह्माला श्रीकृष्ण असे नाव दिले आहे. या सर्व आकलनाला अर्थात परब्रह्माला किंवा श्रीकृष्णाला जाणिवेच्या कक्षेत, सत्, चिद् आणि आनंद या त्रिविध स्वरूपसंबंधाने, मांडून तत्त्वज्ञानात्मक आणि भौतिक अस्तित्वाची, अर्थात ज्ञानविज्ञानाची चर्चा केली आहे. हे सर्व आकलनदेखील माणसाने मनाच्याच योगाने केले आहे; असेच म्हणावे लागते. हा स्वरूपसंबंध, वर्णन करतांना, भारतीय परंपरेने सत् हेच चिद्, हेच आनंद असे प्रतिपादन केले आहे. म्हणजे ही एकल ब्रह्माची तीन स्वरूप नामे होत, असे म्हणता येते. हे सद्, चिद्, आनंदस्वरूपाचे ज्ञान, त्या परब्रह्माला मुळातच आहे. याचे कारण तेच आद्य असे आत्मरूप आहे. हे आत्मरूप स्वसंवेद्य आहे. म्हणजेच सत्य, चिद्, आनंद हे स्वरूप, स्वसंवेद्य आत्मरूप अशा, आद्य स्वरूपाने जाणवले. हे आत्मरूप म्हणजेच चिद्‌रूप (चैतन्यतत्त्व) तेच सत्य आणि तेच आनंदस्वरूप होय. तेच आत्मरूप आद्य स्वसंवेद्य असे स्वरूप आहे. म्हणजे स्वसंवेद्यता हा या सद्‌चिद्‌आनंद स्वरूप आत्मरूपाचा स्वभाव आहे. ही स्वसंवेद्यता हेच आत्मस्वरूपाचे अस्तित्व होय. याचा सरळ अर्थ असा की; आत्मरूप असणे, म्हणजेच स्वसंवेद्यता असणे होय.

ही संवेद्यता आत्मरूपाची स्थायी अवस्था आहे. या अवस्थेलाच, आत्मरूपाचे सद्, चिद्, आनंद, स्वरूप, हे स्वरूप असल्याचे संवेदन स्वभावतःच झाले. स्वभावतः संवेद्य अवस्थेला 'मन' असे नाव देणे भाग आहे. माऊली ज्ञानेश्वरांनी या स्वसंवेद्य आत्मरूपाला अर्थात मनाला 'आद्या' अशी हाक ॐकार स्फोटाने मारली. श्रीकृष्ण असे नाव घेऊन मारलेली हाकदेखील; त्याच सद्चिदानंदस्वरूप अशा आत्मरूपालाच मारली आहे. या सर्वाचा मतितार्थ असा की; अनंत, केवल, अविनाशी, सर्वात्मक, महाशून्य स्वरूप, सद्चिदानंदस्वरूप, श्रीकृष्णांनाच आद्य स्वसंवेद्य आत्मरूप म्हणतात आणि आत्मरूपाची स्वसंवेद्य स्वरूपता म्हणजेच मन होय. अर्थात आत्मरूप आणि मन यांचे एकरूपत्व आहे.

आपण ज्या 'मन' नावाच्या गोष्टीचा विचार करीत आहोत त्या मनाचा सद्, चिद्, आनंद रूपाशी स्वरूपसंबंध आत्मरूप स्वरूपात आहे. 'मन' हेच आद्य आत्मरूप स्वरूपात प्रकटले असेच म्हणावे लागेल. म्हणजे निर्गुण, निराकार, निर्विकार तरी स्वसंवेद्य असे त्या परमात्म्याला, परब्रह्माला; असे जे नाव देता येईल, तेच त्याचे स्वरूप आहे. त्या स्वसंवेद्यतेचाच, हा पसारा म्हणजे, स्वाभाविक स्फुरण आहे.

आत्मस्वरूपाचे, आत्मस्वरूपाला अर्थात मनाला, सद्-चिद्-आनंदस्वरूप अवस्थेचे स्वभावतः असलेले नित्य स्फुरण, स्वसंवेदित स्वरूपात होते आहे; असे जेव्हां मानवी मनाला संवेदित होते; तेव्हां मानवी मनाला प्रश्न पडतात. ते या स्वसंवेदित स्फुरणाच्या स्थान आणि स्फुरित होणाऱ्या घटकांविषयी या प्रश्नांची उत्तरे मानवी मनाला संवेदित होतात; ती म्हणजे; सत्-चिद्-आनंदस्वरूप आत्मस्वरूपाचे स्वभावतः होणारे नित्यस्फुरण स्वतःच्या अनंत अवकाशात, अनंतातच होत आहे. स्वतःचे अनंत अवकाश आणि अनंत भिन्न नाहीत. हे अनंत अवकाशदेखील, सद्-चिद्-आनंदस्वरूप, आत्मस्वरूपातच व्याप्त आहे. या स्फुरणातील स्वसंवेद्य होणारे घटकही तेच आहेत. म्हणजे, सद्-चिद्-आनंदस्वरूप आत्मस्वरूपासह अनंत अवकाश हे ते घटक होत. आता जर यात मनाने नामांकित केलेले, वरवर पाहाता भिन्न वाटणारे, हे घटक भिन्नपणाने स्फुरित होत आहेत असे वाटले; तरी त्यांतील स्वरूपसंबंध पाहता ते भिन्न घटक नाहीत. मनाने या नित्य स्फुरित अस्तित्वाला, निर्गुण, निराकार, निर्विकार, अनंत, महाशून्य, केवल, श्रीकृष्ण, परिपूर्ण, परब्रह्म, परमेश्वर, परमात्मा अशी नावे भारतीय परंपरेत दिली आहेत. याच अस्तित्वाला पृथ्वीवरील सर्व भाषांत वेगवेगळी नावे दिलेली आहेत.

त्या सर्व नावांचा अर्थ सामान्यतः सारखाच आहे. हे परब्रह्म, मानवी मनाला ज्ञात अज्ञात विश्वनिर्मिती स्वरूपात अर्थात विश्वोत्पत्ती हेतू स्वरूपात प्रकट आहे; असे मानवी मनाला प्रारंभीच्या आकलनापासून संवेदित झाले आहे.

हे श्रीकृष्ण नावानेही ओळखले जाणारे परब्रह्म अस्तित्व, नेमके कसे आहे? नित्यस्वसंवेद्यता, नित्य स्फुरण, ही अवस्था नेमकी कोणत्या स्फुरण शक्ती, कोणते पदार्थ; यांच्या कोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे? या प्रश्नाची उत्तरे मानवी मनाने, मनोविज्ञान, योगविज्ञान, भौतिकविज्ञान, पदार्थविज्ञान, रसायन विज्ञान, ज्योतिर्विज्ञान, आगमनिगम शास्त्रे, शरीरशास्त्र, संगीतादिकलाशास्त्रे, विद्या या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या शास्त्रांच्या आधारे देण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात हा सर्व खटाटोप, मानवी मनोव्यापाराचा खटाटोप आहे. यांतून या परब्रह्मांचे स्वरूप, हे परब्रह्माच्या सद्-चिद्-आनंदस्वरूप अनंत, अविनाशी आत्मस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणांचे आहे. ते नित्य आणि कालदृष्ट्याही अनंत स्वरूप आणि अनंत अवकाश स्वरूपातच आहे. ते आहे हे मनाला जाणवणारे परमसत्य होय. ही परब्रह्माची स्वसंवेद्य, नित्य, अनंत स्फुरण अवस्था, मानवी मनाच्या ठिकाणी ज्ञात अज्ञात अशा सर्वव्यापकत्वाने अस्तित्वात आहे. त्यात मानवाला ज्ञात अज्ञात सर्व जड पदार्थ, अजडपदार्थ, सर्वशक्ती, ह्या परब्रह्म स्वभावाने अर्थात सद्-चिद्-आनंद-आत्म-अनंत स्वरूपातच स्वसंवेद्य स्फुरण या गुणात्मकतेने; सूक्ष्मातिसूक्ष्म अस्तित्वात, अस्तित्वात आहेत. नेहमी दिल्या जाणाऱ्या उदाहरणाच्या आधारे सांगायचे तर जलाच्या अतिसूक्ष्म बिंदूतही तेच गुणात्मक जलत्व विज्ञानाला अनुभूत होते; तसे या परब्रह्मरूपातील प्रत्येक अस्तित्व हे परब्रह्मगुणात्मक स्वरूपात, अस्तित्वात असते. स्वसंवेद्यता आणि स्फुरण या नावांनी मानवी अनुभव संचिताला ज्ञात होणाऱ्या सर्व गोष्टी परब्रह्माच्या सूक्ष्मातिसूक्ष्म अंशात किंवा स्वरूपात-अस्तित्वात असतात. मानवी मनाला ज्ञात असे जडत्व, गति, तेज, अवकाशत्व, जलत्व, वायुतत्त्व, लयतत्त्व, ध्वनितत्त्व, सचेतनत्व, संवेदनत्व अर्थात मनत्व, स्पर्शत्व, दृश्यत्वं, कर्मशीलत्व या आणि अशा सर्व शक्ती, पदार्थ इ. सूक्ष्मातिसूक्ष्म अंशात किंवा स्वरूपात अस्तित्वात असतात. परब्रह्म हे तत्त्व अशा परब्रह्मस्वरूप, किंवा श्रीकृष्णस्वरूप अशा सूक्ष्मातिसूक्ष्म अंशांचे, म्हणजे स्वभावतः सद्-चिद्-आनंदस्वरूप, आत्मस्वरूप, अनंत काल आणि अवकाशस्वरूप अंशांचा सतत समस्त स्वसंवेद्यपणाने स्फुरण होणारे अस्तित्व आहे. हे मानवी मनाला जाणवलेले अर्थात मानवाला स्वसंवेद्यतेने स्फुरले. परब्रह्म स्वरूपाचे ज्ञान, स्वतःच

स्वतःला सिद्ध करण्यासाठी मानवाने अनेक कल्प मनस्वीपणाने स्फुरित केले. त्यातील एक कल्प म्हणजे त्या निर्गुण, निराकार, निर्विकार, केवल, अनंत अशा परब्रह्माला एकलेपणाचा कंटाळा आला. आपण कोण आहोत हे जाणून घेण्यासाठी त्याने बहुरूपात नटून स्वतःची स्वतःच अनुभूती घेण्याचा कल्प घडवला म्हणजे त्या परब्रह्माला अहंकार झाला, त्यातून महत्‌तत्त्व प्रकटले. त्यातून पंचमहाभूतात्मक ब्रह्मांडे निर्माण झाली. या अगणित ब्रह्मांडांच्या रूपाने ते परब्रह्म नटले असूनही ते परब्रह्म निर्गुण, निराकार, निर्विकारतेसह स्वसंवेद्यतेने अलिप्तपणे, या आकारित ब्रह्मांडाचा, अर्थात ब्रह्मांडातील सर्व जडचेतन आणि त्रितापात्मक, क्रीडा किंवा आनंद अनुभवते आहे. मानव हे त्याचेच स्वरूप पुन्हा त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपणाने, या रूप अस्तित्वातून, परब्रह्मस्वरूपात, स्वतःला अनुभवण्यासाठी आतूर आहे. हीच मानवाची मोक्षाची कल्पना आहे.

पूर्ण परब्रह्म स्वरूप अवतार अशी मान्यता मिळालेल्या भगवान वासुदेव श्रीकृष्णांच्या मुखाने, महर्षी व्यासांनी त्यांच्या मनाला आकलित झालेले, परब्रह्माचे स्वरूप वर्णन केले आहे. 'प्रकृतिपुरुषविवेकयोग' स्पष्ट करतांना, श्रीकृष्ण म्हणतात,

''**अनादित्वान्निर्गुणत्वात् परमात्मायमव्ययः । शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ।।**'' भ. गी. अ. १३ श्लोक क्र. ३१ ।।

अर्थात संपूर्ण श्रीमदभगवद्‌गीता परब्रह्म अस्तित्वाच्या, मनाच्या ठिकाणी संवेदित होणाऱ्या अस्तित्वाच्या वर्णनासाठी अर्थात पूर्ण ज्ञानावस्था प्रकटविण्यासाठीच आहे.

सद्–चिद्–आनंद परमात्मस्वरूप अनंत असे जे स्वरूप आहे तेच, माणसाला ज्ञान असलेले भौतिक विश्वस्वरूपही आहे. याचाच अर्थ अलौकिक आणि लौकिक असे किंवा अज्ञात आणि ज्ञात असे जे काही आहे; ते सर्व परब्रह्मस्वरूपच आहे. हे अनुभवण्याची किंवा साक्षात्कारीत होण्याची शक्ती माणसाच्या मनाच्या ठिकाणी आहे. माणसाच्या ह्या परमशक्तीचे स्वरूप म्हणजे आत्मरूप होय. परब्रह्माचे मानवी रूप हे पूर्णपरब्रह्म रूपच होय; हेच माणसाच्या मनशक्तीने तर्कशुद्धतेने अनुभूत केले आहे. त्या तर्कशुद्ध अनुभूतीचे सूत्ररूप वर्णन, पूर्णज्ञानोत्तर परमशांती अनुभूतीच्या स्वरूपात, उपनिषदकारांनी शांतीमंत्रात केले आहे,

''**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।**

ॐ शांतिः शांतिः शांतिः''

परब्रह्म स्वरूपाचे संवेदन मनाला झाले की; मनाविषयी एक निश्चित असे वैज्ञानिक सूत्रज्ञान होते. या सूत्रज्ञानाला ब्रह्मसूत्र असे नाव देता येते. हे सूत्र म्हणजे परब्रह्माच्या सूक्ष्मातिसूक्ष्म अंशात्मक अस्तित्वाला; अन्य सर्व शक्तींप्रमाणेच, 'मन' ही आत्मरूप शक्ती आहेच. आत्मरूप अविनाशी आहे; तसे मनही अविनाशीच आहे. त्या त्या सूक्ष्मातिसूक्ष्मापासून त्या त्या अतिमहाकाय अस्तित्व रूपास आत्मरूप मन ही आहेच. जडचेतन चरअचर, दृष्य-अदृष्य, प्रवाही-अप्रवाही, अशा सर्व सर्व रूपात आद्य स्वसंवेद्य आत्मरूप-मन आहेच. ते प्रत्येक रूप हे स्वरूपच आहे आणि ते स्वभावतः सद्-चिद्-आनंद-आत्म-अनंत, स्वसंवेद्य, स्फुरक असे परब्रह्मस्वरूप आहे. ह्या सर्व ज्ञानाचा ज्ञाता मानवी मन आहे. या कारणाने मानवी मनाला ज्ञानविज्ञान स्तरावर स्वसंवेद्यतेने परब्रह्मस्वरूपाचे आकलन, त्यातील अंशात्मक स्वरूपांची मांडणी, पुनर्मांडणी करणे शक्य आहे. मानवी मनाने या परिपूर्णतेची अनुभूती घेत सर्व प्रकारच्या विज्ञानाची मांडणी केली आहे.

परब्रह्म स्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणात सतत आत्मरूप अंशांचे, संघटन, विघटन, परिवर्तन, पुनर्संघटन, चलन, विचलन इ.इ. प्रकाराने स्फुरण सुरूच असते. म्हणजे प्रत्येक स्वरूपाचे कर्म सुरू असते. याच प्रक्रियेचा परिपाक म्हणजे अनंतात, अनंतकाळात, अगणित जडचेतन, सूक्ष्मातिसूक्ष्म आणि अतिमहाकाय रूपांत ते परब्रह्म स्वस्वभावासह नटले असल्याचा अनुभव मानवी मनाने स्वसंवेद्यतेने घेतला. त्या अनुभवांची, मांडणी, पुनर्मांडणी, संघटन, विघटन, परिर्वनात्मक निर्मिती, पुनर्निमिती या स्वरूपातील स्फुरणप्रक्रियेचे ज्ञानात्मक विज्ञान मांडले आहे. हे सर्व मानवाच्या स्वरूप सामर्थ्यातील मनस्वरूपाचे सामर्थ्य आहे. परब्रह्मस्वरूपाच्या या स्वसंवेद्य वर्तमानाला अनंतअवकाश आणि अनंतकालाचे अविनाशित्व असल्याने परब्रह्मस्वरूप नित्य वर्तमान आहे आणि ते प्रत्यही सद्-चिद्-आनंदस्वरूपात असलेले आत्मस्वरूप आहे. म्हणूनच ते केवल निर्गुण, निराकार, निर्विकार, आद्य स्वसंवेद्य असे आत्मरूप आहे हे मनस्वरूपाला संवेदित होते.

●●●

# ८. कर्मस्वरूपता

मानवी जीवात्मा असे आपण म्हणत आहोत, तेव्हां जीव+आत्मा असे आपणास म्हणावयाचे आहे. सद्-चिद-आनंदस्वरूप, ज्ञानस्वरूप, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, अविनाशी, महाशून्य, श्रीकृष्ण, अनंत, केवल, परब्रह्म परमात्म्याचे, अंशात्मक स्वरूप असा आत्मा, आणि पंचमहाभूतात्मक देह किंवा ज्याला आपण जीव असे म्हणतो या दोहोंचे अद्वैत म्हणजे जीवात्मा होय. आत्मांश पृथकपणाला जीव स्वरूपाने, सगुण, साकार, सविकार स्वरूप प्राप्त होते. मानवी जीवात्मा हा अगणित अशा चतुर्विध, जीवात्म्यांपैकी एक होय. अखिल मानवसमाज हा अशा आत्मांशांचा, आत्मांशपुंज रूपात अस्तित्वात असतो. जीवात्म्यांची निर्मिती ही, सच्चिदानंदस्वरूपाच्या, ज्ञानस्वरूपाच्या किंवा आत्मस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक प्रक्रियेचा अविभाज्य, अपरिहार्य असा, पृथक अस्तित्व भाग असतो. सच्चिदानंदस्वरूपाच्या, स्वसंवेद्य स्फुरणात्मक प्रक्रियेअंतर्गत, निर्माण होणाऱ्या, प्रत्येक आत्मांश किंवा आत्मांशपुंजाला, अर्थात पृथक अस्तित्वाला, प्रक्रियांतर्गत, उदय, आलय आणि विलय या प्रक्रियेने, अविनाशी परिवर्तनशीलतेने प्रवाहित असावेच लागते. उदयाच्या क्षणापासून विलयाच्या अंतिम क्षणापर्यंतचे अस्तित्व हे त्या पृथक सगुण, साकार, सविकार अवस्थेचे आयुर्मान असते. त्या अवधीत, हे पृथक अस्तित्व, स्वसंवेद्य स्फुरणात्मकता या आत्मांशातील स्वाभाविक गुणधर्माप्रमाणे, प्रक्रियांतर्गत आणि पृथकत्वांतर्गत बद्धतेने क्रियान्वित असते. असे क्रियान्वित असणे, ही सुद्धा त्या पृथक अस्तित्वाची अपरिहार्य भोग्यता असते. मानव या अपरिहार्य भोग्यतेला अपवाद नाही. उदय झाला रे झाला की, क्रियान्वित होणे, अर्थात जगणे अपरिहार्य होते; ते विलयाच्या अंतिम क्षणापर्यंत. ही उदय, आलय, विलय प्रक्रिया हा एकूण स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वाभाविकतेचा, अर्थात संवित्तीचा, म्हणजेच ज्ञानात्मकतेचा, अर्थात परमात्म्याचा,

भाग असल्यामुळे; जन्म पूर्व क्षणांपासून ते मरणोत्तर पूर्ण विलय क्षणापर्यंत; हे पृथकत्वच, जीवात्म्याचे सत्य, परिपूर्ण, स्वसंवेद्यस्वरूप, अर्थात मनोस्वरूप, सगुण, साकार, सविकार स्वरूप असते. म्हणूनच क्रियान्वितता अपरिहार्य आहे. या क्रियान्वितितेलाच आपण कर्मपरता असे म्हणतो. हे कर्म मनोस्वरूपाच्या योगाने अपरिहार्यपणे घडतच असते. 'जीवनार्थ कलह' तो हाच. मानवी जीवात्म्याचा हा 'जीवनार्थ कलह' एकूण परमात्म्याच्या स्वसंवेद्यस्फुरणात्मकतेने + जीवात्म्याच्या बद्धतेने + मानवनिर्मित मनोस्वरूपात्मक नैतिकविश्वाच्या बद्धतेने; अशा त्रिविध बद्धतेने आणि जन्मपूर्व, जन्मोत्तर अस्तित्वात प्राप्त होणाऱ्या संस्कारांच्या प्रेरणेने; हा 'जीवनार्थ संघर्ष' सुरू असतो. विलयाच्या अंतिमक्षणी हा जीवनाच्या, अर्थात जीवदशाभोग्यतेतील मनोस्वरूप परिपूर्णतेसाठीच्या, परिपूर्तीनेच थांबतो. हा विलयाचा अंतिम क्षण, एका पृथकत्वातून, पुढच्या पृथकत्वातही संक्रमित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. योगभ्रष्टता, ही अवस्था अशाच स्वरूपाची असते. जीवनार्थ संघर्ष करतांना साफल्याचे, आनंदाचे, परिपूर्तीचे ध्येय, कोणते? मार्ग कोणता? स्वरूप कोणते या संबंधातील निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्या पृथक अस्तित्वाला पृथकत्वदशेने प्राप्त असते. हेच त्याच्या जीवनार्थ संघर्षाचे तत्त्व असते.

सच्चिदानंदस्वरूप, ज्ञानस्वरूप, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक सर्वव्यापक, अनंत, महाशून्य, श्रीकृष्ण, अविनाशी, परब्रह्म, परमात्मा हे तत्त्व ठायीच गुणात्मक आहे. असे हे बद्ध निजरूप आहे. या निजरूपाचे असे बद्धत्व, स्वभावतः, त्या बद्धत्वांतर्गत, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आहे. ही स्वसंवेद्यस्फुरणात्मकता, स्वाभाविकपणाने, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियांतर्गततेने, मानवी जीवात्म्याच्या, व्यक्ती आणि समष्टी अशा दोन्ही स्वरूपात, अंशात्मकतेने असते. या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेला, मनोस्वरूप असे नाव दिले आहे. या मनोस्वरूपाचे ठायी, प्रक्रियांतर्गततेने, स्वसंवेद्य स्फुरणात्मकता आलेली आहे; याची जाणीवही आहे. या मनोस्वरूपाच्या, स्वसंवेद्यस्फुरणात्मकतेला, निर्णय घेण्याची, विशेष चैतन्यशाली, पात्रता लाभलेली असते. या पात्रतेनेच, मानवी जीवात्मा बद्ध अस्तित्वातही, सत्य, परिपूर्ण असे ज्ञानात्मक, परब्रह्मत्व, स्वठायी अनुभवतो. मानवी जीवात्म्यांच्या, सामूहिक मनोस्वरूपाच्या, निर्णय घेण्याच्या पात्रतेमुळेच, संपूर्ण मानवसापेक्ष व मानवकेंद्रित, नैतिकविश्वाची निर्मिती, माणसाने केली आहे. मात्र, हे निर्णय सामर्थ्य वगळता, अस्तित्वाची अन्य सर्व गुणात्मकता, ही स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेच्या; परमात्म्यापासून जीवात्म्यांपर्यंत शृंखलेने बद्ध आहे. त्यातील कोणतीही

गोष्ट स्वाधीन नाही. म्हणूनच, या बद्धता शृंखलेतील, स्वसंवेद्यस्फुरणात्मकतेला 'दैवगती' असे म्हटले जाते. मानवी जीवात्म्याचे जगणे, स्वाधीन असते की दैवाधीन असते? याचे थेट उत्तर, निर्णय घेण्याच्या विशेष पात्रतेमुळे, जीवात्म्याचे जीवन स्वाधीन असल्याचे सिद्ध करता येते. मात्र पर-आधीन गोष्टींशी, म्हणजे, दैवाधीन गुणात्मकतेशी, त्याच्यातील निर्णय पात्रतेने, सांगड घालून; समायोजनात्मक, शहाणपणासह वर्तन करावे, एवढीच अट आहे. पर-आधीन, अर्थात दैवाधीन गोष्टी, समायोजित करता याव्यात, यासाठी, मानवाने नैतिकविश्वाची मांडणी तर केलीच; त्याचबरोबर, त्याने शक्तिमत्तांना मानवसदृश्य, सगुण, साकार, सविकार स्वरूपात आकलित व आत्मसात करून; उपयोजित करण्यासाठी, दैवतकथाशास्त्रासह, योगोपासना व विज्ञान तंत्रज्ञान यांची मांडणी केली. निर्णय घेण्याच्या पात्रतेने, स्वतःला प्रभुसत्ताधीश घडविण्याचा प्रयत्न माणसाने केला. इतिहास याची साक्ष देत आहे.

मानवी जीवात्म्याला प्राप्त जन्मानुसार, प्राप्त कर्म करणे अपरिहार्य असते. निर्णय पात्रतेच्या सहाय्याने, आपल्या प्राप्तकर्माला स्वरूप देत; कर्माच्या स्वस्वरूपात, संवेदनही माणूस अनुभवू शकतो. हे लक्षात घेऊन; गुरुजन आणि ज्ञानपरंपरा या, मौखिक, ग्रंथनिविष्ट व लोकसारणी स्वरूपात, मानवी मनःशक्तीच्या सहाय्याने, निर्माण केल्या आहेत. जन्मास येणारा प्रत्येक मानवी जीवात्मा, अंशात्मा स्वरूपात, अंशात्मपुंजस्वरूप मानवी समूहजीवनात, प्राप्त आत्मांशाच्या स्वसंवेद्य स्फुरण स्वभावामुळे, ज्ञानसाधना, ज्ञानप्राप्ती, ज्ञानाचे उपयोजन यांसाठी स्वात्मभावाने समर्थ असतो. त्याच्या या सत्य, परिपूर्ण अस्तित्वाला लाभलेल्या वैशिष्ट्यपूर्ण निर्णय घेण्याच्या पात्रतेने बद्धजीवनातही परमात्म्याची प्रभुसत्ता जीवात्म्याचे ठायी, अनुभवण्याचे सामर्थ्य प्राप्त असते. आत्मांशाचे हे सत्य, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आणि निर्णयविषयक सामर्थ्य ओळखण्याचा अभ्यास घडणे मात्र आवश्यक असते. हा अभ्यास घडविण्याचे सामर्थ्य, मातापिता, गुरू, मित्र, संप्रदाय, तत्त्वज्ञ, चिंतक, संत यांचेकडे असते. त्यांचा सहवास लाभणे, हे स्थलकालपरिस्थिती आणि नैतिकविश्वातील परंपरा, यांवर अवलंबून असते.

प्राप्त जन्म म्हणजे, स्थलकालपरिस्थितीसापेक्ष, मानवी नैतिकविश्वात, अपरिहार्य अशा मातापित्याच्या उदरी जन्म लाभणे. नैतिकविश्वाच्या दृष्टीने, अनौरस, औरस अशा कोणत्याही प्रकारे, प्रसूतीगृहात किंवा जंगलात, शेताभातात, झोपडीत, गोठ्यात, कचराकुंडीत, घरात, चाळीत, देवळात, महालात, मजल्यावर अशा

कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही ऋतुत, कोणत्याही, आपदग्रस्त वा सुरक्षित अशा, नैसर्गिक परिस्थितीत; अशिक्षित, सुशिक्षित, भिकाऱ्यापासून राजापर्यंत; राक्षसी, मानवी, दैवी, व्यसनी, दुर्बल, सबल, गुंड, शोषक किंवा ऋषी, मुनी, तपस्वी, संत, कवी, लेखक, कलावंत, समाजसेवक, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, वाहनचालक अशा कोणत्याही प्रकारच्या मातापित्यांच्या उदरी; कोणत्याही प्रकारच्या कौटुंबिक परिस्थितीत, अर्थात कुटुंबवत्सल, एकुलतेपणे, सावत्रपणे, दासीपुत्र म्हणून इ. प्रकारे; कोणत्याही जातीत, पंथात, समाजात, मार्गात, मतप्रणालीमध्ये, धर्मसारणीमध्ये इ. कोणत्याही भाषिक अथवा वाङ्मयीन पर्यावरणात इ. मध्ये, गावात, प्रदेशात, देशात, गिरीकंदरात, मैदानी प्रदेशात, समुद्रकिनारी, नदीकाठी, तळ्याकाठी इ. ठिकाणी. जन्म होणे; ही नैसर्गिक फलन प्रक्रिया, सर्वत्र, स्त्री, पुरुष यांच्या बीजसंयोगातूनच होते. जन्म होण्यापूर्वीच्या एकूण वरील प्रकारच्या स्थलकालपरिस्थितीचा, जन्म झाल्यानंतर स्थलकालपरिस्थितीचा आणि जन्मोत्तर वाढ होतांना भोवतालच्या स्थलकालपरिस्थितीचा, परिणाम त्या नवजातास अपरिहार्यपणे चिकटतो. जात, धर्म, पंथ, नातेगोते, सर्वप्रकारे मानवी विश्वाशी, नवजातास, संबंधित होणे अपरिहार्य असते. त्याचा जीवनार्थ संघर्ष, अशा प्राप्त जन्मानुसार सुरू होतो. या चिकटलेल्या गोष्टी, हेच त्या जीवात्म्याचे, वास्तविक जीवनातील स्वरूप ठरते. या प्राप्त जन्मानुसार, मानवी जीवात्म्याचे ठिकाणी, स्वसंवेद्य स्फुरणात्मकता, स्वाभाविकच असली तरी; या सर्व प्रकारच्या पर्यावरणातील, सर्व प्रकारची आव्हाने, त्याच्या ठायीच्या, निर्णय घेण्याच्या पात्रतेला स्वीकारावी लागतात. त्याचे मनोस्वरूप असे बाधित व बद्ध असते. प्राप्त परिस्थितीतून निर्णय घेत त्याला जीवनानंद भोगावयाचा असतो. जीवनार्थ संघर्षात, त्याच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेला, प्राप्त परिस्थितीतील, सुखदुःखाच्या कल्पना अधिक आव्हान देत असतात. जीवात्म्याठायी असलेल्या आत्मांशाचा स्वाभाविकपणे परमात्मस्वरूपाशी असलेला स्वरूपसंबंध, त्याच्या ठायीच्या स्वसंवेद्यस्फुरणात्मकतेने, त्याला सच्चिदानंदस्वरूपाच्या दिशेने, अर्थात उर्ध्वगतीने, तरी सततच्या स्फुरण प्रक्रियेअंतर्गत, खेचत असतो. यामुळे, जीवात्म्याला, अपरिहार्य प्राप्त जन्म अवस्था स्वीकारून, प्रभुसत्तेपर्यंतच्या प्रवासाचे ध्येय, स्वाभाविकपणे स्वीकारून, प्रवासावे लागते. नैतिकविश्वाच्या स्वीकृत बद्धतेसह, जीवात्म्याची मनोस्वरूपता, प्रत्यही, नैतिकविश्वातील सुखदुःखे, हेवेदावे, रुसवेफुगवे, सत्तास्पर्धा इ. विषयींची मानवनिर्मित बद्धतेतील आसक्तीप्रेरीत ध्येये, यामुळे बाधीत होते. आत्मांशपुंजस्वरूप समूह,

जीवनातील स्वाभाविक अशा, नैतिकविश्वातील, मानवाने जीवदशेतील वासना, वृत्ती, प्रवृत्ती इ. नुसार अर्जित प्रणाली प्रवाहात, प्रवाहपतीततेने वाहविते. यामुळे स्वाभाविक सच्चिदानंदस्वरूप सत्य, परिपूर्ण अशा, अंशात्म अस्तित्वाच्या, भोग्यतेला जीवात्मा पारखा होऊन; तात्कालिक सुखदुःखाच्या, त्रितापांच्या फेऱ्यात अडकतो. जीवन संघर्षमय आणि दुःखमय वाटू लागते. त्यात अपरिहार्य कर्माला, तात्कालिक सुखदुःखाचे परिमाण प्राप्त होऊन, दुःख, मृत्यू हेच सत्य अशी भावना बळावते. कर्मबाधीत होत, कर्मपरतेला, कष्टप्रदतेचे, दुःखपरतेचे, परिमाण प्राप्त होते. जीवन हे दुःखाने भरलेले आहे असे म्हणत, स्वतःतील सत्यता, परिपूर्णता, ज्ञानमयता हरवून; जिवंतपणीच दैवाधीन होऊन जीवात्मा मृतप्राय होतो. आपल्यातील निर्णय पात्रता आणि परिपूर्ण सच्चिदानंदस्वरूपसंबंध हरवून बसतो.

जीवात्म्यातील, आत्मांशात्मक सच्चिदानंदस्वरूपता, हे अविनाशी सत्य परिपूर्णस्वरूप, नित्य संवेदित ठेवणे; हे जीवात्म्याच्या स्वाधीन असते. कारण ते स्वभावतः त्याच्या ठायीच असते. या अविनाशित्वाची संवेदना, नित्यपणे जागृत असली; की ज्ञानात्मकता, कर्मपरतेचे क्रीडापरतेत परिवर्तन करते. जीवात्मा खेळाडू होतो. ठायीच तो नित्य क्रीडनानंद भोगू लागतो. नैतिकविश्वातील महत्त्वाकांक्षांच्या कचाट्यात या अविनाशित्वाच्या नित्यतेचा विसर पडला की षड्रिपुंच्या विळख्यात तो अज्ञानवश होतो. अशा परिस्थितीत, कर्मपरता ही क्लेषकारक होऊन; अतृप्तता, अशांतता, त्रस्तता येऊन; आनंद प्राप्तीच्या भ्रामक प्रयत्नशीलतेने तो केवळ दुःखाची प्रतिती अनुभवतो. पराभूततेचा बागुलबुवा जीवात्म्याच्या ठायी, सैतानाचे साम्राज्य अनुभवत, नैतिकविश्वाच्या ठायी, पाखंडपणाने वावरू लागतो. याचा स्पष्ट अर्थ असा की; परमात्म्याच्या स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेतील आत्मांशस्वरूप, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने खेळगडी होऊन; कर्मक्रीडेतील सच्चिदानंदस्वरूपाचा सोहळा अनुभवयाचा; की नैतिकविश्वासह बद्ध स्वरूपातील उदय, आलय विलयकारक क्षणभंगुरतेतील नैतिकविश्वसापेक्ष कर्मपरता, गुलामी स्वरूपात अनुभवत, दैवगती विवशतेने, भवदुःखाच्या सागरात, गटांगळ्या खात, जीवात्म्याच्या, मर्त्यतेच्या क्लेशाने, आकांतकारी टाहो फोडत, जीवनसंघर्षात, निस्साहायतेने पतित व्हायचे; याचा निर्णय घेणे; हे सर्वस्वी जीवात्म्यांच्या ठायी स्वसंवेद्य स्फुरणात्मक मनोस्वरूपाच्या आधीन आहे. याचे भान येणे, म्हणजेच पुरुषार्थ प्रवण होऊन; जीवनार्थ संघर्ष करण्यास सिद्ध होणे होय.

जीवात्म्याच्या भोवतीचे आत्मांशपुंजात्मक मानवी समूहजीवन, पंचभौतिक

तत्त्वे, मानवेतर जडचेतन अस्तित्वे आणि मानवनिर्मित नैतिकविश्व, या सर्व गोष्टी, अंशात्मता किंवा अंशपुंजात्मकता यांतील, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, सच्चिदानंदस्वरूपाच्या स्वरूपसंबंधाने, सत्य आणि परिपूर्ण अस्तित्वाच्या कसोटीवर, स्वाभाविकतः उतरतात. जीवात्म्याचे जीवन या सर्व गोष्टींच्या सापेक्षतेने उदयास येते, आलयभूत होते. अर्थात विकसित होत स्थिरावते आणि विलयही पावते. याचा अर्थ या सापेक्षतेने जीवात्म्याची कर्मांसंबंधी पुरुषार्थ प्रवणता सिद्ध होत असते. कुटुंब, जात, जमात, समाज, पंथ, धर्म अशा समूहजीवनाने, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला सगुण, साकार, सविकार प्रतिष्ठा प्राप्त होते. स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने, नैसर्गिक आणि अर्जित साधनसंपत्तीने, जीवात्म्याच्या जीवनाला, जगण्याची, प्रणालीसुलभता प्राप्त होते. हेच जीवात्म्याचे 'लोक' सापेक्षतेने, आत्मांशांसह, जीवदशा भोगणे असते. या सर्व गोतावळ्यात, गरजेनुसार निर्माण होणाऱ्या, कर्मव्यवहार प्रणालीतील, कर्मपरता, जीवात्म्याच्या वाट्याला येते; म्हणून या सर्व संबंधांमध्ये, आत्मांश किंवा आत्मांशपुंज स्वरूपाला, बद्धसृष्टीत, सहानुभूती आणि स्वात्मानुभूतीसह, व्यवहार करणे किंवा अवलंबिणे आवश्यक असते. असा व्यवहार म्हणजे, सत्य संबंधी, प्रेमस्वरूप व्यवहार होय. अशा व्यवहाराने सर्व चरअचर, जडचेतन सृष्टीविषयी, करुणा प्रकट होते. हे परिमाण कर्मपरतेला लाभणे म्हणजे कर्म ज्ञानवान होणे होय. कर्मज्ञानवान झाले; की कर्मासंबंधीची, कर्तव्यतत्परता आणि क्रीडात्मकता प्रकटते. अशा कर्मपरतेने, बद्धजीवनात, पुरुषार्थतेचा अनुभव, म्हणजे सच्चिदानंदस्वरूपाच्या स्फुरणप्रक्रियेचे संवेदन, ठायीच होऊ लागते. कर्मपरतेत निरपेक्ष करुणाभाव प्रकटतो. ऋषी, मुनी, तपस्वी, तत्त्वज्ञ आदींनी याच लोकनिष्ठेने सहानुभूती पूज्यभाव, कृतज्ञता कर्मधर्मसारणीत आणली. ही अध्यात्मवादी भूमिका माती, सरिता, आकाश यांना मातृत्व बहाल करते. माता, पिता, गुरू, मार्गदर्शक. धुरिण यांना देवत्व बहाल करते. मानवीसमूहाला पुरुषस्वरूपता, अर्थात लोकस्वरूपता आणविते. कुटुंब, समूह, घराणे, जात, गाव, प्रदेश, राष्ट्र यांच्याविषयी, आत्मभान प्रकटविते. जीवात्म्याचे ठिकाणी या आत्मभावाने, निर्णयप्रक्रिया आणि कर्मतत्परता घडणे आवश्यक असते. असे घडू लागले; की कर्तव्यतत्परता आणि पुरुषार्थाची, आत्मसन्मानात्मक भावना प्रकट होऊन; कर्माचे कार्यात, प्रयत्नात आणि दिव्यत्वात रूपांतर होते. म्हणजे बद्धजीवात्माही अविनाशी प्रभुसत्ताभावाने प्रकटतो. तो पृथक बद्धजीवात्मा, अविनाशी जीवनप्रणालीतील एक अविभाज्य अंश होऊन बसतो.

'कर्म' या शब्दामध्ये, पोटासाठी करावयाचे काम, मजुरी, सशुल्क सेवा अर्थात नोकरी, चाकरी, कौशल्याधिष्ठित करावयाची सशुल्क कामे, धंदा, व्यापार पेढीव्यवसाय, बाजारहाट यातील विनिमयात्मक कामे, व्यवस्थापकीय नोकऱ्या, संरक्षणविषयक नोकऱ्या आदि सर्वप्रकारे; वस्तुविनिमय, मुद्राविनिमय या द्वारे स्वस्वीकृत वा अपरिहार्यतेपोटी वाट्यास आलेली कामे, यांचा विचार होतो. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, या क्षेत्रातील परंपरांनी वाट्यास आलेली किंवा स्वीकृत केलेली कामे, सेवा इ. गोष्टी यात निःशुल्क किंवा विनामोबदला कामे आणि मोबदल्यासह आलेली कामे येतात. रंजन, सजावट अशा क्षेत्रात छंदात्मक कामे, सशुल्क किंवा मोबदल्यासह आलेली कामे यांचा विचार करता येतो. कृषी क्षेत्रात करावयाची मजुरीची कामे यात येतात. धार्मिक क्षेत्रातील सशुल्क कामे ही ही या विभागात येतात. ही व अशी सर्वप्रकारे केलेली कामे यांचा 'कर्म' म्हणून विचार करतांना, श्रद्धा, निष्ठा, परिपूर्ण कौशल्यता, समर्पणभाव, सेवाभाव, स्वक्षमतेचा योग्य विकास, अशा भावना किंवा ध्येये यांची अपेक्षा असते. यात स्वनिष्ठा, स्वामीनिष्ठा, भूमीनिष्ठा, समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, मानव्यनिष्ठा, धर्मनिष्ठा, गुरुनिष्ठा, ज्ञाननिष्ठा अशी विशिष्टकेंद्री निष्ठा अपेक्षित असते. ही अट मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने पूर्ण होत असेल; तरच कर्म ज्ञानवान असल्याची अनुभूती येऊन; प्राप्त कर्म श्रेयपूर्ण, सच्चिदानंद स्वरूप होते. स्वतःबरोबर सर्वांचे पोट भरण्यासाठी जरी हे काम घडत असले; तरी पोट भरण्यासाठी, नैसर्गिक सगुण, साकार, सविकार, देहदशाकेंद्रित, असे ते काम राहात नाही; तर, ते प्राप्त कर्म, नैतिकविश्वांतर्गत, आत्मांशपुंजस्वरूप, समाजपुरुषाची सेवा अथवा कर्तव्यतत्परता ठरते. कर्माला, सत्कर्माचे म्हणजे देवपूजेचे, आत्मस्वरूप साधनेचे स्थान प्राप्त होते. उलटपक्षी पोटार्थीपणाने, वाट्याला दुर्दैवाने आले म्हणून, गुलामी म्हणून, अपरिहार्यता किंवा दुसरा मार्गच नाही म्हणून, जेव्हा ही कामे आपण करू लागतो; तेव्हां हीच कामे क्लेशदायक, कष्टप्रद, कंटाळवाणी, जीवन अवरुद्ध करणारी आहेत, असे वाटू लागते. अज्ञानवशता येते. कामातली तत्परता नाहीशी झाली; की कामाची प्रत आपसूकच घसरते. आपल्याला या कामाची मिळालेली संधी टिकविण्यासाठी आपण जीवापाड मेहनत घेतो आहोत; अशी स्वात्महीनता अनुभवास येते. यासाठी प्राप्त कामाचे कर्मात रूपांतर करायचे की कष्टात? याचा निर्णय घेणे आपल्या हाती असते. त्यासाठी वृत्तीची स्थिरता आणि मनोस्वरूपाची स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वाभाविकता ही जीवात्म्यातील जीवदशाकेंद्रित असून

चालत नाही; ती आत्मांशकेंद्री व्हावी लागते. प्राप्त कर्म हे जीवात्म्याला प्रभुसत्तेपर्यंत घेऊन जाणारे साधन आहे; याची जाणीव व्हावी लागते. समाजधुरीण, गुरुपरंपरा, तत्त्वज्ञान आणि सहज मातृभाव, प्रेमभाव यांच्या संदेशनातून ही जाणीव प्रकट होऊ शकते. प्राप्त कामावर प्रेम आणि प्राप्तसंधी ज्या व्यक्ती, परिस्थिती, यांच्यामुळे मिळाली, त्यांवर प्रेम असावे लागते. ते अभ्यासाने निर्माण होऊ शकते.

जीवात्मा आणि जीवात्म्यांचा समूह यांचे, नैतिकविश्वसापेक्ष आणि निसर्गसापेक्ष अशा दुहेरी सापेक्षतेसह, जीवनशैलीतील कामे, ही आपण कोणत्या मनोवृत्तीने करतो; यावर या जीवनशैलीतील कामांना 'कर्म' अशी प्रतिष्ठा प्राप्त होणार; की कष्ट अशी दुःखकारकता प्राप्त होणार, हे ठरते. सर्वांठायी आत्मांश आहे; याची सहानुभूती आणि स्वात्मानुभूती त्यांतून निर्माण होणारी सत्यनिष्ठा आणि प्रेम, या प्रक्रियेने, काम करुणापूर्ण होऊन; ज्ञानवानकर्म असे कामाला स्वरूप प्राप्त होते. त्यासाठी माऊली ज्ञानेश्वरांनी सोपे सूत्र सांगितले आहे, ते लौकिक अर्थाने येथे स्वीकारले तर, सहजच सत्य, प्रेम, करुणा यांचा अभ्यास जीवात्म्याच्या ठायी सिद्ध होऊ लागतो. ते सूत्र म्हणजे 'मार्गाधारे वर्तावे । विश्व मोहरे लावावे' हे होय. कुटुंबात, शेजारीपाजारी, पैपाहुण्यात, गावगाड्यात, जात, पंथ, धर्म, समूहात, आपले लोकसंबंध वर्तन असते. ते आपले प्राप्त काम असते. सहजच प्राप्त भूमिका निष्ठेने वठविण्याचा अभ्यास आपण करू लागलो; तर मनोस्वरूपाला स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, सत्यनिष्ठ, प्रेमपूर्वक, करुणापूर्ण असे प्राकट्याचे स्वरूप प्राप्त होते. असे झाले की लोकसंबंधात, ठायीच परमात्म स्वरूपाचा भाव उत्पन्न होऊन; अवघे जीवन प्रेमाने अर्थात आनंदाने भरून आणि भारून जाते. सणोत्सव, लोकसंबंधाने, कुटुंबात आणि समाजात करावयाची, जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा या संबंधातील संस्कार कार्ये आणि दैनंदिन जीवनातील, भावनिक आणि व्यावहारिक विनिमय, जर उपरोक्त प्रकाराने प्रेमपूर्वक करू लागलो; तर प्राप्त अपरिहार्य जीवनशैलीत कामांना कर्माची प्रतिष्ठा प्राप्त होईल.

समाजातील दुर्बल, अपंग, वंचित, रुग्ण यांच्या सेवाकार्यात सहभागी होणाऱ्या जीवात्म्यांचे दोन गट करता येतात. एक पुण्यप्राप्तीची कल्पना, सेवाभाव, सहानुभूती, स्वात्मभाव, या संवेदनेने सेवाकार्य करणे. त्यासाठी दान करणे अथवा प्रत्यक्ष व्यक्तिगत स्वरूपात कार्यात सहभागी होणे. असे कार्य करणारांचा जीवात्मांशपुंज समूह हा या कर्मतत्परतेत सच्चिदानंदस्वरूप मनोस्वरूपाचा ठायीच

अनुभव घेतो. दुसरा गट, सामाजिक, राजकीय प्रतिष्ठाप्राप्ती, विनियोगीत धनसंपत्तीच्या आधारे करसवलती मिळविणे, प्रियजनांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोठे दान करून; कृतज्ञताभावाचे प्रदर्शन करणे, पाखंडपणाने धर्मात्म्यांचे सोंग वठवत, स्वतःच्या व समूहाच्या मानव्यशोषक व्यवहारावर पांघरुण घालणे, आपल्याजवळील टाकावू अन्नधान्य, कपडेलत्ते, साधने यांची विल्हेवाट अशा सेवाकार्यानिमित्त करीत, प्रेमपरतेचे पाखांड मिरविणे. या दुसऱ्या गटामध्ये येणाऱ्या जीवात्म्यांच्या ठिकाणी मुळातच सहानुभूती किंवा स्वात्मभाव नसल्याने, कार्यातील आनंदही बेगडी असतो. व्यावहारिक पातळीवर मिरविता आले; तरी अंतरिक आत्मांशस्वरूपता प्रकट होत नाही. अज्ञान आणि अशांतीवशता असे कर्म दुष्कर्म ठरते. भलेही जेथे कर्म घडते, त्यांना व्यावहारिक पातळीवर काही मिळत असले; तरी परस्परांविषयी सत्यनिष्ठा जागृत होत नाही आणि उभय ठिकाणी अतृप्तता येते.

सेवाकार्य, दान आदि कर्मात, उपकार करतो असा अहंकार येणे; हे केवळ अज्ञानमूलकता येणे होय. यामुळे कर्तव्यतत्परता ही बाधित होऊन; स्वार्थपरतेचे परिमाण प्राप्त होते.

असे, मानवी जीवात्म्यांसाठी आणि मानवेतर जीवात्म्यांसाठीदेखील, सत्यनिष्ठा, प्रेमभाव आणि कारुण्यासह सेवा आणि दान घडणे अपेक्षित असते. आत्म्यांची स्वसंवेद्य स्फुरणात्मकता बद्धदेहाच्या ठिकाणी सहानुभूती, स्वात्मभाव रूपाने प्रकटली; की आपसुकच सर्वांभूती प्रेम आणि करुणा निर्माण होते. कर्माला सत्कर्माची, देवपूजेची, आत्मस्वरूपस्थितीप्राप्तीची पूज्यता प्राप्त होते. जीवात्म्याने, ठायीच, परमात्मस्वरूपाचा अनुभव घेण्याची, ही प्रक्रिया असते. या प्रक्रियेतून जीवदशा भोगताना, जीवाच्या ठिकाणी, सगुण, साकार, सविकार अशा स्वाभाविक अवस्थेतून आलेली, स्वार्थपरता, अर्थात जीवस्वार्थांधता गळून पडते. आत्मांशाच्या ठिकाणी असलेली सत्य आणि परिपूर्णतेची संवेदना प्रकटते. हाच बद्धतेतील मोक्ष किंवा हीच बद्धजीवनातून मुक्तता असते.

मानवी नैतिकविश्वनिर्मितीची सुरुवात, मानवी मनोस्वरूपाने, बहुधा, कृषी जीवनानुभूतीपासून केली असावी असे म्हणण्यास वाव आहे. भारतीय परंपरेतील, ब्रह्ममानसपुत्र म्हणून, ज्या ऋषीपरंपरेचा उल्लेख होतो; त्या ऋषींच्या जीवनसाधनेचा अभ्यास केला; तर कृषीकर्म आणि कृषीसंशोधन अनुभूतीतून, ऋषींनी, संपूर्ण ब्रह्मनिष्पत्ती, ब्रह्मचलनवलन, जीवन सारणीतील परस्परावलंबिता, भूतमात्रांच्या, वस्तुमात्रांच्या, प्राणीमात्रांच्या, मनुष्यमात्रांच्या परस्परावलंबित्वावर आधारित,

आश्रम, ग्राम, राज्य आदि प्रकारच्या मानवी व्यवस्थापनप्रणाली, सुनियोजित केल्या आहेत. संपूर्ण ब्रह्मांडाच्या प्रचलनाचा त्यातील परस्परसंबंधांचा, परस्परावलंबित्वाच्या, अस्तित्वप्रणालींचा अभ्यास आणि त्यांच्या शक्तिमत्तांचे मानव प्रणालीकेंद्रित व्यवस्थापन केले आहे. ऋषीजीवनाला विनिमय आणि स्थिरस्वरूपामधील, भरणपोषण संबंधातील, व्यवस्थापनाचे स्थान देऊन; संपूर्ण मानवीप्रणाली, कृषीकेंद्रित व्यवस्थापनानुसारी मांडल्या. यज्ञसंस्थेचे मूळ कृषीकर्म साधनेत आहे. जलव्यवस्थापन, पर्जन्यव्यवस्थापन, उर्जाव्यवस्थापन, प्राणीव्यवस्थापन, अन्नप्रणाली व्यवस्थापन या कृषीकर्म संबंधित व्यवस्थापनाशी, मानवी समाज, राज सत्ता, अर्थ, न्याय, संरक्षण, धर्मधारणा, कला, संस्कृती इ. गोष्टी अवलंबित स्वरूपात मांडल्या. भौतिकशास्त्रे आणि मानव्यशास्त्रे, यांना पायाभूत शास्त्र म्हणजे कृषी शास्त्र होय. याचे भान याची जाण, लोकधुरिणत्वाने, गुरुपरंपरेने, ऋषीलोकपरंपरेने करवून दिली.

मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने ऋषीपदाला पोचलेल्या मानवी जीवात्म्यांनी, नैतिकविश्व कृषीजीवनाशी असे निगडित केले. या निसर्गावलंबी जीवनप्रणालीतून, मानवी स्वसंवेद्यस्फुरण प्रक्रियांतर्गत, मानवी जीवनप्रणालीतील, सनातन धर्मधारणांचे परिवर्तनशील मंडन करीत; कृषीक्षेत्र, आश्रम, ग्राम, पंचक्रोशी, प्रदेश, राज्य, राष्ट्र, विश्व अशा क्रमाने सत्ताकेंद्रे उभी केली. त्याचबरोबर व्यष्टी आणि समष्टीची, व्यवस्था मंडीत केली. व्यष्टी, कुटुंब, ज्ञाती, समाज, वर्ण, पंथ, धर्मधारणा यांचे व्यवस्थापन केले. या सर्वांचे केंद्र म्हणजे कृषीजीवन होय. प्रत्येक कृषीक्षेत्राचा, क्षेत्रज्ञ कृषक, हा एक प्रकारे, त्या क्षेत्राचा ज्ञाता, धाता, भोक्ता, पोशिता, संरक्षक, असा प्रभुसत्ताधीश असे. आजही असतो. कृषीजीवनातील कर्मपरतेचा विचार म्हणूनच सर्वात्मकतेनेच करावा लागतो. कृषीजीवनातील कर्म पंचमहाभूते, आणि जीवमात्र यांच्यावर अवलंबून असते.

शेतात काम करतांना भूमी ही माता आहे आणि आकाश, वायू, तेज आणि पाणी ही परमात्म्याची रूपे आहेत. असा भाव, काम करणाऱ्याच्या मनोस्वरूपाच्या ठिकाणी, असावा अशी सनातन अपेक्षा आहे. भूमीच्या आश्रयाने राहणारे, उद्भिज, स्वेदज, अंडज, जारज असे सर्व प्राणीमात्र, ही भूमीची संताने आहेत; एवढेच नव्हे तर; अंशात्मस्वरूप आपलीच रूपे आहेत; अशी सर्वात्मक जाणीव अभिप्रेत असते. भूमीचे शेतकरी केंद्रित व्यवस्थापन करून; शेती पिकवणं, हा एकप्रकारे जीवन संघर्ष असतो. या संघर्षाला स्तनपान करण्याची प्रेममयता

असावी; अशी अपेक्षा काम करतांना असावी. भूमीने दिलेले दान केवळ आपल्या पोटासाठी नाही तर अवघ्या प्राणीमात्रांच्या पोषणासाठी आहे; हे सत्य स्वीकारून, त्या दानाचा स्वतःसाठी आणि अन्य सर्व प्राणीमात्र यांच्यासाठी प्रेममयतेने, करुणापूर्णतेने विनियोग होईल; असा विनिमय असावा, अशी अपेक्षा असते. भारतीय परंपरेतील ऋषीपरंपरेने, निर्गुण निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, सच्चिदानंदस्वरूप, केवल, अनंत, अविनाशी, महाशून्य, श्रीकृष्ण, परब्रह्म, परमात्मा स्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणप्रक्रियेतील, उदय, आलय आणि विलय प्रक्रियेचे, प्रात्यक्षिकच जणू कृषीकर्मपरंपरा निर्माण करून; मांडले आहे. या सनातन अपेक्षेने शेतीकाम हे एक सनातन परमात्मस्वरूप, मनोस्वरूप स्वरूपात, ठायीच, अर्थात 'याचिदेही याचिडोळा', अनुभवण्याची क्रीडनात्मक परंपरा, ऋषींनी निर्माण केली. उपरोक्त अपेक्षा शेतकरी म्हणविणाऱ्या अंशात्म मानवी जीवात्म्याचे ठिकाणी स्वसंवेद्य स्फुरणस्वरूप, मनोस्वरूपात प्रकटल्या की शेतीकाम हे सुप्रतिष्ठित कर्म होते. प्राप्त शेत हे क्षेत्र होते. शेतकरी क्षेत्रज्ञ होतो. परमात्म स्वरूपाची सत्-चिद्-आनंदस्वरूपता, परिपूर्णतेने अनुभवू लागतो. शेतकरी परमात्म्याच्या स्वाभाविकतेसारखाच प्रतिरूपतेने जगू लागतो. ऐहिक जीवन मानवी नैतिकविश्वात प्रणालीतील एक म्हणून जगत असतांनाही, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक सच्चिदानंद स्वरूपतेने, बद्ध जीवात्म्यांची जीवन क्रीडा, उदय, आलय, विलय या बद्ध, क्षणभंगुर तरी अविनाशित्वाच्या अनुभूतीसह, स्वात्मभावाने अनुभवतो. कृषीक्षेत्रात जीवनपोषणार्थ, अन्नब्रह्म निपजते; तसेच तत्त्वज्ञान आणि चराचराच्या व्यवस्थापनाची स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मस्वरूपताही निपजते. सत्य, प्रेम, करुणा हे सच्चिदानंदस्वरूपाचे प्राकट्य, लीलया मनोस्वरूपाठायी घडते. कृषीकर्माची ही महत्ता प्रत्यही लक्षात ठेवणे अपेक्षित असते. कृषक हा परमात्म्यासमान समावेशक, सर्वात्मभावे पोशिंदा असतो. दातृत्व, हा सच्चिदानंदस्वरूपाचा, सत्यप्रेमकरुणात्मक भावधर्म, शेतकऱ्याच्या ठायी परंपराप्राप्त असतो. म्हणूनच तो दुकाळात आणि सुकाळातही राजाच असतो. ऋषींनी कृषकाला विष्णुस्वरूपात मांडले आहे. शिवस्वरूपात त्याच्या प्रपंचाचे चित्र उभे केले आहे; तर ब्रह्म स्वरूपात अस्तित्वाच्या पित्याचे रूप त्याला दिले आहे.

सामाजिक, राजकीय, आर्थिक व्यवस्थापनाच्या प्रक्रियेत, कृषकवृत्ती स्वीकारणाऱ्या ऋषीकुलातील वा ऋषीकुलाबाहेरील जीवात्म्याला, केवळ जुजबी महसुलाच्या विनिमयाच्या अटीवर भूसंपादित करून; कृषीकर्म करण्याची संधी

मिळाली होती. सत्ता, संपत्ती, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय सत्तेतील सहभाग या नैतिकविश्वातील विनिमयात्मक गोष्टींच्या कक्षेने, भूमी भोग्यवस्तु म्हणून वापरापर्यंत, संवेद्यतेची घसरण झाली.

कर्तव्य भावना, सत्यनिष्ठा, प्रेममयता आणि करुणा हरपली. कृषीकर्मातील अतिआवश्यक अध्यात्मिक स्वसंवेद्यतेची जागा, भौतिक बद्ध व्यावहारिक सत्तालोलुपतेने घेतली. कृषीकर्माचे कामात रूपांतर झाले. कुटुंबापासून वैश्विकतेपर्यंत, सत्ता, संपत्ती आणि ऐहिक ऐश्वर्यपूर्ण जीवन, याविषयी भ्रष्ट निष्ठा निर्माण झाली. या प्रवासात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि प्रामुख्याने आर्थिक क्षेत्रात, सत्ताहव्यासाचीही स्पर्धा निर्माण झाली. भूमीसाठी, द्वंद्वे, हेवेदावे, भाऊबंदकी, संघर्ष, युद्धे, भ्रष्टव्यवहार, सूडचक्रे, यांनी ऋषी जीवात्म्यांच्या मनोस्वरूपाला बाधित केले. विष्णूस्वरूप, राजास्वरूप कृषक, मनोस्वरूपाच्या बाधिततेने, याचक, भोक्ता आणि रंक झाला. भारतीय परंपरेत कलियुगाच्या नावाखाली क्षेत्रांगणिक भूजंगांची वारुळे निर्माण झाली. स्वतःच स्वतःला शोषक, घातक, मारेकरी झाला. शेतीला उद्योगाचा दर्जा असावा; हा व्यवस्थापनातील सनातन विचार; भौत्तिक उद्योगस्वरूपात विचारात घेतला जाऊ लागला. कृषीजीवनात कृषीक्षेत्राचे मालक आणि प्रत्यक्ष कृषीकर्म करणारे मजूर झाले. आपल्याच जमिनी पराधीन करून, भौतिक जीवनातील व नैतिकविश्वातील तथाकथित प्रतिष्ठा जपण्याच्या भ्रमात, स्वतःला दास, उपभोग्य वस्तु बनविले. वर्तमानात कृषीजीवनातील ही अशांतता या बाधित मनोस्वरूपामुळे शिगेला पोचली आहे. कर्माला कष्ट, काम, क्लेश यांचा दर्जा प्राप्त होऊन; स्वतःला शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी म्हणवून घेत, आत्मांश आणि आत्मांशपुंज स्वरूपातील सामूहिकतेतील आत्मस्वरूप नाहीसे होऊन; बुभुक्षितपणा, हव्यास, अतृप्तता, स्वार्थपरता यांचे थैमान स्वतःच्या ठायी निर्माण करण्याला, आत्मभानात्मक संघर्ष, असे म्हटले जाऊ लागले. ह्या घसरणीचे कारण म्हणजे स्वसंवेद्य स्फुरणात्मक मनोस्वरूपातील निर्णयपात्रतेला, नैतिकविश्वातील, भ्रामक सत्तांधतेने, स्वार्थांधतेने आलेली बाधितता होय; त्यातून, निर्णय घेण्याच्या पात्रतेला, ग्रहण लागले. निर्णयप्रक्रियेतील सत्यनिष्ठा, प्रेममयता, करुणा या संबंधातील नैतिकविश्वसापेक्ष विवेक आणि शहाणपणालाच पारखे होऊन; प्रलयंकारी अहंकाराला कवटाळणे सुरू झाले.

प्रत्येक मानवी जीवात्मा हा आत्मांश असल्याने, परमात्म्याची सर्व गुणात्मकता त्याच्या ठायी आहेच. स्वसंवेद्य स्फुरणात्मक प्रक्रियेतील आत्मांशपुंज अशा

समूहजीवनाचा भाग म्हणून, स्वतःचे अस्तित्व व्यष्टीपासून समष्टीपर्यंत, विकसित, प्रस्थापित करून; आत्मस्वरूपाला सिद्ध करण्याचा त्याला जन्मजात अधिकार आहे. याला कोणताही मानवी जीवात्मा अपवाद असण्याचे कारण नाही. प्राप्त जन्म पराधीन असला; तरी प्राप्त जन्माला हवे तसे स्वरूप देण्याचा, निर्णय घेण्यास, जीवात्मा पात्र असतो. मानवी नैतिकविश्वांतर्गत, दास म्हणून जगायचे की चक्रवर्ती, विश्वशास्ता, सम्राट होऊन जगायचे? मजुरी करायची की मालक व्हायचे? राक्षस व्हायचे की देव व्हायचे? हे ठरविण्याचा, तशी महत्त्वाकांक्षा, निदान इच्छा, कदाचित निश्चय, असे काहीही करण्याचा निर्णय त्याच्या हाती दैवगत्याप्राप्त आहे. याचाच अर्थ प्राप्तकर्म करतांनाच मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरण स्वभावानुसार, मनःशक्तीचा विकास करण्याचा अभ्यास करणे, जीवात्म्याला आवश्यक आहे. येथेच निर्णयाची पात्रता जशी जीवात्म्याच्या हातात आहे; तसे प्रयत्न करणेही जीवात्म्याच्या स्वाधीन आहे. अंशात्म्याचे परमात्मस्वरूप सिद्ध करण्याएवढे प्रयत्न, जीवात्मा करू शकतो. 'प्रयत्नांती परमेश्वर' किंवा 'अगर नर करणी करे तो नर का नारायण बन जाय' अशी बोधवाक्ये नैतिकविश्वातील धुरिणांनी त्यासाठीच प्रसृत केलेली असतात.

मानवी जीवात्म्याच्या वेगळेपणानुसार, मानवनिर्मित नैतिकविश्वात, प्राप्त जन्म कोठेही, कोणत्याही प्रकारे प्राप्त झाला असला; तरी निर्णयपात्रता, प्रयत्नपात्रता, स्वसंवेद्यस्फुरणात्मकता यांचे सामर्थ्य जीवात्म्याला प्राप्त आहे. प्राप्त जन्मानुसार प्राप्त परिस्थितीत प्राप्त कर्म करणे; हे क्रमप्राप्त असले तरी अभ्यासानुसार प्राप्त स्वतंत्र सामर्थ्याच्या सहाय्याने, कांक्षित ध्येयाप्रत जाण्याची क्षमता, जीवात्मा प्राप्त करू शकतो. प्राप्त कर्माला, त्याच सामर्थ्याने, त्या त्या स्तरावर जीवात्मा अवलंबू शकतो. मात्र कर्म कर्मस्वरूप राहायला हवे. त्याचे काम, कष्ट, क्लेश यात रूपांतर होता कामा नये.

प्राप्त जन्म आणि प्राप्त कर्म नैतिकविश्वात कोणत्याही स्तरावरील असले तरी, क्रमाक्रमाने वा गरुडभरारीने, आकांक्षा, उद्दिष्ट, ध्येय कोणतेही ठेवणे, यात काहीही गैर नाही. उलटपक्षी, दैवगत्याएवढे सामर्थ्य प्राप्त असतांना; प्राप्त जन्मानुसार, प्राप्त कर्म करीत राहाण्यात धन्यता मानणे; हा आत्मांशस्वरूप अस्तित्वाच्या संबंधाने गुन्हा आहे. ज्ञान, कर्म आणि कर्तृत्व हे स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेचे त्रिविध सामर्थ्य आहे. हे करत असतांना, नैतिकविश्वात जीवदशेने जगत असतांना, जीवबद्ध अशा अष्टधाप्रकृतीने प्राप्त, पृथक जीवभावाला, नेमके कोणते वळण

द्यायचे; वासनादेहाधीन होऊन की आत्मांशस्वरूपाने; याचा निर्णय घेणे हेही माणसाच्या हाती आहे. वासनादेहाधीन होऊन प्रयत्न करू लागले; की असूया, स्पर्धा, द्वंद्व, कुटीलता, शोषकता, भ्रष्टपण सोपा वाटणारा मार्ग, इ. म्हणजे, आसूरी गुण संपदा जागृत होऊन; पाखांडपण जोडले जाते. यामार्गे जीवात्मा सर्वसत्ताधीशही होऊ शकतो. तो विश्वशास्ता विश्वभोक्ता होऊ शकतो, परंतु आत्मांशस्वरूपाला पारखे झाल्याने, भोग भोगण्याची, वासना देहाला तृप्ती कधीच प्राप्त होऊ शकत नाही. हे अध्यात्मिक नव्हे; तर भौतिक जैविक सत्य आहे! आत्मांशस्वरूप होऊन, कांक्षापूर्तीचा मार्ग खडतर असला; तरी तो परिपूर्तीपर्यंत पोचतांना, प्रत्येक पायरीवर परमानंदाचा आनंद देत; शिखरापर्यंत जाण्यास प्रोत्साहित करतो. अशी पुरुषार्थपूर्ण, सत्यनिष्ठ, ज्ञानवानकर्मशील, मानवी जीवात्म्यांची उदाहरणे, विश्वाच्या इतिहासात, सर्व स्तरावर मिळतात. निर्णय, कर्म, प्रयत्न, यांची पात्रता स्वसंवेद्य स्फुरणात्मक मनोस्वरूपाने वापरावी ह्याचाही निर्णय आपल्याच हाती आहे.

जन्मकर्म मीमांसेच्या संदर्भात नकारात्मक जीवात्मभाव प्रकटण्याची शक्यता असते. सारेच, उदय, आलय, विलय या क्रमाने नश्वरच आहे. मग जन्म, जीवन आणि कर्म हा खटाटोपच कशाला? हा विचार मानवी जीवात्म्याच्या ठिकाणी येणे; म्हणजे खरी आत्महत्या असते! हा विचार करणारी माणसे, एकतर स्वैर भोक्ते होतात, नाहीतर निःसहाय दुःखी जीवन मरेपर्यंत जगतात. यांसाठीच नैतिकविश्वात मानवाने गुरुपरंपरा निर्माण केली आहे. नकारात्मकता म्हणजे निवृत्ती किंवा मुक्ती नव्हे. ज्ञानवान कर्म करीत, ठायीच सत्य, परिपूर्ण अस्तित्वाचा अनुभव घेत, अस्तित्व भोगणे; म्हणजे जीवन होय! 'योग कर्मसु कौशलम्' असे सूत्र त्यासाठीच आहे. ज्ञानात्मकतेने कर्मवान घडविणे आणि कर्मज्ञानवानतेने घडणे हेच, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, अविनाशी, महाशून्य, श्रीकृष्ण, कैवल्य, सच्चिदानंदस्वरूप, परब्रह्म परमात्मस्वरूपाची, नित्य स्वसंवेद्य स्फुरणात्मक अवस्था, ठायीच याचिदेही याचिडोळा भोगणे होय!

●●●

# ९. परब्रह्माचे परिपूर्ण प्राकट्य

मानव हे परब्रह्माचे परिपूर्ण प्राकट्य आहे. त्याचे अस्तित्व हे स्वभावतः सच्चिदानंदस्वरूप आहे. असे त्याचे अस्तित्व, मानवी मनोस्वरूपाने रचलेल्या किंवा अर्जित केलेल्या नैतिकविश्वात, मानवाने परिवर्तनशील, सुविहिततेने नियोजित केले आहे. ही स्वअर्जित बद्धता माणसाच्या, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, आत्मस्वरूप, परिपूर्णतेचे द्योतक आहे. त्याने रचलेल्या, नैतिकविश्वातील, त्याच्या बद्धतेने, मानवाच्या जीवात्मस्वरूप अवस्थेला, सर्वव्यापक अस्तित्वांपेक्षा आगळे आणि श्रेष्ठ असे जीवनकर्मशैलीचे परिमाण दिले आहे. या कर्मशैलीत, मानवाचे, सच्चिदानंदस्वरूप, जीवन सत्य सामावले आहे.

असे परिपूर्ण सच्चिदानंदस्वरूप अस्तित्व, मानवाला जीवात्मभावासह, अनुभवता येते. मात्र स्वनिर्मित अशा, या आनंदमय किंवा निखळ सौंदर्यात्मक अस्तित्वाचा, परिपूर्ण अनुभव भोगण्यासाठी, मानवाला अंतरबाह्य संघर्षाला सामोरे जावे लागते. स्वतःच स्वतःचा वैरी होऊन; मानव स्वतःच, स्वनिर्मित, आनंदमयी अस्तित्वानुभूतीला, पारखा होतो. मानवी जीवन दुःखी, अपूर्ण, अज्ञानवश, विफल आहे; असे मानवाला अनुभूत होऊ लागते. हे जीवन, त्रितापांनी भरलेले भोगणे आहे, असे मानवाला वाटू लागते. जीवन निरर्थक आहे, दुःखी आहे; कोणीतरी वर अस्तित्वात असलेल्या, प्रभुसत्तेच्या अवकृपेने, आपल्या संचिताला, न्याय देण्याच्या प्रक्रियेतून ही अवस्था झाली आहे. वाट्याला आलेले भोग भोगायचे. त्याच्या कृपेनेच आपण तरुन जाऊ असा नकारात्मक भाव, माणसाचे जीवनच व्यापून टाकतो. त्यातच जन्ममृत्यूच्या अनुभूतीतून, नश्वरतेची, मिथ्या किंवा आभासी जीवन अस्तित्वाची, त्याची खात्री पटते. यामुळे त्यानेच निर्माण केलेली, नैतिकविश्वातील, कर्मशैली झुगारून; बंधमुक्त पणे, वर्तनकरण्याच्या आधीन होऊन; तो अधिक विफल होतो. काही वेळा भ्रामक जीवनासक्तीने, स्वार्थांध होऊन;

स्वसत्तेने सारे घडावे, चालावे, असा हव्यास धरतो. तात्कालिक सत्तास्पर्धा, यशापयश यांच्या चक्रात स्वतःला अशांत करून; तो अधिकाधिक अतृप्त दुःखी होतो. कधी स्वरचित नैतिकविश्वाची; आसक्ती किंवा भ्रामक अथवा छद्म सर्वकल्याण साधण्याचा आव आणून; वाटेल तशी तोडफोड करण्याचा प्रयत्न तो करतो. विज्ञानवश मानवी सामर्थ्याने, सर्वसत्ताधीश होण्यासाठी, शोषक होऊन, अखिल मानवजातीचे जीवन, अशांत करण्याचा दुर्विलास करू लागतो. काही वेळा या प्राप्त जीवनात, जन्ममृत्यू या विषयी निर्णय घेणे हाती नाही; या अनुभूतीने, प्राप्त जीवनाविषयी तो दैववादी होतो. मानवेतर प्राणी पातळीवर जाऊन व्यवहार करू लागतो. जीवन अपरिहार्य दुःखाने भरले आहे. ही सर्व माया आहे. म्हणून सर्वसंगपरित्याग करून; विजनवास पत्करतो. अशा प्रकारच्या अज्ञानवश अनुभूतींनी निराश, निस्सहाय, निरुपायी झालेला मानव आत्मघाताला, छद्मसत्तेला, फसव्या आनंदाला, शरण जाऊन; स्वतःतील परिपूर्ण, सत्य मनोस्वरूपाला, व त्यातील सामर्थ्याला स्वतःच वंचित होतो. मात्र अशा प्रकारची दुःखदायक अवस्था निवारण करणे सहज शक्य असते. यासंबंधी विवेक जागृत करण्याचे कार्यही, नैतिकविश्वातील धुरिण, करीत असतात, तसेच जगराहाटी किंवा लोकसारणीतील, परंपरातून यासाठी प्रेरणा प्राप्त होऊन; या दुःखमयतेचे निवारण होते.

उपजत, समूहशील, जीवात्मस्वरूप प्रकटलेला मानव; अंशात्मस्वरूप आणि अंशात्मपुंजसमूहस्वरूप अनुभवत असते. अर्थात व्यष्टी आणि समष्टी स्वरूपात अस्तित्वात असतो. या दोन्ही स्तरावर, त्याचे आत्मरूप अर्थात मनोस्वरूप कार्यरत असते. या मनोस्वरूपाने, स्वसंवेद्य स्फुरण सामर्थ्याने, नैतिकविश्व निर्माण केले आहे. या नैतिकविश्वाची बद्धता माणसाने व्यष्टी आणि समष्टी या दोन्ही स्तरावर स्वीकारली आहे. परमात्मस्वरूपाच्या सार्वकालिक सर्वव्यापक स्वसंवेद्य स्फुरणस्वरूप, मनोरूपाच्या योगाने, परमात्म्यांतर्गतच हा परमात्मा बहुरूपांनी नटण्याच्या प्रक्रियेत; माणूस जेव्हाकेव्हा प्रकट झाला असेल; त्या क्षणापासून; त्याच्या परमात्मअंशस्वरूपाने, अंशात्मक आणि अंशपुंजात्मक असलेल्या मानवी अस्तित्वाने, स्वसंवेद्य स्फुरणाचे, आपले परमात्मस्वरूप, सामर्थ्य, मनोस्वरूपाने, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, जाणले आहे. यातूनच त्याने नैतिकविश्व निर्मितीचा प्रारंभ केला आहे.

नैतिकविश्वनिर्मिती प्रक्रिया, हे मानवी अस्तित्वाच्या, परिपूर्ण परमात्मस्वरूप सामर्थ्याचे, द्योतक आहे. या नैतिकविश्वातील मांडणीचा अर्थात सांस्कृतिक

सामाजिक आदि प्रकारच्या, मानवी संबंध आणि मानवी संसाधन स्वरूप, प्रणालींचा अनुसार, मानवाला करणे अनिवार्य झाले. या नैतिकविश्वातील प्रणालीनुसार, मानवाच्या कर्मशीलतेला परिमाण मिळाले. या नैतिकविश्वातील अपरिहार्य प्रचलनाने, मानव नैसर्गिक आणि नैतिक बद्धतेत, एवढा बद्ध झाला की; त्याला स्वतःतील परमात्मस्वरूप अशा जीवात्मस्वरूपाचा विसर पडू लागला. त्याच्या मनोस्वरूपाला, या बद्धतेने बाधित केले. या बाधित अवस्थेच्या विळख्यात, आंतरबाह्य संघर्षाला एवढे उधाण आले की; त्याचे प्राप्त बद्ध जीवन, आत्मरूपापासून विचलित होऊन; त्रस्त झाले. याचेच वर्णन 'त्रितापबद्ध' असे केले जाऊ लागले. यातून कर्मविषयक भ्रामकता, विचलन, अपकर्मकारकता, दुष्कर्मकारकता, कर्मत्याज्यता, अकर्मकता, कर्मभ्रष्टता, अशा कर्मविषयक अवस्था, माणसाच्या ठायी दृढावू लागल्या. नैतिकविश्वातील धर्मकर्ममीमांसा, पाखंडपणात अडकण्याची, शक्यता बळावली. पाखंडी वर्तनाने, भ्रामक प्रतिष्ठा, नैतिकविश्वांतर्गत दिसू लागली. मानवी जीवनाला, आत्मस्वरूपापासून पारखे होऊन; अज्ञान, दास्य, लाचारी, स्वार्थांधता, शोषकता, सत्तांधता, यांनी ग्रासले. दंभाचार, अनाचार, भ्रष्टाचार यांनी मायाबाजार मांडला. मानवाला झालेल्या; परमात्मस्वरूप परिपूर्णतेच्या ज्ञानात्मक, स्वसंवेद्य स्फुरक, मनोस्वरूपाच्या जाणिवेला, माणूस स्वतःच; नैतिकविश्वातील बद्धतेने, पारखा होण्याचा प्रसंग ओढवला. माणसाला अर्जित संचित ज्ञानदेखील भ्रामक वाटण्याचा संभव बळावला.

परिपूर्ण आत्मस्वरूप, मनोस्वरूपाची स्वसंवेद्य स्फुरकता, या जीवात्मस्वरूपातील, स्वभाविक जाणिवेने, कर्मवान असलेले मानव, धुरिणत्वाने, अज्ञानवशत्वाचा विनाश करण्यासाठी, सनातनपणे, सत्संग मांडत आहेत. अशा धुरिण मानवांनी, ज्ञान आणि विज्ञान साधनेसह, समूपदेशनाचे कार्य सातत्याने सुरू ठेवले आहे. असंख्य गुरुकुले, ज्ञानपरंपरा, वैज्ञानिक परंपरा, संप्रदाय, मार्ग, यांच्या माध्यमातून; प्रसारमाध्यमे आणि प्रत्यक्ष गुरु-शिष्य परंपरा, यांच्या सहाय्याने; भटकलेल्या, वंचित झालेल्या, अज्ञानवश झालेल्या, मानवी मनोस्वरूपातील, स्वात्मनिष्ठा जागृत करण्याचे अथक प्रयत्न या धुरिणांनी सुरू ठेवले आहेत. स्वभावतः समूहशील मानवांच्या समूहांमध्ये; ही परंपरा तेवढीच अपरिहार्य असते. किंबहुना समूहजीवनाच्या, स्वसंवेद्यस्फुरणशील, संघमनोस्वरूपाचा, तो व्यवच्छेदक असतो.

जीवात्म्याच्या ठायी विचलता, संघर्ष, ह्या गोष्टी अपरिहार्य आहेत किंवा

कसे? या गोष्टी स्वाभाविक आहेत काय? बद्धतेचा हा व असा परिणाम मुळातील अखिल जीवात्म प्रवृत्तीने घडतो किंवा कसे? या प्रश्नांची उत्तरे; मानवाच्या, वैयक्तिक आणि सामूहिक जीवनातील, शारीरिक आणि मानसिक, स्थितीगतीच्या विचारातून मिळतात. अर्थात, हा विचार, एकाचवेळी व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर करावा लागतो.

मानव हा एक जीवात्मा आहे. जीवात्म्यांचे आहार, निद्रा, मैथून आणि भय हे विकार, मानवाच्या ठायी स्वभावतःच आहेत. समूहशीलतेमुळे, या विकारांची अनिवार्यता, मानव हा समूहाचा अंश म्हणून भोगत असतो. आहार, निद्रा आणि भय हे तीनही विकार एकूण मानवाच्या ठायी आहेतच. मैथून या विकाराचा थोडा वेगळा विचार, नर आणि नारी या संबंधाने करावा लागतो. नरसमूह आणि नारीसमूह यांच्या, समूहसापेक्षतेने, वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर, हा विचार अनिवार्य आहे. नर व नारी, ही दोन्ही मानवी जीवात्म अस्तित्वे, स्वसंवेद्यस्फुरणस्वरूप, मनोस्वरूपानेच अस्तित्वात असतात.

मैथूनभाव अर्थात कामवासना ही जीवात्म्याची सहजप्रवृत्ती आहे. या संदर्भातही, मानवाचे देहिक वेगळेपण लक्षात घ्यावे लागते. मानवेतर जीवसृष्टीत, फलनभावना, कामवासना, विशिष्ट ऋतु किंवा काळाने मर्यादित केलेली आहे. माणसाच्या बाबतीत निश्चित ऋतुकाल मर्यादित नाही. स्त्री ऋतुस्नात झाल्यापासून; ऋतुविलय होईपर्यंत; प्रजनन प्रक्रियेतील काही काळ वगळता, अखंड असा फलनकाल अनुभवास येतो. नारीच्या बाबतीत, ही नित्यता, काही अंशी मर्यादित वाटली; तरी कामप्रवृत्ती नित्य आहे. नराच्या बाबतीत तर शारीरिक परिपूर्ण दशा प्राप्त झाल्यापासून; मृत्यूपर्यंत, कामप्रवृत्ती अबाधितपणे कार्यान्वित असते. मानसशास्त्रज्ञांनी, ही कामकाल मर्यादा, संपूर्ण जीवनव्यापी आहे, असे संशोधित केले आहे. व्यक्तिगत पातळीवर असलेली कामवासना, मानवी समूहात, स्वैरपणे संचारित होते याचा अनुभव येतो. स्त्री–पुरुष संबंधांच्या या स्वैरभावामुळे, मानवी जीवात्म्यांना मानवेतर प्राण्यांप्रमाणे 'सक्षम तो श्रेष्ठ', या भावाने वागण्यास उद्युक्त केले. नरदेहात, सहज संचारित होणारे हे पशूत्व, माणसाने, सर्वाभूती, परमात्मभावाने मर्यादित, नियमित करून सर्व मानवांना सुरक्षित, सुस्थित जीवन लाभासाठी; नर–नारी आणि मानवी समूह यांचे, मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणाने, नैतिकविश्वांतर्गत, सुव्यवस्थापन करण्याचा प्रयत्न केला. नैतिकविश्वाच्या उन्नयन विचाराने सत्कर्मयोगकारक असे पतिव्रता, पत्नीव्रता, असे कल्प मांडले. मुळात विवाहसंस्थेचे

मंडन केले. विवाहसंस्थेला, जननप्रक्रियाशास्त्राचे मंडन करून; अधिक सुविहित करण्यासाठी, वर्ण आणि गोत्र विचार, ज्योतिर्विज्ञान, यांच्या आधाराने विवाहसंस्था, भक्कम पायावर उभी केलेली दिसते. जगभरात अगदी लहानातलहान, मानवी समूहातही, 'विवाह जुळवणे' यांसाठी, असे संकेत दिसतात. विवाहसंस्था निर्माण केल्याने, मानवाने, एकूणच मानवी जीवनाच्या, नैतिकविश्वाला भक्कम पायावर उभे केले. असे असले तरी; कामभावनेची स्वैरता उसळी मारतांना दिसते. मानवाने कुटुंबसंस्थेची उभारणी करून ही भावना अधिक मर्यादित व कल्याणकारी किंवा सुरक्षित व सुखावह करण्याचा विचार केला. नैतिकविश्वाच्या मांडणीत विवाहसंस्थेचा इतिहास गुढ, गुंतागुंतीचा, सत्तानुगामी, आणि ढोबळपणे व प्रसंगोपात्त, समायोजन करतांना दिसला; तरी नैतिकविश्व नियंत्रित करून; कुटुंबसंस्था विवाहसंस्था, स्थिर करणारा आहे. मात्र यामुळे मानवी जीवात्म्याला आलेल्या मानवनिर्मित, बद्धतेमुळे अंतरबाह्य उग्र संघर्षालाही वाव मिळाला आहे. मानवी इतिहासाचा मागोवा घेतला तर, कुटुंबसंस्था आणि विवाहसंस्था यांच्या निमित्ताने, मोठेमोठे ऐतिहासिक व सांस्कृतिक संघर्ष घडले आहेत. नर-नारी विवाहसंबंधातील जुळणीमुळे, कामाकर्षण, आवड आणि निवड यामुळे, व्यक्तिगत आणि सामूहिक स्तरावर घडलेले संघर्षही, मोठे विनाशकारी आणि मानवाच्या आत्मस्वरूप परिपूर्ण अस्तित्वभावाला बाधित करणारे ठरले आहेत. मानवनिर्मित नैतिकविश्वावरही, या संघर्षाचे परिणाम झाले आहेत. पुरुषप्रधानता आणि स्त्रीप्रधानता अशा जीवनसारणी भेदांनाही, या संघर्षाने पोसले आहे. स्वसंवेदित स्फुरणप्रक्रियेच्या, नित्य परिवर्तन प्रक्रियेतही, या संघर्षामुळे, मानसिक आणि शारीरिक स्वरूपात, मनोस्वरूपाच्या शक्तीने, मनोनीत परिणाम घडविले. उदा. लिंगपरिवर्तन, लिंगनिरोध, कायापरिवर्तन इ. मैथून विकाराने मानवी जीवात्म्यांच्या जन्मपूर्व आणि मरणोत्तर जीवनाविषयीही; संघर्षात्मक संवेदना निर्माण केल्या आहेत.

आहार या विकाराचा, जीवात्म्याच्या समग्र विहार प्रक्रियेवर अर्थात मानसिक, शारीरिक, भौतिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक नैतिक, तात्त्विक, कृषीविषयक आदि सर्व क्षेत्रांवर, परिणाम जाणवतो. नैतिकविश्वातील परिमाणे, स्तर, सत्तास्थाने, कुटुंबव्यवस्था, ज्ञातीव्यवस्था, प्रादेशिक प्रणाली आदि सर्व संदर्भात परिणाम पाहावयास मिळतो. सद्-चिद्-आनंदस्वरूप, परमात्म्याच्या जीवात्मा स्वरूपाने, सृष्टीतील समत्वाचा आणि व्यवस्थापनाचा विचार करून; मिश्रआहार, मांसाहार, शाकाहार, अशा आहारप्रणाली, नैतिकविश्वात निर्माण

केल्या आहेत. मानवी जीवात्म्याच्या, गुणात्मक अस्तित्वाशी, आहाराचा संबंध विचारात घेऊन; ऋतुचक्राशी निगडित असे आहाराचे नियोजन केले आहे. हे सर्व करीत असतांनाही, मानवी समूहजीवनात, आहारविकारवशतेचा परिणाम, राजकीय सत्ता, उद्योगव्यवसाय, कृषीजीवन यासह सर्व क्षेत्रात; अर्थसत्ता आणि अर्थविनिमय या दृष्टीने अधिक झाला आहे. इतिहासाचा मागोवा घेतला तर; साम्राज्यवाद, विस्तारवाद, प्रभुसत्तावाद, भांडवलदारी अर्थव्यवस्था; अशा गोष्टींना नैतिकविश्वात स्थान प्राप्त होऊन; मानवी जीवात्म्यांच्या समूहजीवनात, शोषक आणि शोषित असे वर्ग निर्माण झाले आहेत. यांचा परिणाम, विवाह व स्त्री-पुरुष संबंधावर, अर्थात मैथून विकारावर झाला आहे. आहार सुलभीकरण, आहार सुव्यवस्था, आहार नियोजन, यांसाठी, संचयप्रवृत्ती बळावली. संचय ही मूलभूत प्रवृत्ती असल्याचे, छद्‌ममनो वैज्ञानिक परिमाण निर्माण झाले. जीवात्मा स्वार्थांध झाला आहे.

भूक ह्या विकाराच्या तीव्रतेने, अतृप्ततेने आणि अनिवार्यतेने, मानवी समूहव्यवस्थेत, मानसिक आणि शारीरिक लाचारी, दास्यत्व स्वीकार आणि भोगकारकता, अशा परस्पर विरोधपूरक गोष्टी बळावल्या आहेत. 'जीवो जीवस्य जीवनम्' हे जीवनसूत्र मानवी जीवात्म समूहात, अंतरिक संघर्ष घडवू लागले. इतिहासाची असंख्य पाने याची साक्ष देत आहेत. राजसत्ता, अर्थसत्ता, धर्मसत्ता, उद्योगव्यवहार, कृषीजीवन, सामाजिक व्यवहार, सांस्कृतिक धारणा; या सर्वांवर, दांभिक, पाखंडी आणि भ्रष्ट प्रणालींचे वर्चस्व जाणवू लागले. या, मूलभूत, मानवी, आत्मस्वरूपमनोरूपाने स्वसंवेद्य स्फुरणप्रक्रियेतून, मांडलेल्या नैतिकविश्वात; मानवाच्याच मनोस्वरूपाला, बाधित केले. त्यातून मानवी मनोस्वरूपाच्या, स्फुरणप्रक्रिया घडविणाऱ्या शक्तीला, बद्धतेचे, विपरित वळण लागले. नैतिकविश्वातील जीवात्मसमुदायाच्या जीवनशैलीवर बद्धतेची अनेक परिमाणे, सच्चिदानंद स्वरूप, आत्मरूपाला बाधित करण्यास ठायीच, जीवभावाने सरसावली आहेत. या सर्व परिवर्तन प्रक्रियाप्रवाहाला, नेटके, सम्यक, वळण लावण्याचे कार्यही, मानवी जीवात्म स्वरूपातील, परिपूर्ण, सच्चिदानंदस्वरूप, परमात्मस्वरूपाची, जाणीव झालेली, मनोस्वरूपे, अर्थात धुरिण करीतच आहेत. असे असले तरी; विकारवश जीवात्मे, स्वस्वरूपाला पारखे होऊन; अज्ञानवश, स्वार्थांध होऊन, अतृप्ततेच्या भोगवर्धिष्णू, वासनाजीवनात गुरफटत जाऊन; जीवन दुःखकारक करीत जगतच आहेत. त्यामुळेच, आहार विकाराने, मैथून विकाराप्रमाणेच,

मानवी नैतिकविश्वात, भौतिक, मानसिक आणि शारीरिक संघर्षही, जीवनाच्या सर्व क्षेत्रात निर्माण केला आहे. जीवात्म्यांच्या ठिकाणी, आत्मस्वरूपाचा स्वसंवेद्य स्फुरणात्मक, मनोस्वरूपाचा, स्वतःच्या ठिकाणी, बाधित आणि अबाधित संवेदनांचा टकराव, आत्मिक संघर्ष घडवीत असतो. या संघर्षाचा परिणाम, जीवात्म्याचे, परिपूर्ण सत्य, सर्वात्म अस्तित्व, यांविषयी, संभ्रम निर्माण करण्यात होतो. नैतिकविश्वात, तात्कालिक, सुखलोलुपतेच्या आभासी कल्पनांना, उधाण येते. वैभव, श्रीमंती, सत्ता, यांविषयी भ्रामक कल्पनांना जीवात्मा कवटाळतो. जीवनाचे तात्कालिकत्व विसरून, भ्रामकशाश्वत मूल्यांची, निर्मिती आणि उभारणी करीत; अभिनिवेशात्मक पाखंड करू लागतो. परंपरा, प्रतिष्ठा, श्रेष्ठता, यांच्या भ्रामक, अंध, कल्पनांना शाश्वत सत्य मानून; स्वतःच्या प्राप्तकर्माविषयी, पाखंडीपणाने, अभिनिवेश बाळगतो किंवा या विपरित, कर्मच्यूत होतो. समत्व दृष्टीने, कर्म करण्याची स्वसंवेद्यता हरवून बसतो. याचाही परिणाम अतृप्तता, क्लेश, दुःखकारकता, निराशा आदि नकारात्मक संवेदना, वाढविण्यावर होतो. या बद्धतेचा परिणाम, जननप्रक्रियेवर, जन्मपूर्व आणि मरणोत्तर अस्तित्वावर होतो. या सर्व अवस्थेचे मुख्य कारणही, माणसाला लाभलेले वेगळेपण हेच असते. स्वतःतील, सत्य, परिपूर्ण, आत्मस्वरूप अशा मनोस्वरूपाचे स्वसंवेद्यस्फुरण, जीवाच्या ठिकाणी बाधित होऊ न देण्याचा अभ्यास करण्याची क्षमता, मानवी जीवात्म्याच्या ठिकाणी असूनही; आपल्या, पृथक, प्राणीस्वरूप, जीवात्मा व जीवभावाने स्वतःच, स्वतःला बाधित करतो. जीवाचे पृथकत्व न सांडता, सर्वात्मक स्वसंवेद्यस्फुरणात्मक, सच्चिदानंदस्वरूप, आत्मरूपाचे, अर्थात मनोस्वरूपाला, अबाधित राखण्यातच खरे श्रेय असते. मानवी जीवात्म्याचे, सत्य परिपूर्ण, नित्य, अविनाशी आनंदस्वरूप, ठायीच अबाधित राखण्याचा निग्रह, अभ्यास आणि अनुभव, मानवी जीवात्मा, करू शकतो. हे त्याचे वेगळेपण लक्षात घेऊन; जीवात्म्याने कर्मशील होणे अपेक्षित असते. मानवी जीवन प्रवासात, समूहजीवनातील, लोकधुरिणांनी, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, मनोस्वरूपाच्या, योगाने अभ्यास, तप, यांसह, ज्ञानविद्यानायुक्त, नैतिकविश्वाचे, मंडण करण्याचा दीर्घोद्योग सुरू ठेवला आहे. मानवी अस्तित्वांनी, आपल्यातील वेगळेपणाने, आहार, मैथून अशा जीवभाव विकारावर, मनोस्वरूपाने मात करणे, ही मानवी जीवात्म्याची, स्वाभाविक, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, आत्मस्वरूप, मनोस्वरूपता आहे.

मैथून आणि आहार, यांची आवश्यक तृप्ती व्हावी, अशी जीवात्म्यांची

उपजत गरज असते. ती पूर्ण होईल की नाही; याविषयी, जीवसृष्टीतील ‘जीवो जीवस्य जीवनम्’ आणि ‘श्रेष्ठ तो सत्ताधीश’, या सूत्रांमुळे जीवात्म्याच्या ठिकाणी भय हा विकार निर्माण होतो. हा, जीवात्मविश्वातील बद्धतेतून निष्पन्न विकार, मानवनिर्मित नैतिकविश्वात राहू नये; अशी मांडणी धुरिणांनी, स्वसंवेद्य स्फुरणात्मक मनोस्वरूपाच्या सामूहिक जाणिवेतून केलेली असते. परंतु उपरोक्त, मैथून आणि आहारविषयक संवेदनांमुळे, उलटेच घडते. भय वाढते. या भयापोटीच मैथून आणि आहार तृप्तीसाठी, प्रचलित प्रणालीमध्ये, अज्ञान, दास्य, लाचारी, नैराश्य यांसह, भयात्मक अवस्थेची परमावधी घडते. यामुळे ठायीच असलेल्या, सत्य, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, आत्मस्वरूप मनोस्वरूपालाच, मानवी जीवात्मा पारखा होतो. निर्भयतेने, स्वकर्म करण्याची, त्याची शारीरिक आणि मानसिक क्षमताच हरवते. या प्रक्रियेचा परिणामही, मानवी जीवन प्रवाहातील, जन्मपूर्व आणि मरणोत्तर जीवनावर होतो. निर्भयतेसाठी, सर्वक्षेत्रात सर्वस्तरावर, समुपदेशन आणि सामूहिक सुरक्षितेची जाणीव आवश्यक असते. ऋषींनी ध्यानयोग, राजयोग किंवा ज्ञानयोगाची मांडणी; धर्म, नीती, तत्त्वज्ञान, वैद्यक, जोतिर्विज्ञान आदि शास्त्रांची मांडणी याचसाठी केली आहे.

निद्रा हा विकार, मानसिक आणि शारीरिक निकोपतेसाठी स्वाभाविक आणि अत्यावश्यक आहे. मैथून, आहार आणि भय या तीनही, विकारांचा परिणाम निद्रा या विकारावर होतो. त्यामुळे, मानसिक व शारीरिक संतुलन बिघडते. विविध प्रकारचे शारीरिक व मानसिक रोग जडतात. अशांतता, अतृप्तता व भय वाढत जाते. याचा परिणाम प्रजनन प्रक्रियेवर व मृत्यूवर होतो. जन्मपूर्व व मरणोत्तर जीवनांच्या अवस्थांना, निद्रानाश, अतिनिद्रा, अस्वस्थनिद्रा, अपूर्णनिद्रा असे विकार कारणीभूत ठरतात.

एकूण आहार, निद्रा, भय आणि मैथून, या चारही विकारांची, जीवात्म्याच्या ठिकाणी अपरिहार्यता आहे. हे लक्षात घेऊन, मानवी लोक जीवनातील, लोकधुरिणांनी, नैतिकविश्वाची निर्मिती केली आहे. ही नैतिकविश्वाची निर्मिती केली आहे. ही नैतिकविश्वाची निर्मिती मानवी जीवात्म्यांच्या आत्मांशपुंज मनोस्वरूपाने, अर्थात संघमनाने केलेली आहे. आत्मांशस्वरूप जीवात्म्याने, आपल्या ठायीच्या, आत्मस्वरूप मनोस्वरूपाच्या, स्वसंवेद्य स्फुरणात्मक प्रक्रियेच्या सहाय्याने सर्वात्मभावाने ही मांडणी केली आहे; हे लक्षात घ्यावे लागते. अशी नैतिकविश्वाची निर्मिती होत असताना; धुरिणांच्या गृहिकतांत; मानवी जीवात्म्यांची आणि पृथ्वी

या कक्षाबद्ध अस्तित्वासह, सर्वात्मक सार्वकालिक, सर्वव्यापी अस्तित्वाच्या ठायी, असलेल्या पंचमहाभूतात्मक आणि त्रिगुणात्मक अशी अष्टधाप्रकृती, अग्रभागी होती. त्याच प्रकृतीच्या संघटन, विघटन, विचलन, पुनर्संघटन, नित्यपरिवर्तन, अविनाशित्त्व आदि स्वाभाविक प्रक्रियांच्या सहाय्याने, मानवी जीवात्म्यांच्या, लोकजीवन सापेक्षपणे, नैतिकविश्वाची मांडणी करण्याची प्रक्रिया सुरू केली. म्हणूनच नैतिकविश्व हे मनःपूत असूनही ते पूर्णसत्य आहे. नैतिकविश्वाचे हे वास्तव स्वीकारून; प्राकृतिक वास्तवात, दोहींच्या परस्पर, अनिवार्य संबंध प्रक्रियेसह, मानवी जीवात्म्याला, कर्म करीत जगायचे असते. ही गोष्टही गृहितकांतील एक गृहितक होय. त्याचबरोबर प्रत्येक मानवी जीवात्मा, मर्त्य, तात्कालिक असे बद्ध अस्तित्व असले तरी; ते आत्मांशपुंजस्वरूप, मानवजातीचे, अंशात्म अस्तित्व असते. आत्मांशपुंज जीवात्मस्वरूप, अर्थात लोकजीवन हे सत्य, नित्य, अविनाशी, स्वसंवेद्यस्फुरक, परमात्मस्वरूप, मनोस्वरूप असते; हे अतिमहत्त्वाचे गृहितक, मानवी नैतिकविश्वनिर्मिती प्रक्रियेच्या, मुळाशी असते. म्हणूनच नैतिकविश्व, हे प्रत्येक मानवी जीवात्म्याच्या दृष्टीने, सत्य, नित्य, परिवर्तनशील, अविनाशी आणि सच्चिदानंदस्वरूपाची, आत्मानुभूती देणारे असते. प्रत्येक मानवी जीवात्मा हा त्याचा बद्ध, तात्कालिक भोक्ता असतो. त्याच्या जीवन जगण्यासाठी करावयाच्या कर्माला, या गृहितकांची परिमाणे अपरिहार्यपणे येऊन चिकटलेली असतात, असे सतत संवेदित होते.

मानवी जीवात्म्याची, ही व्यष्टी आणि समष्टी स्वरूपाची, वास्तविक अवस्था, मानवी मनोस्वरूपाला आरंभापासूनच संवेदित होत आहे. तीच त्याची स्वसंवेद्यता आहे; हे लक्षात घेऊन; धुरिणांनी नैतिकविश्वाची मांडणी, परोपरीने करण्याचा, सतत प्रयत्न केला आहे.

भारतीय परंपरेत ऋषींनी केलेले कार्य अतिशय मौलिक आहे. आज उपलब्ध जागतिक स्तरांवरील वाङ्मयातही, ऋषी निर्मित वाङ्मय, निर्विवादपणे अतिप्राचीन म्हणता येईल. या वाङ्मयाची मौखिक आणि लिखित स्वरूपातील परंपरा सनातन आहेत. या परंपरांना गुरुकुले आणि गुरुशिष्य परंपरांचा भक्कम आधार आहे. या वाङ्मयात, श्रुती, स्मृती, संहिता, उपनिषदे, पुराणे, उपवेद, वेदांगे, महाकाव्ये, कथावाङ्मय, काव्यनाटके, विविध दर्शने, मतप्रणाली या अशा वाङ्मयाचा समावेश होतो. सनातन धर्मपरंपरांतील धर्मसिंधु ब्रह्मसूत्रे, न्यायशास्त्रे, अर्थशास्त्रे यांचाही समावेश होतो. जैन व बौद्ध मतप्रणालीने, निर्मिलेले वाङ्मय,

यांत समाविष्ट आहे.

वैदिक वाङ्मयाचे, आधुनिक दृष्टीने, अवलोकन केले तर; हे सर्व वाङ्मय, आजच्या भौतिक, रसायन आणि जीवशास्त्रांवरील वाङ्मय आहे हे लक्षात येते. यज्ञसंस्थांचा प्रयोगसिद्धीसाठी उपयोग केला जात असे. पंचमहाभूते, पंचमहाभूतांचे विविध विभ्रम, स्वरूपे, आकार, अवस्था यांचा सूक्ष्मातिसूक्ष्म विचार यात केला आहे. या सर्वांना मानवसापेक्षतेने देवत्व बहाल केले आहे. हे करतांना ही सर्व अस्तित्वे सच्चिदानंदस्वरूप निर्गुण, निराकार, निर्विकार, सर्वकाल व सर्वव्यापक, अशा, परमात्म किंवा परब्रह्मस्वरूपांतर्गत, स्वसंवेद्य स्फुरणात्मक परिवर्तन प्रक्रियेंतर्गत, नित्य स्थित असली तरी; पृथ्वी कक्षेच्या बद्धतेत, नियमित, स्वसंवेद्य स्फुरण स्वरूपात; गती, उर्जा, द्रव्य, जल व आकाश अशा स्वरूपात आहेत; हे गृहितक स्वीकारले आहे. जड-चेतन जीव सृष्टीच्या आणि पंचमहाभूतांच्या प्रचलनाचा अन्योन्य संबंध, सत्व, रज, तम असा त्रिगुणात्मक आणि वात, पित्त, कफ अशा प्राकृतिक अवस्थेवर, अवलंबून असल्याचे आकलन करून; यज्ञसंस्था व गुरुकुले, यांतील ज्ञानार्जन व ज्ञानविनियोग, यांचे सुविहित नियमन करण्याचा सूक्ष्म विचार, अनुभवसंचिताच्या आधारे केला आहे. हा सर्व विचार मानवकेंद्रित आहे. असे असले तरी, जीवात्म्याच्या ठिकाणी आणि समस्त जड-चेतन रूपांच्या ठिकाणी, परमात्म्याच्या सर्व गुणांनी युक्त असे परिपूर्ण अस्तित्व, प्रत्येक रूपाच्या ठिकाणी, नित्य व अविनाशी स्वरूपात, अर्थात आत्मस्वरूप असे मनोस्वरूप असते, हे गृहित आहे. या सर्व गृहितकांची मांडणी, मानवी जीवात्म्यांच्या, समूहस्वरूपाच्या अनुभूती संचितांच्या आधारे, धुरिणांनी, अर्थात ऋषीपरंपरेने केली आहे. मानवी अस्तित्वाचे, पृथ्वीसापेक्ष अशा जीवात्म्यांच्या, असंख्य जातीप्रजातींतही, वेगळेपण सिद्ध होते, याचे आकलन, या अनुभूती संचितात आहे. लाखो वर्षांच्या मौखिक आणि त्याच प्रवाहात, लिखित परंपरांत, या समस्त आकलनाची मांडणी केलेली आहे. हे या सनातन ऋषीपरंपरेचे वैशिष्ट्य म्हणता येईल. या सर्व आकलनाच्या आधारे, मानवी जीवात्म्यांच्या, आत्मांशजपुंजसमूह स्वरूपाच्या, सापेक्षतेने सनातनपरंपरेत, मानवी नैतिकविश्वाची मांडणी केली आहे. जागतिक पातळीवर, क्रमाने, अनेक परंपरांनी याच स्वरूपात, प्रतिकात्मकतेने, नैतिकविश्वाची मांडणी केली आहे, असे म्हणता येईल. भारतीय परंपरेने चौदा विद्या चौसष्ट कला स्वरूपात, आकलित, अर्जित माहिती व ज्ञानपरंपरांची सुविहित मांडणी केली आहे. विद्या अर्थात शास्त्रे आणि कला यांच्या संख्येत, सतत वाढ होत जाऊन;

नैतिकविश्वाला, सूक्ष्मातिसूक्ष्मता आली आहे. या सर्व मांडणीत, शास्त्रे आणि साधने यांचा उत्तरोत्तर विकास, मानवी मनोस्वरूपाने, अनुभवसंचिताच्या, संशोधनाधारे केला आहे. ही प्रक्रिया अखंडपणे सुरू आहे. आधुनिक काळात ऋषी या शब्दांना गुणात्मकतेने अनेक नावे प्रचलित झाली आहे. जसे शास्त्र, तत्त्वज्ञ, चिंतक इ. मानवी समग्र नैतिकविश्वाची, परिवर्तनशील, प्रक्रियात्मक मांडणी सतत सुरू आहे. या प्रक्रियेने, मानवी जीवात्म्याच्या ठायी असलेली; सच्चिदानंदस्वरूपता, अर्थात परिपूर्णता आणि जीवनाची सत्यता, एकूण अस्तित्वाच्या, सापेक्षतेत सिद्ध झाली आहे. मानवी अवस्था, हे परब्रह्म्याचे, परिपूर्ण प्राकट्य आहे; हे या नैतिकविश्व निर्मितीतील, मानवाच्या; निर्मिती, विनियोग व पुनर्निमिती; या कर्मात्मक सामर्थ्याने, सिद्ध केले आहे. पृथ्वीवरील कक्षेतील आणि कक्षेबाहेरील दृश्यमान अस्तित्वे, सत्य, वास्तव, परिवर्तनशील, नित्य व अविनाशी आहेत. त्यांची उत्पत्ती, स्थिती, लय ही अवस्थांतरे, ही या नित्य अविनाशी सनातन प्रक्रियेतील एक प्रक्रियात्मक भाग आहे. याचे आकलन, मानवी जीवात्म्याला असल्याने; सर्व जीवात्म्यांच्या आणि सृष्टीच्या सर्व अस्तित्वांची, समदृष्टीने आणि जीवनकर्म नियमिततेच्या सापेक्षतेने, नैतिकविश्वाची केलेली मांडणी; मानवी जीवात्म्याला, त्याच्या जन्ममृत्यू फेऱ्यातही, स्वतःतील, परब्रह्मस्वरूप अशा केवल, सच्चिदानंदस्वरूपाची जीवनानुभूती देण्यास सक्षम आहे, असे हे नैतिकविश्व आहे. या नैतिकविश्वातून, अशी अनुभूती, नित्य अनुभवता यावी, यासाठी, या ऋषीपरंपरेने, संपूर्ण नैतिकविश्वाची, व त्या अंतर्गत सत्यनिष्ठकर्मपरतेची, मांडणी केली आहे. परब्रह्म, ब्रह्मांड, पृथ्वी, जीवात्मे, मानवी जीवात्मे, नैतिकविश्व, यांत मानवी जीवात्म्याला, बद्धतेने जीवन जगावे लागते. त्यात सत्कर्मयोगसिद्धीने, जगण्याचा अभ्यास केला; तर ठायीच, सच्चिदानंद परब्रह्म स्वरूपाचे प्राकट्य, साधकाला मनोस्वरूप भोगता येते. यासाठी 'जे जे भेटे भूत ते ते मानीजे भगवंत' अशी समत्व मनोभूमिका राखण्यासाठी व सत्यकर्मपरतेने जगतांना मानवी जीवात्म्याच्या अष्टधाप्रकृतीला, आपल्यातील ठायीच्या शक्तींचा, प्रकर्षक करता यावा, यासाठी, ऋषीपरंपरेने दैवतशास्त्रांची मांडणी करून; सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि भौतिक जीवनाला; सनातन धर्मसारणी बहाल करण्याचा दीर्घोद्योग केला.

मानव या जीवात्म्याचे ठिकाणी, सच्चिदानंदस्वरूप परब्रह्म, अनंत, श्रीकृष्ण, परमात्मा, अविनाशी, सर्वकाळ सर्वव्यापक, केवल, असे परिपूर्णत्व भोगण्याची क्षमता आहे. खरेतर, ते परमात्मतत्त्व सर्वच अस्तित्वांच्या ठायी आहे. मात्र

माणसाचे, अनन्यसाधारण, वेगळेपण, त्याच्या, या पूर्णत्व भोगण्याच्या क्षमतेत आहे. भारतीय ऋषीपरंपरेतील, 'सोऽहं', 'अहं ब्रह्मः अस्मी', 'तत्त्वमसी' अशा घोषणा, ह्या, ही क्षमता प्रदर्शित करणाऱ्या आहेत. मानवी जीवात्म्याच्या मनोस्वरूपात, 'परब्रह्माचे परिपूर्ण प्राकट्य' आहे; असे आपण, या क्षमतेच्या, अनुभूतींच्या, अनादि कालाच्या, संचितामुळे म्हणतो आहोत.

मानवी जीवात्म्याचे ठिकाणी, परब्रह्माचे परिपूर्ण प्राकट्य, अनुभव करणे, म्हणजे, वरील प्रकारच्या, बद्धअवस्थेतही, जीवनव्यवहारात, सच्चिदानंदस्वरूपाचा, अर्थात, निजतत्त्वाचा अनुभव घेणे होय. 'याचि देही याचि डोळा', 'परब्रह्माचा सुखसोहळा' अनुभवणे होय. जीवनव्यवहारात हा अनुभव घ्यायचा म्हणजे; वास्तव, भौतिक जीवन हेच पूर्ण सत्य आहे; हे वस्तुतः लक्षात घेऊन; सर्वात्मक जाणिवेने, व्यवहार करणे किंवा जीवन व्यतित करणे होय, आपण जीवन जगतो; म्हणजे नेमके काय करतो? जन्माला आल्यापासून, जीवात्म्याच्या, सर्व पातळीवरील बद्धतेसह, अधिकाधिक आनंददायक असे जगण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे आनंदलक्षी कर्म करतो. हे कर्म, आपण सर्वात्मक आहोत; या स्वसंवेद्यस्फुरक मनोस्वरूपाने करणे होय. अर्थात बद्धजीवात्म्याचे पृथकत्व, अन्य अस्तित्वांमध्ये, प्रदर्शित होत असतांना; बद्धजीवात्मा, व्यक्तिगत पातळीवर आणि समूहगत पातळीवर, पृथकत्वाच्या प्रतिष्ठेची सुरक्षितता, अन्य अस्तित्वांच्या संबंधाने, अनुभवण्यासाठी प्रयत्न करतो. मानवनिर्मित नैतिकविश्व आाणि प्रकृती, यांना सापेक्ष, व्यक्ती, कुटुंब, समूह, जाती, धर्म, गाव, प्रदेश, राष्ट्र, जगत या अग्रक्रमाने, स्वसंरक्षण व स्थैर्य या दृष्टीने, संघर्ष करतो. हा संघर्ष करतांना, आत्मसन्मान जपत, सहानुभूतीपूर्वक, संघर्ष साधावयाचा असतो. हा संघर्ष म्हणजेच अपरिहार्य जीवननिष्ठा होय. हा संघर्ष आत्मसन्मानपूर्वक करावयाचा, म्हणजे, निःस्वार्थ बुद्धीने, आत्मसंरक्षणात्मक कर्मव्यवहार करावयाचा. हाच सत्कर्मयोग साधणे होय. सर्वात्मभावाने कर्म करणे म्हणजे आत्मसन्मान आणि पृथकत्वाची प्रतिष्ठा सांडणे नव्हे; तर, केवळ आपमतलबी, स्वार्थपरता सांडणे होय. स्वतःच्या आनंदाबरोबरच इतरांच्या आनंदाचा विचार होय. अर्थातच, असे सत्कर्म साधण्यासाठी, शारीरिक आणि मानसिक स्वरूपातील, निकोप आणि निर्भयशील सामर्थ्याचे संपादन करणे आवश्यक असते. मानवी जीवात्म्यांना हे अभ्यासाने साधता येते. वर उल्लेखित, स्वपासून, जगतापर्यंतच्या, स्वत्वाचा अभिमान आणि संरक्षण सामर्थ्य जोपासणे, आवश्यक असते. असे करतांना स्वार्थवश किंवा तमोवश, शोषक वृत्ती बळावणार

नाही ना; याची काळजी घ्यायची असते.

नैतिकविश्वामध्ये जीवनव्यवहार करतांना, सुलभ, सत्वर आणि तात्काळ, आनंददायक व्यवहार साधण्यासाठी, मानवी मनोस्वरूपाने, साधने निर्माण करण्यासाठी वैज्ञानिक तत्त्वांचे उपयोजन केले आहे. या निर्मितीमुळे, नैसर्गिक साधनांकडे सहज दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. सत्कर्मयोग साधतांना, साधनांच्या उपयोजनाने, व्यक्तिगत आणि समूहगत पातळीवर अपंगत्व येत नाही ना; जीवात्म्यांचे स्वसंवेद्य स्फुरक, सर्वात्मभावात्मक संबंध, दुरावत नाहीत ना; याविषयीचा विवेक, मनशक्ती विनियोगात असावा लागतो.

त्रितापयुक्त जीवनाचा अनुभव, प्रत्येक जीवात्म्याचे ठिकाणी अपरिहार्य असतो. संयम, व्यवहार्यतः, साधनशुचिता, सहानुभूती, आत्मनिर्भवता, सेवा, सहकार्य, आदि प्रकारच्या मनोव्यापारांच्या सहाय्याने, या त्रितापांवर मात करता येते. आत्मनिर्भरता, भक्कम पायावर उभी राहावी, यांसाठी, आत्मरूपावर अर्थात प्राकृतिक आणि आत्मिक शक्तीसामर्थ्यावर, अपार श्रद्धा असणे आवश्यक असते. मानवी मनोरूपाने यांसाठी दैवतकथाशास्त्राची मांडणी केली आहे. उपासना, साधनापद्धती यांच्या सहयोगाने, व्यक्तिगत व समूहगत स्वरूपात, सामर्थ्य वाढविता येते. या सामर्थ्याने, व्यष्टीपासून समष्टीस्तरापर्यंतच्या, त्रितापांवर मात करता येते.

मानवी जीवनात, जीवन व्यवहारांतर्गत, स्थलकालपरिस्थितीसापेक्ष परिणाम अपरिहार्य असतो. नैतिकविश्वसापेक्षतेने, असा व्यवहार करतांना, जीवनव्यवहारात, अतृप्तता, असमाधान, कांक्षाविच्छेद, संकल्पविच्छेद, अशा गोष्टींनी विफलता येते. जीवात्मा, हा अष्टधाप्राकृतिक कोषात बद्ध मनोस्वरूप असतो. त्याचे हे पृथकत्व, हेच त्याचे तात्कालिक अस्तित्व असते. नैतिकविश्वाने, ते अधिक बद्ध असते. जन्मपूर्व आणि मरणोत्तर जीवन, या स्वरूपात, विफल जीवात्मे, मनोस्वरूप पृथकत्व जपण्याचा प्रयत्न करतात. विफलतेवर ते मात करून, पूर्ण सफलतेपर्यंत, त्याच बद्ध अवस्थेत, मनोस्वरूपाने प्रयत्नशील होतात. बद्धतेची परिपूर्ती झाल्यानंतरच, परिवर्तन प्रक्रियेसह, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेत, समाविष्ट होतात. किंवा मनोस्वरूपाने बद्ध स्वसंवेद्य स्फुरणासह, गुणात्मक स्वरूपात, तत्सम बद्धावस्था स्वीकारतात. ही प्रक्रिया बद्धजीवात्म स्थितीतही पूर्ण परब्रह्मस्वरूप, मनोस्वरूपाने, सच्चिदानंदस्वरूप अनुभवेपर्यंत, सुरू असते.

या सर्व चर्चेचा थोडक्यात आशय म्हणजे–

**“ॐ पूर्णमदः पूर्णमिदं, पूर्णात्पूर्ण मुदच्चते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।”**

या शांतीसूत्राप्रमाणे, मानवी जीवात्म्यास ठायीच पूर्णत्वाचा, सच्चिदानंदस्वरूप अनुभव भोगण्याचे सामर्थ्य असते. ते सामर्थ्य, त्याच्या ठिकाणी, आत्मस्वरूप, मनोस्वरूप असलेल्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक, शक्तीसामर्थ्य विवक्षित करून, भोगता येते. ठायीच सच्चिदानंद अनुभूती भोगता येते. स्वतः परब्रह्मस्वरूप होऊन; सार्वकालिक सर्वव्यापक, स्वसंवेद्य स्फुरणात्मक लीलेचा अनुभव, मनोस्वरूपाच्या प्रभुसत्तेने घेता येतो. मानवी जीवात्म्याच्या ठिकाणीच, परब्रह्माचे परिपूर्ण प्राकट्य आहे; याचे आत्मभान येणे, म्हणजेच परिपूर्ण प्राकट्याचा अनुभव होय.

●●●

# १०. मनोस्वरूपाचा शक्तीस्वरूप संबंध

मनःशक्तीचा विचार मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी असतो. स्वसंवेद्य स्फुरणात्मकता म्हणजे मनोस्वरूपता होय. मनोस्वरूपतेचा स्वरूपसंबंध आत्मस्वरूपाशी आहे. सद्-चिद्-आनंदस्वरूपाचा स्वरूपसंबंध आत्मस्वरूपाशी आहे. परमात्मस्वरूप ते मनोस्वरूप असा स्वरूपसंबंध, अनादिकालाच्या अनुभवसंचितातून दृष्ट झाला. 'अहं ब्रह्मः अस्मी!' अशी घोषणा द्रष्ट्या ऋषींच्या मुखातून बाहेर पडली. 'सोऽहम्', 'तत्त्वमसि', या घोषणा, याच स्वरूपाविषयीच्या आहेत. मनोस्वरूपाचे प्राकट्यदेखील वाणीच्या स्वरूपसंबंधानेच सिद्ध झाले आहे. या वाणीस्वरूपाचे बीजात्मक स्वरूप, आद्य असा वाणी स्फोट, हे मानावे लागते. भारतीय परंपरेने हा बीजात्मक आद्य स्फोट 'ॐ' या स्फोटात पाहिला. त्याचा दृष्ट आकार मांडला. त्याचा श्रुत स्वर मांडला. त्यातील स्वसंवेद्य स्फुरक भावरूपता मांडली. ही आद्य बीज स्फोटातील धारणा, आत्मांशपुंजस्वरूप अशा संघमनाने, अनादिपणाने पारंपरिक केली. म्हणूनच 'ॐ इति एकाक्षर ब्रह्म' अशी घोषणा द्रष्ट्या ऋषींनी केली. मानवी नैतिकविश्वात परब्रह्माचे स्वरूप, मनोस्वरूपाच्या, 'ॐ' स्वरूपाने अर्थात वाणीस्वरूपाने सिद्ध झाले. अर्थातच मनोस्वरूपाचे हे वाणीस्वरूप, स्वसंवेद्य स्फुरणात्मकच आहे. माऊली ज्ञानेश्वरांनी वेदोपनिषदांचे सार, स्थलकाल परिस्थितीसापेक्ष, मनोस्वरूपा संघमनाला, संवेदित करतांना, या स्वरूपसंबंधानेच स्पष्ट केले-

''**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।**'' ज्ञा.अ. १ ओ. १।।

निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, महाशून्य, सच्चिदानंदस्वरूप, श्रीकृष्ण, अनंत, केवल, परब्रह्म, परमात्मा, अशा आपल्या

याच अवस्थेत बद्ध, अशा स्वसंवेद्यस्फुरक, आत्मस्वरूपाचा पृथ्वीवरील, पृथक बद्ध, त्रितापयुक्त, तरी सत्य, परिपूर्ण अशा मानवी जीवात्म्याचे, आत्मांश आणि आत्मांशपुज असे मनोस्वरूप, वाणीस्वरूपाने प्रकट होत; सच्चिदानंदस्वरूपाचा ठायीच अनुभव, स्वसंवेद्य स्फुरकतेने घेण्याचा संघर्षात्मक प्रयत्न, कर्मवानतेने, मानवी नैतिकविश्वाच्या, स्वअर्जित व स्वस्वीकृत, बद्धतेसह मानव करत आहे. मानवी जीवात्म्याच्या ठिकाणी असलेल्या सत्य, परिपूर्ण अंशात्मकतेने मनोस्वरूप योगाने, वाणी स्वरूपात, परमात्म्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतांना, कारण, अपेक्षा, लक्ष्य, यांसह वंदन, जीवात्म्याने केले आहे–

**''सच्चिदानंदरूपाय । विश्वोत्पत्या दि हेतवे ।**
**तापत्रय विमोक्षाय । श्रीकृष्णाय वयंनुमः ।।''**

भारतीय परंपरेतील, सनातनातून पारंपरिकता संवेदित होत राहिलेले, मनोस्वरूपाचे, हे वाणीस्वरूप दर्शन, पृथ्वीच्या भिन्नभिन्न प्रदेशांमध्ये, भिन्नभिन्न भाषा, भिन्नभिन्न प्रणालींमधून प्रकट झाले आहे. मनोस्वरूप, वाणीस्वरूप आणि नैतिकविश्वातील मानवी आत्मांशपुंज संघ स्वरूपाचा स्वरूपसंबंध, कोणीही नाकारला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. मनोस्वरूपाचा विचार मानवाने केला आहे. या विचारांतर्गत मनोस्वरूपाच्या व्यापक एकात्म आणि भिन्नभिन्न शक्तिमत्तांचा बारकाईने विचार मानवी जीवात्म्याच्या, जीवबद्धता आणि वाणीस्वरूपता, या दोन्ही स्तरावर, शास्त्रीय स्वरूपात, मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मनोस्वरूपाच्या, अर्थात मनःशक्तीच्या युक्त, पूर्ण उपयोजनासाठी शारीर आणि स्वसंवेद्यस्फुरक मानस, या दोन्ही स्तरावर प्रयत्नही केलेले दिसतात. तसे प्रयत्न शास्त्रीय प्रक्रियात्मकतेने विविध व्यक्ती व संस्थांच्या माध्यमातून सुरूच आहेत.

आत्मस्वरूप हे मानवाच्या ठिकाणी मनोस्वरूपपणाने प्रकटते. परमात्म्यांतर्गत सर्वच पृथक अस्तित्वांमध्ये आत्मस्वरूप, अर्थात आत्मांश, जीवात्मास्वरूप अथवा जडभावस्वरूप अस्तित्वात आहे. माणसाचे वेगळेपण म्हणजे आत्मस्वरूपाची परिपूर्ण जाणीव होय. अर्थात चिद्रूप हे परिपूर्ण मनोस्वरूपाने प्रकाशणे होय. आत्मस्वरूप आणि मनोस्वरूप यांत भेदच राहात नाही. आत्मस्वरूपाला मानवी जीवात्मभाव प्राप्त झाला; म्हणजेच जीवात्मबद्धरूपता आली की तीच बद्धता मनोस्वरूपाला येते. जीवात्मभावाची बद्धता ही आत्मस्वरूपाशी संयोगित होते. मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, अर्थात ठायीच बद्ध होऊन; आत्मस्वरूप

अस्तित्व, जीवात्मस्वरूपात स्तंभित होऊन, देही किंवा अदेही स्वरूपातही पृथकत्वाने अस्तित्वात राहते. जीवात्म्याच्या सगुण, साकार, सविकार अशा जीवात्मभावाने ते आत्मरूप वावरू शकते. ही प्रक्रिया केवळ मानवी जीवात्म्यांच्या संदर्भातच घडते असे नाही. अन्य जीवात्म्यांच्या संदर्भातही अशी अवस्था येते. मानवी जीवात्म्यांच्या संदर्भातील ही अवस्था, मानवनिर्मित नैतिकविश्वाच्या बद्धतेसह, पृथक अस्तित्वविहाराद्वारा अनुभूत करते. याकरिता, मानवी मनाचा, मानवाने, अनुभूतीसंचिताद्वारे तात्त्विक आणि भौतिक अशा दोन्ही प्रकारे विचार केलेला दिसतो. ह्या विचारातून तत्त्वज्ञान – मनोविज्ञान – वर्तनविज्ञान, असा मानसशास्त्राचा प्रवास घडला आहे. मानवार्जित योगविज्ञान किंवा ब्रह्मविद्या हे शास्त्र ह्या शास्त्रांच्या आधारानेच मंडित झाले आहे. या वैज्ञानिक मांडणीमध्ये, जीवदशेला, प्राप्त 'वाणी' शक्तीचा, विनियोग, स्वरूपसंबंध अनुभवत केलेला दिसतो. या अध्यात्मिकतेसह वैज्ञानिक शास्त्रव्यवस्थेमुळे, मानवाला, मनोस्वरूप सामर्थ्याने, केवळ शरीर या साधनाने, ब्रह्मांडात संचार करता आला आहे. परमात्मस्वरूपाचे सत्य परिपूर्णस्वरूप, ठायीच असल्याचे सिद्ध करता आले आहे. या प्रवासातील मनोस्वरूपाच्या शक्ती म्हणजेच मनःशक्ती होत. मनोस्वरूप ही शक्तींची संयोगस्वरूप अवस्था आहे. तसेच मनोस्वरूपाच्या या शक्तींचा स्वतंत्र असा परिपूर्ण स्वरूपात, विकास करता आला आहे. मनोस्वरूपाच्या शक्तींचा परिपूर्ण विकास म्हणजेच, जीवात्म्याच्या ठायीच, सच्चिदानंदस्वरूप केवल, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, महाशून्य, श्रीकृष्ण, अनंत अविनाशी, परब्रह्म अशा परमात्म स्वरूपाचा, अनुभव घेणे होय.

आत्मस्वरूपाचा, मनोस्वरूप स्वरूपसंबंध स्पष्ट करतांना, श्रीमद्‌भगवद्‌गीतेत, पंधराव्या अध्यायातील सातव्या श्लोकात, मनाचा 'इन्द्रिय' असा उल्लेख आलेला आहे. या उल्लेखातून श्री व्यासांना, श्रीकृष्ण मुखाने आत्मस्वरूप अशा मनोस्वरूपाचा, स्वरूपसंबंध प्रक्रियात्मकतेने दाखवायचा आहे. इंद्रिय असा उल्लेख केल्याने 'मन' हे पंचज्ञानेद्रियांप्रमाणे 'जड' आहे असा कल्प परंपरेने स्वीकारलेला दिसतो. एव्हढेच नव्हे तर परंपरेतील आत्मस्वरूपाची चर्चा करतांना अहमहमिकेने 'मन' 'जड' असल्याचे निरुपण करतात. या संबंधात यापूर्वीच्या उल्लेखात चर्चा केली आहेच. मनोरूपाच्या शक्तीसंयुगात्मकतेची व शक्तींच्या कार्याची चर्चा करतांना, आत्मस्वरूपाचा मनोस्वरूपसंबंध पुन्हा उलगडणे आवश्यक वाटते. माऊली ज्ञानेश्वरांनी हा स्वरूपसंबंध त्यांच्या शैलीत सूचकतेने स्पष्ट केला आहे. मनाची कार्ये आणि

मनाचा संचार यांचा, जडदेहातीत होऊन घडणारा व्यवहार लक्षात घेतला; तर 'इंद्रिय' या संबोधनाने, आत्मस्वरूपाच्या मनोस्वरूपावस्थेला उणेपणा येण्याचे कारण नाही. आत्मस्वरूपाचे असलेपण मनोस्वरूपाने शारीर आणि अशारीर स्तरावरही सिद्ध होते. हे लक्षात घेणे आवश्यक आहे. माऊलींनी हे स्वरूप सूचन पुढील ओव्यांत केले आहे–

**''किंबहुना आत्मा चोखटु । होऊनी प्रकृतीसी एकवटु ।**
**बांधे प्रकृतिधर्माचा पाटु । आपणपयां ।।''**

(ज्ञा.अ. १५ श्लोक ७ ओ. ३५१)

**''पैं मनादि साही इंद्रिये । श्रोत्रादि प्रकृतिकार्ये ।**
**तियें माझीं म्हणौनि होये । व्यापारारूढ ।।''**

(ज्ञा.अ. १५ श्लोक ७ ओ. ३५२)

निर्गुण, निराकार, निर्विकार, स्वसंवेद्यस्फुरक, असा शुद्ध आत्मा प्रकृतीशी अर्थात जडबद्ध जीवाशी, जीवात्मा होऊन, एकरूप होतो. ती प्रकृतीधर्म पाळू लागते. ही एकरूप होण्याची क्रिया, आत्मरूपाच्या मनोस्वरूपाने घडते. म्हणूनच माऊली पुढील ओवीत 'मनादि' मन आणि इतर इंद्रिये असा उल्लेख करून नंतर पुन्हा 'श्रोत्रादि' या पंच प्राकृतिक इंद्रियांचा उल्लेख करतात. मनोस्वरूपामुळे, या देहेंद्रियांचा म्हणजे कान, नाक, डोळे, जिव्हा आणि त्वचा, यांचा मनोस्वरूपपूर्वक आत्मस्वरूप संबंध सिद्ध होतो. हेच अधिक स्पष्ट करतांना माऊली म्हणतात–

**''ऐसेनि देहेंद्रियनायकें । धरूनि मन जवळिकें ।**
**भोगिजतो शब्दादिके । विषय भरणे ।।''**

(ज्ञा.अ. १५ श्लोक ७ ओ. ३६०)

जीवात्मा मनाला मिठी मारून अर्थात मनोस्वरूप होऊन; शब्दादिक विषय समुदायांचा, उपभोग घेतो. आत्मस्वरूप शब्दादि विषय भोगतो, म्हणजेच याच्या उपभोगासह, आणखी काही त्याच्या द्वारे घडते. ते म्हणजे मानवी जीवात्म्याच्या स्वसंवेद्य स्फुरकपणाने निर्माण केलेले, नैतिकविश्व होय. म्हणजेच आत्मस्वरूपाचे स्वसंवेद्य स्फुरण हे मनोस्वरूप, स्वरूपसंबंधाने घडते. मनाला 'इंद्रिय' असे संबोधणे हे अन्य पंचज्ञानेंद्रियांच्या प्रकारे न घेता; लाक्षणिक अर्थाने स्वीकारावे लागते. व्यासांनाही, आत्मस्वरूपाच्या मनोस्वरूपाची, देहाठायीच्या जीवात्मभावस्वरूपाची, स्वसंवेद्य

स्फुरण प्रक्रिया, स्पष्ट करावयाची आहे. म्हणूनच मनोस्वरूपाचा, आत्मस्वरूप संबंध विचारात घेऊनच; मनःशक्तींचा विचार करावा लागतो.

**''ममैवांशी जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनः षष्ठानीन्द्रियाणी प्रकृतिस्थानी कर्षति ।''**

(गी.अ. १५ श्लोक ७)

अंश आणि षष्ठानान्द्रियाणी यांचा असा स्वरूपसंबंध विचारात घेतांनाही; विचारपरंपरेत; अनुभवपरींच्या, स्व किंवा समूहकेंद्रित आकलनाने, मतभिन्नता निर्माण झालेली दिसते. 'मन' या प्रतिमात्म नामाला पर्यायी नामांचे उपयोजन केलेले दिसते. या पर्यायांमध्ये 'चित्त', 'बुद्धी', 'कल्पना', 'स्फूर्ति' अशा काही नावांनी, 'मन' या प्रतिमात्म नामाच्या, अर्थासंबंधात गोंधळात टाकले आहे. भारतीय परंपरेने, अंतःकरण असा शब्द वापरून; अंतःकरण चतुष्ट्यात, अंतःकरणाचे मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार असे चार भाग केले आहेत. 'मन' या प्रतिमात्म नामातून स्वसंवेद्य स्फुरणात्मक, आत्मस्वरूपाचा बोध होतो. म्हणजेच 'मन' हे आत्मस्वरूप अस्तित्वाचे, स्वरूप असल्याचे स्पष्ट होऊन; मनोस्वरूप, असे अस्तित्व जीवात्म्याच्या ठायी, एकूण संचार अवस्थेचा बोध घडविते. हे मनोस्वरूप जडचेतन जीवात्म्याच्या सर्व गुणात्मकतेने, जीवात्म्याचे परिपूर्ण प्राकट्य देही आणि अदेही किंवा देही आणि विदेही स्वरूपातही, पृथकपणे संवेदित करण्याचे किंवा संवेदित होण्याचे सामर्थ्य राखते. या सामर्थ्यामुळे जीवात्म्याच्या सतत नव्या, नव्या जन्मांचे, परिवर्तनाचे तसेच देहदशेविरहित, अन्यदेहस्वीकारीत आणि अधर, सूक्ष्म रूप स्थितींचे, अनुभवन, माणसाला, अस्तित्वाच्या आरंभबिंदूपासून घडत आले आहे. मानवी मनोस्वरूपाचे अन्य जीवात्म्यांपेक्षा वेगळेपण आणि विलक्षणत्व, त्याने निर्मिलेल्या, मनोमय नैतिकविश्व स्वरूपाने सिद्ध केले आहे. या नैतिकविश्वाचे मंडन, शास्त्रे, विद्या व कला यांच्या स्वरूपात, स्वरूपसंबंधाने करून; परब्रह्माचा मनोस्वरूप विलास प्रक्रियात्मकतेने; अनादिअनंतपणे, प्रसृत केला आहे. आत्मांश आणि आत्मांशपुंज व आत्मांशपुंज लोक; अस्तित्वानुभूतींसह, या नैतिकविश्वाचा, मानवी जीवात्म्याशी, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आणि नैतिकविश्वाच्या प्रक्रियेतील, सर्वार्थे, स्वरूपसंबंधात्म अस्तित्वाच्या प्राकट्यासाठी, अंतरबाह्य संघर्षक्रीडा करीत आहेत. ही संघर्षक्रीडा, मनोस्वरूपातील, संयोगित शक्तींच्या सहाय्याने अखंडपणे सुरू आहे. या शक्तींना मनःशक्ती असे नाव आहे. मनःशक्तीचे अनेक कंगोरे,

अनुभूती संचितातून वाक्‌ब्रह्मांतर्गत पुढे आले आहेत. त्यांचा परिचय पुढीलप्रकारे करून घेता येतो.

'चित्त' ही मनःशक्तीतील, सर्वात्म महत्त्वाची शक्ती होय. चित्तचा थेट संबंध जिवंतपणाशी, म्हणजे स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेशी आहे. सच्चिदानंद स्वरूपातील 'चिद्' स्वरूपाशी 'चित्त' या शक्तीचा संबंध आहे. 'चिंता किंवा चिंतन करते ते चित्त' अशी चित्ताची व्याख्या केली जाते. संवेदनशक्ती म्हणजे चित्तशक्ती होय असे म्हणता येते. जीवात्म्याचे मूलभूत विकार आणि जिवंतपण, यांच्या जाणिवेचे चिंतन आणि समाधानाविषयी, अर्थात ज्याला सुख असे नाव दिले आहे; त्याची चिंता करणारी ही शक्ती होय. आहार, निद्रा, भय आणि मैथून यांसह जन्म आणि मृत्यू यांचे संबंधात, चित्ताचे हे कार्य, जन्मक्षणापासून, मृत्यूपर्यंत, जीवात्म्याच्या ठिकाणी सुरू असते. देहाच्या ठिकाणी शारीर वासनांच्या अस्तित्वाची जाणीव, वासनानिर्मिती आणि वासनांच्या समाधानासाठी, संघर्ष किंवा धडपड करण्याची शारीर प्रेरणा, या शक्तीने प्रकटते. एकूण जीवात्म्याची जीवात्मा म्हणून, नैसर्गिक प्रेरणांसह जगण्याची क्रिया, या शक्तीच्या आधीन असते. जिवंतपणाविषयी म्हणजे चेतन अस्तित्वाविषयीचे सतत चिंतन ही शक्ती करीत असते. नैतिकविश्वात, भावना आणि वासना, यांची निर्मिती, या शक्तीमुळे घडते. एव्हढेच नव्हे तर; अनेकदा ही शक्ती वासना आणि भावनांमध्ये गुरफटते, लिप्त होते; असेही अनुभव येतात. एखाद्या वासनेचा, भावनेचा किंवा अनुभवाचा अंतरबाह्य, परिपूर्ण असा शारीर आणि जाणीव या दोन्ही स्तरांवर, अनुभव घेण्यासाठी, जीवात्म्यातील चित्तशक्ती एकवटते. 'डोळ्यात प्राण आणून पाहाणे', 'कानात प्राण आणून ऐकणे' असे वाक्‌संप्रदाय 'चित्त'शक्तीच्या या क्रियेचे द्योतक असतात. 'चित्त एकाग्र करणे' ही क्रिया अभ्यासाने करता येते. योगविद्येमध्ये ही एकाग्रता अतिमहत्त्वाची असते. 'चित्त' या शक्तीचा, माणसाच्या जिवंतपणाशी संबंध असल्याने; शरीराच्या संपूर्ण चलनवलनाशी संबंध असतो. मात्र, मानवनिर्मित मनोस्वरूप नैतिकविश्वाशी, केवळ चित्‌शक्तीच्या प्रेरकतेपुरताच संबंध असतो. असे असले तरी मनःशक्तीचा कोणताही कंगोरा, स्वतंत्रपणे विचारात घेता कामा नये. स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेची व्यामिश्रता विचारात घ्यावीच लागते. मरणोत्तर अस्तित्वात आणि अर्थातच नवजन्मपूर्व अस्तित्वात, मनोस्वरूपाच्या ठायी, चित्तशक्ती असतेच. आत्मांशांचे चेतनरूप म्हणून मनोस्वरूपात ती कार्यान्वित असते. या शक्तीमुळेच देहदशा नसतांनाही वासनांचा भोग मनोस्वरूपाला घेता

येतो. ‘आत्मांशा’प्रमाणे चित्त देहाच्या ठायी सदेह भावाने कार्य करते. तरी, देह नसतांना, अर्थात अदेह किंवा विदेह स्वरूपात, जाणिवेचे संवेदन, चित्तशक्तीने घडते; हे लक्षात घ्यावे लागते. चित्तशक्ती ही मनःशक्तीमध्ये केंद्रस्थानी असते. यामुळेच ‘मन’ या संयुग स्वरूपातील अवस्थेला पर्यायी शब्द म्हणून ‘चित्त’ हा शब्द वापरला जातो.

‘बुद्धी’ हा मनःशक्तीचा आणखी एक अतिमहत्त्वाचा कंगोरा होय. जाणिवेचा अर्थात संवेदनांचा, परिपूर्ण बोध घडविण्याचे कार्य करते; ती शक्ती म्हणजे ‘बुद्धी’ होय. अनुभव स्वीकारणे, त्या अनुभवाची अनुभवसंचितांच्या आधारे चिकित्सा करून; व्यवस्थापन करून; बोधकथा सतत वाढवत नेणे, हे कार्य ‘बुद्धी’ शक्ती करते. बुद्धीच्या या कार्यात, चित्तशक्ती प्रेरक म्हणून सहभागी असते. बुद्धी हाही अनेक शक्तींचा संयुग स्वरूप समुच्चय असतो. अवलोकन, निरीक्षण, तुलना, चिकित्सा, वैशिष्ट्यविषयक निर्णय व्यवस्थापन आणि स्मृतीकोशात प्रेषण, अशा शक्ती बुद्धीशक्तीमध्ये कार्यान्वित होतात. बुद्धीही वृत्ती, प्रवृत्ती, वासना, भावना, रंग, रूप, गंध, रस, मूलद्रव्य वैशिष्ट्ये इ. सर्व बाबतीत हे कार्य करीत असते. बुद्धीच्या अधिक्यावरून, बुद्धिमान ठरविले जाते. वैज्ञानिक संशोधनात बुद्धी मौलिक कार्य करीत असते.

डोळ्यांनी पाहाणे, कानांनी ऐकणे, नाकाने श्वास आणि गंध अनुभवणे, रचनेने रसचिकित्सा म्हणजे चव घेणे आणि वाणी प्राकट्यात सहभागी होणे, शरीरव्याप्त त्वचेने स्पर्श अनुभवणे; ही ज्ञानेंद्रियाकडून, जागृत, अर्धजागृत अवस्थेत घडणारी कार्ये म्हणजे अवलोकन होय. शारीर अथवा देह अवस्थेतील, जीवाच्या ठिकाणी, सहज, स्वाभाविकतेने, संवेदित होणाऱ्या गोष्टींचा, सहज स्वीकार आणि अनुभव घडणे; अशी ही क्रिया असते. जिवंत आणि जागृत, अर्धजागृत अवस्थेत, अपरिहार्यपणे जगण्याची, निसर्गप्राप्त, अर्थात स्वस्वरूपाच्या स्पसंवेद्य स्फुरण प्रक्रियेच्या अंतर्गत, जी क्रिया घडते त्याचा अनुभव जीवाच्या ठायी घडत असतो. जिवंतपणाच्या अनुभवनाची ही पहिली अवस्था असते. ज्ञानेंद्रियांचे आणि कर्मेंद्रियांचे अस्तित्वक्षणापासून जे सहज कार्य घडते, त्याचा हा भाग असतो. मात्र क्रियांतील पाहाणे, ऐकणे, गंध घेणे, चव घेणे आणि स्पर्श अनुभवणे या नरदेहाच्या मूलभूत शक्ती आहेत. सगुण, साकार, सविकार नरदेहाचे जगणे हे या मूलभूत शक्तींच्या सहाय्याने घडते. या शक्तींच्या अनुभवांचा सहज संचय जीवाच्या जन्मपूर्वजीवनात, अस्तित्वबिंदूपासून, प्राप्त जीवनात व अर्थात आत्मांशाच्या

पृथक सगुण, साकार, सविकार, अस्तित्व प्रवासात, सुरूच असतो. अनादिकालापासूनचे, हे सहज अनुभवसंचयन, संक्रमित आणि प्रवाहित होत; प्राप्त जीवात्म्याच्या ठायी, पुढील प्रवास प्रक्रिया करीत असतो. एवढे हे कार्य महत्त्वाचे आहे. या पायाभूत कार्यप्रक्रियेमुळेच, जीवजन्मक्षणापासून बुद्धी शक्तीचे कार्य सुरू होते.

निरीक्षण या प्रक्रियेत संवेद्य अनुभवांचे, हेतूपूर्व अथवा स्वेच्छा अनुभवन सुरू होते. दृश्य, ध्वनी, गंध, रसायन पदार्थ, पदार्थ यांची हेतूपूर्वक, सर्वांगीण किंवा विशेष पाहाणी करणे; म्हणजे निरीक्षण होय. हे निरीक्षण, अनुभवाच्या ज्ञानात्मक जाणिवेसाठी किंवा विकारसापेक्ष हेतूसापेक्ष जाणिवेसाठी घडते. निरीक्षण क्रिया घडतांना, ज्ञानेंद्रिये, पृथकपणे चित्त एकवटून कार्य करतात. उदा. पाहाणे करावयाचे असेल तर 'प्राण डोळ्यात आणून पाहाणे' व लक्ष्य केंद्रित पाहाणे घडविणे होय. अर्जुनाचा लक्ष्यवेध असा घडला. निरीक्षणाने अनुभवाचे परिपूर्ण किंवा वैशिष्ट्यपूर्ण हवे असेल तर तसे, असे ज्ञानात्मक संवेदन घडावे, अशी अपेक्षा असते. अर्थातच अशी अपेक्षा पूर्ण करण्यासाठी, अनेक प्रकारच्या, बुद्धीअंतर्गत शक्ती कार्य करू लागतात.

निरीक्षणासाठी हेतू आणि अनुभवाची निवड करणे आवश्यक असते. निवड ही वासना, भावना, आवश्यकता, गरज, वृत्ती, प्रवृत्ती, नैतिकविश्वातील धारणा, आवड इ. शारीर, व्यावहारिक, नैतिक इ. गोष्टींवर अवलंबून असते. त्यामुळे, निवड ही, बुद्धीची क्रिया अनेक अनुभवांधारे, जगण्याच्या धडपडीतून प्रकटलेली असते. म्हणूनच प्रक्रियेत, निवड क्रियेला मनःशक्तीचे स्वरूप प्राप्त होते. निरीक्षणात्मक पाहाणी, ही रूप, स्वरूप अशी सूक्ष्म पाहाणी घडणे अपेक्षित असते. अशी पाहाणी करताना, अनुभवांचे पृथःकरण, विश्लेषण करणे आवश्यक असते. अनुभवाची अवयव पाहाणी, अवयवसंबंध पाहाणी आणि समग्रतेची पाहाणी अपेक्षित येते.

निरीक्षित अनुभवाची, अनुभवसंचितात व्यवस्था लावणे, अपेक्षित असते. अशी व्यवस्था बुद्धिशक्तीच्या क्रियान्वित प्रक्रियेचा भाग असतो. अनुभवांची व्यवस्था लावतांना तत्तसमता, भिन्नता आणि विशेषता ओळखून, व्यवस्था करावयाची असते. असे करतांना स्वाभाविकपणाने संचित अनुभवांचा धांडोळा घ्यावा लागतो. या धांडोळ्यासाठी, साम्यभेद ओळखण्याची तुलनाशक्ती कार्यान्वित होते. या शक्तीच्या योगाने अनुभवाचे स्वरूप पुढील अनुभवप्रक्रियेसाठी निश्चित होते.

यासंदर्भात व्यक्ती आणि भोवतालच्या नैतिकविश्वातील, असंख्य व्यक्तींचे, मौखिकपरंपरेतील संचित, वाङ्मयपरंपरेतील लिखित संचित, हे व्यासंगसापेक्षतेसह विचारात घेतले जाते. त्यामुळे तुलनाशक्तीला, विशेष महत्त्व प्राप्त होते. तुलनेसाठी साक्षेप, शुद्धाशुद्धता, पूर्णतः पाहाणी, वास्तव पाहाणी यांची गरज असते. यासह पाहाणी घडते. अर्थातच अशा पाहाणी करतांना, पूर्वसंचिता संदर्भातील, स्मृतिशक्ती कार्यान्वित होते.

मनःशक्तीतील स्मृती ही शक्ती महत्त्वाची शक्ती आहे. निरीक्षण प्रक्रियेत, स्मृती, ही त्या विशिष्ट अनुभवासंदर्भानेच कार्य करते. आत्मांशाच्या, पृथक अस्तित्वाच्या प्रवासात, स्वसंवेद्य स्फुरणात्मक मनोस्वरूपाचे ठायी, स्मृतीचे कार्य, आरंभबिंदूपासून सुरू असते. संचिताच्या व्यापाएवढाच व्याप स्मृतीचाही असतो. मनःशक्तीच्या ठायी स्मृतीनाश, स्मृतीभ्रम, विस्मृती या गोष्टी, केवळ तात्कालिक कारणामुळे येतात. अन्यथा आत्मांशाच्या पृथक अस्तित्वाबरोबरच, अनुभूतीग्रहण सुरू होते. त्याच क्षणापासून स्मृतीचे कार्य सुरू असते. स्मृती म्हणजे अनुभवांचे संचयन करण्यास व त्या अनुभवांची गरजेनुसार, पुन्हा प्रसृती करण्याचे कार्य होय. स्मृतीच्या या कार्यांतर्गत बुद्धीच्या ठायी नियोजन, व्यवस्थापन अशी कार्ये, स्मृतीशक्तीने होऊ लागतात. हे नियोजन व व्यवस्थापन, अत्यंत सूक्ष्म, काटेकोर, साक्षेपासह, वास्तव अशा स्वरूपाचे असते. हे व्यवस्थापन, जेव्हढे सुव्यवस्थित होत जाते, तेव्हढी, ती व्यक्ती बुद्धिमान असल्याचे संवेदित होते. स्मृती शक्तीच्या सहाय्याने, बुद्धीचे ठायी, नवनव्या अनुभवांची, नवनवी दालने उघडली जातात. अनुभवसंचिताचा व्याप त्यानुसार वाढत जातो. निरीक्षण करतांना, नव्या अनुभवांची तुलनात्मक चिकित्सा करतांना, काटेकोर व्यवस्थापनाची आणि त्यातील अनुभवांच्या पुनःप्रसृतीकरणाची आवश्यकता असते.

मानवी व्यवहाराच्या जवळपास सर्वच क्षेत्रात स्मृतीचे कार्य सुरू असते. ज्ञानप्रक्रियेमध्ये किंवा माहिती संकलन आणि माहिती विवरण या क्रियांमध्ये, माहीत असलेल्या गोष्टींकडून; माहीत नसलेल्या गोष्टींकडे प्रवास असतो. या प्रवासात माहिती पुरविण्याचे कार्य स्मरणशक्तीने घडते. स्मरणशक्ती अभ्यासाने पुष्ट करता येते. आठवणे ही क्रिया थोड्याशा चित्तएकाग्रतेने, घडू शकते. प्राप्त माहितीचा आढावा घेणे किंवा परीक्षा घेणे या क्रिया स्मरणशक्तीला परिमाण देणाऱ्या असतात. याप्रसंगी स्मरणशक्ती कार्यान्वित व्हावी लागते.

स्मृतीशक्तीचीच एक अवस्था म्हणजे प्रज्ञा होय. प्रज्ञा म्हणजे संचित,

संकलित माहिती आणि ज्ञान यांचे, नेमक्या, योग्य वेळी, अचूक प्रकटन होय. बुद्धिमान व्यक्तीला, प्रज्ञावंत म्हणतात. त्यात ही अपेक्षा असते. बुद्धिकार्याच्या अचूक प्राकट्याची, मानवी व्यवहार आणि व्यवस्थापन यांत आवश्यकता असते. नैतिकविश्वाच्या मांडणी, संशोधन आणि पुनर्मांडणी, यासाठी, मनोस्वरूप, प्रज्ञाबळाचा वापर करते. बुद्धीचे कार्य हे अनुभवाचे नेटके संकलन, संपादन, व्यवस्थापन, अशा स्वरूपाचे असते. प्रज्ञाशक्तीचे कार्य, बुद्धीच्या प्राकट्यासह युक्त विनियोगाचे असते. एकप्रकारे प्रज्ञाशक्तीने संचितांचा ज्ञानात्मक आविष्कार घडतो. त्यामुळे प्रज्ञाप्राकट्याला दिव्यत्व लाभते. प्रज्ञेच्या या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रश्नांची तात्काळ सोडवणूक होय. मौखिक प्रक्रियेत, ही क्रिया हजरजबाबीपणा म्हणून ओळखली जाते. हजरजबाबीपणा म्हणजे, फटकळपणा किंवा क्रोधाने वाटेल तसे प्रकट होणे नव्हे. कारण अशा प्राकट्यात, ज्ञानात्मकता बहुधा नसते. याचा अर्थ प्रज्ञेला स्मृती या शक्तीची जशी आवश्यकता असते; तशीच अचूकता, युक्तायुक्तता, सारअसारता, तुलनासमता, याप्रकारे, विवेकशक्तीचीही गरज असते. प्रज्ञा म्हणजे, चिकित्सापूर्वक अचूक असे प्राकट्य होय. म्हणूनच संशोधन प्रक्रियेत, प्रज्ञाशक्तीचे प्राकट्य अत्यावश्यक असते. याचाच अर्थ बुद्धीशक्तीच्या व्यवस्थापन प्रक्रियेतील सर्व शक्तीघटक प्रज्ञाशक्ती कार्यान्वित असतांना, कार्यरत असतात. तत्क्षणी, ज्ञानात्मक निर्णय, हे प्रज्ञेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्यामुळे, प्रज्ञेला दिव्यत्व प्राप्त होते. या वैशिष्ट्यामुळेच 'चित्त', 'बुद्धी' या शब्दांना पर्यायी शब्द म्हणून 'प्रज्ञा' हा शब्द व्यवहारात, विशेषण स्वरूपात वापरला जातांना आढळतो.

मनोस्वरूपाच्या शक्तींचा अर्थात मनःशक्तींचा विचार करतांना, मनःपूत, मनोमयी असे शब्द येतात. हे शब्द 'काल्पनिक' या अर्थाने वापरलेले असतात. 'कल्प+ना' असा विग्रहित विचार केला तर 'कल्प' म्हणजे निश्चित स्वरूपात भावी किंवा नवी अशी अवस्था, आकार, प्रक्रिया किंवा घटना मांडणे होय. 'कल्प' शब्दापासून संकल्प अर्थात कार्यनिश्चय, विकल्प म्हणजे संशय, शंका किंवा प्रश्न, असे अर्थ प्रसृत होतात. हे सर्व शब्द भावी किंवा पुढील व्यवहार, मांडणी, क्रिया, स्वभावप्रतिक्रिया इ. संदर्भात असतात. 'कल्पना' या 'कल्प' शब्दापासूनच बनलेला शब्द आहे. कल्पना, अज्ञात अशा, भूत, वर्तमान, भविष्य अशा सर्व कालांविषयी, व्यवहार, घटना, मांडणी, अपेक्षा, इच्छा, भावना, वृत्ती, प्रवृत्ती, दृश्य, अवस्था याविषयींची आविष्कृती करणारी, मनःशक्ती आहे. चित्त,

बुद्धी, प्रज्ञा, स्मृती, विवेक, निर्णय, तुलना आदि, येथवर चर्चा केलेल्या किंवा उल्लेखित सर्व शक्ती, 'कल्पना'शक्तीच्या प्राकट्यासमयी कार्यान्वित असतात. या सर्व शक्तींच्या आधारे नवी मांडणी करण्याची शक्ती कल्पनाशक्तीत असते. यामुळेच स्वसंवेद्य स्फुरणात्मकता, कल्पनेच्या स्वरूपात, आत्मांशस्वरूप जीवात्म्याच्या ठिकाणी, तसेच आत्मांशपुंजस्वरूप संघमनाच्या ठिकाणीही प्रकट होते. 'बुद्धी होणे' हा शब्दप्रयोग, व्यवहारात, कल्पनेच्या संबंधातच केलेला असतो. संचितअनुभवांची, पृथःकरण, संश्लेषण, संघटन, अपूर्व संघटन, अपूर्व विघटन, अपूर्व मांडणी करण्याची क्षमता कल्पनाशक्तीत असते. शास्त्रे, इतिहास अशा स्वरूपातील वाङ्मयनिर्मितीत, पृथःकरण, संश्लेषण, संघटन, अशी कार्ये ही शक्ती करते. इतिहासातील, अनेक दुवे जोडण्याचे कार्य तर कल्पनाशक्ती करतेच, तथापि वाङ्मयनिर्मितीतील, अद्‌भुत, दैवी, विस्मयकारक, आभासात्मक दर्शन घडविण्याचे कार्य, कल्पनाशक्ती करत असते. अपूर्व, अभूतपूर्व, नाविन्यपूर्ण, आकार प्राकट्य करण्याचे कार्यही कल्पनाशक्ती करते. आकार प्रसृतीकरण भावना, वासना, वृत्ती, प्रवृत्ती, घटना, प्रसंग यां संदर्भातही कल्पनाशक्तीचे कार्य सुरू असते. जणू सर्व मनःशक्ती या कल्पनाशक्तीत एकवटल्या आहेत; असे भासमान होते. म्हणूनच, उपरोक्त, मनोमय असा शब्द कल्पनाशक्तींसाठी वापरला. बुद्धीमध्ये सहयोगी सर्व शक्तिमत्ता कल्पनाशक्तीत समाविष्ट होत असल्याने; तसेच प्रज्ञा प्रवाहही कल्पनाशक्तीत समाविष्ट होत असल्याने, कल्पनाशक्तीला मनाची गती आणि वेग आल्याचे अनुभवता येते. कल्पनेने, अवास्तवदेखील वास्तव वाटू लागते. क्षणात विश्वसंचार, विश्वसंवाद, विश्वानुभूती घेण्याची पात्रता कल्पनेत असते. 'कल्प' संकल्पित करण्याचे कार्यदेखील कल्पनाशक्ती करते, असे बोलले जाते. मानवी नैतिकविश्व हा सर्वथा कल्पनेचा खेळ आहे, असे बोलले जाते. वरवर पाहाता ते सत्य आहे असा आभास होतो. आत्माविष्कार करण्यासाठी कल्पना उपयुक्त ठरते. हे जरी सर्व खरे वाटले तरी; कल्पनाशक्ती ही आत्मांशाची किंवा आत्मांशपुंजस्वरूप समूहाच्या सत्य, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरक, नित्य, अविनाशी, अशा अस्तित्वाची, दृश्य अवस्था नसते. असे सत्य, परिपूर्ण, नित्य, अविनाशी, अशा अस्तित्वापर्यंत घेऊन जाणारा, पोचविण्याची क्षमता असलेला, तो शक्तिपुंज असतो. चित्त, बुद्धी, प्रज्ञा या शक्तींच्या आधारावर, आभासात्मक विश्वनिर्मिती, अनुभूत करण्याची पात्रता कल्पनाशक्तीत असते. कल्पनाशक्तीमुळे अंतरबाह्य अवस्थेतील अनेक गोष्टी स्फूट होतात हे मात्र खरे. अभ्यासाने कल्पनाशक्ती बलवान करता येते.

त्यासाठी व्यक्तिमनाला व संघमनाला, सतत प्रकट होण्याची सवय लावावी लागते. कला ह्या कल्पनेच्या आविष्कृती आहेत असे म्हटले जाते, ते बहुतांशी खरे असते. कलेमध्ये आत्मांशपुंजात्मक समूहमन सापेक्षता असते. समूहमनाला चित्ताकर्षक होईल, अशा स्वरूपात, कल्पनाशक्ती, रचना, पुनर्रचना करते. कलेतील अलंकारिकता म्हणजे चित्ताकर्षक रचना, संरचना, मांडणी, शैली होय. कलेची सिद्धता होण्यासाठी, कल्पना, रचना व मांडणीसाठीचे, शैली उपाय सुचविते.

कलेच्या प्रांतात कल्पनाशक्तीच्या अंगी चमत्कृती आणि सौंदर्यदृष्टी असे गुण साकार होतात. चमत्कृती म्हणजे चित्ताकर्षक नाविन्यपूर्ण संरचना करण्याची शक्ती होय. नर्तन, वादन, गायन, चित्र, शिल्प अशा कलांमध्ये, चमत्कृतीपूर्ण कल्पनाशक्ती अधिक कार्यरत असते. भाव, विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव, संयोगाने रसनिष्पत्ती घडविण्याचे कार्य कल्पनाशक्ती, चमत्कृतीच्या सहाय्याने करते. रचनेचे सामर्थ्य प्रकट करणारी शक्ती, चमत्कृती म्हणून ओळखली जाते. वाङ्मयकलेतही या शक्तीचा सरसहा वापर होतो.

शास्त्रांच्या बाबतीत संशोधनात्मक निर्णयाची किंवा कल्पमांडणीची झेप घेण्यासाठी, कल्पनेसह चमत्कृतीशक्ती कार्यान्वित असते. चमत्कृती शक्तीमुळे रम्यता, अद्‌भुतता या गोष्टी आविष्कारात प्रकटतात.

कल्पनाशक्तीला पुष्ट आणि गुणात्मक करणारी गोष्ट म्हणजे सौंदर्यदृष्टी होय. सौंदर्यदृष्टी म्हणजे खरेतर स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेतील, निरपेक्ष चित्ताकर्षकतेची अनुभूती किंवा संवेदन होय. म्हणूनच या शक्तीचे भावना असे वर्णन केले जाते. सौंदर्यभावना ही निरपेक्षता आणि कार्यकारण संबंधविरहित स्वरूपात, जीवात्म्याला, आनंदकारक संवेदना देते. कल्पनेच्या प्रक्रियेत घडणारी अपूर्व संरचना व भावभावनांचे अपूर्वतेसह आभासात्मक दर्शन, ह्या गोष्टी, सौंदर्यभावनेची कार्यान्वितता असते. ही सौंदर्यभावनात्मक आविष्कृतता, कलानिर्मितीच्या योगे, सच्चिदानंदस्वरूपाचा, स्पर्श घडविण्याचे सामर्थ्य, कल्पनानिर्माता आणि भोक्ता दोहोंच्या ठायी प्रदान करते.

परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरीच्या उपरोक्त कल्पनाशक्तीअंतर्गत, कार्यान्वित होणाऱ्या सर्व शक्तींच्या योगाने, कल्पनारंजक, चित्तवेधक, प्रबोधक, तत्त्वज्ञानात्मक, शास्त्रमांडणी आणि उपयोजनात, आदिस्वरूपाचे, अगणित रूपात्मक वाङ्मय, मौखिक आणि लिखित परंपरेत, कल्पनाशक्तीयोगे अनादिकालापासून निर्माण होत आहे. मनात आले, विचार केला, कसेतरी, या व अशा स्वरूपात

व्यवहारात वापरले जाणारे, वाक्प्रचार, शब्दसमूह, वाक्यांश, म्हणी, उक्ती या कल्पनांची व्यावहारिक प्रसृती असते. 'जे न देखे रवी ते देखे कवी' ही म्हण कल्पनेच्या संदर्भानेच आली आहे.

कल्पनेचे स्फुरण, हे अनुभवसंचिताच्या योगे, मनोस्वरूपाचे ठिकाणी, स्वसंवेद्य स्फुरण असते, हे खरे; तरी या प्रक्रियेचा भर अनुभवसंचितातील, सर्व प्रकारच्या आकारांचे, पुनर्संघटन व रचना, यांच्या उपयोजनांवर असतो. या संघटन व रचनेला आत्मांशाच्या स्वसंवेद्यस्फुरणाच्या आत्मिक संवेदनेचा, सत्यस्वरूपाचा म्हणजे जीवात्म्याच्या ठिकाणी असलेल्या मूळ अस्तित्व संवेदनेचा स्पर्श होतो. ही प्रक्रिया मानवी जीवात्म्याचे ठिकाणी आत्मांश आणि आत्मांशपुंजस्वरूप समूह, या दोन्हींच्या आत्मप्रेरकतेने घडते. ही प्रक्रिया म्हणजे प्रतिभाशक्ती प्राकट्याची प्रक्रिया होय. या प्रक्रियेच्या योगाने कल्पनाविश्वाचे सत्यस्पर्शी प्राकट्य होते. व्यावहारिक उपयोजनाच्या पलिकडील, सत्-चिद्-आनंदस्वरूप जीवात्म्याच्या ठिकाणी, संवेदित होण्याची, प्रक्रिया सुरू होते. आणि वाङ्मयाला दिव्यत्वाचे परिमाण लाभते. निखळ आनंद प्रतीती घडू लागते. कलाविश्वाच्या बाबतीत अशारीर आनंदानुभूती घडते. ज्ञानेंद्रियांच्या जडतेतून, ज्ञानात्मक संवेदनांचे प्राकट्य होऊन, संयोगितस्वरूपात, आत्मिक आनंद प्रतिती होते. 'ब्रह्मस्वादसहोदर' आनंद, असे याचे वर्णन, सौंदर्यसिद्धांतात व रससिद्धांतात केलेले असते. रससिद्धांतानुसार म्हणायचे तर; अन्य सर्व रसांच्या अनुभूतींच्या परी ओलांडून, संयोगित स्वरूपात, अष्टसात्विकभाव जागृत होऊन; आनंदप्रतीती घडते. कलाविश्वात प्रतिभेचा स्पर्श असा घडतो. माऊलींनी वाङ्मयाच्या संदर्भात या 'स्पर्श' स्वरूपाची अपेक्षा केली आहे. प्रतिभेचा असा स्पर्श जेव्हा शास्त्रीय ज्ञान मांडणी प्रक्रियेत घडतो; तेंव्हा त्रिकालाबाधित सत्यतेच्या कसोटीवर, शास्त्रीय ज्ञान प्रकटते. भौतिकशास्त्रे असोत की मानव्यशास्त्रे असोत; त्यांच्या व्यवस्थापन, संशोधन मांडणीमध्ये, आगम, निगम स्वरूपातील प्रक्रिया घडते; तेव्हा तत्त्व, मांडणी करतांना, प्रतिभा स्पर्श घडतो. प्रतिभा स्पर्श म्हणजे, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, अविनाशी, अनंत, श्रीकृष्ण, महाशून्य, परब्रह्म परमात्मा, अशा त्याच्याच ठायी, गुणात्मक बद्धतेतील, स्वाभाविक स्वसंवेद्य स्फुरणात्मक महतत्त्व, अर्थात मनोस्वरूपाचे; आत्मांश किंवा आत्मांशपुंजात्मक जीवात्म स्वरूप बद्धतेतील, स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूपाचे ठायी प्रतिभेचे प्राकट्य होय. हे घडणे म्हणजे जीवात्म्याचे, निजरूपाशी ठायीच अद्वैत अनुभवणे

होय. भारतीय परंपरेतील ऋषी, मुनी, तपस्वी, योगी यांनी या प्रक्रियेचा अनुभव घेत घेतच; अनादिकालापासून, योगशास्त्राचे शारीरवैज्ञानिक, भौतिक किंवा पदार्थवैज्ञानिक, तसेच रसायनविज्ञान, वाणीविज्ञान, धनुर्विज्ञान, ज्योतिर्विज्ञान आणि संगीत यांचे प्रतिभाबलाने मंडन केले. आत्मांशपुंजात्मक सामूहिक मानव्यव्यवहाराशी, सृष्टीसापेक्षतेचा विचार करून; गुरुकुलाद्वारे ऋषींनी यात्रांच्या परंपरा सुरू केल्या. ऋषी, मुनी, योगी यांस्वरूपातील, जगभरातील व्यक्तिमत्त्वांनी या तऱ्हेने शास्त्रे व कला यांची मांडणी करीत; प्रतिभाबलाने नैतिकविश्वाला, प्रतिविश्वस्वरूप आकार देण्याचा खटाटोप, नित्य परिवर्तनशीलतेने सुरू ठेवला. प्रातिभशक्ती म्हणजे, मानवी जीवात्म्याच्या ठायी प्रकटलेली निजरूपाची सत्य, परिपूर्ण अंशात्म अवस्था होय. प्रतिभाबलाने प्रातिभज्ञान घडते. असे प्रातिभज्ञान ज्या मानवी कर्मवानांना घडले, त्यांनाच आपण द्रष्टे ऋषी असे म्हटले आहे.

मनोस्वरूप हे जीवात्म्याच्या व्यक्ती आणि समूहसापेक्ष स्वसंवेद्य स्फुरण स्वरूपाचे, मानवी प्रचलनातील, दृश्यादृश्य, जन्मपूर्व, मरणोत्तर आणि जीवजीवन काळातील, वर्तनात्मक प्रचलन असते. जीवात्मा म्हटले की, पंचतत्त्वात्म देहभावाचे आणि त्या ठायी प्रकटलेल्या आत्मांशाचे समस्त गुणधर्म, जीवात्म्याच्या स्वसंवेद्यस्फुरणात्मक मनोस्वरूपावर, स्वाभाविक परिणाम करणार, हे उघड आहे. आंशात्म्याची निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक सर्वव्यापक स्वसंवेद्यस्फुरणात्मक अशी निजस्वरूपता आणि पंचतात्त्विक देहाची सगुण, साकार, सविकार, स्वसंवेद्य स्फुरणात्मक चिदरूपता या दोन्हींचा परिणाम, जन्मपूर्व, जीवनभर आणि मरणोत्तर अवस्थेत होणे किंवा जाणवणे अपरिहार्य असते. यामुळे मानवी देहाच्या आहार, निद्रा, भय आणि मैथुन, या प्राणीपणाच्या, मूलभूत विकारांशी निगडित, भावना, वासना, प्रवृत्ती, याशिवाय, नैतिकविश्वातील अस्तित्व आणि भोगसापेक्ष भावना, वासना, प्रवृत्ती, वृत्ती, चांगलेवाईट संस्कार यांचा परिणाम मनोस्वरूप अवस्था घडविण्यास कारणीभूत होणे शक्य आहे.

जीवबद्धतेने आलेली पृथक अस्तित्वाच्या प्रतिष्ठेची किंवा संरक्षणपूर्वक मिरविण्याची उपजत धडपड, अर्थात जीवनार्थकलह आणि आत्मांशस्वरूपाने आलेली, अलिप्तता व त्यामुळे उपजत प्राप्त क्रीडाआनंद भोगण्याची धडपड; या दोहोत जीवाच्या ठायी अंतर्गत संघर्ष मनोस्वरूपावर परिणाम करतो. तसेच जीवनार्थ कलह म्हणजे वासनादेहाच्या अपेक्षापूर्तीसाठीचा संघर्ष सुरू असतो. हे दोन्ही प्रकारचे संघर्ष मानवी मनोस्वरूपाने स्वतःच निर्माण आणि स्वीकृत केलेल्या,

नैतिकविश्वाच्या अंतर्गत, समूह आणि वैश्विक मानव, यांच्या संदर्भाने, निर्णय आणि वर्तन, या दोन्ही विषयींचे स्वार्थनिःस्वार्थपर संघर्ष असतात. या नैतिकविश्वाच्या बद्धतेतून, निर्माण झालेला संघर्ष, उपरोक्त दोन प्रकारच्या संघर्षावर परिणाम करीत, मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्पुरणात्मक शक्तिमत्तांना, बाधित करून; मनोस्वरूपाला बद्ध करण्याचा प्रयत्न करतो. या परस्परावलंबी स्वाभाविक संघर्षात्मक, प्रक्रियांमुळे मनःशक्तीला वळण लागू शकते. मनःशक्तीला मनोगंडांनी, बाधितदेखील केले जाते. त्यामुळे मनोस्वरूपाचे दृश्यरूप वर्तन, त्यावर या सर्व गोष्टींचा परिणाम होत असतो. त्यातच नैतिकविश्वातील प्रणाली भूमिकेने, स्वाभाविक वर्तनाला पाखंडात्मक किंवा बेगडी किंवा नाटकी वळण लागण्याची शक्यता असते. नैतिकविश्वातील प्राप्त अशी मानवी जीवात्म्याची भूमिका, व्यवहारात प्रकट होताना, पारदर्शीपणे होईल, याची खात्री असत नाही. एकप्रकारे सत्यतेची, परिपूर्णतेची वास्तविक लाभलेली अंशात्मक अवस्थाच बाधित होते.

श्रीमद्‌भवद्‌गीतेमध्ये सोळाव्या अध्यायात, 'दैवासुर सम्पद्विभाग योग' कथन केला असून, दैवी संपत्तीप्रमाणे आणि आसुरी संपत्तीप्रमाणे, मनोस्वरूपाच्या शक्तींना वळण लागते असे स्पष्ट केले आहे. तर सगुण स्वरूपामुळे सत्व, रज, तम या प्रकारचे वळण, मनःशक्तीला लागते. ह्याकडे लक्ष वेधून; तीन प्रकारच्या जीवननिष्ठा कशा तयार होतात याचे संदेशन 'श्रद्धात्रयविभागयोग' या प्रकरणात, म्हणजे सतराव्या अध्यायात केले आहे. आत्मांश आणि आत्मांशपुंजस्वरूप समाज, या दोन्ही ठिकाणी मनोस्वरूपाला वळण लागून; व्यवहार घडत असतो. मूलतः मानवी मनोस्वरूपाने, सार्वकालिक, सर्वव्यापक असे मानवी जीवात्म्यांचे, व्यक्ती आणि समष्टी स्वरूपातील जीवन, सुखरूप, अर्थात सत्यपरिपूर्ण स्वरूपात प्राप्त कर्माच्या योगाने, जीवबद्धतेतच, स्वतःच्या ठायी, सच्चिदानंद स्वरूप होईल असे; सहानुभूती स्वअनुभूती या स्वसंवेद्य स्फुरणात्मक जाणिवेने, अर्थात मानवताभावाने प्रेरीत होईल; असा प्रयास, नैतिकविश्वाच्या मंडनात केलेला असतो. त्यादृष्टीनेच, मानवी जीवनाच्या नैतिकविश्वातील परंपरा निर्माण झालेल्या असतात. न्याय, नीती, धर्म, संस्कृती, समाज आणि राज्यव्यवस्था, यांचे मंडन मनःशक्तीच्या योगाने केलेले असते. या अपेक्षा विचारात घेऊन; मानवी जीवात्म्यांनी मनःशक्तींना अभ्यासपूर्वक बलिष्ठ करून; मनोस्वरूपाचे प्राकट्य करावे; अशी अपेक्षा असते. या अभ्यासासाठी मनोस्वरूपाच्या ठिकाणी स्वभावतः स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेबरोबरच, निग्रह, निश्चय, निर्णय आणि वृत्तिनिरोध करण्याची पात्रता,

मूलभूत, परमात्मस्वरूपाच्या निर्गुण, निराकार, निर्विकार सार्वकालिक आणि सर्वव्यापक स्वसंवेद्यस्फुरणात्मक, अशा गुणवत्तेच्या बद्धतेने, अंशात्मक स्वरूपाच्या ठिकाणी, प्राप्त झालेली असते; याचे संवेदनही, अंशात्मक आणि अंशपुंजात्मक समाज या दोन्ही ठिकाणी नित्य असते. त्यामुळेच समग्र नैतिकविश्व, संघर्षात्मक असल्याचे प्रतीत होते.

उपरोक्त पात्रतेतील, 'निर्णय' ही शक्ती, ही मनोस्वरूप जीवात्म्याच्या जीवनाला दिशा देत असते. निर्णयशक्ती जसे ज्ञानात्मक कार्यामध्ये, ज्ञानप्रतीतीविषयी, निर्णय घेऊन, संशोधित स्वरूपाविषयी, निश्चिती करते; तसेच निर्णयशक्ती, जीवात्म्याच्या, प्राणीतत्त्वीय आणि मानवनिर्मित नैतिकविश्वांतर्गत, जीवनार्थकलहाविषयी, जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या, जीवनातील प्रत्येक क्षणी, करावयाच्या शारीर आणि मानसिक वर्तनाविषयी निर्णय घेते. त्या वर्तनाचा परिणाम मात्र, त्या जीवात्म्याच्या हातात नसतो. ही निर्णयविषयक अपरिहार्यता, व्यक्ती, समूह, समाज अशा व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनप्रक्रियेतील, जीवनार्थ कलहातदेखील असते. वर्तनविषय निर्णयाची यथायोग्यता, मानवी मनोस्वरूपाला लागलेल्या, गुणात्मक वळणावर आधारित असते; हे खरे असले तरी; व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवरसुद्धा, तारतम्य, निवड, विवेक आणि शहाणपण, या शक्तींची क्रियान्वितता, प्रक्रियेत कशी आणि कितपत घडते; की या शक्तींना पारखे होऊन; केवळ तात्कालिक, वासना, भावना, वृत्ती, प्रवृत्ती यांच्या आवेगाने, निर्णयप्रक्रिया घडते, यावरही भावी परिणाम, परिस्थिती आणि त्यातून येणारी जीवनार्थ कलहाची अवस्था ठरत असते. हे लक्षात घेऊनच, लोकधुरिणांनी मानवी मनोस्वरूपातील विविध मनःशक्तींना, अभ्यासपूर्वक निश्चित वळण लावण्याच्या परंपरा निर्माण केल्या आहेत. त्यातूनच जीवात्म्याच्या व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनाला अधिकाधिक युक्त, नेटका, प्रक्रियात्मक, स्थलकालपरिस्थितीसापेक्ष परिवर्तनशील, समावेशक अशी प्रणाली देण्याचा प्रयास झाला आहे.

मनोस्वरूपाने निर्माण केलेल्या नैतिकविश्वाची बद्धता स्वीकारणे, मानवी जीवात्म्याला अपरिहार्य आहे. त्याचबरोबर धुरिणांच्या मार्गदर्शनानुसार, शारीर आणि मनोसाधनाही अत्यावश्यक आहे. मानवाने अर्जित केलेल्या, ज्ञानात्मक संचित आणि विज्ञानात्मक संचित, या दोन्ही गोष्टींतून, ज्ञानविज्ञानात्मक प्रचलन प्रक्रिया, नैतिकविश्वात सुरू असते. हे सुरू असणे, माणसाच्या व्यक्तिगत आणि सामूहिक स्वात्मभावासह, जीवनार्थ कलहात आवश्यक आणि अपरिहार्यही आहे.

ज्ञान आणि विज्ञानप्रणाली ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजूंसारख्या किंवा आत्मस्वरूप आणि मनोस्वरूपसारख्या अभिन्न असतात. विज्ञानप्रणालीतून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत, सतत साधनांची निर्मिती आणि उपयोजन सुरू असते. या साधनांच्या गर्दीत ज्ञानात्मक प्रणालींकडे दुर्लक्ष होऊन; विज्ञानात्मक प्रणालींच्या आहारी, मानवी जीवन जाण्याची शक्यता बळावते. यामुळे तारतम्य, विवेक आणि शहाणपण हरपण्याची शक्यता असते. त्यामुळे मनोदौर्बल्य, परावलंबित्व, अशांतता व संवेदनहीनता बळावते. ही अवस्था मानवी जीवनातील मानव्य हरवून टाकणारी असते. यातून यांत्रिकतेविषयीच्या मनोविकृती निर्माण होऊन; स्वात्मभान आणि आत्मविश्वास हरवून बसण्याची शक्यता असते. व्यक्तिगत आणि समूहगत स्वरूपात, साधनांच्या विनियोगामुळे द्वंद्वे, भीषण संघर्ष किंवा युद्धे घडतात. या प्रक्रियेची साक्ष इतिहासात मिळते.

मनोस्वरूपाला, बाधित स्वरूपात वळण लावणाऱ्या, वासनाभावनात्मक शारीर आणि मानसिक प्रेरणांना, नैतिकविश्वात, व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात; सत्य, परिपूर्ण आणि आनंदमय जीवननिष्पत्तीसाठी, यथायोग्य निरोधित करणे, अभ्यासपूर्वक प्रेरणांचा उपयुक्त विकास करणे, आवश्यक असते. त्या संदर्भातील निर्णय, निश्चय आणि विवेक शक्तींचा शहाणपणाने उपयोग करण्याची सवय लावणे किंवा अभ्यास करणे आवश्यक असते. नैतिकविश्वसापेक्षपणे सत्य, परिपूर्ण, आनंदमयी जीवनानिष्पत्तीसाठी, निसर्गप्रेरणा आणि नैतिकविश्वातील प्रेरणा, यांचा मानसिक स्तरावर व त्यायोगे शारीरिक स्वास्थ्यावर प्रचंड परिणाम होतो. नैतिकविश्वातील, प्रेरणांच्या सहाय्याने समूहजीवन बद्ध असते. ती बद्धता, व्यक्तिपातळीवर भोगतांना, नैसर्गिक प्रेरणा, अर्थात आत्मिक आणि शारीर जीवनदशाप्राप्त प्रेरणा, मोठ्या प्रमाणावर, अवरुद्ध होणे, कोंडल्या जाणे, दडपल्या जाणे असे घडते. या दडपलेल्या किंवा तुंबलेल्या प्रेरणा, मनोस्वरूपाला अधिक विपरित स्थिती प्राप्त करतात. या विपरित स्थितींना आपण मनोविकृती, मनोव्याधी किंवा मनोरुग्णता असे म्हणतो. यांत विविध प्रकारे वासनागंड, निष्ठागंड इ. निर्माण होतात. त्यांना उन्मादाचे किंवा वेडाचे स्वरूपही प्राप्त होते. मानसिक स्तरावर, वैफल्यग्रस्तता, न्यूनगंड असे विकारही घडतात. जीवनसंघर्षातील तथाकथित वैफल्याने, शरीरहत्या अर्थात आत्महत्या करण्याची प्रेरणा निर्माण होते. उलटपक्षी हिंस्त्रता, उत्तानता, आक्रमकता, स्वैरता, स्वच्छंदता यांचा उद्रेक होण्याचा संभव असतो. हे सर्व मानसिक आजार, शारीरविकृतींनाही कारणीभूत ठरतात. उपरोक्त

दैवीसंपत्ती अर्थात अभय, अंतःकरणशुद्धी, ज्ञान, योग यांचे ठिकाणी तन्निष्ठता, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, सरलता, अहिंसा, सत्य, क्रोध नसणे, त्याग, दुःखित, पीडित आणि भूतमात्र यांविषयीची दया, अलोलुपता, मृदुता, लज्जा, अचंचलता, तेज, क्षमा, धैर्य, शौच, अद्रोह, अमानित्व, अशा सद्‌गुणांचा नाश होतो किंवा लोप होतो. आसुरीसंपत्तीस्वरूप दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरता, अज्ञान अशा दुर्गुणांचा उद्रेक होतो. यामुळे निराशा, वैफल्य आणि अतीव दुःख, संघर्षविकोप, अनुभवावा लागतो. ह्या शक्यतांचा विचार करून, लोकधुरिण सद्‌गुण विकसित करण्यासाठीच्या अभ्यासप्रणाली, संस्कारांच्या स्वरूपात निर्माण करतात. संस्कारांचा स्वीकार करण्याची पात्रता मनोस्वरूपाच्या ठिकाणी असतांनाच, म्हणजेच विकसनशील अवस्थेतच, संस्कारप्रणालींना व्यक्तिमनात प्रेरीत करणे आवश्यक असते. जन्मपूर्व जीवदशा आणि अरुण अवस्थेपर्यंत ही विकसनशीलता असते. या अवस्थेमध्ये, मनोस्वरूपाला, नैतिकविश्वाच्या दृष्टीने, सहानुभूती स्वात्मानुभूती यासह उपरोक्त दैवीसंपत्ती वृद्धिंगत होईल असे वळण लावण्यासाठी, वर्तनप्रणालीतून अभ्यास घडवावा. म्हणजे नैतिकविश्वाच्या स्वीकृत बद्धतेसह, जीवात्म्याच्या ठिकाणी सत्वनिष्ठा जागृत होऊन; प्राप्त जीवनाचे साफल्य साधता येईल.

''**अभ्यासाशी काही । सर्वथा दुष्कर नाही ।**
**म्हणून माझ्या ठायी । अभ्यासे मीळ ।।**''

ही, भगवद्‌गीतेच्या आधारे, माऊलींनी सांगितलेली सूत्ररूप उक्ती जीवात्म्याच्या ठायी अनुभवता येईल.

मनोस्वरूपाला वळण लावायचे, म्हणजे मनःशक्तीचा युक्त विकास अभ्यासाद्वारे साधावयाचा. हा साधतांना पंचज्ञानेंद्रियांना अभ्यासानुकुल वळण लावायचे असते. हे वळण लावण्याचे कार्यही मनोस्वरूपातील निग्रह, निश्चय, विवेक, शहाणपण आणि निर्णय या शक्तींच्या विनियोगाने घडते हे खरे. मनोस्वरूपाची एकूण व्यवस्थापन प्रक्रिया ज्या शारीर साधनाने किंवा इंद्रियाद्वारा आत्मिकताः आणि शारीरिकतः घडते ते इंद्रिय म्हणजे महामंडळ स्वरूप मस्तकातील मेंदू हे होय. संपूर्ण अस्तित्वाचे स्वरूपसंबंधासह संचालन, जीवात्म्याचे ठिकाणी, मेंदू द्वारा घडते. मानवी जीवात्म्याच्या मनोस्वरूपाचे वर्तनात प्राकट्य करण्याचे कार्य, मेंदूसंस्थेद्वारे घडते. म्हणूनच या महामंडळाचा, शारीर इंद्रिय म्हणून विकास करणे

आवश्यक असते. भारतीय परंपरेत, 'मन' या अस्तित्वाला इंद्रिय संबोधून, मेंदूचा निर्देश केला आहे. हे विशेष वैशिष्ट्यपूर्ण यासाठी आहे की; मानवी जीवात्म्याच्या ठायीच्या आत्मस्वरूपाचा स्वरूपसंबंध, मनोस्वरूपाने सिद्ध होतो आणि मनोस्वरूपाचे, जीवदशा असेपर्यंत, शारीरधर्मासह प्राकट्य मेंदूस्वरूपाच्या व्यवस्थापन केंद्रातून घडते. योगशास्त्रामध्ये आत्मस्वरूपाच्या अनुभूती, याचिदेही अनुभवण्यासाठी समाधीमग्न साधनांचा अभ्यास केला जातो. या अभ्यासात या महामंडळाच्या ठायीच आत्मस्वरूपाची सिद्धता अनुभवता येते. शक्तिपात ही ज्ञानवितरणाची प्रक्रियात्मक तांत्रिकता, गुरुशिष्य परंपरेने, याच महामंडळाच्या कार्यान्विततेतून घडविली जाते. आत्मानुभूतीची अनुभूती मेंदू या ऐंद्रिय व्यवस्थापन केंद्राद्वारे घेता येते. वर्तनाच्या निरीक्षणातून होणारे, संवेद्य परिणाम, या संस्थेतून वैज्ञानिकदृष्ट्याही तपासता येतात. मेंदूविकास ही मनःशक्ती विकासातील अत्यंत आवश्यक प्रक्रिया होय. संस्कारप्रणालींचा वापर करून हे साधता येते.

निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, स्वसंवेद्य स्फुरणात्मक बद्धतेतील, परमात्मस्वरूपाचे अंशात्मस्वरूप म्हणून, त्याच सर्व गुणात्मकतेने अनुभवन घडविण्याचा मार्ग, जीवदशेच्या ठिकाणी मेंदूस्वरूपातून जातो. मनोस्वरूपाचे, नैतिकविश्व आणि नैसर्गिकविश्व, या दोन्ही बद्धता स्वीकारून घडणारे, सत्य, परिपूर्ण आणि आनंदमय अनुभवन, जीवदशेत अनुभवता येते. याच दृष्टीने मनोस्वरूपाच्या शक्तींचा विकास महत्त्वाचा ठरतो. या विकासावर नैतिकविश्वाच्या ठायी, मानवाचे व्यक्तिगत आणि सामूहिक 'सच्चिदानंदस्वरूप' लक्ष्यी संघर्षमय वर्तनाचे प्राकट्य दृश्यमान होते.

मनःशक्ती संवर्धन आणि जीवनाच्या सत्य, परिपूर्ण पुरुषार्थ साफल्यासाठी; पू. स्वामी विज्ञानानंद यांच्या विचाराने प्रेरित मनशक्ती प्रतिष्ठान, लोणावळा आणि पू.डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर यांच्या 'पूर्णवाद' प्रेरित प्रतिष्ठान पारनेर (नगर) माध्यमातून, विश्वासाठी आदर्शभूत असे प्रयोगसिद्ध प्रयत्न सुरू आहेत. ही वैश्विक स्तरावर, सर्वात्मक आनंदप्रतीतीसाठी विशेष आश्वासक गोष्ट आहे.

●●●

# ११. परमात्मा–जीवात्मा स्वरूपसंबंध

मानवी मनोस्वरूप संबंध विचार, याविषयी चर्चा करीत असतांना; स्वाभाविकपणे, आत्मांशपुंजस्वरूप माणूस हा, केंद्रस्थानी आहे. पृथ्वीवरील माणूस, या मानवी अस्तित्वाव्यतिरिक्त, अन्यत्र मानवी अस्तित्व आहे किंवा कसे; याविषयी मानवाची अद्यापही कुतुहलपूर्ती झालेली नाही. कोणत्याही संबंधाने विचार करतांना; मानवी मनोस्वरूपासमोर पृथ्वी आणि दृश्य असे पृथ्वीएतर विश्व एवढेच अनुभवविश्व प्रत्यक्षतः माणसासमोर आहे. 'अथा तो ब्रह्म जिज्ञासा' यामुळे माणूस स्वअस्तित्वाबरोबर, त्याचे हे अनुभवविश्व, स्वसापेक्षतेने, समजावून घेऊन; आकलित, अर्जित अशा माहिती आणि ज्ञानाची मांडणी, शास्त्रीय स्वरूपात करण्याचा प्रयत्न करीत आहे.

सद्–चिद्–आनंद स्वरूप परमात्मा, पृथ्वी या अंशपुंजात्मक स्वरूपाने, स्वसंवेद्यस्फुरण स्वरूपात, मानव या, अंशपुंजात्मक स्वसंवेद्य स्फुरणस्वरूपासमोर आहे. मानवी अस्तित्व हे, पृथ्वी या अंशपुंजांतर्गत, अंशपुंज स्वरूपातील, स्वसंवेद्यस्फुरणात्मक अंशपुंज जातीसमूह आहे. सोप्या शब्दात सांगायचे तर मानव हे पृथ्वीवरील स्वतंत्र तरी पृथ्वी कक्षेत बद्ध असे, स्वसंवेद्य आत्मरूप; असे जीवात्मस्वरूप होय. म्हणजे निर्गुण, निराकार, निर्विकार, सच्चिदानंदस्वरूप, सार्वकालिक, सर्वव्यापक, स्वसंवेद्य स्फुरण स्वरूपातील, परब्रह्म स्वरूपांतर्गत– पृथ्वी हे एक अंशपुंजात्मक स्वसंवेद्यस्फुरण स्वरूपातील सगुण, साकार, सविकार तरी परिपूर्ण स्वतंत्र आत्मांशपुंज स्वरूप– पृथ्वीअंतर्गत मानव हे सगुण, साकार, सविकार तरी परिपूर्ण स्वसंवेद्य स्फुरणस्वरूप, आत्मस्वरूप होय. हा स्वरूपसंबंध विचारात घेऊनच, मानवाने अनुभवसिद्ध, स्वसंवेद्य स्फुरक, मनोस्वरूपाच्या योगाने केलेल्या, स्वरूपसंबंधाविषयीच्या मांडणीचा विचार, समजावून घ्यावा लागतो.

मानवाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूपाला, अर्थात मनोस्वरूपाला;

पृथ्वीअंतर्गत, पंचमहाभूते आणि त्रिगुण अशा अष्टधा प्राकृतिक बद्धतेत, जीवात्मास्वरूप, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, परिपूर्ण स्वरूपाचे ज्ञान आहे. सगुण, साकार, सविकार असे, जन्ममृत्यूसापेक्ष; तरी चिरंतन असे; निर्गुण, निराकार, निर्विकार, सच्चिदानंदस्वरूप, परब्रह्म्याच्या स्वरूपसंबंधाने आपण, अस्तित्व भोगत आहोत. याची आत्मानुभूती, सनातनपणे माणसाला येते आहे. या अनुभूतीच्या योगाने, मानवी मनाने, संपूर्ण विश्वाची संगती, ज्ञानात्मकतेने, लावण्याचा प्रयत्न केला आहे. बद्ध जीवात्मास्वरूपातील, मनोस्वरूपाला, परमात्मस्वरूपपणे, अनुभवण्यासाठी, पूर्ण विकसित करण्याचा अभ्यास केला आहे. त्यातूनच ज्ञानयोग, भक्तियोग, कर्मयोग, भौतिक विज्ञान, आयुर्वेद, धनुर्वेद, संगीतादि कला, जोतिर्विज्ञान, सामाजिक, राजकीय, धार्मिक, नैतिक संबंधातील विज्ञान, न्यायशास्त्र अशी ज्ञानात्मक मांडणी; माणूस सत्यतेच्या कसोटीवर उतरवित करीत आला आहे.

पृथ्वीच्या नित्यबद्धतेतही, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, सगुण साकार, सविकारतेसह परिवर्तन प्रक्रिया, अंशपुंजात्मक स्वरूप अवस्थेने घडत आहे. त्या बद्ध कक्षेत, बद्ध, पृथक रूपांतील सगुण, साकार, सविकार अशी असंख्य अस्तित्वे, स्वरूपसंबंधाने, स्वसंवेद्यतेने स्फुरणात्मक, मर्त्य, तरी अविनाशी, जीवन अनुभवत आहेत. परब्रह्माच्या सर्वगुणात्मकतेने, परिपूर्ण स्वरूप अवस्था, बद्धावस्थेतील प्राप्त कर्मशीलतेने, ही अस्तित्वे भोगत आहेत. मानवी मनोस्वरूपाने स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, या संदर्भातील सत्यान्वेषण केले आहे. सातत्याने ही प्रक्रिया सुरूच आहे.

मनोस्वरूपाने, आपल्या शक्तीसामर्थ्याने, परब्रह्म स्वरूपाविषयी केलेल्या, आकलनातून त्याला तथ्ये अनुभूत झाली–

परब्रह्म स्वरूपाच्या, स्वसंवेद्य स्फुरण स्वभावातून, परब्रह्मांतर्गत, त्याच्याशी बद्धपणाने आणि त्याच्या स्वभावानुसार, स्वसंवेद्य स्फुरण स्वभावासह, सर्व अस्तित्वे आविष्कृत आहेत. परब्रह्म हे सार्वकालिक, सर्वव्यापक या मुक्तबद्धतेत, नित्य स्वसंवेद्य स्फुरण आहे. सार्वकालिक सर्वव्यापक अशा मुक्तबद्धतेमुळेच, ते सर्व अस्तित्वांच्या पलिकडे, निर्गुण, निराकार, निर्विकारपणे, नित्य आहे. सर्व अस्तित्वे त्याच्याअंतर्गत स्वाभाविकतेतून आविष्कृत होत असल्याने; परब्रह्म सर्वाठायी आहे. सर्व अस्तित्वे त्याच्या ठायी आहेत. ही सर्व अस्तित्वे स्वभावतः स्वसंवेद्य स्फुरण, या स्वभावाने, अंशात्मक बद्ध पृथकता अनुभवताना; त्या परब्रह्मांतर्गत, सगुण, साकार, सविकार, परिवर्तनशील आणि अविनाशी आहेत. अंशात्मक

बद्धपृथकता, तात्कालिक असली; तरी ती स्वसंवेद्य स्फुरक असल्याने, परब्रह्मांतर्गतदेखील, पृथकतासिद्धस्थित, राखण्याचा, परिवर्तनात्मक विलयापर्यंत प्रयत्न हे अस्तित्व करते. यामुळे स्वतःच्या, बद्धपृथकात्म अवस्थेचे, अस्तित्व अबाधित राखण्यासाठी; तरी परब्रह्म्याची परिपूर्णता भोगतांना, अन्य सर्व अस्तित्वांशी अंतरिक संबंधाने, हे अस्तित्व संघर्षाधीन होते. हा संघर्षही नित्य, अनंतपणे सुरू असतो. यातच परिवर्तनात्मक पुनर्अस्तित्वांमुळे, परब्रह्म्याचे अविनाशित्व, त्या अस्तित्वाच्या ठायी, अंशभावाने आणि परिपूर्ण गुणात्मक असते.

परब्रह्मांतर्गत परमात्म अंशात्मक बद्ध पृथक अस्तित्वे ही दोन प्रकारे दृश्यमान झालेली आहेत. एक एकलपणाने, दुसरे म्हणजे अंशपुंजात्मकतेने. या दोन्ही प्रकारांचा अन्योन्य स्वाभाविक संबंध जाणवतो. त्यामुळे, या अस्तित्वांचे समूहजातीप्रकार, अनुभवता येतात. उदा.- एक आकाशगंगा, एकलपणे दृश्यमान झाली; तरी अनेक आकाशगंगा अंशपुंजात्मक समूहाने जाती म्हणून अनुभवता येतात. असा अनुभव, सूर्यमाला, तारे, नक्षत्रे, ग्रह, उल्का इ.मध्ये घेता येतो. तसा, केवळ पृथ्वीचा, विचार केला तर; त्यातील जड आणि चेतन, पृथक अस्तित्वेदेखील, याच तऱ्हेने अनुभवास येतात. हे अनुभवन सूक्ष्मातिसूक्ष्म, पृथक अस्तित्वापर्यंत नेता येते.

परब्रह्म्यांतर्गत, प्रत्येक अस्तित्व, अंशात्मक, बद्धपृथक, सगुण, साकार, सविकार, परिवर्तनात्मक अविनाशी, असे असले तरी; ते परिपूर्णपणाने, सद्-चिद्-आनंदस्वरूप, स्वरूपसंबंधानेच भोगत असते.

मनोस्वरूपाला, अनुभूत झालेल्या, या तथ्यांचा, एक भाग म्हणजे, पृथ्वीवरील अस्तित्वाच्या आकलनाचा आणि मांडणीचा होय.

मानवी मनोस्वरूप, सामर्थ्याने, पृथ्वीवरील चेतन अस्तित्वांची म्हणजे जीव अस्तित्वांची, मांडणी केली आहे. प्रत्येक सूक्ष्मातिसूक्ष्म जीव, ज्याला जीवाणू असे संबोधता येईल, असा जीव हा सगुण, साकार, सविकार पृथक, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, अस्तित्व आहे. म्हणजेच परमात्म्याचे अंशस्वरूप परिपूर्ण, सत्य, अस्तित्व आहे. हे अस्तित्व अष्टधा प्रकृतीनेच बनले आहे. म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचतत्त्वे आणि सत्व, रज आणि तम, या तीन गुणांनी युक्त असून; त्यामुळे, त्याला सगुण, साकार, सविकार अस्तित्व प्राप्त असले; तरी त्याच्याठायी स्वसंवेद्य स्फुरण आहे. प्रत्येक जीव हा जीवात्मा आहे. त्याच्या ठायी जशी पृथ्वी अंतर्गत बद्धता आहे, त्याचबरोबर परमात्म्याचे परिपूर्ण गुणात्मक

असे अंशात्मक आत्मस्वरूप आहे. त्याच्या ठायी असलेल्या, या सर्व गुणात्मकतेसह, जीवात्मा आपले पृथक अस्तित्व अबाधित राखण्यासाठी, बद्धतेतील विकारात्मकतेने, सतत संघर्ष करीत असतो; तरी त्याला आत्मस्वरूप सद्-चिद्-आनंदस्वरूपाची ओढ असते. यामुळेच जीवात्म्याच्या ठायी बद्धतेने प्राप्त झालेला, अन्य बद्धरूपांशी, बाह्य स्वरूपातला संघर्ष असतो. त्याचप्रमाणे सद्-चिद्-आनंद नित्य, निजस्वरूप होण्यासाठीचा, स्वतःच्याच बद्धतेशी, अंतर ठायी संघर्ष असतो. अशा, अंतरबाह्य संघर्षात्मक, तात्कालिक, परिवर्तनात्मक, तरी अविनाशी स्वरूपात, पृथ्वीच्या बद्धतेत, जीवात्मा आपले पृथक तात्कालिक जीवन जगत असतो. परिपूर्णता आणि तात्कालिकता, यांचे अनुभवन, त्याच्या ठायी, मनोस्वरूपांतर्गत, स्वसंवेद्य स्फुरणात्मक प्रक्रिया घडवित असतात. जीवाची सगुणता आणि सविकारता त्यातून आविष्कृत होत असते.

पृथ्वीच्या कक्षेत, मानवी मनोस्वरूपाला, चार प्रकारचे जीवात्मे ज्ञात किंवा अनुभूत झाले आहेत. अर्थात, हे प्रकार, मानवी मनाने आपल्या आकलनानुसार केले आहेत. ते प्रकार- उद्भिज अर्थात जमिनीतून, अथवा तत्सदृश्य परिस्थिती प्राप्त जागेतून, उगवणारे. यात सर्व प्रकारच्या वनस्पती स्वरूपांची गणना होते. स्वेदज- घामापासून किंवा तत्सम परिस्थितीतून, जन्मास येणारे. उदा.- ढेकूण, उवा इ. प्रकार यात येतात. अंडज- अंडस्वरूपात जन्मास येऊन, त्यातून प्रकटणारे. यात पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी इ. प्रकार येतात. जारज- शारीरिक संभोगातून प्रकट होणारे प्राणी यात समाविष्ट होतात. द्विपाद, चतुष्पाद प्राणी इ. यातील स्वेदजांतील अपवाद वगळता, सर्व प्राणी उत्पन्न होण्याची प्रक्रिया, स्त्रीबीज आणि पुबीज यांच्या संयोगातून होते. हे सर्व प्राणी जलचर, भूचर, खेचर, उभयचर, सर्वचर अशा स्वरूपातही विचारात घेता येतात. याचा स्पष्ट अर्थ असा की; जीवात्म्यांची निर्मिती ही अंशपुंजांच्या संयोगातून होते. त्यामुळे जीवात्म्यांना समूहसापेक्षता, सामाजिकता असे जीवन स्वभावतःच प्राप्त असते.

या, चारही प्रकारच्या जीवात्म्यांची, एकत्रित अशी अंशपुंजात्मकता, माणसाने अनुभवली आहे. जीवात्मा हा आत्मरूप + स्वसंवेद्य स्फुरणात्मक मनोस्वरूप + अष्टधा प्रकृती यांनी बनलेला असतो. जीवात्म्यांचे जीवन तात्कालिक असते. म्हणजे त्यांना जन्म - वृद्धी व स्थैर्य - लय किंवा मृत्यू अशी नित्यबद्धता असतेच; तरी आत्मरूपाच्या स्वाभाविकतेनुसारची, नित्य अविनाशित्वाची, अनुभूती घेता येते. जीवात्म्यांच्या अंशपुंजात्मक जाती, प्रजाती, उपजाती, अशी पृथक

अनुभूती घेता येते. जीवात्म्यांना आहार, प्रजनन प्रक्रिया अर्थात मैथून, विश्रांती किंवा निद्रा. आणि तात्कालिक, बद्ध जीवात्म स्वरूपातील, सगुण, साकार, सविकार, पृथक अस्तित्वाच्या अबाधिततेच्या सुरक्षेचे भय असते. या चारही मूलभूत विकारांच्या, पूर्ततेसाठी त्याला सतत संघर्ष करावा लागतो. या संघर्षाचे, मुख्य कारण म्हणजे या चारही विकारांच्या संदर्भात, जीवात्म्यांचे परस्परावलंबित्व हे होय. 'जीवो जीवस्य जीवनम्' आणि 'सक्षम तो श्रेष्ठ' ही सूत्रे, त्याच्या जगण्याची सूत्रे झालेली असतात. याच विकाराधीन, त्याचे आत्मरूप स्वसंवेद्य स्फुरणदेखील सुरू असते. स्वसंवेद्य स्फुरण, त्याच्यातील आत्मरूप मनोस्वरूपाला, प्रवृत्ती, वासना, भावना यांच्या योगाने जीवात्म्याचा आकार देते. म्हणजे अर्जितबद्धता देते. ही अर्जितबद्धता देखील, जीवात्म्याच्या मनोस्वरूपाचा, स्वसंवेद्य आविष्कार असतो. या सर्व गोष्टींमुळे मानवी मनाला, सर्व प्रकारच्या जीवात्म्यांच्या जाती, प्रजाती, उपजाती त्यांतील सामाजिकता, वृत्तीप्रवृती, भावभावना, जीवनासाठी संघर्ष, यांचे आकलन घडते. प्रत्येक जीवात्म्याच्या अशा, अंशपुंजात्मक अवस्थेचे आकलन, माणसाने आणि काही प्रमाणात प्राण्यांनीही केले आहे; असे ज्ञात झाले आहे. उदा. मुंग्या, कळप करून राहणारे प्राणी, पक्ष्यांचे थवे इ. एकूण ही जीवसृष्टी परस्परांसाठी जीवनसाधन बनण्याची क्षमता राखून असते. आत्मस्वरूप असे मनोस्वरूप, हे जीवसृष्टीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. पंचतत्त्वात्मक, सगुण, साकार, सविकार; असे जीव अस्तित्व भोगतांना, पंचतत्त्वांचे अंतरबाह्य उपयोजन करीत जगणे; जीवाला अपरिहार्य असते. हवा, तेज, जल, पृथ्वीतत्त्व आणि आकाशतत्त्व, यांचे उपयोजन जीव स्वसापेक्षतेने करतो. पंचतत्त्वांसह जीवन जगतांना; सर्व जीवमात्रांचा, अपरिहार्य परिणाम, जीवांच्या शरीर आणि मन यांच्यावर प्रत्यही होतच असतो. यामुळेच पृथ्वी आपल्या कक्षेत, तिच्या अंतर्गत, भूतमात्रांसह स्वसंवेद्य स्फुरणस्वरूप, अस्तित्व भोगत असते; हे मानवी मनोस्वरूपाला संवेदित आहे.

पृथ्वीवरील भूतमात्रांच्या अंशपुंजात्मक अवस्थेत, मानवाचे अस्तित्व अगदी वेगळे आहे. हेही मानवी मनाला आकलित झाले आहे. पृथ्वीकक्षेतील सर्व भूतमात्रांना, उपयोजित करतांना; मानव त्यांचा उपयोग स्वसंवेद्य स्फुरणात्मक अशा, कल्पशक्तीने करतो. यासाठी माणसाची, मनोस्वरूप अर्थात आत्मस्वरूप, मनःशक्ती पूर्णपणे कार्यान्वित करण्याचा प्रयत्न, मानव, अंशपुंजात्मक मानवी समूहमनाने करतो. मानवाने स्वअर्जित केलेले ज्ञान; स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने,

वाणी आणि भौतिक स्वरूपात, स्वनिर्मित, साधनसामग्रींच्या स्वरूपात, आत्मभावाने सिद्ध केले आहे. या स्वअर्जन प्रक्रियेमुळे, मानवाने, मानवअर्जित असे, नवे वेगळे, मनोमयीविश्व, स्वअंशपुजाभोवती, निर्माण केले आहे. या निर्मित विश्वाला, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, कलात्मक, क्रीडात्मक, कृषीविषयक, युद्धकलाविषयक, आरोग्यविषयक, भविष्यविषयक, धर्म, नीती इ.विषयक, रूप देऊन; मानवी जीवनप्रणाली स्थापित केली आहे. अशी मानवी जीवनप्रणाली, मानवाच्या आत्मांश व आत्मअंशपुंजात्मक अवस्थांचे, अर्थात व्यक्ती आणि समष्टी जीवनाचे समग्र, नैतिक विश्वस्वरूपात व्यवस्थापन करते. या नैतिकविश्वांतर्गत मानवाचे अष्टधाप्राकृतिक जीवन; बद्धतेने, व्यवहार अर्थात कर्म करीत असते. या मनोमयी नैतिकविश्वाला, मानवाच्या मनोस्वरूपाने, अनादि अनुभवसंचिताने, सुविहित, तरी स्थलकालपरिस्थिती सापेक्ष स्वरूपात, मांडणीचे परिमाण दिले आहे. या नैतिकविश्वाचा इतिहास, वर्तमान व भविष्यविषयक कल्पही, मानवी मनोरूपाने स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वाभाविकतेसह अनुसरला आहे. हा मानवी जीवनप्रणाली प्रवास, समूहमनोस्वरूपातून, अर्थात लोकसाहित्यस्वरूपातून सिद्ध झाला आहे. शब्दब्रह्माने हे अवघे नैतिकविश्व; अनुभूत होणाऱ्या, अवघ्या अमानवी, अर्थात परमात्म तत्त्वांतर्गत, स्फुरीत होणाऱ्या विश्वावर, मानवाने विरोपित करून, मानवी विश्व अर्जितस्वरूपात, निर्माण केले आहे. यादृष्टीने पाहाता, परमात्म्याच्या निर्माण क्षमतेची परिपूर्ण शक्ती, मानवी मनोस्वरूपाला प्राप्त आहे. अनंत विश्वातील स्वसंवेद्य स्फुरण जसे स्वाभाविकतेने घडत आहे; त्याच स्वाभाविकतेने, मानवी मनोस्वरूपाचे स्फुरण घडत आहे. विश्वनिर्माता आणि विश्वशास्ता असे सामर्थ्य, मानवाच्या मनोस्वरूपाला प्राप्त झाले आहे. सद्-चिद्-आनंदस्वरूप परमात्म्याचे; निर्गुण, निराकार, निर्विकार स्वसंवेद्य आत्मरूप, अर्थात मनोस्वरूप, स्फुरणप्रक्रियेने भासमान झालेले अवघे विश्व, ह्या अवस्थेला, 'निसर्ग' असे किंवा 'प्रकृती' असे नाव दिले तर; मानवाच्या, मनोस्वरूप स्वसंवेद्य स्फुरणात्मक, प्रक्रियेतून हे मानवनिर्मित, कृत्रिम, प्रतिनैसर्गिक विश्व, निर्माण झाले आहे; असे म्हणता येईल. या नैतिकविश्वाची नाळ मात्र अपरिहार्य, अनिवार्यपणाने त्या नैसर्गिक विश्वाशीच जोडलेली आहे. म्हणूनच या नैतिकविश्वातही नित्यपरिवर्तनात्मक; तरी नैसर्गिक विश्वांतर्गतच, सगुण, साकार, सविकार अशी रूपे प्रकट होत आहेत. या नैतिकविश्वात मानवी लोकच्या मनोस्वरूपाने, जीवात्म स्वरूपातील आत्मांशपुंजात्मक अस्तित्वाला, अन्य जीवात्म

जीवनापेक्षा, वेगळे आकार दिले आहेत. म्हणजे मनोस्वरूपातील नैसर्गिक स्फुरणातून, जीवात्म्यांच्या ठिकाणी निर्माण झालेल्या स्त्रीबीज आणि पुबीज स्वरूपातील पृथकत्वाला, केवळ स्त्रीबीज आणि पुबीज एवढीच, प्रजननसापेक्ष, मर्यादित, नैसर्गिक संवेदना ठेवली नाही; तर संवेदनांनादेखील मानवी स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेत, कल्पित रूपे निर्माण केली. उदा. बहीण, भाऊ, काका, मामा, गुहक इ.इ. अशी संवेदनांची विविध रूपे नैतिकविश्वात तयार केली. नैतिकविश्वाची ही आगळी बद्धताही मानवी मनःशक्तीचे आगळे सामर्थ्य आहे.

मानवाच्या मनोस्वरूपातून प्रकट झालेले, है नैतिकविश्व, दोन भागात विस्तारले आहे. एक म्हणजे आत्मिक, अर्थात भावनात्मक कल्पनाविश्वात, तरी तर्कनिष्ठ प्रमाणांनी आणि संवेदनशीलतेने, प्रकटलेले नैतिक विश्व. यांत धर्म, नीती, तत्त्वज्ञान, न्यायशास्त्र, भाषाविज्ञान, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकसंबंधविज्ञान, लोकसाहित्य, दैवतकथाशास्त्र, कला, क्रीडा आदींचा विद्या व कला स्वरूपात समावेश होतो. दुसरा भाग हा भौतिक विज्ञानाचा प्राणीशास्त्रे, शरीरशास्त्र, आयुर्वेदरसायन, भौतिक पदार्थविज्ञान, गती, गुरुत्वाकर्षण, धातुशास्त्र, पाकशास्त्र, कृषीविज्ञान, स्थापत्यशास्त्र आदि शास्त्रांचा समावेश करता येतो.

योगविज्ञान किंवा ब्रह्मविज्ञा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शास्त्राचा, आयुर्वेद, भविष्य आणि कृषीविज्ञान यांसारखा विद्या व कलांचा, उभय विभागांचा एकत्रित विचार करता येईल, असा तिसरा विभाग करता येतो.

मानवी मनोस्वरूपाने निर्माण केलेले किंवा अर्जित केलेले, हे नैतिक विश्व, आत्मांशपुंजात्मक मानवजातीने एवढे स्वीकारले; की यातील अनेक शास्त्रेही माणसाला अपौरुषेय वाटू लागली. उदा. भाषाविज्ञान, भविष्य, आयुर्वेद, धर्मशास्त्र, वेदवाङ्मयासारखे शास्त्र, दैवतकथाशास्त्र इ. भौतिक विज्ञानाच्या दुसऱ्या भागात, मानव क्रमाक्रमाने, सतत बद्ध होत गेला आहे. मानवाला, भावनात्मक किंवा कल्पनात्मक भाग अव्यवहार्य, भ्रामक, अंधविश्वास स्वरूपातला वाटू लागला आहे. योगविज्ञान या ज्ञानपरंपरेने या दोन्ही भागांच्या संदर्भातील मनोस्वरूपता आकलित केली असून; विश्वनिर्मितीतील, मानवाचे आत्मांशपुंजकात्मक लोकअस्तित्व आणि मनोस्वरूपातील प्रत्यक्ष परमात्मतत्त्व, यांची जाणीव मानवी मनाला सतत करून दिली आहे.

पृथ्वीवरील मानवजातीची, वैशिष्ट्यपूर्णता, मानवाच्या स्वनिर्मित नैतिकविश्वामुळे सिद्ध झाली असली तरी; मानव या जीवात्म्याची, बद्धता कशी

अधिक विस्तारित झाली, याकडेही लक्ष वेधले.

मानव हादेखील; सद्-चिद्-आनंदस्वरूप, निर्गुण, निराकार, निर्विकार, स्वसंवेदित स्फुरणांसह, स्व अंतर्गत, बहु रूपांत नटलेले, बहु रूपांना स्वतःत सामाहूनही, सार्वकालिक, सर्वव्यापकतेने, बद्ध असलेल्या; परमात्मस्वरूपांतर्गत; एक आत्मपुंज व आत्मपुंजात्मकसमूह स्वरूपातील, आत्मस्वरूप मनोस्वरूप, असे सगुण, साकार, सविकार असे; स्वसंवेदित स्फुरणात्मक अस्तित्व आहे. हे लक्षात घेतले; तर त्याच्या जीवात्म स्वरूपाची बद्धता, श्रीमद्‌भगवद् गीतेतील 'पुरुषोत्तम योगा'प्रमाणे 'उर्ध्वमूल अधःशाक' स्वरूपात स्पष्ट करता येते. त्याच्या बद्धतेचे अनेक तट निर्माण होतात.

१) मानवी मनोस्वरूपाने स्वअर्जित स्वसंवेद्य स्फुरित अशी नैतिकविश्वातील स्वीकृत बद्धता.

२) जीवसृष्टीतील प्राणीमात्र स्वरूपातील शारीरिक व मानसिक बद्धता.

३) पृथ्वीवरील भूतमात्रांच्या समग्र साहचऱ्यासह आलेली, शारीरिक व मानसिक, तथा जन्ममृत्यू फेऱ्यातील अविनाशित्वाची असलेली बद्धता.

४) पृथ्वीसह सूर्यमाला आणि अंतरिक्षातील ग्रह, तारे, नक्षत्रे, आकाशगंगा आदि दृश्यअदृश्य अशा अस्तित्वांतर्गत, प्रभावित बद्धता.

या चारही स्तरावरील बद्धतेतील अस्तित्व हे सगुण, साकार, सविकार आणि अष्टधाप्राकृतिक स्वरूपासह; तरी स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मस्वरूपाने, मनोस्वरूपात संवेदित होणारे असते. स्वाभाविकपणे सद्-चिद्-आनंदस्वरूप, निर्गुण, निराकार, निर्विकार सार्वकालिक, सर्वव्यापक केवलतेची संवेदना; या परमात्मस्वरूपाशी असलेल्या जीवात्म्याच्या स्वरूपसंबंधामुळे जाणवत असते. या स्वरूपसंबंधामुळे बद्धतेतील, सच्चिदानंदमयतेला येणारी, तात्कालिक बाधिताही संवेदित होते. अविनाशित्वाच्या आत्मसंवेदनेने, परमात्मतत्त्वाची निर्गुण, निराकार, निर्विकार सार्वकालिक आणि सर्वव्यापक अस्तित्वाची, स्वसंवेद्य स्फुरक सद्-चिद्-आनंद स्वरूपता; अनुभवण्याची अर्थात बद्धतेतून मुक्ततेची तीव्रतर ओढही, मनोस्वरूपाला लागल्याचे सतत संवेदित होते. याचे कारण, तेच अविनाशी, स्वसंवेद्य, परमात्मस्वरूप, जीवात्मस्वरूपाने, मनोस्वरूप योगे, जीवात्मा अनुभवत असतो. तात्कालिकतेची, क्षणभंगुरतेची, अशाश्वततेची, बद्धरूपाला होणारी जाणीव आणि शाश्वताच्या अविनाशित्वाच्या, चिरंतनेच्या, सार्वकालिक आणि सर्वव्यापक मुक्ततेची जाणीव, अशी दुहेरी जाणीव जीवात्म्याला सतत होत जाते. त्याच्या

मनोस्वरूपाच्या ठायी, शाश्वत-अशाश्वताचा मूलभूत संघर्ष निर्माण होतो. त्याचबरोबर शाश्वत सत्य किंवा मुक्त अविनाशी निर्गुण निराकारता, निर्विकारता, हे अस्तित्व सत्य - चिद्‌मय - आनंदस्वरूप आहे. तेव्हढेच बद्धअशाश्वत जीवात्मस्वरूपदेखील, सत्य-चिद्‌मय-आनंदस्वरूप, तरी गुणात्मक, रूपबद्ध, सविकार असलेले. अस्तित्वही सत्यच होय; याची जाणीव जीवात्म्याला सतत होते. परमात्मा, नित्यपणे स्वसंवेद्यता स्फुरक - बहुरूपे नटून अस्तित्व भोगण्याचा, सच्चिदानंद, स्वतःच्या ठायी घेतो. म्हणजेच निरपेक्ष, कर्मवान असतो. तेव्हढ्याच नित्यपणे, बद्धतेतही, निरपेक्ष कर्मवान होण्याची, स्वसंवेद्य स्फुरकता जीवात्म्याच्या अर्थात जीवात्म्याच्या मनोस्वरूपात असते. हे त्या मनोस्वरूप अस्तित्व शक्तीचे द्विगुणित सामर्थ्य होय! परमात्मा-जीवात्मा संबंध स्वरूपसंबंध, हा असा, सच्चिदानंद अनुभूती द्विगुणित करणारा असल्याने, मानवी मनोस्वरूप प्राप्त नरदेहाची श्रेष्ठता, निर्गुण, निराकार, निर्विकार, परब्रह्मापेक्षा अधिक संवेदित होते. परमात्मा, सर्व भूतांच्या ठायी असतो. सर्व भूतमात्र परमात्म्याचा ठायी असतात, असे असूनही परमात्मा सार्वकालिक, सर्वव्यापक निर्गुण, निराकार, निर्विकारतेच्या बद्धतेत, स्वसंवेद्यतेने स्फुरत, अनंत रूपे सच्चिदानंदस्वरूप भोगतो. या परमात्म्याच्या गुणात्मकतेसह, पृथकस्वरूपता, बद्धपणाने अनुभवत, स्वसंवेद्यस्फुरण प्रक्रियेने, अविनाशी अनंताच्या, सच्चिदानंदस्वरूपाची अनुभूती, वास्तविक रूपाने जीवात्मा घेतो. हे नरदेहाचे परमात्मसिद्ध सामर्थ्य होय.

●●●

# १२. जीवात्मा – स्थितीगती – स्वरूपसंबंध

सार्वकालिक, सर्वव्यापक, निर्गुण, निराकार, निर्विकार, सच्चिदानंदस्वरूप, श्रीकृष्ण, अनंत, परमात्मा, महाशून्य, परब्रह्म, स्वसंवेद्य स्फुरक, असे अस्तित्व, नित्य आणि निजस्वरूप आहे. त्या अस्तित्वांतर्गत, तेच अस्तित्व, स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेमुळे, आत्मांश व आत्मांशपुंज स्वरूपाने, सतत, त्याच अस्तित्वाच्या, उपरोक्त, गुणात्मकतेसह, आत्मांश व आत्मांशपुंज यांचे संघटन, विघटन, पुनर्संघटन, संयोग, परिवर्तन, अशा प्रक्रियात्मकतेने नव्या-नव्या रूपांनी, बद्धपणे, सगुण, साकार, सविकार; तरी, स्वसंवेद्य स्फुरकतेने प्रकट होत आहे. सूक्ष्मातिसूक्ष्म अंशदेखील या प्रक्रियात्मक स्थितीगतीचा भाग असतो. या प्रक्रियेत प्रकट होतो. प्राकट्याच्या स्वाभाविक सगुण, साकार, सविकारतेने, प्रक्रियात्मक, पृथक अस्तित्व, सिद्ध आणि स्वात्मभावाने मिरवतो. प्रक्रियाप्राप्त, गतिमान, परिवर्तनशीलतेमुळे, त्याचा विलय, नव्या पृथक अस्तित्वात होतो. 'अंश' अस्तित्वाची किंवा अंशपुंजात्मक अस्तित्वाची, ही जन्म, जीवन, मृत्यू आणि पुन्हा, अन्य रूपात, प्रक्रियाप्राप्त परिवर्तनशीलतेने, जन्म, जीवन, मृत्यू... अशी स्थितीगती अनुभूत होते. हे सर्व परब्रह्म, परमात्मा या नित्य निजरूपाच्या ठिकाणी, त्याच्याच गुणात्मकतेने सुरू असल्याने; ते परमात्मतत्त्व, नित्य, अविनाशी स्वरूपात, या सर्व स्थितीगतीचे, स्वतःचेच ठिकाणी, कारण, परिवर्तन, परिणाम, या प्रक्रियेत समाविष्ट असूनही; केवळ निर्विकार, साक्षी, धारक आणि मारकही ठरते. ही सर्व प्रक्रिया, अविनाशित्वाने सुरू असल्याने, नित्य व सत्स्वरूप - चिद्स्वरूप, आनंदस्वरूप असते. या स्वरूपांतर्गत प्रकट होणारे, प्रत्येक पृथक अस्तित्व, हे स्वरूपसंबंधाने, त्यातच, अस्तित्वात असलेल्या, जडचेतन म्हणून, माणसाने आकलित केलेल्या गुणात्मकतेने, अनित्यता भोगतांनाही, पृथक अस्तित्वाची, परिपूर्णता स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने भोगत; ती परिपूर्णता प्राप्त होईपर्यंत, संघर्षात्मकतेने, पृथकत्व सांभाळण्याचा अभ्यास, स्वाभाविक स्वरूपसंबंधाने, मनोस्वरूपाच्या योगाने करू शकते. पृथक अस्तित्वाच्या परिपूर्ण स्वरूपसंबंधात्मक अस्तित्वाच्या, सच्चिदानंदस्वरूप लक्ष्यी,

स्वाभाविक जीवन संघर्षात, त्याचे मनोस्वरूपत्व अति महत्त्वाचे असते. या मनोस्वरूपाचा स्वरूपसंबंध, परब्रह्म निजरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरक मनोस्वरूपाशी असतो. त्यामुळे निजस्वरूपाच्या ठिकाणी असलेली मनोस्वरूपाची, सत्य अवस्था हीच, पृथक अंशरूपाच्या, मनोस्वरूपाचीही असते; हे जीवात्म्याच्या स्थितीगतीचा विचार समजावून घेतांना लक्षात घेतले पाहिजे.

माणसाला त्याच्या पंचज्ञानेंद्रियांना आणि मनोस्वरूपाला संवेदित होणारी, समग्र सृष्टीतील, प्रत्येक पृथक अस्तित्व प्राप्त अवस्था; मग ती केवळ अंशात्मक असो की अंशपुंजात्मक असो, ती एकल असो की समूहात्मक असो, ती निजस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वाभाविक प्रक्रियेचा एक भाग असते. ती प्रत्येक अवस्था, स्वतःच्या कक्षेत, अन्य पृथकांच्या स्वरूपसंबंध कक्षेत, निजस्वरूप अंतर्गत, 'पुनरपि जननम् पुनरपि मरणं' या प्रक्रियेचा भाग असते. परिवर्तनात्मक प्रक्रियेअंतर्गत, रूपभिन्नता व अस्तित्वभिन्नता जाणवते इतकेच. तसेच त्या पृथकअस्तित्वाचे, पार्थिव+आत्मिक असे एकत्र सगुण, साकार, सविकार रूप असतेच. ही सर्व अस्तित्वे, स्फुरक, परिवर्तनात्मक, अविनाशी आणि अंततः आणि वस्तुतः स्वात्मबद्धता आणि निजस्वरूप, सार्वकालिक, सर्वव्यापक संवेदन, अपरिहार्यपणाने भोगत असतात.

या सर्व प्रक्रियेच्या अंतर्गत, पृथ्वीवरील जीवात्म्यांपैकी, मानवी जीवात्मा, या आत्मांशपुंजात्मक, समूहस्वरूप अस्तित्वाचे, परिपूर्ण सत्य, स्वसंवेद्य स्फुरक, मनोस्वरूप सामर्थ्य, मानवी मनोस्वरूपाला संवेदित झाले. त्यामुळेच मानवी मनोस्वरूपाने, स्वअस्तित्वाभोवती, नैतिकविश्वाचा, परिवर्तनशील, प्रक्रियात्मक, तरी स्वसिद्ध असा, कल्प मांडला. त्या नैतिकविश्वाच्या बद्धतेत, 'विश्वाचा शास्ता', असे निजस्वरूपाचे सामर्थ्य, स्वात्मभावाने सिद्ध केले. या समस्त प्रक्रियेचा स्वरूपसंबंध लक्षात घेतला की, मानवाने स्वतःभोवती निर्माण केलेला, नैतिकविश्वाचा कल्पकोश, निजस्वरूपाच्या स्वाभाविकतेने, सत्यतेच्या कसोटीवर उतरतो. हेच मानवी जीवात्म्याचे अनन्यसाधारण सामर्थ्य होय.

परमात्मस्वरूपाच्या ठायी असलेल्या, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेच्या अंतर्गत, स्फुरलेल्या प्रत्येक परमात्मांशाला, म्हणजेच अंशरूपाला, पृथक अस्तित्व प्राप्त झाले आहे. हे पृथक अस्तित्व, स्फुरण प्रक्रियेमुळे, ठायीच स्वसंवेद्य स्फुरण स्वभाव अनुभवत असते. या अंशस्वरूप पृथक अस्तित्वाला, जडचेतन स्वरूपात, स्फुरणाची, अपरिहार्य आणि अनिवार्य गती प्राप्त आहे. हे पृथक अस्तित्व,

परमात्म्याच्या स्फुरणप्रक्रियेच्या अंतर्गत, नित्य परिवर्तन प्रक्रिया अनुभवते. अंशस्वरूप पृथक अस्तित्वाची, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियाही स्वाभाविकपणे सुरू असते. यामुळे या अंशस्वरूप, पृथकत्वाला परमात्म्याची सार्वकालिक सर्वव्यापक अशी, स्थितीगती आणि स्वतःतील स्थितीगती, अशा द्विविध स्थितीगतीयुक्ततेने, परमात्म्याच्या सार्वकालिक, सर्वव्यापक बद्धतेसह, स्वप्राप्तबद्धतेने, प्रवासावे लागते. परमात्म्याची स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रिया ही, अंशात्मक पृथकत्वाला नियमित स्थितीगती देत असते. यालाच परमात्म्याची नियती किंवा विधिलिखित म्हणतात.

अंशस्वरूपाचे; स्वाभाविक, स्वसंवेद्य स्फुरणप्रक्रियेने, प्रकट झालेले पृथक अस्तित्व, उत्पत्ती, स्थिती आणि लय या क्रमाने, पृथक अस्तित्व म्हणून भोगतांना, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेने हे पृथक अस्तित्व सांभाळण्यासाठी, अस्तित्वाला स्वयंप्रेरित आणि बाह्य, अन्य अंशअस्तित्वांच्या, नियतीयुक्त विळख्यात सापेक्ष असे, वळण देण्याचा, स्वमनोस्वरूपाने प्रयत्न करते. पृथक अस्तित्वाची जन्म होण्याची प्रक्रिया, जीवनाची परिवर्तनात्मक विलयलक्ष्यी गतिमानता, विलयप्रक्रिया आणि परिवर्तनात्मक पुनर्भिन्नरूपात्मक पृथक अस्तित्व प्राकट्य अशी भ्रमंती, अनादीअनंतपणे, अविनाशी अशा सार्वकालिक, सर्वव्यापक, सच्चिदानंदस्वरूप बद्धतेत, पृथकत्वाच्या बद्धतेसह, सुरू असते. पृथक अस्तित्वाच्या जन्म, जीवन आणि मृत्यू, या गतिमान प्रक्रियात्मक पृथकत्वाला, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेने, आपल्या समग्र अंतरबाह्य अस्तित्वाचे अनुभवन घडत असते. हे अनुभवन कोणत्या प्रकारे संवेदनेच्या कोणत्या स्वरूपात स्वीकारायचे याचा निर्णय त्या त्या क्षणी घेण्याचे स्वातंत्र्य स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेने मिळते. या स्वातंत्र्याने सच्चिदानंदस्वरूप परमात्म्याच्या, स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेअंतर्गत, आत्मस्वरूप, मनोस्वरूपाने जगण्याचे लक्ष्य ठेवून; आनंदमयतेच्या लीलेचे वळण, आपल्या जीवनप्रक्रियेला, लावायचे की; पृथकत्वाच्या स्वसंवेद्य स्फुरक जाणिवेने, पृथकत्वालाच मिरवत, पृथक अस्तित्वाच्या, अहंकाराचे वळण लावायचे; याचा निर्णय मनोस्वरूपला घेण्याचे, हे स्वातंत्र्य असते. पृथकत्व हे, सर्वव्यापक परमात्म्याच्या अंशात्मक स्वरूपात, सत्य, वास्तव आणि परिपूर्णच असते. त्यामुळे वरील दोन्ही प्रकारचे स्वातंत्र्यदेखील पृथकत्वाला भोगता येते. पहिल्या निर्णयात परमात्मसापेक्षता असते; तर दुसऱ्या निर्णयात, पृथकत्वसापेक्षता असते. दोन्ही प्रकारच्या निर्णयप्रक्रियेत, केवळ निर्णय घेणेच स्वाधीन असल्याने; त्या निर्णयाप्रमाणे, जन्म, जीवन आणि मृत्यू, या अवस्थांनी पृथकत्व बद्धतेत, जीवन संघर्ष किंवा अस्तित्वासाठी संघर्ष अटळ असतो. हा संघर्ष 'अंश' अस्तित्वाने पृथकत्वाच्या आकांताने, म्हणजे,

अस्तित्वाच्या समग्रतेने, करावयाचा असतो. अशा संघर्षानेच स्वभावतः सत्य, वास्तव, परिपूर्णता भोगता येते.

निर्णयाचे साफल्य प्रयत्नांवर अवलंबून असते. या प्रयत्नात्मक संघर्षाला बाधित, रोधित किंवा विफल करणारे, असंख्य घटक, नियती आणि पृथकत्व अस्तित्वाच्या गतिमानतेत, कार्यान्वित असतात. हे शत्रूघटक जडचेतन अशा, भावात्मक व पदार्थात्मक अशा, दोन्ही स्वरूपात उपस्थित असतात. या संघर्षात्मकतेने लाभलेल्या, नियत गतीने, पृथक अस्तित्वाची, अस्तित्व प्रक्रिया, प्रकटणे, मिरवणे, परिवर्तीत होणे, या चक्रनेमिक्रमात सुरू असते. परमात्म्याच्या निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, नित्य, अविनाशी, नियमित प्रक्रियेचा, परिणाम म्हणजे पृथक अस्तित्वाचे अंशात्म, सत्य, परिपूर्ण स्वसंवेद्य स्फुरक प्रकटणे आणि परिवर्तीत होणे सुरूच असते. पृथक अस्तित्वाला 'असणे' ही सत्य, वास्तव अशी अवस्था स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने भोगावीच लागते. या प्रक्रियेला अगणित ब्रह्मांडातील कोणतेही जडचेतन अस्तित्व, सूक्ष्म किंवा जगड्व्याल अस्तित्व, अपवाद नाही! म्हणूनच, पृथ्वीवरील, कोणतेही जडचेतन अस्तित्व, अपवाद नाही. त्यातील एक अस्तित्व म्हणजे अंशपुंजात्मक मानव किंवा अंशपुंजात्मक मानवी समूह होय. माणसाला, या प्रक्रियेत, आनंदलक्ष्यीपणाने, जीवन व्यतित करायचे असते. त्यामुळे जन्मपूर्व, जन्मजीवन, मृत्यू आणि मरणोत्तर या अवस्थांचा विचार, मानवी पृथकत्वाच्या दृष्टीने, त्यानेच निर्माण केलेल्या, नैतिकविश्वांतर्गत आवश्यक ठरतो. माऊली ज्ञानेश्वरांनी, श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील पंधराव्या अध्यायावर, केलेले विवेचन, या दृष्टीने सूचक आहे.

मानवी पृथक अस्तित्वाची जन्मप्रक्रिया समजावून घेणे आवश्यक आहे. परमात्मस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेअंर्तगत, घडणाऱ्या परिवर्तनात्मक, नित्य गतिमान, प्रचलनाचा भाग म्हणून; एखादा पार्थिव मुक्त आत्मांश या गतिमानतेत, परिवर्तनाचा अपरिहार्य भाग म्हणून नव्या पार्थिवाकडे खेचला जात असतो. मानवी जन्माच्या दृष्टीने विचार केला तर; विविध जीवात्म्यांपैकी; म्हणजे; उद्‌भिज, स्वेदज, अंडज, जारज यांपैकी कोणताही पार्थिव मुक्तआत्मांश असू शकतो किंवा मानवी जीवनातून पार्थिव मुक्तआत्मांश असू शकतो किंवा स्वसंवेद्य स्फुरणातून अन्य, अलिप्त आत्मांशही असू शकतो. यापैकी कोणत्यातरी स्वरूपातील आत्मांश मानवी फलनप्रसंगी, स्वाभाविक प्रक्रियेमुळे खेचला जातो. याप्रसंगीदेखील,

खेचल्या जाणाऱ्या, आत्मांशाला पूर्वीच्या पृथकत्वाचे लिप्तपण असते. म्हणजे तो आत्मांश मनोस्वरूप असतो. त्याला हे खेचले जाणे, संघर्षात्मक ठरते. यांत निर्णय घेऊन; समाविष्ट होण्याला वाव असतो. त्याचबरोबर अनेक आत्मांश खेचले जाण्याची शक्यताही असते. यांतील एक आत्मांश, पूर्वीच्या पृथकत्वाच्या संचितासह जननप्रक्रियेत समाविष्ट होतो.

जीवात्म्यांची जननप्रक्रिया, स्त्रीबीज आणि पुबीज संयोग संपन्न असते. मानवी जीवात्म्याच्या बाबतीतही, स्वाभाविकपणे, आत्मपुंजात्मक पुरुष आणि आत्मपुंजात्मक स्त्री, यांच्यात होणाऱ्या जननप्रक्रियेत वरील पृथक आत्मांश खेचला जातो. या प्रक्रियेमुळे, या समाविष्ट आत्मांशाचे मानवी जीवात्मस्वरूपात प्रकट होतांना; तीन स्त्रोतातून, पूर्वपृथकत्वलिप्तता, त्या अंशात्मकतेत, संयोगित होते. आत्मांशाची पूर्वपृथकलिप्तता + स्त्रीची पूर्वपृथकलिप्तता + पुरुषाची पूर्वपृथकलिप्तता = फलित मानवी आत्मांश – जीवात्मा होय. जीवात्म्याच्या अस्तित्वक्षणापासूनच, जन्माला येणाऱ्या, जीवात्म्याच्या, जीवनप्रणालीविषयीच्या, इच्छा, आकांक्षा, अपेक्षा, आदर्श, यांविषयीच्या आग्रही सूचना येऊ लागतात. अस्तित्वक्षणापासून, गर्भ स्वसंवेद्य स्फुरणात्म जीवनाला सुरुवात करीत असतो; याचे आकलन, मानवी मनोस्वरूपाला लाखो वर्षांच्या अनुभवांतून असते. या कारणामुळे गर्भ ज्या मातापित्याच्या योगाने, जन्माला येणार असतो; त्या उभयतांच्या नैतिकविश्वाचा कोश, गर्भाभोवती निर्माण होऊ लागतो. लाखो वर्षांच्या अनुभवसंचितासह, परिवर्तनशील प्रणालीस्वरूपातील, नैतिकविश्वातून, जीवनप्रणालीविषयी, संदेशन गर्भापर्यंत पोचते. प्रणालीमध्ये, हेतुपूर्वकदेखील असे संदेशन गर्भापर्यंत पोहोचविता येते किंवा स्वाभाविक सहवासातूनही काही संदेशन गर्भापर्यंत पोचते. जन्मक्षणापर्यंतच्या कालावधीत आत्मांशस्वरूपातील, गर्भाचे मनोस्वरूप, नैतिकविश्वाशी तथा पूर्वलिप्तपणे संवादी होऊ शकते. संवादी होऊ शकते असे म्हणण्याचे कारण स्पष्ट आहे; की जन्मास येणारा अंशात्मा, हा स्वरूपसंबंध स्वरूपात, सत्य, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरक असतो. त्यामुळे मानवी मनोस्वरूप निर्मित, नैतिकविश्वाला वळण लावण्याची क्षमताही त्यात असते. जन्मक्षणी नवजात गर्भ, असा, स्वपूर्वपृथकत्व + माता + पिता + गर्भसंस्कार = नवजात अर्भक, अशा स्वरूपात प्रकटतो.

उपजतच, मानवी जीवात्म्याच्या ठायी, उपरोक्त तीनही स्त्रोतातून आणि गर्भसंस्कारातून; प्राण्याचे मूलभूत विकार, अर्थात आहार, निद्रा, भय आणि

मैथून, त्रिगुण – सत्व, रज, तम, त्रिविधा प्रकृती – वात, पित्त, कफ; विविध सहज प्रवृत्ती – उदा. संचय, क्रीडा इ. विविध वासना किंवा इच्छा – उदा. काम, क्रोध, लोभ, मोह, भूक इ. भावना – उदा. वत्सल, भक्ती, प्रेम, सहानुभूती, दया, क्षमा, शांती इ. अशा स्वरूपातील, भावाशय निर्माण झालेला असतो. यातूनच अर्भकाचा स्वभाव निर्माण होतो. या भावाशयाने, अर्भकाच्या जीवात्म्याला मनोस्वरूपता येते. या प्राप्त, विकारित तथा संस्कारित मनोस्वरूपाचे प्राकट्य, अर्भकाच्या भावानुभाव स्वरूप हावभाव प्राकट्यातून घडत असतांनाच, त्याच्या या जैविक अवस्थेला, मातापिता व भोवतीच्या आत्मांशपुंजात्मक लोक जीवनप्रणालीतून वाणी स्पर्श होतो. शब्दस्फोट, उच्चार आणि भावाविष्कारी शब्दसमुदाय, वाक्यांश, वाक्ये या क्रमाने, जीवात्मा मनोस्वरूपपणाने, वाणीतून आविष्कृत होतो. त्याच्या या शैशवावस्थेपासूनच, भोवतीच्या मानवी मनोस्वरूपातून, लाखो वर्षांच्या परंपरांतून, सतत परिवर्तन, परंपरा, यातून नियमित होत राहिलेल्या; जीवनप्रणालीतील, सर्व घटकांचा अर्थात सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, न्याय, कला, शास्त्रे, भाषा, व्यवहार, कुटुंब, जात, धर्म, पंथ इ. जे म्हणून घटक असतील, त्या सर्व घटकांचा, आघात मनोस्वरूपावर होऊ लागतो. या सर्व गदारोळात, त्या जीवात्म्यांच्या जन्मपूर्व स्त्रोतातून, उपजत आलेली, स्वभाववैशिष्ट्ये आणि त्याच्या ठायीच्या आत्माअंशस्वरूपाची, स्वसंवेद्य स्फुरकता, यांच्या एकत्रित आधाराने, जीवात्मा, समूहजीवनातही स्वात्मभावाने, स्वयंनिर्णयात्मक प्रक्रियेसह, जीवनप्रणाली सिद्ध व सापेक्ष सफल करण्यासाठी, अंतरबाह्य संघर्ष मांडतो. हा संघर्ष तीन प्रकाराने, पूर्वसंचिताच्या स्त्रोतांसह व त्यामुळेच सुरू असतो. एक म्हणजे, आत्मस्वरूप योगाने, स्वाभाविक असा, सच्चिदानंदस्वरूप लक्ष्यी, जीवनमार्ग अनुसरण्यासाठी, दुसरा प्रकार म्हणजे, जीवात्म्याच्या पृथकत्वाच्या नैतिकविश्वातील स्वात्मप्रतिष्ठेसाठीचा संघर्ष होय. तिसरा प्रकार म्हणजे, दोन्ही प्रकारांचा समतोल साधत, जीवनमार्ग प्रशस्त करण्यासाठीचा संघर्ष. अर्थातच या तीनही प्रकारचा संघर्ष, जीवात्मसापेक्ष असतो. म्हणजे समूहजीवनात प्राप्त नरदेहस्वरूप जीवात्म्याच्या स्वकर्म साफल्यासाठीचा संघर्ष होय.

मानवी जीवात्मा, जीव अर्थात जैविक देह स्वरूपात, पूर्णविकसित झाल्यानंतर, या जीवनसंघर्षाचे, तीव्र, निकराचे असे वास्तव दृश्यस्वरूप प्रकटते. असे असले तरी; या प्राकट्याविषयीची चाहूल बालवयातच लागते. एव्हढेच नव्हे तर शैशव आणि बाल्यावस्थेतील, नैतिकविश्वामधील प्रणालींमधून, हेतुपूर्वक,

संस्कार करण्याचा प्रयत्न होत असतो. त्या प्रयत्नांचा परिणामही, त्या त्या समूहप्रणाली सापेक्षतेने, दोन्ही बाजूंनी, म्हणजे जीवात्म्याचे पृथकत्व आणि प्रणालीचा व्यूह, या दोन्ही बाजूंनी घडलेला पाहावयास मिळतो.

नैतिकविश्वातील, संस्कृतिसापेक्ष, आग्रही संघमन आणि नैतिकविश्वाच्या मांडणीची नियमितता; स्वैरपणे, विद्रोहीपणे झुगारून; हव्या त्या प्रकारची, प्रणाली मांडण्याचा प्रयत्न करणारे संघमन, या दोन्ही प्रकारांमधून, जीवात्म्याच्या मनोस्वरूपाला, वळण लावण्याचा प्रयत्न होत असतो. मानवी नैतिकविश्वात, ढोबळमानाने चांगले वळण आणि वाईट वळण अशी नावे, सापेक्षतेने, या प्रयत्नांना दिली जातात. एकंदर मानवी मनोस्वरूपाने, अर्जित केलेल्या आणि मांडणी केलेल्या, नैतिकविश्वात, आत्मांशपुंजसमूह स्वरूपात, बद्धपणे, जीवनप्रणाली किंवा मार्गक्रमण करणाऱ्या पृथकस्वरूपात किंवा समूहस्वरूपात, या प्रयत्नसिद्ध परिणामयुक्त हे जीवात्मे अनुभवता येतात.

या प्रयत्नसापेक्ष जीवनप्रणाली शोधनप्रक्रियेत, जीवात्म्याच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक, आत्मस्वरूप, मनोस्वरूपामुळे; जीवात्म्याच्या ठायी, मुळात असलेले, सत्य, परिपूर्ण, आत्मस्वरूप अस्तित्व, संवेदित होऊन; त्या स्वात्मभावाने, प्राप्त अशा, पृथ्वी व पर्यावरण, जीवदशा आणि नैतिकविश्व यांत बद्ध असलेला जीवात्मा, स्वात्मनिष्ठेने, स्वतःतील सत्य पूर्णत्वाचे जागरण करीत, केवळ क्रीडात्मकतेने, निरपेक्ष सत्यनिष्ठेने प्राप्त असे कर्म अनुसरत, जीवनसफलतेचा; वस्तुतः प्रत्येक जीवात्म्याला, स्वाभाविकपणे अनुसरता येईल असा पाठ; स्वात्मरूपाने मंडित करतो.

वैश्विक, मानवी नैतिकविश्वाच्या पसाऱ्यात, नैतिकविश्वाच्या संदर्भात आणि पृथ्वीकक्षेतील नैसर्गिकविश्वाच्या पसाऱ्यात, विविध प्रकारची, चांगली, वाईट, मध्यम, विकृत अशी व्यक्तिमत्त्वे, पाहावयास मिळतात. तसेच विविध प्रकारचे मानवी समूह पाहावयास मिळतात. जात, वर्ण, पंथ, धर्म, मतप्रवाह, यांचे अक्षरशः असंख्य मानवी समूह, पाहावयास मिळतात. मानवी नैतिकविश्वांतर्गत, मानवी जीवनसारणीला मार्गदर्शन करणारे, आधार देणारे, सांभाळ करणारे, विकसित सारणीस्वरूपाचा आकार देणारे, परंपरा, नवता, यांचा पुरस्कार करीत; जीवनाचे धुरिणत्व, सहानुभूतीपूर्वक कळवळ्याने करणारे; ऋषी, मुनी, तपस्वी, सिद्ध, अवलिया, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, शास्त्रे, चिंतक, विचारवंत, कवी, लेखक, कलावंत स्वरूपातील, समाजधुरिण जसे कार्यरत दिसतात; तसेच याच स्वरूपात छद्मतेने,

दांभिकतेने, शोषकतेने मानवी जीवनाची नागवणूक करणारेही दिसतात. अशी दोन्ही प्रकारची व्यक्तिमत्त्वे कुटुंबसंस्थेपासून जात, समाज, गल्ली, गाव, प्रदेश, पंथ, मतप्रणाली, धर्मसारणी, राष्ट्रसारणी, या व अशा सर्व प्रकारच्या संस्थात्मक, मानवी मनोस्वरूप निर्मित, नैतिकविश्वाच्या प्रणालीत, मानवी जीवनप्रणालींचे शोषक म्हणून, वावरत असतात. जीवनप्रणालीतील सर्व संस्थात्मक व्यवहार व व्यवसायांमध्ये, अशा मानवी व्यक्तिमत्त्वांचा वावर सरसहा आढळतो. अनेकदा ज्याला आपण नैतिकविश्व असे म्हणत आहोत; त्याची नैतिकता पूर्णतः बाधित झाली किंवा काय; असे प्रश्न नैतिकविश्वाला पडतात. नैतिकविश्वाच्या प्रणालींप्रमाणे, सापेक्षतेने ज्या वर्तनाला शिष्टाचार किंवा या वर्तनाला भ्रष्टाचार म्हणतात. अशा वर्तनप्रणालींविषयी, परिवर्तनात्मक प्रश्नांचे मोहोळ उठते. प्रत्येक, पृथक, आत्मांशस्वरूप जीवात्मा आणि तत्सम आत्मांशपुंजस्वरूप समूह, आपापल्या स्वीकृत किंवा उपयोजित वर्तनप्रणालीची, उपयुक्तता, योग्यता यांचा साभिनिवेश, स्वात्मभाव मिरवीत असतो. या अशा प्रणालींचा एकूण मानवी जीवनाच्या धारणेवर, म्हणजे मानवतेवर, अर्थात सर्वात्मप्रेमभावी समायोजक प्रणालीवर, परिणाम होऊन; चांगलेवाईट प्रवाह पुष्ट होत होत, अवघे नैतिकविश्व बाधित करतात.

या सर्व पसाऱ्यात प्रत्येक मानवी जीवात्मा हा सत्य, परिपूर्ण, स्वसंवेद्य स्फुरणात्मक, परत्मांशासहच प्रकट असतो. त्याचे हे आत्मरूप, या जीवदेशेतील, पिंडाधीन वासनात्मकतेने झाकोळते. ते झाकोळपण काढून टाकण्याचे मोठे आव्हान, जीवात्म्याच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत जीवनात, मोठा संघर्ष निर्माण करते. या संघर्षाचे परिणाम, पृथक अस्तित्वप्राप्तीच्या एका जीवदशेपासून, परिवर्तन प्रक्रियेत अन्य जीवदशेचा स्वीकार होईपर्यंत राहातो. वास्तविक जीवात्म्याला त्याच्या ठायी असलेल्या सच्चिदानंदस्वरूप अंशात्मकतेचे आणि त्याच्या स्वसंवेद्य स्फुरक स्वभावाचे, अर्थात आत्मस्वरूप अशा मनोस्वरूपाचे, भान आले तर, तो जीवात्मा, प्राप्त प्रणालीतही, प्राप्त कर्म सत्यनिष्ठेने अलिप्ततेने करून; स्वतःबरोबर समूहालाही आनंदकारक आणि आदर्शभूत ठरू शकतो. हे आत्मस्वरूप असे मनोस्वरूप, हेच तर त्याचे परमात्मअंशात्मक सत्य, परिपूर्ण अस्तित्व असते. ह्यातच निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक अशा परमात्म्याच्या, स्वसंवेद्य, स्फुरणात्मक, क्रीडेच्या, अर्थात लीलेच्या 'सच्चिदानंदस्वरूपाचा', 'याचि देही याचि डोळा परब्रह्मसुखसोहळा' अनुभूतीचा आत्मसाक्षात्कार असतो. बद्ध

अवस्थेतील बद्धजीवदशेने पंचमहाभूतात्मक जीवाला, भूतस्वभावांच्या, स्वाभाविक गुणधर्मांप्रमाणे, सगुण, साकार, सविकार, त्रिगुणात्मकता येते. आत्मरूप या बद्धतेसह वावरू लागते. मानवी जीवात्म्यांनी स्वतःच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक, आत्मस्वरूपाच्या मनोस्वरूप योगाने निर्माण केलेल्या नैतिक विश्वात, या बद्धपणाला, बद्धपणाचा अहंकार जडतो. आत्मस्वरूपाच्या निखळ सत्यस्वरूपाला पारखे होऊन; बद्धसत्यतेला अनुसरण्यातच धन्यता मानतांना; बद्धतेचे, मर्त्य, परिवर्तनात्मक, असे स्वाभाविक अवस्थांतरण विसरतो. जो आत्मांश प्रक्रियेतही आत्मस्वरूप, मनोस्वरूपाने, नैतिकविश्वात प्राप्त कर्म करीत; सत्यनिष्ठेने अर्थात सहानुभूतीने किंवा सर्वात्मकतेने जगतो, तो जीवनमुक्त ठरतो.

परमात्म्याच्या स्वसंवेद्यस्फुरण प्रक्रियेत, आत्मांशस्फुरण, आत्मांशपुंजस्वरूप संघटित स्फुरण, अपरिहार्य असते. या स्फुरणाला, स्फुरणाची गती मिळालेली असते. स्फुरणप्रक्रियेप्रमाणेच, ती गती अपरिहार्य व नित्य असते. अंशात्म किंवा अत्मांशपुंज पृथकपण, म्हणजे बद्ध अस्तित्वाला जन्म व नियतीनुसार, गती आणि परिवर्तन नित्य असते. पृथक अस्तित्वाला मर्त्यता किंवा विलयता हीदेखील अपरिहार्य व नित्य असते. पृथक अस्तित्व, परमात्म्याच्या अंशात्म किंवा अशांत्मपुंज स्वरूप असल्याने; हे पृथक अस्तित्व सत्य आणि स्वसंवेद्य स्फुरक असते. या पृथकत्वातील, स्वाभाविक स्फुरण प्रक्रियेतील गती आणि परिवर्तनदेखील अपरिहार्य असते. म्हणजे परमात्म्याच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक गती+ पृथक अवस्थेतील स्वसंवेद्य स्फुरणात्मक गती = पृथकअस्तित्वाची द्विविध गतिमानता. अर्थातच परिवर्तनात्मक प्रक्रिया या द्विविधतेतून घडते. मानवी जीवात्मा या प्रक्रियेला अपवाद नाही. मानवी जीवात्म्याचे वेगळेपण त्याच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक आत्मरूप स्वसंवेद्यतेने निर्माण केलेल्या नैतिकविश्वातील अस्तित्व असे आहे. म्हणजे मानवी आत्मांश किंवा आत्मांशपुंजसमूह यांचे बद्ध अस्तित्व, तीन पातळीवर, परिवर्तन प्रक्रियेत गतिमान असते. सर्वच पृथक अस्तित्वांना आणि विशेषतः जीवात्म्यांना मनोस्वरूपाच्या ठिकाणी, निर्णय घेण्याची, स्वाभाविक स्फुरक शक्ती प्राप्त आहे. त्यामुळे मानवी आत्मांश किंवा आत्मांशपुंज समूह, नैतिकविश्वांतर्गत बद्धतेसह, जीवबद्धतेविषयी, निर्णय घेण्याची पात्रता, गतिमानता आणि परिवर्तन, ही गुणात्मकता या प्रक्रियेतदेखील राखून असतो. मानवी जीवात्म्यांच्या बाबतीतही, ही निर्णयप्रक्रिया, नियतीच्या गतिमान, परिवर्तनात्मक प्रक्रियेशी, संघर्षात्मक जीवनप्रणाली अनुभवते. मृत्यूपर्यंत किंवा विलयापर्यंत, या प्रक्रियेत मानवी जीवात्म्यास, नैतिकविश्वातील

बद्धतेच्या अंतर्गत, जीवात्म्याच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने, स्वतःचे सगुण, साकार, सविकार, स्वरूप स्वयंनिर्णयाने घडविण्याची क्षमता प्राप्त होते.

या मानवी जीवात्म्याच्या वैशिष्ट्यपूर्ण, प्रक्रियात्मक, जीवनप्रणालीचे परिणाम, जन्मपूर्व अवस्था, जीवन अवस्था, यांवर जसे दिसतात; तसेच मृत्यूसमयी आणि मरणोत्तर, नव्या परिवर्तनातदेखील दिसतात; याचे आकलनही, मानवी मनोस्वरूपाला, सत्यतेच्या कसोटीवर झाले आहे. मानवी जीवनप्रणालीला, नैतिकविश्वाचा इतिहास निर्माण करता आला आहे. याच सामर्थ्याने मानवी मनोस्वरूपाने, स्वतःतील, व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर, परमात्मांश स्वरूपाच्या स्वरूप सामर्थ्यत्वाचा उपयोग, नियतीलाही नैतिकविश्वाचे वळण लावण्यासाठी केला आहे. निदान तसा प्रयत्न केला आहे. त्याने नैतिकविश्वाच्या स्वरूपात निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक अशा स्वसंवेद्य स्फुरणात्मक, सच्चिदानंदस्वरूप परमात्म्याचा, स्वतःच्या जीवात्मस्वरूप बद्ध अस्तित्वात, स्वात्मभावाने अनुभव घेऊन, स्थापित करून; स्वसंवेद्य स्फुरकतेने, आत्मरूपाचे उपयोजनही करण्याची प्रणाली, निर्माण केली आहे. ब्रह्मविद्या किंवा योगविद्या या नावाने, ही प्रणाली भारतीय परंपरेत सर्वश्रुत आहे. या प्रणालीने परमात्म्याच्या स्वसंवेद्य स्फुरणात्मक, सार्वकालिक व सर्वव्यापक, नित्य, नियमित बद्धतेवर प्रकाश पडला. त्याचबरोबर नैतिकविश्वाची मनोस्वरूप मांडणी करणाऱ्या, मानवी जीवात्म्यांच्या स्थितीगतीचा, स्वरूपसंबंधासह, दृष्ट अशा, सृष्टीशी असलेल्या संबंधांचा, सत्य, वास्तव स्वरूपात, पदार्थवैज्ञानिक आणि मनोवैज्ञानिक मांडणीसह, सत्यतेच्या कसोटीवर धांडोळा करता आला आहे. अभ्यासाने अनंतातील प्रत्येक गोष्ट, अनंत स्वरूप आत्मांशाला किंवा आत्मांशपुंजाला किंवा आत्मांशपुंजसमूहाला, आकलनकक्षेत आणून; प्रकट उपयोजित करणे शक्य झाले आहे. हेच परमात्म्याचे, सच्चिदानंदस्वरूप, आत्मस्वरूप संबंधाने प्रकटणे होय. या सर्व लक्षावधी वर्षांच्या प्रक्रियेमुळे, मानवी जीवात्म्यांच्या अस्तित्वांचा वस्तुनिष्ठ, श्रद्धापूर्ण, अभ्यास शक्य झाला आहे. हे मानवी मनोस्वरूपाचे सामर्थ्य, विश्वातील ऋषी, योगी, सिद्ध, अवतारस्वरूप, प्रेषितस्वरूप विभूतिमत्त्वांनी व्यवस्थातज्ज्ञ, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, कवी, लेखक, कलावंत आणि मानव यांनी, स्वात्मसामर्थ्याने सिद्ध केले आहे.

मानवी जीवात्म्यांच्या अस्तित्वाचा काल, वरील प्रक्रियेमुळे नियती आणि नैतिकविश्व यांशी, निगडित झाला. मानवी मनोरूपाने, स्वीकारलेली बद्धता, अर्थात वासनाबद्धता, त्याच्या अस्तित्वाचा काळ नियमित करण्याचा प्रयत्न

करतात. यावर मनोस्वरूपाच्या वासना, अर्थात इच्छाबद्धतेला, मनोस्वरूपाच्या नैतिकविश्वात्मक बद्धतेच्या त्यागाने, नियती नियोजित गतीशी आणि गतिबाह्य निर्गुण, निराकार, निर्विकार स्वसंवेद्य स्फुरणात्म अस्तित्वाशी मनोस्वरूपाला स्वरूप संबंध साधता येतो. या प्रक्रियेने पृथकत्वापासूनही मुक्तता मिळविता येते. यासाठीही मानवी मनोस्वरूपाने अभ्यासाद्वारे प्रणाली सिद्ध केली आहे. माणसाला परमात्म्याची प्रभुसत्ता स्वात्मभावाने अनुभवणे शक्य झाले आहे.

मानवी जीवात्म्याला, मृत्यू अटळ आहे, असे आपण म्हणतो आहोत. त्यावरही मानवी स्वरूपाने मात केली आहे. मानवी मनोस्वरूपाला देहबद्धता स्तंभित करून, देहबद्धता पार्थिवतः विसर्जित करून, भावात्मकतेने राखून, देहबद्धतः पार्थिवतः काही काळासाठी विसर्जित करून, प्राप्तबद्धतेत स्वीकृत, अपेक्षित मनोस्वरूपासह जीवनकाळ स्थिर करता येतो, हे अभ्यासाने सिद्ध केले आहे. भारतीय परंपरेतील ऋषीलोक, विशेष विभूतिमत्त्वे स्वतःच्या अभ्यासाने; वा अन्य अभ्यासक दिव्य विभूतिमत्त्वाच्या सहाय्याने, चिरंतनाचे अस्तित्व सांभाळण्याचा अभ्यास करीत असल्याविषयी अक्षरशः लक्षावधी उदाहरणे, भारतीय परंपरेच्या श्रुति, स्मृति, संहिता, पुराणे आदि ऐतिहासिक वाङ्मयात व मौखिक परंपरेत प्रसिद्ध आहेत. भारतीय परंपरेतील देव व दानव ही अस्तित्वे मानवी जीवात्म्यांच्या वरील अभ्यासप्रक्रियेचा भाग आहे, असे म्हणता येते. मानवी मनोस्वरूपांनी स्वसंवेद्य स्फुरणात्मकता निष्पन्न, ब्रह्मांडातील पंचतत्त्वांप्रमाणेच, त्रिदेव आणि त्रिशक्ती यांची स्वरूपे, बद्धपृथकस्वरूपात आकलित करून, उपयोजित करणे शक्य आहे. पृथ्वीसापेक्षतेने, ही अस्तित्वे कार्यान्वित केलेली दिसतात. मानवी मनोस्वरूपाच्या ठिकाणी, सत्य, परिपूर्ण अशा परमात्मा स्वरूपाचे, तेव्हढेच सत्य, परिपूर्ण अंशात्म किंवा अंशपुंजात्मक अस्तित्व आहे. तेही तेव्हढेच स्वसंवेद्य स्फुरक आहे. या त्याच्या आत्मस्वरूप मनोस्वरूपाला, नैतिकविश्वाच्या मांडणीसाठी, शक्तिमत्तांची स्वरूपमांडणी, तेव्हढीच उपयुक्त असल्याने, मनोस्वरूपाने अशा दिव्यशक्तिमत्तांना, मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरणाने, शक्तीस्वरूपांचे, कल्प योजून स्थापित केले आहे.

अभ्यासातून सिद्धस्वरूपात निर्मिलेली, अशी मनोस्वरूप अस्तित्वे, स्वात्मभावाने, चिरंतनासाठी, काही कालावधीसाठी, विशिष्ट प्रसंगी, नैतिकविश्वात प्रकट होऊन; आपल्या बद्ध, शाश्वत, दिव्य अशा विभूतिमत्त्वाची साक्ष देतात. तसेच कोणाही, आत्मांश व आत्मांशपुंजस्वरूपाला, उपयोजनासाठी, त्यांना आवाहित

करता येते. नैतिकविश्वाच्या स्थितीगतीवर, आत्मभावाने दृष्टी असलेली, अशी अस्तित्वे, आत्मांश वा आत्मपुंजात्मक समूहाला, साक्षीभूत होऊन कार्यान्वित करतात. एकप्रकारे निर्णयप्रक्रिया आणि यथासंभव नियतीला नियंत्रित करण्याचे कार्य, ह्या मानवी आत्मपुंजात्मक प्रणालीतूनच उदित झालेल्या, आणि अभ्यासातून सिद्ध झालेल्या, या विभूतिमत्त्वाकडून घडू लागते. अर्थात, परमात्म्याच्या स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेच्या अंतर्गत आणि त्या प्रक्रियेच्या परिवर्तनात्मक नित्यतेला वळण लावून, परमात्म्याच्या, स्वाभाविक, सार्वकालिक, सर्वव्यापक अशा सच्चिदानंद स्वरूपाचाच अनुसार करण्यासाठी, सत्य आणि परिपूर्ण स्वरूपातील, मनोस्वरूपनिर्मित, नैतिकविश्वातील, या विभूतिमत्त्वांकडून, असे वर्तन अर्थात प्राप्त कर्म घडत असते. जागतिक परंपरेत, अशा दिव्यविभूतिमत्त्वांची असंख्य उदाहरणे देता येतील. पृथ्वीकक्षेच्या मर्यादेत मानवाला हे ठामपणे अनुभवता येते.

साधित सिद्ध मनोस्वरूप शक्तींचा, नैतिकविश्वांतर्गत आत्मांश, आत्मांशपुंजस्वरूप समूह, निर्णयसामर्थ्याच्या योगाने स्वपृथकत्वाच्या बद्ध अवस्थेला, केंद्रस्थानी ठेवून स्वार्थपरतेने, वर्तन अवलंबितात, तेंव्हा त्या समूहाच्या नैतिकविश्वाला समूहमर्यादित, स्वार्थपरतेचे वळण लागते. त्या त्या समूहांचा विश्वाचे शास्ते बनण्याचा, असहिष्णूमनस्क प्रयत्न असतो. समूहाच्या नैतिकविश्वात अशा जीवनप्रणालींना आदर्श मानले जाते व सर्वात्मक सहिष्णूता लोप पावते. असे समूह किंवा त्यातील मानवी घटक व्यापक नैतिकविश्वातील प्रणालींचा स्वकेंद्रित विनियोग करतात. हिंस्त्रता, शोषकता, विक्राळता, सत्तांधता यांना मूल्यात्मक स्थान समूहाच्या नैतिकविश्वात प्राप्त होते. असे मानवी समूह, दानव, राक्षस म्हणून इतिहासात ओळखले गेले आहेत. मानवी अर्जित नैतिकविश्वातील सर्व शक्तिमत्ता, अभ्यासपूर्वक साध्य करून, विनियोगीत करण्याचे प्रयत्न, असे समूहदेखील करतात. उपरोक्त, मर्त्यतेवर मात करण्याची शक्तिमत्ता त्यांनीही अर्जित केलेली असते. या समूहाला आधार देणारे, त्यांच्यातील धुरिण, मनोस्वरूपाच्या आकलन शक्तीने नव्या, विकसित शक्तिमत्ताही विकसित करून; त्यांचा स्वसमूहसापेक्ष स्वार्थपर, विनियोग करण्याची, समूहांतर्गत प्रणाली अवलंबितात. अखिल मानवी मनोस्वरूपाने, नैतिकविश्वात, आपल्या स्वसंवेद्य स्फुरणात्मकतेने निर्माण केलेल्या, सर्व दिव्य शक्तिमत्तांचा, व्यावहारिक असहिष्णू उपयोग, हा मानवी समूह करीत असतो. भारतीय परंपरेत प्राचीन वाङ्मयात दानव, असूर, राक्षस या मानवी समूहांची असंख्य उदाहरणे दिसतात. देव आणि दानवादींचा संघर्ष, हा यामुळेच, मानवी

प्रवृत्तींचा संघर्ष आहे; असे पुढे येते.

ज्ञानाचे उपयोजन, अस्तित्वाचे मूल्यात्मक आकलन, नैतिकविश्वातील अखिल मानवी विश्वसापेक्ष प्रणालीचे व्यवहार, या संबंधातील हा संघर्ष, मानवी नैतिकविश्वाच्या, परिवर्तनशील मांडणीसाठींचा संघर्ष असतो. यात अंशात्म मानवी जीवात्म्यांचा, अंशपुंजात्मक समुदाय केवळ प्रजा या स्वरूपात मर्यादित असतो. देवासूर संग्रामाचा मोठा परिणाम सर्वसाधारण मानवी जीवात्म्यांसह सर्व सृष्टीवर होतो. मानवांचा इतिहास हा योगविज्ञान, पदार्थविज्ञान, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, न्याय, नीती, धर्म आदिमानव अर्जित शास्त्राधारे, निर्मित नैतिकविश्वातील, या सर्व शास्त्रांच्या मानवकेंद्रित उपयोजनाच्या, प्रणाली संदर्भातील, प्रभुसत्तेच्या, संघर्षाचा इतिहास आहे. मानवी नैतिकविश्वनिर्मिती, ही मानवाच्या आरंभबिंदूपासूनची प्रक्रिया असल्याने, परिवर्तनात्मक गतिमानता आणि नित्यता स्वाभाविकपणे अनुभवास येते.

स्वेच्छा जन्म आणि स्वेच्छा मरण, अवतारस्वरूप अवतरण, परपार्थिव प्रवेश, मरणोत्तर जीवनात परपार्थिवाचा, स्वकेंद्रित उपयोग, विविध जीवात्म्यांच्या स्वरूपातील स्वात्मभाव प्राकट्य, मरणोत्तर अस्तित्वाचा, स्वेच्छापूर्तीसाठी विनियोग करतांना, तत्सम कार्यात, विनियोगीत होणे अशा अनेक प्रकारची अस्तित्वे; स्वीकारण्याची, भोगण्याची अभ्यासपूर्ण विद्या, मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्य स्फुरण प्रक्रियेने, बद्ध जीवनात अर्जित केली आहे. नैतिक विश्वातील या विद्यांच्या परंपरा व प्रणाली निर्माण झाल्या आहेत. या स्वरूपात सत्यनिष्ठ, न्यायनिष्ठ, परमात्मवृत्ती स्वभावाने, कर्मनिष्ठ विभूतिमत्त्वे दिसतात, तशीच आसुरी, राक्षसी, शोषक, स्वार्थी, आसक्त व्यक्तिमत्त्वेही, अनुभूत होतात. सर्वसामान्य मानवी जीवात्म्यांच्या नैतिकविश्वातील प्रणालींमध्ये, अशा व्यक्तिमत्त्वांना पूज्यभावाने किंवा भय या विकारासह सुरक्षाभावाने स्वीकारलेले दिसते. तंत्रशास्त्राच्या प्रयोगांमध्ये, अशा अस्तित्वांचा विनियोग, जारण आणि मारण अशा दोन्ही प्रयोगासाठी केला जातो. या अस्तित्वांमध्ये देव, ऋषी, योगी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, शास्त्रे, चिंतक, कवी, लेखक, कलावंत, या सर्व अस्तित्वांचा समावेश असतो. अवतारित होणे ही प्रक्रिया, स्वेच्छाजन्म स्वरूपाची असते. भारतीय परंपरेत, सर्व देवांच्या संदर्भात, शक्तिमत्तेनुसार मानवी जीवात्म्यांच्या स्वरूपात, अवतारांचा अनुभव, इतिहासात व लोक मौखिक परंपरेत, नोंदविला आहे. जागतिक परंपरेतही याची उदाहरणे सापडतात. भूत, प्रेत, पिशाच्च, सैतान, मुंजा, खविस, चेटकीण, हडळ, ब्रह्मसमंध,

ब्रह्मराक्षस या नावांनी ओळखली जाणारी, मरणोत्तर मानवी लिप्त, आत्मांश स्वरूपात वावरणारी अस्तित्वे, लाखो वर्षांच्या मानवी जीवनप्रणालीने अनुभवली आहेत. मरणोत्तर बद्धलिप्त आत्मांश, परिपूर्तीपर्यंत जीवउत्पत्ती प्रक्रियेपासून, स्वतःचे पृथकत्व राखत वावरतो. तो आत्मांश वरीलप्रकारे, मानवी रूपांत जसा दृश्यमान किंवा भासमान होतो; तसाच तो विविध प्राण्यांच्या पार्थिवांचा वापर करूनही, वावरतांना दिसतो. ही गोष्ट मानवेतर प्राण्यांच्या संदर्भातही घडत असते. अनेकदा मानवी शरीराचा वापर हे जीवात्मे करतात. यातूशास्त्र, तंत्रशास्त्र यांचे मंडन मानवी मनोस्वरूपाने अनुभवसंचिताधारे केले असून, या अस्तित्वांना आकळण्यासाठी, त्यांना पुन्हा जीव प्रक्रियेत समाविष्ट करण्यासाठी, अर्थात भूतदशामुक्त करण्यासाठी, तसेच नैतिकविश्वातील अपेक्षापूर्तीसाठी तंत्रशास्त्र व यातुशास्त्राने, विधीविधानांचे मंडन, शास्त्रीय स्वरूपात, लाखो वर्षांच्या अनुभवसंचिताधारे केले आहे. मानवी जीवात्म्यांचे जीवन जैविकतः जसे पृथ्वीच्या कक्षेत बद्ध आहे तसेच त्यांच्याच स्वसंवेद्य स्फुरक मनोस्वरूप शक्तिमत्तेने, आत्मपुंजात्मक वैश्विक मानवी जीवनप्रणालींची मांडणी करण्याची प्रक्रिया, प्रारंभबिंदूपासून सुरू ठेवली आहे. त्याअंतर्गत व्यवस्थेत नैतिकविश्वाला, परमात्मस्वरूपाचे सामर्थ्य निर्माण झाले आहे. या सामर्थ्यामुळे, सच्चिदानंदस्वरूप परमात्म्याच्या, स्वसंवेद्य स्फुरण मनोस्वरूपाचे परिमाण, नैतिकविश्वाला प्राप्त झाले आहे. परमात्म्याच्या स्वाभाविक स्वसंवेद्य स्फुरणप्रक्रियेतून, अवघेपणांतर्गत, पृथकत्व प्राप्त बद्ध ब्रह्मांडांतर्गत, पृथ्वी कक्षेच्या बद्ध अस्तित्वात, जीवात्म्यांची बद्धता अशी क्रमाने, शृंखलाबद्ध अपरिहार्यतेने, आलेल्या बद्धतेसह, मानवी जीवन सुरू आहे. या सर्व बद्धतेत नरदेहाने स्वतःच्या आत्मांश आणि आत्मांशपुंज अशा मनोस्वरूपाला लाभलेल्या जीवात्मास्वरूप व्यवस्थेला, अन्य जीवात्म्यांपेक्षा, वेगळेपणाच्या स्वसंवेद्य स्फुरणप्रक्रियेने, नैतिकविश्वाची निर्मिती, थेट प्रतिपरमात्मास्वरूपाने केली आहे. या नैतिकविश्वाची बद्धता, प्रारंभबिंदूपासून स्वीकारली. त्यात मानवी जीवात्म्याची दैवी, पूज्य, सामान्य, सुष्ट, दुष्ट, त्याज्य अशा विविध व्यक्ती आणि व्यक्तीसमूहांच्या परंपरा, प्रारंभापासून आढळतात.

हे नैतिकविश्व, मानवी आत्मांशपुंजसमूहाच्या मनोस्वरूपाने, निर्माण केले आहे; असे आपण म्हणतो; तेव्हा नैतिकविश्वाचा आरंभबिंदू नेमका केव्हां, कोणता आणि कसा; असे प्रश्न जीवात्मा – स्थितीगती स्वरूप संबंधाविषयी, विचार करतांना पडतो. नैतिकविश्व हे मानवाने, मानवासाठी मानवांतील धुरिणांनी

व्यवस्थापित केले आहे हे खरे. असे असले तरी, त्यात मानवेतर जडचेतन सृष्टीचा, मानवसापेक्ष विचार अपरिहार्यपणाने केला आहे. सृष्टीतील, आहारविहारात्मक जीवन, परस्परावलंबी असल्याची जाणीव, स्वाभाविकपणे, आरंभबिंदूपासूनच, माणसाला आहे. अवघी सृष्टी ईश्वराने मानवासाठी निर्माण केली आहे, असा कल्पही, अनेक मानवी समूहपरंपरांनी मांडला आहे. माणसाने सृष्टीचा उपभोग विवेकपूर्वक घ्यावा एवढीच अट आहे. यात शास्ता, शासन आणि शासित, असा भाव व्यक्त झाला आहे. ईश्वरकल्पना ही दोन स्तरांवर स्वीकारली आहे. एक म्हणजे, परमात्मास्वरूप अनंत ब्रह्मांडाचा स्वामी आणि दुसरा स्तर, पृथ्वीसापेक्ष किंवा सूर्यमालासापेक्ष व्यवस्थापक प्रभुसत्ता. या ठिकाणी आपण चर्चा करतांना परमात्मा, ईश्वर, देव आणि जीवात्मा या संकल्पना, स्वरूपसंबंधाने स्वीकारल्या आहेत. हा स्वरूपसंबंध, स्वसंवेद्य स्फुरणात्मक निर्गुण, निराकार, निर्विकार, केवल, सार्वकालिक, सर्वव्यापक, महाशून्य, परब्रह्म, परमात्मास्वरूप, मनोस्वरूपाने सिद्ध होतो; असे तत्त्व स्वीकारले आहे. नैतिकविश्वाच्या मांडणीतील धर्म, प्रणाली, संस्कृती इ. संकल्पना मांडतांना, विविध प्रकारे मतभिन्नता असल्याचा आभास परंपरेने दिसत असला; तरी मनोस्वरूपाचा संकल्प स्वीकारला; की हे आभास, अंततोगत्वा, गळून पडतात; असा अनुभव, मनोस्वरूपाला येतो.

भारतीय परंपरेत, मानवी जीवात्म्यांच्या निर्मितीविषयी, संकल्प स्वीकारताना, भौतिक विज्ञानाच्या दृष्टीने, कारणपरंपरा शोधतांना मोठाच गोंधळ उडालेला दिसतो. स्त्री आणि पुरुष या लिंगभेदामुळे हा गोंधळ उडाला आहे. त्यातच पृथ्वीवरील सर्वच जीवात्म्यांविषयी विचार करतांना, अपवाद वगळता, सर्व जीवात्म्यांमध्ये हा लिंगभेद दिसतो. या अनुभवामुळे, एकातून द्विविध आणि द्विविधाच्या संयोगातून पुन्हा असंख्य द्विविध, असा कल्प मांडतांना, शिव-शक्ती, विष्णू-लक्ष्मी, ब्रह्म-माया अशी युगुले, ईश्वर स्थानी ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांच्या कथाही नैतिकविश्वात प्रसिद्ध आहेत. ही त्रिविध युगुले, एकातून द्विविध निर्मिती, या प्रक्रियेतून झाली आहेत; असे म्हणतांना, ही त्रिविध युगुले तरी कोठून निर्माण झाली; यांविषयी पुन्हा परब्रह्म-चिद्शक्ती किंवा श्रीकृष्ण-राधा, असे युगुल, हे परमयुगुल मानण्यात आले. जगाच्या पाठीवर, मानवी जीवात्म्यांच्या उत्पत्तीविषयी, मतभिन्नतेने कल्पना आल्या आहेत. तरी लोककथांचा धांडोळा केला तर; एकाचीच दोन अर्थात द्विविध झाली; अशा कल्पना येतात. कारण मानवी मनोस्वरूपाला प्राप्त संचित अनुभूतीच्या पलिकडे, पृथ्वीच्या कक्षेत,

कारणपरंपरा शोधता आलेली नाही. एका पेशीतून अनेक पेशी निर्माण होतात; याचा जैविक अनुभव हाताशी असला; तरी द्विविध निर्मिती प्रथम, का, कोणती, कशी झाली; याच्या संवेदना दिव्यानुभूती, या केवळ, स्वसंवेद्य स्फुरणप्रक्रिया स्वरूप अस्तित्व विचारात घेतल्याशिवाय होऊ शकत नाहीत. पृथ्वीच्या कक्षेत परमात्मस्वरूपापासून, त्रिविध परमात्मस्वरूपे, प्रत्येकी द्विविध स्वरूपात प्रकटली. हे प्राकट्य हेही, त्या एकल परमात्म्याच्या, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक, अविनाशी, महाशून्य, स्वसंवेद्य स्फुरणात्मपरब्रह्म अशा बद्ध अवस्थेतून, पृथ्वीपर्यंत पृथकत्वाचा स्वसंवेद्य स्फुरणात्मक प्रवास, स्वरूपसंबंधाने झाला आहे. पृथ्वीकक्षेतील मर्त्य तरी अविनाशी नित्यत्वाचा चक्रनेमिक्रम प्रत्यक्ष विज्ञानात्मकतेने स्वसंवेद्य स्वरूपात अनुभवतांना, त्रिविध ईश्वर-महाशक्ती स्वरूपांची निर्मिती, मनोस्वरूपांनी केली, असेच म्हणावे लागेल.

आज उपलब्ध प्राचीनतम वाङ्मयाचा आणि अनादिकालातून, चेतनात्मकतेने, पारंपरिक झालेल्या, 'ज्ञान' म्हणून ज्याचा आपण निर्देश करतो, त्याच्या मांडणीत, लोकधुरिण अशा द्रष्ट्या, प्रज्ञावंतांचा विचार पुढे येतो. पृथ्वीच्या ठायी असलेल्या सर्व अस्तित्वांच्या, स्वसंवेद्य स्फुरणात्मक स्वरूपाची जाणीव, सर्व अस्तित्वांना होत असतांना, मानवी अस्तित्वाला प्राप्त प्रज्ञेने, मानवांतील अंशपुंजात्मक स्वरूप स्थितीने, अर्थात समूह मनोस्वरूपाने, ही सर्वांठायीची, स्वसंवेद्य स्फुरकता, शक्तीस्वरूपात अनुभवून मानवी सापेक्षतेने, शक्तिमत्ता आणि परमात्मस्वरूपता यांच्या स्वरूपसंबंधाची संगती लावत; वाणीबद्ध नैतिकविश्व, निर्माणाची प्रक्रिया, मनोस्वरूपाने अवलंबिली. मानवी जीवात्म्यांचा स्वरूपसंबंध त्यातून सिद्ध झाला. त्याचप्रमाणे या धुरिणांनी, सर्वव्यापी अस्तित्वाचा स्वरूपसंबंध अनुभवत, प्रत्येक लहानात लहान अस्तित्व, घटना इ. ही त्या सर्वव्यापक अस्तित्वातील स्वसंवेद्य स्फुरणात्मक, प्रक्रियेचा, प्रक्रियात्मक भाग आहे, हे स्पष्ट केले. या प्रक्रियेत प्रक्रियांतर्गत, अडथळे आले तर; त्यांचे निराकरण, पूर्तता करीत, अखंडपणे, प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेत, जीवात्मा स्वरूपसंबंधाने सत्य, परिपूर्ण, स्वसंवेद्य तरी बद्धपणे, प्रक्रियेच्या अंतर्गत, कर्मवान होऊन जीवनाचे, जन्म, जीवन, मृत्यू - या चक्रनेमिक्रमाने अनुभवन करीत असतो, असे संकल्प मांडले आहेत. हे धुरिण म्हणजे, विविध संस्कृतीतील, विविध नावाने ओळखली जाणारी, ऋषीरूप विभूतिमत्त्वे होत.

●●●

# १३. मन–वाक्ब्रह्म

पृथ्वीवरील जीवांचे, वाणी, शब्द, नाद हे उपजत, स्वसंवेद्य आत्मस्वरूप प्रकटीकरण आहे. परब्रह्मांतर्गत पृथ्वीनामक अंशपुंजातील, जीव हा एक परिपूर्ण स्वसंवेद्य आत्मस्वरूप असा, अंशपुंज होय. पृथ्वीवरील समस्त जीवांचे अस्तित्व सारखेच आहे. या जीव अंशपुंजांच्या समुदायांतील, माणूस हा एक अंशपुंजसमूह होय. उद्भिज, स्वेदज, अंडज, जारज, अशा चार प्रकारांत, मानवी मनाने जीवसृष्टीची, विज्ञानात्मक मांडणी केली आहे. त्या प्रत्येक प्रकारांत, अगणित, अंशपुंज जातीसमुदाय आहेत. या चार प्रकारातील, जारज प्रकारांतर्गत अगणित अंशपुंज जातीसमुदायातील एक अंशपुंज जातीसमुदाय म्हणून; मानवजाती समुदायाची गणना, मानवी मनाने केली आहे. मानवी मनाने, या सर्व अंशपुंजात्मक जीवांच्या, पिंडस्वरूपांचे आकलनही केले आहे. मानवेतर सर्व जीवांचा मानवी जीवनसापेक्ष संबंध ओळखून; त्यांचे स्वसापेक्ष व्यवस्थापन केले आहे. समस्त जीवांना वाणी आहेच, असा कल्प मांडून; त्यांचे आकलन करतांना; मानवी वाणीचे व्यवस्थापन, आपल्या मनसामर्थ्याने केले आहे. वाणीच्या व्यवस्थापनाचा परमोत्कर्ष केला आहे. वाणीचे सामर्थ्य स्वसंवेद्य आत्मस्वरूपात्मक, परमशक्तीसह प्रकटू शकते; याचे आकलन करून; वाणीला स्वसंवेद्य, सद्–चिद्–आनंदस्वरूप, आत्मरूप असे स्थान दिले आहे. आत्मरूप, मानवी मन आणि मानवी वाणी यांचा स्वरूपसंबंध, मानवी मनाने प्रस्थापित केला आहे. वाणी हे, मानव या आत्म–अंशपुंजाचे, स्वसंवेद्य, मानवलोकसापेक्ष, आत्मप्रकटीकरणाचे माध्यम झाले आहे. मानव–मन माध्यम – वाणी, यांचे एकात्मरूप, स्वसंवेद्य वाङ्मयरूपाने, माणसाला जाणवते आहे. वाणी हे मानवाच्या स्वतःतील परमात्म अस्तित्वाचे स्वसंवेद्य रूप आहे; अशा स्वरूपात, पृथ्वीवरील अखिल मानवलोकचे वाणी हे व्यवच्छेदक, अनिवार्य अंग झाले आहे. वाणी सगुण, साकार, सविकार स्वरूपात, स्वसंवेद्य

आत्मस्वरूपात्मकतेने प्रकटते. वाणी ही मानवी जीवात्मस्वरूप आहे; असे संवेदित होत आहे. म्हणूनच माऊली ज्ञानेश्वरांनी, भावार्थदीपिका सिद्ध करतांना, आत्मरूप स्वसंवेद्य, वाणीरूपाने प्रकटलेल्या, ॐकाराला नमन केले आहे-

"**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।**
**जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।।**" ज्ञा.अ. १ ओ. १।।

ॐकाराचा, आद्य स्वसंवेद्य आत्मरूप, असा गौरव केला आहे. असा गौरव करण्याचे कारणही माऊलींनी सांगितले आहे. ॐकार हा वेद प्रतिपादित करणारा, आद्य असा आहे. पृथ्वी हे परमात्मअंशपुंजाच्या स्वरूपातील एक अस्तित्व आहे. परमात्मस्वरूप व पृथ्वी या अंशपुंजातील विविध अंशपुंजांचे, आत्मरूप स्वरूप सामर्थ्य, वेदात प्रतिपादित आहे. ते विविध ऋषींनी, विविध अंशपुंजांचे, त्यांच्या मनाला झालेले दर्शन, ॐकार - अर्थात वाणी स्वरूपात प्रतिपादिले आहे. या प्रतिपादित वाङ्मयाच्या परंपरा, म्हणजे वेद होय. ॐकार हा आद्य वाणी आविष्कार होय. वाणी आविष्काराचा, आरंभबिंदू म्हणून भारतीय परंपरेने ॐकार रूपाचा अनुभव नोंदविला आहे. विविध परंपरांनी ॐकाराच्या विविध पर्यायांचे दर्शन घेतले असेल; असे भाषिक वैविध्यावरून, अनुमान काढता येते. आद्य रूपाने, वाणीविकासाला चालना दिली असणार; हे उघड आहे. पृथ्वीवरील अंशपुंजात्मक मानवलोक अस्तित्वाची, शारीरिक रचना आणि मनस्वरूप, निश्चितच समान; तसेच मानवलोक अंतर्गत, एकात्म आहे. या गोष्टीची मानवलोकला दृढ जाणीव झालेली आहे. मानवाची मनोवस्था एकात्म आहे; याची साक्ष नेत्रपल्लवी, हावभाव, चित्रशैली, वस्तुविनिमय, यांवर आधारित, मानवी लोकसंबंध - साम्यावरून स्पष्ट होते. वाणी, वाङ्मयरूप धारण करेपर्यंत; नेत्रपल्लवी आदि प्रकारची, भाषामाध्यम सारणी असणे शक्य असल्याचा, तर्क मांडला जातो.

स्वसंवेद्य असे वाणी माध्यम गवसले, ही कदाचित; परमात्मस्वरूप अंशपुंजात्मक मानवी इतिहासातील, त्याच्या स्वसंवेद्य आत्मस्वरूप मनाची, पहिली अनुभव क्रांती म्हणता येईल. परमात्मस्वरूपाचे; अंशपुंजात्मक जीवात्मा स्वरूपातील बद्धतेच्या, अर्थात जीवन-मरण अशा कालावधीतील, स्वसंवेद्य आणि अष्टधाप्रकृतीयुक्त जीवन जगण्यासाठी; मानवी मनाने, अर्जित केलेले, स्वसंवेद्य, आत्मरूपात्मक व्यवहार माध्यम, म्हणजे वाणी होय. मानवाने वाणीची व्यवस्था, आत्मसंवेदनेसह दोन प्रकारे लावली आहे. एक म्हणजे संगीत, चित्र अशा

प्रयोगसिद्ध कलांच्या स्वरूपात; सगुण साकार, सविकार; तरी अक्षरे, शब्द, चिन्हे यांच्या विरहित अशी व्यवस्था आहे. दुसरी व्यवस्था ही भाषा घटना स्वरूपात आहे. वाणीचे दर्शन मानवी मनाने चार स्वरूपात घेतले आहे. या चार प्रकारांना, मानवी मनाने, परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी, अशी नावे दिली आहेत. यातील मुख्य, तात्त्विक आणि सर्वात्मक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ह्या दोन्ही व्यवस्था, पृथ्वीवरील अंशपुंजात्मक, मानवी जातीसमूहाच्या, म्हणजे समूहमनाच्या, अर्थात लोकमानसाच्या स्वसंवेद्यतेसह, लोकमान्य स्वरूपात, पारंपरिक झाल्या आहेत. या परंपरांचे शास्त्रीय नित्य स्वरूपही, लोकमानसाने, पारंपरिकतेच्या नित्यतेसह, तसेच परिवर्तनाच्या संवेद्यतेसह, अर्जित केले आहे. पृथ्वीवर एकूण मानवजातीत वाणी व्यवस्थेच्या अनेक परंपरा, स्वसंवेद्य स्फुरणप्रक्रियेसह निर्माण होऊनही; पृथ्वी अस्तित्व आणि मानवी जीवन यांशी स्वरूप संबंधासह, बद्ध स्वरूपात, प्रकट व पारंपरिक दिसतात. अशा अनेक परंपरांमध्येही, मानवी जातीसमूहातील, एकात्म जीवात्मभाव, समत्वाने आविष्कृत होतो आहे. त्यातूनही, पृथ्वीवरील मानव, हा एक परिपूर्ण अंशपुंजसमूह असून; तो समूह एकात्म स्वरूपसंबंधानेच बद्धतेत कर्मवान आहे. अशा वाणीसह कर्मवानतेतही त्याचा, परमात्मा आणि जीवात्मा स्वरूपांचा, स्वरूपसंबंध, याविषयीची स्वसंवेद्यता स्वस्वरूपात्मकतेने, प्रकट करता येऊ शकेल; याचे शास्त्रही, याच वाणी व्यवस्थेच्या सहाय्याने, मानवी मनाने मांडले आहे. संगीत, भाषाविज्ञान, वाणीसामर्थ्यविज्ञान, या स्वरूपातील मानवी मनाने केलेले, वैज्ञानिक मंडन, मनाबरोबरच वाणीचेही स्वसंवेद्यतेचे सामर्थ्य प्रदर्शित करते आहे.

मानवी जीवात्मा एकटा, समूहाने आणि सर्वव्यापकत्वाने अशा त्रिविधतेने एकाचवेळी, स्वसंवेदित मनोस्वरूपाने जगणारे, अस्तित्व आहे. वास्तविक एखादा दुसरा अपवाद वगळता, पृथ्वीवरील सर्वच प्राणीमात्रांच्या बाबतीत हे विधान मांडता येते. मानवाचे मनोमयी वाक्‌जीवन विचारात घेऊन; त्यासंबंधी वेगळी चर्चा आपण करीत आहोत. अशाप्रकारे जगत असतांना, स्वसंवेदित मनोस्वरूपाने, लोकजाणिवेने, सूक्ष्मातिसूक्ष्म, सर्व प्रकारच्या, अनुभूत अशा जड, चेतन, दृश्य, अदृश्य, अस्तित्वांना, मानवी जीवनसापेक्षतेने लोकसंबंधितपणे, व्यवस्थापित करण्याची प्रक्रिया, अखंडपणे सुरू ठेवली आहे. मानवी जीवात्म्यांचे वाक्‌ब्रह्मस्वरूप अस्तित्व आहे. लोकजाणिवेतून सर्व प्रकारच्या, प्रत्येक संवेदनेला जीवात्म्याच्या स्वाभाविक बद्धतेने, नामकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'माणूस हा नावे

ठेवणारा प्राणी आहे' अशी माणसाची एक व्याख्या या प्रक्रिये आधारे करता येते. मानवाच्या व्यक्तिगणिक, सामूहिक आणि सर्वात्मक संबंधांना, जाणिवांना, हालचालींना, कल्पनांना, आकारांना दृश्यादृश्य अस्तित्वांना, वृत्ती-प्रवृत्तींना, कर्मपरतेच्या समूहजीवनातील व्यक्ती आणि सर्वात्मक संवेदनांना; मानवी मनाने स्वसंवेद्य आत्मरूपात्मक मनस्वरूपाने, वाक्ब्रह्मांतर्गत, पृथक नामासह, व्यवस्थापित केले आहे.

पृथ्वीवर मानवी जीवनांचे, स्थलकालपरिस्थिती सापेक्ष असंख्य लोकजीवनाकार दिसतात. हे लोकजीवनाकार, परमात्म अंशपुंजाच्या, समूहस्वरूप पृथकत्वाने, अस्तित्वात असल्याचे भासत असले तरी; पृथ्वीवरील मानवी जीवात्म्यांची, परमात्म अंशपुंजात्मकता, एकात्मरूपाने लोकजीवन जगते आहे, असे संवेदित होते. प्रत्येक लोकजीवनाकाराची वाणी, भिन्न भाषिकरूपात प्रकटते, असे वाटले तरी; त्या भाषिकरूपांत वाक्ब्रह्मस्वरूपात, अर्थात संवेद्यतेच्या स्वरूपात, समत्व असल्याचे लक्षात येते. या सर्व भाषिक रूपांचा तुलनात्मक अभ्यास केला तर; पृथ्वीवरील मानव अवघा एक असे संवेदन घडते. या जाणिवेने वाणीचा अर्थात वाक्ब्रह्माचा, जीवात्म्याशी आणि परमात्म्याशी, बद्धतेच्या पलिकडील असा, स्वरूपसंबंध, सिद्ध होतो.

परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी याच प्रकारात्मक वाणी स्वरूपात, हे वाक्ब्रह्म, पृथ्वीवर, एकूण मानवी जीवनसारणी, अनादीपणाने प्रवाहित आहे. याच कारणाने सर्व भाषांतील रचनांना अध्यात्मिक, भौतिक अशा संवेदनांचे, स्वसंवेद्य आत्मस्वरूपात्म सामर्थ्य, प्राप्त झालेले आहे. संगीत, चित्र आणि वाङ्मय, या स्वरूपात प्रकटणाऱ्या वाणीला; स्वसंवेद्य आत्मरूपात्मक, मनस्वरूप प्राप्त झाले आहे. या स्वसंवेद्य आत्मरूपात्मक मनाने वाणीचे व्यवस्थापन करून; परमात्म्याच्या, पृथ्वीस्वरूपातील अंशपुंज शक्तींनाही, अर्थात- पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश आणि त्रिगुण - अशा अष्टधा प्रकृतीला, मानवी जीवात्मरूपांच्या सापेक्षतेने, आत्मसात करून; स्वेच्छेने विनियोगित करण्याची, विद्या अर्जित केली आहे. अर्थात मनःपूत वाक्ब्रह्माला, मंत्रसामर्थ्य सिद्ध करून; वाणी द्वारा विनियोगित केले आहे.

वाणीच्या भाषारूपाने, मानवी मनाशी स्वरूपसंबंध प्रस्थापित केला आहे. ही गोष्ट ऐतिहासिक स्वरूपात विचारात घेता कामा नये. अंशपुंजात्मक बद्ध अशा जीवात्म्याचा, स्वसंवेद्य आत्मरूप, मनोरूपाशी, वाणीचा स्वरूप संबंध, स्वाभाविकपणे

सिद्ध झाला आहे. परमात्मस्वरूपातील, बद्ध अशा, असंख्य अंश आणि अंशपुंजात्मक अस्तित्वातील; पृथ्वी हा एक बद्ध अंशपुंज आहे. त्या अंशपुंजांतर्गत जीवात्मा हा बद्ध अंशपुंजसमूह आहे. त्या जीवात्मा अंशपुंजसमूहातील, माणूसलोक, हा एक बद्ध अंशपुंजसमूह आहे. एकूण परमात्म्यांतर्गत बद्ध स्वरूपातील जीवात्म्याचा, स्वसंवेद्य आत्मस्वरूप असा, जीवात्म्याचा स्वरूपसंबंध आहे. त्या बद्ध अवस्थेतील आत्मरूपाशी मनाचा आणि मनाशी वाणीचा स्वरूपसंबंध, हा अनंतातील स्वसंवेद्य आत्मरूप संबंध आहे. हे लक्षात घेतले की बद्धतेतील आणि बद्धतेत प्रकटलेल्या मनोमयी वाणीरूपातील, परिपूर्ण, स्वसंवेद्यता लक्षात येईल. या संबंधामुळेच, जीवात्मा – मनोमयता – वाणी अर्थात भाषा, असा स्वरूपसंबंध मूळातून प्रसिद्ध असल्याचे सिद्ध होते.

पृथ्वीवरील मानवी वाणीच्या संगीत, चित्र आणि शाब्द इ. स्वरूपात असंख्य परंपरा, मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासून निर्माण झाल्या आहेत. या परंपरांचे समग्रस्वरूप रूपकात्मकतेने, माऊली ज्ञानेश्वरांनी, श्री आत्मरूप गणेश वंदनेच्या रूपाने, वर्णिले आहे. त्यात त्यांनी 'सकलमतिप्रकाशु' अशा गणेशांचे वर्णन केले आहे. रूपकात्मकता बाजूला ठेवली तरी; मन म्हणजेच गणेश असाही अर्थ यातून संवेदित होतो. म्हणजे 'आद्य स्वसंवेद्य आत्मस्वरूप गणेश, हाच सकलमतिप्रकाशक, शक्तीस्वरूप, म्हणजेच मनःस्वरूप आहे'; असे म्हटले आहे. याचाच अर्थ आत्मरूप – मनोरूप – 'शब्दब्रह्मअशेष', अशी वाणी ॐकार, यांचा स्वरूपसंबंध स्पष्ट केला आहे–

**''हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष ।**
**तेथ वर्ण वपु निर्दोष । मिरवत असे ।।३।।''** (ज्ञा.अ. १, ओ. ३)

भारतीय परंपरेतील श्रुति, स्मृति, पुराणे, पदबंध, काव्यनाटके, अनेक प्रकारची प्रमेये, षडदर्शने, तर्क, वेदान्त, बौद्धादिमते, विविध वाद, दशोपनिषदे, असे, ललित, वैचारिक, अध्यात्मिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, असे सर्व प्रकारचे साहित्य; या ॐकारस्वरूप, स्वसंवेद्य आत्मस्वरूप, अर्थात वाणीरूपी गणेशस्वरूपात एकवटले आहे. संपूर्ण आत्मस्वरूपाचे मनोस्वरूप, वाणीस्वरूपातून स्वसंवेद्यतेने प्रकटते आहे. याचेच वर्णन माऊलींनी ॐकारस्वरूप गणेशरूपकातून केले आहे,

**''अकार चरणयुगुल । उकार उदरविशाल ।**
**मकार महामंडळ । मस्तकाकारें ।।१९।।**

**हे तीन्ही एकवटलें । तेथें शब्दब्रह्म कवळले ।**
**ते मियां श्रीगुरुकृपा नमिले । आदिबीज ।।२०।।**"

(ज्ञा.अ. १ ओ. १९ व २०)

श्री माऊली ज्ञानेश्वरांनी, वाणीच्या, अर्थात भाषेच्या, आदि बीजास, आत्मरूप, आद्यप्रतिपादिता, वाणीस्वरूप, असे मानले आहे. पृथ्वीवरील मानवाने आपले सर्व अस्तित्व, या वाणीरूपात अर्थात शब्दब्रह्मात प्रकटविण्याचा प्रयत्न केला आहे. मानवाच्या आत्मरूप स्वसंवेद्य, मनोस्वरूपाने; मानवलोक स्वरूप बद्ध अवस्थेतील, जीवात्मस्वरूप अवस्थेचे, प्राकट्य वाणीस्वरूपात करण्याचा प्रयत्न केला आहे. बद्धअंशपुंजात्मक अस्तित्वाचा, परमात्म अशा केवळ, अनंत, सद्-चिद्-आनंद स्वरूप निर्गुण, निराकार, निर्विकार अस्तित्वाअंतर्गत; स्वसंवेद्य आत्मरूपात्मक, बद्ध सगुण, साकार, सविकार स्फुरण स्वभावाचे, प्राकट्य वाणीद्वारे आविष्कृत केले आहे. बद्धतेच्या योगाने स्वसंवेद्यस्फुरण प्रक्रियेतही, बद्धतेच्या नियमन प्रक्रियेसाठी, अष्टधाप्रकृतीसापेक्ष, संघर्ष, भावभावना, वृत्ती-प्रवृत्ती, जाणिवा, यांच्यासह, बद्ध स्वसंवेद्यता, प्रकट होत असते. त्यामुळे अर्थातच बद्ध अंशपुंजात्मकतेचे अवघे स्वरूप - सुष्ट आणि दुष्ट, संघर्षमय, कर्ममय इ. प्रकारे - वाणीरूपातून आविष्कृत होते. भारतीय परंपरेतीलच उदाहरण द्यावयाचे तर; आत्मरूप-मनोस्वरूपाचे अंशपुंज स्वरूपातील सुष्ट-दुष्ट रूप प्रकट होते - वाणीद्वारे विद्या, अविद्या इ. स्वरूपात पदबंध प्रकटणे अपरिहार्य असते. जारण विद्येबरोबर मारण विद्याही प्रकटते. सद्‌विद्येबरोबर कुटील विद्याही प्रकटते.

मनोस्वरूप वाणीचे, असे शब्दब्रह्मस्वरूप, जगभरात विविध भाषांत, प्रकटले आहे. ते भावसंबंधाविषयी आहे; तसेच ते विज्ञानांविषयी आहे. संगीत, चित्र, हावभाव स्वरूपात आहे; तसेच ते चिन्हव्यवस्था प्रतिके, प्रतिमा, अक्षरे, शब्द, वाक्ये, आदि; भाषा वैज्ञानिक आणि वाङ्मय, अर्थात साहित्यकला अंतर्गत, पदबंधांच्या स्वरूपात, परिभाषेच्या स्वरूपात, लोकभाषेच्या स्वरूपात, नागर भाषेच्या स्वरूपात, बोलीभाषा, प्रादेशिक भाषा, मध्यवर्ती भाषा आणि ग्रंथभाषेच्या स्वरूपातही प्रकटले आहे. अशा शब्दातून लोकजीवन लौकिकता आणि पारलौकिकता, प्रकृती, संस्कृती, विकृती यांचे दर्शन घडवित, रूप प्रकट होते आहे. मन, आत्मरूप आणि वाणी यांची स्वरूपता, मानवी जीवनाच्या बद्धस्वरूपातील स्वसंवेद्य आत्मरूप-मनोस्वरूप, यांतून सिद्ध होते आहे.

●●●